गोष्टीरूप गांधीजी

[परिवर्धित संस्करण]

लेखक

साने गुरुजी

परिवर्धक

यदुनाथ थत्ते

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगाव, मुंबई

किंमत पंचवीस रुपये

© कर्नाटक प्रकाशन संस्था

पहिली आवृत्ती : १९४४
दुसरे पुनर्मुद्रण : १९५३
तिसरे पुनर्मुद्रण : १९६२
चौथे पुनर्मुद्रण : १९९४

प्रकाशन क्रमांक १००५

कर्नाटक मुद्रणालय, मुंबई २
यांनी छापलेल्या मूळ प्रतीवरून
पुनर्मुद्रण केले आहे.

मुद्रक
प्र. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई-४०० ००४.

प्रकाशक
धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.

साने गुरुजी आणि गांधीजी

गुरुजींचा आणि गांधीजींचा प्रत्यक्ष भेटीचा संबंध फक्त एकदाच आला होता. अमळनेरवरून गांधीजी कोठेंसे जात होते. गुरुजींना बळजबरीनें गांधीजींच्या डब्यांत कोणीतरी लोटलें. गुरुजींचा शालीनता व संकोची स्वभाव. थोर पुरुषांच्या पासुन ते दूर दूर असत आणि त्यांच्या कर्ममय मूर्ति दुरुन पाहून ते स्फूर्ति घेत. महापुरुषांच्या जीवनांतला एखादाही क्षण आपल्यासाठीं विनाकारण खर्चीं पडावा अशी त्यांना इच्छा नसे. त्या वेळीं गांधीजी दोनच शब्द त्यांच्याशीं बोलले. म्हणाले, "श्रद्धा होना." गुरुजींना तीं अमृतवाक्यें मिळालीं. गुरुजींच्या जीवनाचा आधार असलेलीच गोष्ट गांधीजींनीं उच्चारली तेव्हां गुरुजी गांधीजींचे झाले तर नवल नाहीं.

गुरुजींच्या जीवनाला सर्व जगाशीं एकरूप होण्याची तगमग होती, गरिबांच्या मधून ईश्वराचें दर्शन होणार, जन तोचि जनार्दन, अशी त्यांची भावना होती आणि गांधीजींच्या जीवनांत सामान्य जनतेशीं एकरूप होण्याची तळमळ पाहून गुरुजी गांधीजींच्याकडे आकर्षिले गेले. एक पराधांश गांधी, एक पराधांश रवींद्रनाथ टागोर आणि एक पराधांश रामकृष्ण परमहंस बनणें हें त्यांनीं आपल्या जीवनाचें ध्येय मानलें होतें.

गुरुजींच्या जीवनपुष्पाचा जो मंदमधुर मंगल सुवास महाराष्ट्रांत सर्वत्र दरवळून राहिला आहे, त्याचें श्रेय गुरुजी कृतज्ञतेनें ह्या थोरांना अर्पण करून मोकळे होत. त्यामुळेंच गुरुजींच्या जवळ अहंकार नसे. गांधीजी हा गुरुजींच्या जीवनाचा सूर्य होता. हा सूर्य दूर तळपत असला तरी त्यापासूनच उष्णता आणि प्रकाश मिळवून गुरुजी आपलें जीवनपुष्प फुलवीत होते.

गुरुजींच्या वाङ्मयांतही आपल्याला सर्वत्र गांधीविचारांचें दर्शन होतें. महाराष्ट्राला गांधीजींची खरी ओळख करून देण्याचें श्रेय ज्या थोड्या व्यक्तींना आहे त्यांत गुरुजींचें स्थान फार वरचें आहे. मानवी मनाची उंच भरारी

आणि मानवी मनाचा कमकुवतपणा ह्या दोन गोष्टींची जाणीव दोघांच्या जीवनांत विपुल होती, कारण ते दोघे जन्मजात थोरपण घेऊन आलेले नव्हते. थोरपण स्वप्रयत्नानें मिळविणारे दोघेही जीवनवीर होते. गुरुजींचें वाङ्मय 'पत्री' पासून सुरू झालें. त्यांनीं अखेरचें जें वाङ्मय लिहिलें तें म्हणजे 'सुंदर पत्रें.' किंवा विद्यार्थी मासिकापासून त्यांनीं जी साहित्यसेवा सुरू केली ती 'साधना' साप्ताहिकापर्यंत. ह्या सर्व साहित्यांत गांधीजींचें सर्वत्र दर्शन होतें.

गांधीजींना असें सदैव वाटे कीं आपलें कांहींतरी जीवितकार्य आहे. साहित्य हा त्यांचा स्वधर्म कधींच नव्हता. तीच गोष्ट गुरुजींची. साहित्य-संमेलनांतून गुरुजी जात नसत. कारण ते म्हणत कीं साहित्य हा कांहीं माझा स्वधर्म नव्हे. मीं लेखणींच्या लालित्यापेक्षां झाडूच्या लालित्याचा उपासक आहें. आज महाराष्ट्रांत कांहीं उदार विचारांचा प्रचार व्हावा अशी तळमळ वाटते म्हणून 'साधना' चालवतों. साहजिकच लेखणीच्या लालित्यापेक्षां गुरुजींचें लक्ष आपण लेखणीच्या द्वारें कोणते विचार जनतेला देतों ह्याकडे असे आणि आपल्या लेखणींतून एकही शब्द निरुपयोगी जाऊं नये असें त्यांना वाटे. त्यामुळेंच त्यांचें वाङ्मय प्रचारकी थाटाचें असल्याची साहित्यिकांची ओरड होती आणि ही गोष्ट गुरुजीही कधीं नाकारीत नसत. जर उच्चारलेल्या शब्दानें कांहीं संस्कार जनमनावर उमटणारच असेल तर तो संस्कार सत् आहे कीं असत् आहे हें पाहाणें त्यांना कर्तव्यरूप वाटे. ह्यामुळें विस्तारभयाची गुरुजींनीं कधीं पर्वा केली नाहीं. विचारांचा संयम मात्र त्यांनीं पाळला.

गांधीजींच्या १९३० पासूनच्या सर्व चळवळींत ते एक निष्ठावान् सैनिक म्हणून सामील झाले होते. आणि तेही गांधीजींच्याप्रमाणेंच "संसारासी आग लावुनियां हातें । मागुतें पेटोतें पाहूं नये॥" ह्याच गांधीजींच्या निष्ठेनें. गांधीजींच्या विधायक कार्याचा त्यांनीं सर्व प्रकारें प्रचार केला. खादीचे गठ्ठे खांद्यावर टाकून ते खानदेशांत भटकले, तकली आणि

चरखा त्यांनीं सर्वत्र नेला. जातीय ऐक्याचा तर त्यांना ध्यास होता. सामाजिक विषमता नष्ट व्हावी म्हणून ते तळमळत. किसान कामगारांना चार घास सुखाचे मिळाले पाहिजेत म्हणून त्यांनीं खानदेशांत चळवळी केल्या. ३० सालच्या लढ्यांत ते होते. ३२ सालीं पुन्हा तुरुंगांत होते. ह्याच काळांत गांधीजींचें सान्निध्य लाभलेल्या थोर पुरुषांचा सहवास त्यांना लाभला. स्वामी आनंद, प्यारेलाल, वगैरे लोक नाशिक जेलमध्यें त्यांच्या जवळ होते. आणि विनोबाजी, जमनालालजी धुळें जेलमध्यें त्यांच्या जवळ होते. विनोबाजींना तर गुरुजींच्या जीवनांत गुरूचें स्थान होतें. १९४०च्या वेळीं गुरुजी अगोदरच जेलमध्यें होते. १९४२ च्या आंदोलनांत ते गांधीजींच्या 'करेंगे या मरेंगे' ह्या संदेशाबरहुकूम भाग घेत होते. गुरुजींनीं मंदिरप्रवेशाचा दौरा आरंभला त्या वेळींही गांधीजींचें स्मरण गुरुजींना वारंवार होत असे. १९३२ सालीं गांधीजींनीं हरिजनांसाठीं उपास केला पण समाजांतून अजून अस्पृश्यता गेली नाहीं. गुरुजी त्या वेळच्या आपल्या भाषणांत सांगत, "तुमचीं आमचीं हृदयें ह्या कामांत रंगावीं अशी महात्माजींस उत्कट इच्छा होती. १० वर्षांत ही अस्पृश्यता जाईल अशी त्यांना आशा होती. दहाचीं पंधरा वर्षें झालीं पण आपणास काय दिसत आहे? गांधीजी काय म्हणतील? त्यांना आशा होती कीं स्वातंत्र्योन्मुख हिंदी राष्ट्र अस्पृश्यता झपाट्यानें दूर करील. परंतु आपण उदासीन राहिलों. राष्ट्रपित्याची मान तुमच्या आमच्या उदासीनतेमुळें खालीं व्हावी असें तुम्हांस वाटतें का? कशाला आपण 'महात्मा गांधी की जय' म्हणावें? आपण कामचुकार ठरलों!" ह्याच भावनेनें गुरुजी बेचैन झाले आणि गांधीजींचें कार्य करण्याच्या हेतूनें त्यांनीं पंढरपूरच्या मंदिर-प्रवेशाची महान् यात्रा केली आणि नंतर उपवास केला. जनमनाचा कौल त्यांना हवा होता, हृदयमंदिरांतही हरिजनांना प्रवेश मिळावा असें त्यांना वाटत होतें. केवळ कायदे करण्यानें हृदयमंदिरांत प्रवेश होणार नाहीं ही त्यांना खात्री होती. पण गुरुजींची ही तळमळ, ही थोरवी

महाराष्ट्रांतल्या तत्कालीन सत्ताधीशांना समजली नाहीं. गांधीजींचा गैरसमज झाला. त्यांनीं उपवास बंद करा म्हणून कळविलें. परंतु गुरुजींचा निश्चय अभंग होता. 'सत्या असत्यासी मन केलें ग्वाही' म्हणून त्यांनीं उपवास चालूच ठेवला. नंतर गांधीजींना खरी परिस्थिति समजली. पंढरपूरचें मंदिरही उघडें झालें. गांधीजींनीं दिल्लीच्या एका प्रार्थनाप्रवचनांत गुरुजींचा उल्लेख करून त्यांना धन्यवाद दिले. ते ता. २५।११।४७ रोजीं आपल्या प्रार्थनासभेंतील भाषणांत म्हणाले : "दूसरी खुशीकी बात यह है कि पंढरपूरका पुराना और मशहूर मंदिर ठीक उन्हीं शर्तोंपर हरिजनोंके लिये खोल दिया गया है जैसा कि दूसरे हिंदुओंके लिये। इसका खास श्रेय साने गुरुजीको है, जिन्होंने उसे हरिजनोंके लिये हमेशाके वास्ते खुलवानेके मकसदसे आमरण उपवास शुरू किया था।"

पुढें देशाचें स्वातंत्र्य आलें, फाळणी झाली. देशांतली जातीयता उफाळून वर आली. पुण्याच्या रस्त्यावर 'गांधी मरोत', 'नेहरू मरोत' असें लिहिलेलें गुरुजींनीं पाहिलें. गुरुजींना अत्यंत वेदना झाल्या. स्वातंत्र्याच्या बरोबर निर्माण झालेलें जातीयतेचें विष ह्या नवस्वतंत्र राष्ट्राला बाधूं नये म्हणून गांधीजी प्रयत्न करीत होते. आणि ३० जानेवारीला एका महाराष्ट्रीयानें गांधीजींवर गोळया झाडल्या आणि त्यांची हत्या केली. गुरुजींचें हृदय शतशः विदीर्ण झालें. त्यांच्या प्रियतम महाराष्ट्रावर हा केवढा कलंक. जातीयतेचें विष जर महाराष्ट्रांतून न जाईल तर महाराष्ट्रीयांची स्थिति फार शोचनीय होईल. म्हणून गुरुजींनीं महाराष्ट्र-जीवनांतली जातीयता जावी म्हणून हृदयशुद्धीसाठीं २१ दिवसांचा उपवास केला आणि साऱ्या महाराष्ट्रभर जातीयताविरोधाची एक लाट उसळवून दिली.

राष्ट्रपिता गेला. पण रडून काय होणार ? राष्ट्रपित्यानें दाखविलेल्या मार्गानें जाऊनच त्याचें पुण्यस्मरण करायचें असतें. गुरुजींनीं ह्याच हेतूनें

नगर वाचनालय सातारा.

कर्तव्य ' नांवाचें एक दैनिक सुरू केलें. " स्मरुनि हृदयीं तूंतें, कर्तव्य निज चालवूं " हा शिरोलेख त्यांनीं दैनिकावर घातला होता आणि त्यांतूनच त्यांनीं बापूजींच्या जीवनांतील लहान सहान प्रसंगांतून त्यांच्या जीवनदृष्टीचें दर्शन घडविणाऱ्या छोट्या गोड गोष्टी लिहावयाला सुरुवात केली. गांधीजींचें चरित्र गातांना गुरुजींना कधीं कंटाळा आला नाहीं, कधीं पुरेसें वाटलें नाहीं. गांधीचरित्रांत ते रंगून जात. त्यांची तर इच्छा अशी होती कीं हरिविजय, रामविजय ह्यांच्याच धर्तीवर १०८ अध्यायांचा एक गांधीविजय लिहावयाचा. ती वस्तु अपूर्व झाली असती. पण गुरुजी ' गांधीविजय ' लिहूं शकले नाहींत.

आपल्या आयुष्याच्या अखेरीस गुरुजींनीं ज्या एका कामाचा ध्यास घेतला होता तें आन्तरभारतीच्या स्थापनेचें कार्यही गांधीजींच्याच कार्यांपैकीं एक होतें म्हटलें तरी चालेल. गांधीजींना प्रांतीयता नको होती, जातीयता नको होती. जेथें जेथें संकुचितता असेल तेथें तेथें गांधीजींचा आत्मा कधींच रमला नाहीं. गुरुजींचेंही तसेंच होतें. भारतीय आत्म्याची एकरूपता अनुभवण्याची, विविधतेंत एकता पाहाण्याची तळमळ अखेरीस गुरुजींना लागून राहिली होती.

आणि शेवटीं शुक्रवारीं गुरुजींनीं मृत्यूच्या मांडीवर निर्भयपणें आपलें डोकें ठेवल्याचें कळलें, तेव्हांही साहजिकच त्याचाही संबंध गांधीजींच्या निर्वाणाशीं लावल्यावांचून आम्ही राहूं शकलों नाहीं. खादीच्या शुभ्र वस्त्रांत त्यांनीं आपला देह ठेविला होता. त्याच कपड्यांत त्यांची उत्तरक्रिया करावी अशी त्यांची इच्छा होती. आपली देहयात्रा गांधीजींनीं देहयात्रा संपविली त्याच वेळेस संपावी अशाच कयासानें त्यांनीं चिरनिद्रेची तयारी केली असावी असें सहजीं आमच्या मनांत आलें.

गुरुजी आणि गांधीजी दोघेही भावनेच्या चाऱ्यावर जगत होते. दोघांच्या जीवनांत ईश्वराला आणि उपवासाला फार मोठें स्थान होतें. ह्याचमुळें दोघांनाही लोक समजूं शकले नाहींत. गांधीजींनीं आगाखान

महालांत उपवास केला तेव्हां लिनलिथगो त्याला पोलिटिकल ब्लॅकमेलिंग म्हणाला. महाराष्ट्रांतल्याही सुजाण समजल्या जाणाऱ्यांना गुरुजींच्या उपासांचा अर्थ अशाच प्रकारें समजला नाहीं. कांहीं गोष्टींना गुरुजींच्या जीवनांत असें स्थान होतें कीं त्यांच्याशिवाय जगणें त्यांना मृत्यूपेक्षां भयंकर वाटावयाचें! तसा तर मृत्यु त्यांना कधींच भयंकर वाटला नाहीं. रात्रीं मनुष्य निद्रेच्या आधीन जितक्या सहज होतो, तितक्याच सहज दोघांनीं मृत्यूला कवटाळलें. गांधीजींनीं मरतांना 'हे राम' म्हटलें आणि गुरुजींनीं अखेरच्या पत्रांत लिहिलें, "बहुधा देवाघरचें बोलावणें मला आहे." ही ईश्वरश्रद्धा सामान्य व्यवहारी लोकांना समजत नसली तरी त्यावरच ह्या दोन थोर पुरुषांचीं जीवनें आधारलेलीं होतीं असें वाटतें.

गांधीजींच्या जीवनाशीं अशा प्रकारें विविध स्वरूपांत गुरुजींचा संबंध होता. त्यांनीं १९४३ पर्यंत गांधीजींच्या जीवनाचें चिंतन 'गोष्टीरूप गांधीजी' मध्यें करून ठेवलें होतें. हें चरित्र पुन्हा सुधारून देण्याची त्यांची इच्छा होती, परंतु ते तसें करूं शकले नाहींत. नाहींतर ह्या चरित्रांत किती अपूर्वता त्यांनीं आणली असती! गांधीजींनीं आपल्या चरित्रग्रंथाचें अखेरचें तेजस्वी पान लिहिलें तेथपर्यंत पुस्तक पूर्ण करणें तर आवश्यक होतें आणि म्हणून हें चरित्र पूर्ण करण्याचें मीं पत्करलें. एकाद्या उंच रेशमी वस्त्राला हलक्या कापडाचा जोड द्यावा तसें हें होणार आहे. पण वाचकांनीं गोड करून घ्यावें.

यदुनाथ थत्ते

गो ष्टी रू प

* * * * * * * * * * * * *

गां धी जी

* * * * * * * * * * * * *

सेवादलांतील प्रिय सैनिकांनो,

आज तुम्हांला कोणाच्या गोष्टी सांगणार आहें तें माहीत आहे का? त्या महापुरुषाचें स्मरण होतांच हृदय भक्तिप्रेमानें भरून येतें. त्या थोर विभूतीचे ह्या भारतदेशावर अपार उपकार आहेत. ही विभूति केवळ ह्या देशाचीच आतां राहिली नाहीं. ती जगाची झाली आहे. ह्या महापुरुषाला मी संत म्हणूं कीं संसारी म्हणूं? मुनि म्हणूं कीं मुत्सद्दी म्हणूं? संन्यासी म्हणूं कीं रात्रंदिवस सेवेंत रमलेला कर्मयोगी म्हणूं? वीरपुरुष म्हणूं कीं शांतात्मा म्हणूं? कोणत्या शब्दांनीं मी वर्णन करूं? नवभारताला त्यांनीं जन्म दिला आहे. नवीन सृष्टि ते निर्मू पाहात आहेत. रणगाडे, बॉंब ह्यांच्या जगड्व्याळ रणधुमाळींत अहिंसा व प्रेम ह्यांचा संदेश ते सांगत आहेत. मित्रांनो, अशी अलौकिक विभूति अनेक शतकांत एखादीच जन्माला येते.

तुम्हीं ओळखलेंच असेल कीं मी महात्माजींच्या गोष्टी सांगणार आहें. होय, त्यांच्याच पुण्यकथा आज मी सांगणार आहें. आज कदाचित् संपणार नाहींत; उद्यां रात्रीं बसूं; उद्यांही संपल्या नाहींत तर परवां बसूं. महात्माजींचें जीवन सागराप्रमाणें आहे. हजारों प्रसंग. मी सांगणार तरी किती? परंतु दोन तीन दिवसांत जेवढे सांगतां येतील तेवढे सांगेन.

जन्म व आईबाप

महात्माजींचे वडील : कबा गांधी

महात्माजींचा जन्म कोठें झाला माहीत आहे ? तुम्ही म्हणाल, " गुजराथमध्यें. " परंतु गुजराथमध्यें म्हणजे कोठें ? ज्या नगरींत भक्त सुदामदेव नांदत होता, त्याच नगरींत महात्माजींचा जन्म झाला. हल्लीं ज्याला पोरबंदर म्हणतात, त्याला पूर्वी सुदामपुरी म्हणत. काठेवाडमधील हें गांव. ज्या काठेवाडांत अहिंसाधर्म शिकविणाऱ्या जैनधर्मांचीं पुण्यक्षेत्रें आहेत, ज्या काठेवाडांत गोपालकृष्णाची पवित्र द्वारका आहे, ज्या काठेवाडांत सोमनाथाचें विख्यात मंदिर आहे, अशा काठेवाडांत महात्माजींचा जन्म झाला. काठेवाडांत जिकडे तिकडे जैन व वैष्णवधर्म आहे. हत्या फार नाहीं ; मांसाशन फारसें नाहीं. काठेवाडांत अहिंसाधर्माचें साम्राज्य आहे. हिंदुस्थानांत कोठेंही आढळणार नाहींत इतके मोर काठेवाडांत आहेत ; कारण त्यांना तेथें अभय आहे. झाडांमाडांवरून सर्वत्र मोर दिसत असतात.

अशा ह्या प्रेममय काठेवाडांत, सुंदर सौराष्ट्र प्रांतांत महात्माजींचा जन्म झाला. कधीं झाला आहे का माहीत ? १८६९ च्या ऑक्टोबरच्या दोन तारखेस. ही दोन तारीख आतां अमर झाली आहे. महात्माजींच्या वडिलांचें नांव करमचंद. त्यांना कबा गांधी असें प्रेमानें म्हणत. महात्माजी एखादे वेळेस म्हणत कीं " देश स्वतंत्र असता तर मीं वैश्यधर्माप्रमाणें एखादें दुकान चालवलें असतें. " कबा गांधी कांहीं दिवस राजकोटचे दिवाण होते. ते अत्यन्त निष्ठावान होते. धर्मशील होते. उदार व शूर होते. सत्याचे उपासक होते. ते फारसे शिकलेले नव्हते. गुजराथी पांचवीपर्यंत शिक्षण. परंतु ते बहुश्रुत होते. खूप अनुभवी होते. पोथ्यापुराणें ऐकून धर्माची माहिती

त्यांना झाली होती. आयुष्याच्या अखेरीस ते गीता वाचूं लागले होते. ते वैष्णव होते.

ते राजकोटचे दिवाण असतांनाच्या वेळची एक गोष्ट आहे. पोलिटिकल एजंटानें राजकोटच्या ठाकुरसाहेबांचा एकदा अपमान केला. दिवाणसाहेबांस तो सहन झाला नाहीं. आपल्या धन्याची निंदा त्यांना सहन झाली नाहीं. ते ताडकन् उठले व एजंटास खरमरीतपणें बजावते झाले. गोरा साहेब गरम झाला. " माझी माफी मागा " असें तो महात्माजींच्या वडिलांस म्हणूं लागला. परंतु करमचंद गांधी निर्भय पुरुष होते. क्षमा मागण्याचें त्यांनीं नाकारलें. त्यांना स्थानबद्ध करण्यांत आलें. परंतु कबा गांधींचा अभंग निश्चय पाहून त्यांना मुक्त करण्यांत आलें.

महात्माजींची आई : पुतळीबा

पिताजी असे वीरपुरुष होते, तर माता केवळ धर्ममूर्ति होती. बाळ मोहनदास ह्याच्या आईचें नांव पुतळीबाई. खरोखरच ती पुण्याची पुतळी होती, पावित्र्याची पुतळी होती. ही माउली अत्यंत धार्मिक होती. तिचीं नाना व्रतेंवैकल्यें असायचीं. पूजाअर्चा केल्याशियाय ती तोंडांत पाणी घालीत नसे. मंदिरांत तिनें नित्य जायचें. प्रत्येक चातुर्मास्यांत कांहीं ना कांहीं व्रत ही माता घ्यायचीच. एकदा चांद्रायणव्रत त्यांनीं सुरू केलें होतें आणि त्या आजारी पडल्या. परंतु व्रतांत त्यांनीं खंड पडूं दिला नाहीं. लागोपाठ दोन तीन उपवास करणें म्हणजे त्यांना कांहीं वाटत नसे. चातुर्मास्यांत बहुधा त्या एकभुक्तच असत. एकदा एका चातुर्मास्यांत एक दिवसाआड रोज उपवास असें व्रत त्यांनीं केलें. सूर्यदर्शन झाल्याशिवाय जेवायचें नाहीं असें त्या कधीं कधीं व्रत घेत. पावसाळ्याचे दिवस असावेत. आकाशांतील सूर्य ढगांत बुडलेला असावा. त्याचें दर्शन कसें

व्हायचें ? मुलें बाहेर सूर्य जरा दिसतो का त्याची वाट पाहात बसत. सूर्यानें तोंड बाहेर काढतांच तीं आईला हाका मारीत. माता बाहेर येई. परंतु तेवढ्यांत काळे ढग पुन्हा येत व सूर्याला लपवीत. माता म्हणे, " मीं आज कांहीं खाऊं नये अशीच प्रभूची इच्छा आहे. " असें म्हणून ती हसतमुखानें पुन्हा कामाला निघून जाई.

प्राथमिक व दुय्यम शिक्षण

अशा सत्यनिष्ठ, पवित्र व व्रती आईबापांच्या पोटीं महात्माजी आले. पहिलीं कांहीं वर्षें पोरबंदर येथें गेलीं. वयाच्या सातव्या वर्षी ते राजकोटला आले; कारण वडील राजकोट येथें नोकरीस आले. प्राथमिक शिक्षण संपून वयाच्या बाराव्या वर्षी ते राजकोट हायस्कूलमध्यें दाखल झाले. ते फार लाजाळू होते. ते फारसे कोणाशीं मिसळत नसत. पुस्तकें हेच त्यांचे मित्र. आपला अभ्यास बरा कीं आपण बरे. घंटेच्या वेळेला ते शाळेंत जात व शाळा सुटतांच तडक घरीं येत.

त्यांच्या हायस्कूलमधल्या कांहीं गमती आहेत. एकदा शिक्षणाधिकारी शाळा तपासायला आले होते. महात्माजी ज्या वर्गांत होते त्या वर्गाची चांचणी चालली होती. साहेबानें कांहीं इंग्रजी शब्द लिहायला घातले होते. महात्माजींनीं 'केटल्' शब्द चुकीचा लिहिला होता. शिक्षक मुलांमधून हिंडत होते. महात्माजींनीं लिहिलेला शब्द पाहून ते त्यांना पायांतील बुटानें जवळच्या मुलाचें पाहून बरोबर कर असें सुचवीत होते. आपले शिक्षक आपणाला बुटानें कां टोचीत आहेत तें सरळ मनाच्या मोहनदासाच्या ध्यानांत येईना. शेवटीं तो शब्द तसाच राहिला. वर्गांतील इतर मुलांचे सारे शब्द बरोबर, परंतु सत्यार्थी महात्माजींचा एक शब्द चुकला. महात्माजी विनोदानें लिहितात, 'दुसऱ्याचें पाहून नक्कल करण्याची कला मला कधींच साधली नाहीं.'

चौथ्या यत्तेंत गेल्यावर अनेक विषय सुरू झाले. भूमिति आली, संस्कृत आलें, नाना विषय. पुन्हा सारें इंग्रजींतून शिकायचें. भूमिति प्रथ समजेना. परंतु एके दिवशीं त्यांना एकदम समजूं लागली. जणूं भूमितीचें रहस्य कळलें. आणि पुढें हा विषय त्यांना फार आवडूं लागला. परंतु संस्कृतचें काय करायचें? पर्शियन शिकायला सोपें असें मुलें म्हणत. पर्शियन शिकविणारे शिक्षकही मुलांचे आवडते होते, प्रेमळ व दयाळू होते. एके दिवशीं विद्यार्थी मोहनदास पर्शियनच्या वर्गांत जाऊन बसला. संस्कृत शिकविणाऱ्या शिक्षकांस फार वाईट वाटलें. त्यांनीं मोहनदासाला बोलावलें व म्हटलें, "अरे, तूं वैष्णव ना? स्वत:च्या धर्माची भाषा नको का यायला? कठीण जात असेल तर माझ्याकडे ये, मी शिकवीन, मदत करीन. संस्कृत भाषा सुंदर आहे. पुढें तुला आनंद होईल. आपल्याला संस्कृत येणारच नाहीं असें नको म्हणूं. पुन्हा माझ्या वर्गांत ये." संस्कृताध्यापकांचे ते कळकळीचे शब्द ऐकून मोहनदास विरघळला. पुन्हा संस्कृतच्या तासाला महात्माजी जाऊं लागले.

महात्माजी अति बुद्धिमान् नसतील, परंतु ते व्यवस्थितपणें अभ्यास करीत. आपल्याला कधीं शिक्षा होऊं नये, बोलणीं बसूं नयेत म्हणून ते फार जपत. स्वाभिमानाला धक्का लागूं नये असें त्यांना वाटे. हायस्कूलमध्यें असतांना दोनदा त्यांना मार बसला. एकदा तर ते रडले. शिक्षेमुळें नव्हे, छड्या लागल्या म्हणून नव्हे, तर तूं शिक्षेला पात्र आहेस म्हणून मार देण्यांत आला, त्याचें त्यांना वाईट वाटलें. आणि दुसरा मार सक्तीच्या खेळांना हजर न राहाण्याबद्दल. क्रिकेट, वगैरे खेळ सक्तीचे करण्यांत आले होते. महात्माजी लाजाळू. ते खेळांना जात नसत. ते फिरण्याचा व्यायाम घेत. इतर व्यायाम त्यांनीं फारसा घेतला नाहीं.

बालपणांतील आदर्श

शाळेंतील अभ्यासाच्या पुस्तकांशिवाय इतर पुस्तक ते फारसे वाचीत नसत. परंतु एकदा एक पुस्तक त्यांच्या दृष्टीस पडलें. [illegible]णां-

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

तील श्रावणाच्या पितृभक्तीची गोष्ट माहीत असेल. आंधळ्या आईबापांना कावडींत घालून, ती कावड खांद्यावर घेऊन श्रावण त्यांना तीर्थयात्रा घडवायचा. अशा त्या श्रावणाच्या पितृभक्तीवरचें तें नाटक होतें. महात्माजींच्या मनावर त्या पुस्तकाचा फार परिणाम झाला. त्यांतील करुण गीतें ते आळवीत बसत. पित्यानें एक वाद्य त्यांना आणून दिलें होतें. त्यावर तीं गीतें ते म्हणत. श्रावणाच्या आईबापांचा आक्रोश ते कधीं विसरले नाहींत. तूं श्रावणाप्रमाणें हो! असें त्यांचें मन त्यांना म्हणे. आणि ह्याच सुमारास एक नाटकमंडळी आली होती. पित्याच्या परवानगीनें महात्माजी हरिश्चंद्र नाटक पाहायला गेले. तें नाटक किती वेळां तरी त्यांनीं पाहिलें; परंतु त्यांची तृप्ति होईना. हरिश्चंद्राप्रमाणें सर्वांनीं सत्यनिष्ठ कां बरें होऊं नये असें त्यांच्या मनांत येई. सत्यासाठीं हरिश्चंद्राला किती आपत्ति भोगाव्या लागल्या! महात्माजी नाटकांतले प्रसंग आठवून रडत. ते घरीं हरिश्चंद्राची मनांतल्या मनांत भूमिका करीत. हरिश्चंद्र खरोखर झाला कीं नाहीं, देव जाणे. परंतु महात्माजींना हरिश्चंद्र, श्रावण काल्पनिक नव्हते वाटत. जणूं जिवंत आदर्श वाटत. त्यांच्या गोष्टी वाचून पुन्हा माझें हृदय विरघळेल असें ते म्हणत.

आणि तो प्रल्हाद! लहान बाळ; परंतु सत्याचा केवढा पुजारी. पित्यानें किती छळ केला! परतु तो शांत राहिला, अचल राहिला. प्रल्हादानेंही महात्माजींच्या विकासाला अपार मदत केली आहे. बाळ मोहनदास अशा ह्या आदर्शांवर पोसला जात होता. परंतु हातून चुकाही होत होत्या. महात्माजींचें जीवन म्हणजे पराकाष्ठेचा प्रयत्न. प्रयत्नानें, दक्षतेनें मनुष्य किती उंच जाऊं शकतो त्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे महात्माजी.

क्रांतीचा क्षण

पुढें त्यांना व्यसनी मित्रांची संगत लागली. त्यांच्या संगतीनें महात्माजी अभक्ष्य भक्षूं लागले, धूम्रपान करूं लागले. गुलाम झालेल्या आपल्या लोकांस वाटे कीं मांस खाल्ल्याशिवाय आपण स्वतंत्र होणार नाहीं; साहेबाप्रमाणें

सिगारेट ओढल्याशिवाय स्वतंत्र होणार नाहीं. परंतु आपला देश गुलाम झाला तेव्हां का सर्वांनीं मांसाशन सोडलें होतें? आणि मांसाशन न करणारे भाऊसाहेब, विश्वासराव, माधवराव, बापू गोखले, झांशीची राणी लक्ष्मीबाई, ह्यांच्यांत का शौर्य नव्हतें ? मांसाशन करणारीं राष्ट्रेंही गुलाम होतात आणि मांसाशन न करणारेही शूर असूं शकतात.

परंतु महात्माजींचे मित्र म्हणायचे, " आपण मांस न खाऊं तर दुबळे होऊं. " आणि मोहनदास संकोचानें मांसाशन करूं लागला. भूक नाहीं असें घरीं सांगावें लागे. असें खोटें सांगणें त्याच्या जिवावर येई. शेवटीं सत्याचा जय झाला. त्यांनीं मांसाशन सोडलें.

महात्माजींनीं मांस तर सोडलेंच, पण विडी सुटेना. पण त्यासाठीं पैसे ? नोकरांचाकरांच्या खिशांतील पैसे मग मोहनदास चोरी. कधीं कोणाचीं विडीचीं थोटकें पडलेलीं उचलून घेई. असें चाललें. परंतु नोकरांच्या खिशांतील पैसे कितीसे पुरणार ? कर्ज होऊं लागलें. तलफ भागावी म्हणून तंबाखूसारख्या कांहीं पानांच्या विड्या करून ते ओढूं लागले. परंतु मन खाऊं लागलें. जवळ पैसा नाहीं, व्यसनें सुटेनात. जगण्यांत त्यांना आनंद वाटेना. आत्महत्त्या करावी असें त्यांना वाटलें. धोत्र्याच्या झाडाचें बीं खाल्लें तर मनुष्य मरतो असें त्यांनीं ऐकलें होतें. रानांत जाऊन तें बीं त्यांनीं मिळविलें. महात्माजी व त्यांचा तो मित्र एका मंदिरांत गेले. तेथील नंदादीपांत त्यांनीं तूप घातलें. प्रभूचें दर्शन घेतलें. परंतु त्या बिया खाण्याचें धैर्य त्यांना होईना. शेवटीं देवाच्या पायां पडून ते शांत होऊन बाहेर पडले.

विडी आतां सुटली. मांसाशन सुटलेंच होतें. परंतु कर्ज झालें होतें त्याचें काय ? हातांत सोन्याचें कडें होतें. त्यांतील थोडें सोनें कापून कर्ज फेडण्याचें त्यांनीं ठरविलें आणि तसें केलें. परंतु मन आंत रडूं लागलें. महात्माजी अस्वस्थ झाले. ते कावरेबावरे झाले. वडिलांना सारें सांगावें

असें त्यांना वाटूं लागलें. परंतु समक्ष बोलण्याची हिंमत नव्हती. शेवटीं त्यांनीं चिठी लिहिली. "मला शिक्षा करा. तुम्ही स्वत:ला शिक्षा करून घेऊं नका. मी पुन्हा असें पाप न करण्याची प्रतिज्ञा करतों" इत्यादि मजकूर चिठींत होता.

महात्माजी थरथरत होते. पिताजी आजारी होते. एका लाकडी खाटेवर ते पडून होते. मोहनदास पित्यासमोर उभा राहिला. थरथरणाऱ्या हातानें त्यानें ती चिठी पित्याच्या हातांत दिली व खालीं मान घालून दीनवाणेपणानें तो उभा राहिला.

वडिलांनीं चिठी वाचली आणि मोत्यांसारखे अश्रु त्यांच्या डोळ्यांतून घळघळले. ते कांहीं बोलले नाहींत. वडील रागावतील, आपल्याला बोलतील किंवा स्वत: डोकें आपटून घेतील असें महात्माजींस वाटत होतें. परंतु तसें कांहीं झालें नाहीं. अश्रुधारा वाहात होत्या. पित्याचें अपार दु:ख त्या अश्रूंत होतें. त्या जणूं हृदयवेदना होत्या आणि महात्माजीही रडूं लागले. त्या अश्रूंतून अहिंसेचा संदेश जन्माला आला. पित्याच्या प्रेमानें महात्माजींचें हृदय शुद्ध झालें. पित्याच्या मारानें जें झालें नसतें, तें त्या प्रेमळ अश्रूंनीं झालें. रामबाण ज्याला लागेल त्यालाच त्याची शक्ति कळेल. दुसऱ्याचा हृदयपालट प्रेमानें करायचा. जगाची खरी सुधारणा शिक्षा करून होणार नाहीं. प्रेमानें, सहानुभूतीनें होईल. ज्या वेळीं आपलें प्रेम वाढत वाढत विश्वव्यापी होतें त्या वेळेस तें ज्याला स्पर्श करील, त्याला सुंदर व मंगल केल्याशिवाय कसें राहील? खरी क्रांति प्रेमानें होईल.

महात्माजींच्या जीवनांतील तो क्रांतिकारक क्षण होता. सत्य व अहिंसेचा जो महान् वृक्ष त्यांच्या जीवनांत दिसत होता, त्याचें बीज वरील प्रसंगी पेरलें गेलें. पित्याच्या त्या प्रेममय, क्षमामय गंगोत्रींतून

महात्माजींच्या जीवनांतील प्रेमगंगेचा, अहिंसामय गंगेचा जन्म झाला व पुढें तिचा महाप्रवाह झाला.

महात्माजी म्हणतात, "प्रभूची माझ्यावर कृपा आहे असें वाटतें. मीं चुका केल्या, परंतु एकदा पश्चात्ताप झाल्यावर पुन्हा त्या चुका केल्या नाहींत." आणि खरा पश्चात्ताप एकदाच होतो. खरे अश्रु एकदाच येतात व त्या अश्रूंनीं आपलें पाप धुवून जात.

महात्माजींचे वडील परधर्मसहिष्णु होते. त्यांचे मुसलमान मित्र होते, पारशी मित्र होते. त्यांच्या धर्मांच्या गोष्टी ते आदरानें ऐकत. पित्याच्या आजारीपणांत महात्माजी शुश्रूषा करायचे. हे संवाद ते ऐकत. त्यामुळें सर्व धर्मांविषयीं समभाव मनांत वाढला. भेदाभेदाची भावना त्यांच्या-जवळ नव्हतीच. उपजतच सर्वांविषयीं समभाव त्यांच्यांत होता. आणि एका गुजराथी कवीचे कांहीं उपदेशपर चरण त्यांच्या ओठांवर खेळूं लागले. काय होतें त्या चरणांत ?

"तुला कोणीं पेलाभर पाणी दिलें तर तूं त्याला पोटभर जेवण दे. कोणीं तुला कृपेनें तुझें क्षेमकुशल विचारलें तर तूं त्याला लवून प्रणाम कर. तुला कोणीं पै दिली तर तूं त्याला सोन्याची मोहोर दे. कोणीं तुझे प्राण वांचविले तर तूंही त्याच्यासाठीं प्राण द्यायला मागेंपुढें पाहूं नको. जे थोर असतात ते कसे वागतात, कसे बोलतात, तें पाहात जा. जे मोठ्या मनाचे असतात ते लहानशा सेवेची दसपट सेवेनें परतफेड करतात. परंतु खरें पाहिलें तर संतांना आपपर नसतेंच. सारें विश्व त्यांना आपलें वाटतें. आणि अपकाराचीही ते उपकारानें फेड करतात. आणि त्यांतच त्यांचा आनंद असतो." अशा अर्थांचे ते चरण होते. त्यांतील अर्थ दिवसेंदिवस अधिकच स्पष्ट होऊं लागला. त्या उपदेशाप्रमाणें आपण वागावें असें महात्माजींस वाटूं लागलें. जीवनाचें हें ध्येय ठरलें आणि त्यांचे प्रयोग सुरू झाले.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

महात्माजींच्या पत्नी : कस्तुरबा

लग्न

महात्माजींचें लग्न बालवयांत झालें होतें. त्यांच्या पत्नीचें नांव कस्तुरबा. कस्तुरबा करारी होत्या, निश्चयी होत्या. भीति त्यांना माहीत नसे. महात्माजी लहानपणीं अंधाराला भीत. काळोखांतून कोठें जाणें त्यांच्या जिवावर येत असे. परंतु कस्तुरबा अंधारांतून जायला भीत नसत. गांधीजींना ह्यामुळें स्वतःची लाज वाटे.

विलायतेस प्रयाण

महात्माजींची मॅट्रिकची परीक्षा झाली. वडील देवाघरीं गेले होते. आई होती. आतां पुढें काय करायचें, काय शिकायचें ? त्यांच्या कुटुंबाच्या एका पोक्त मित्रानें महात्माजींस विलायतेंत पाठवा असा सल्ला दिला. विलायतेंत जायला मिळालें तर किती छान होईल असें महात्माजींस वाटलें. त्यांनीं आनंदानें उड्या मारल्या. परंतु आईची समजूत कशी घालायची ? ती तयार नव्हती. विलायतेंत गेलें म्हणजे लोक मद्यमांस सेवूं लागतात, इतरही ढंग करतात असें तिनें ऐकलें होतें. परंतु महात्माजी आईला म्हणाले, " आई, माझ्यावर तुझा विश्वास नाहीं का ? मी तुला का फसवीन ? मी शपथपूर्वक सांगतों कीं मी मद्यमांसास स्पर्श करणार नाहीं. " आई म्हणाली, " तूं लांब जाणार. येथील गोष्ट निराळी. येथें मी तुझ्यावर विश्वास ठेवीन. परंतु तेथें वातावरण निराळें ! काय करूं ? "

शेवटीं एका जैन साधूला आईनें विचारलें. तो म्हणाला, " मोहनदासा-कडून मी तीन प्रतिज्ञा करवतों. त्या तीन प्रतिज्ञा करून त्यानें जावें. " साधूनें प्रतिज्ञेचा संकल्प सांगितला. महात्माजींनीं उच्चारिला. " मद्य, मांस,

व परस्त्री ह्यांना स्पर्श करणार नाहीं. " अशी त्यांनीं प्रतिज्ञा केली. आणि आई निश्चिंत झाली.

वडील भावानें पैशांची व्यवस्था केली. हायस्कुलातर्फें निरोप देण्याचा समारंभ झाला. मोहनदास इंग्लंडला गेला.

त्यांना आपण डॉक्टर होऊन सेवा करावी असें लहानपणापासून वाटत असे. पण वडिलांचा विरोध होता. विलायतेंत गेल्यावर पुन्हा डॉक्टर व्हावेंसें त्यांना वाटलें. पण तेथें चिरफाड करावी लागते म्हणून त्यांनीं तो विचार सोडून दिला आणि ते बॅरिस्टरीकडे गेले.

नवीन षोक

इंग्लंडमध्यें कसें वागायचें, कसें राहायचें ? शाकाहाराचें व्रत कसें चालवायचें ? नाना अडचणी आल्या. इंग्लंडमधली हवा थंड. थंड हवेंत मद्यमांसाशिवाय कसें राहातां येईल असें मित्र म्हणत. परंतु इंग्लंडांतही शाकाहारी संघ निघाले होते. महात्माजींनीं आपलें व्रत सोडलें नाहीं. खाण्या-पिण्याच्या बाबतींत आपण बावळट ठरलों तरी इतर गोष्टींत असतां कामा नये असें महात्माजींस वाटे. आपण अद्यतन सभ्य गृहस्थ झालें पाहिजे असें त्यांनीं ठरविलें. सुधारलेला सुसंस्कृत सभ्य गृहस्थ. ते झकपक कपडे करूं लागले. केसांची फार काळजी घेऊं लागले. उंची तेलें वापरूं लागले. नृत्यकला शिकूं लागले. बोलतां नीट यावें म्हणून एका शिक्षकाजवळ वक्तृत्वकला शिकूं लागले. वाजवतां यावें म्हणून तंतुवाद्य विकत घेऊन त्याचीही एक शिकवणी त्यांनीं लावली. परिपूर्ण सभ्य गृहस्थ बनण्यासाठीं हा सारा आटापिटा होता. परंतु पैशांचें काय ? तिकडे भाऊ काटकसर करून मोठ्या कष्टानें पैसे पाठवीत होता आणि महात्माजी इकडे सभ्य गृहस्थ होऊं पाहात होते !

भान आलें

स्वत:च्या वर्तनाकडे त्यांचें लक्ष होतें. आणि एके दिवशीं प्रकाश आला. हे पैसे मीं कां खर्च करावे? मीं येथें अभ्यासासाठीं आलों आहें. ह्या नृत्याची काय जरूरी? वक्तृत्वकला कशाला? वाजवायला मी हिंदुस्थानांतही शिकेन. हे भारी किंमतीचे कपडे कशाला? आणि केसांकडे किती हें लक्ष? सारखा हात डोक्याकडे जातो. छे. हा वृथा सायास आहे. ही संस्कृति नव्हे. काळाचा व धनाचा हा अपव्यय आहे. आणि ही एवढी जागा कशाला? कमी भाड्याच्या खोलींत नाहीं का राहातां येणार? किती तरी विद्यार्थी कमी खर्चांत राहातात. असे विचार सुरू झाले; आणि महात्माजी एका लहान जागेंत राहायला गेले. त्यांनीं एक स्टोव्ह विकत घेतला. सकाळची न्याहरी घरींच करीत. दुपारीं बाहेर जेवीत. रात्रीं पुन्हा घरींच पावरोटी खात व कोको करून पीत.

इतर सर्व छंद सोडून दिल्यामुळें भरपूर वेळ राहूं लागला. लंडनच्या मॅट्रिकच्या परीक्षेस बसायचें त्यांनीं ठरविलें. फ्रेंच व लॅटिनचा अभ्यास सुरू झाला. उष्णता व प्रकाश हे विषयही होते. ते परीक्षेस बसले. परंतु लॅटिनमध्यें नापास झाले. पुन्हा अभ्यास करून ते बसले. शेवटीं पास झाले.

प्रतिज्ञेचें स्मरण

एकदा एका मित्राबरोबर शाकाहारी संमेलनास ते गेले होते. परंतु ज्या घरीं ते उतरले ती बाई चांगली नव्हती. ती थट्टाविनोद करूं लागली. जरा मर्यादेचें अतिक्रमण होऊं लागलें. त्या अमर्याद अश्लील विनोदांत महात्माजी का भाग घेणार? त्यांच्या मित्रानें त्यांना सूचना दिली, "वेड्या, नीघ येथून. स्वत:ला सांभाळ. हें तुझें काम नव्हे." आणि घरची प्रतिज्ञा आठवली. महात्माजींची मान खालीं झाली, परंतु आत्म्याची मान उंच झाली.

गीतेची भेट

असे दिवस जात होते. मधून मधून त्यांना घरची आठवण येई. आईचें प्रेम आठवे आणि त्यांचे डोळे भरून येत. परंतु दुसरी एक बाई त्यांना तेथें मिळाली, श्रीभगवद्गीता मिळाली. तेथें कांहीं थिऑसफिस्ट मित्र होते. ते गांधीजींना म्हणाले, "आमच्याबरोबर गीता वाचा." सर एडविन् आर्नोल्ड ह्यांनीं गीतेचें इंग्रजींत अतिसुंदर भाषांतर केलें आहे. तें भाषांतर वाचलें जाऊं लागलें. गीतेजवळ गांधीजींची ही पहिली ओळख. परंतु ती ओळख चिरंजीव झाली. गीतेंतील मोलवान विचार त्यांच्या हृदयाची पकड घेऊं लागले. विशेषत: दुसऱ्या अध्यायांतील

> **विषयांचें करी ध्यान, त्यास तो संग लागला ।**
> **संगांतून फुटे काम, क्रोध कामांत ठेवला ॥**
> **क्रोधांतून जडे मोह, मोहानें स्मृति लोपली ।**
> **स्मृति-लोपें बुद्धिनाश, म्हणजे आत्मनाशचि ॥**

हे श्लोक त्यांना वेड लावते झाले. खरोखरच ह्या दोन श्लोकांत एक प्रकारें सारें मानसशास्त्र आहे. वासनाविचारांचा येथें उलगडा आहे. आसक्तीनें मनुष्य कसा गुरफटत जातो व कसा गुदमरतो, अध:पतित होतो, तें तेथें सांगितलें आहे.

गीतेचें रत्न गांधीजींनीं हृदयाशीं धरिलें आणि बायबलाचाही त्यांनीं अभ्यास केला. भगवान् येशूच्या त्या पर्वतोपनिषदानें त्यांना मोहिनी पाडली. गीता व बायबल ह्यांतील शिकवणींची ते मनांत तुलना करीत.

स्वदेशांत परत

बॅरिस्टर होऊन १८९१ च्या जून महिन्याच्या अखेरीस महात्माजी परत आले. मुंबईला वडील भाऊ बंदरावर आला होता. महात्माजी मातृभूमीला परत आले. परंतु त्यांची माता देवाघरीं गेली होती. वडील

भावानें ती वार्ता कळविली नव्हती. आईच्या निधनाची वार्ता ऐकून गांधीजींस अत्यंत दुःख झालें. सर्व मनोरथ, साऱ्या आशा जणूं नष्ट झाल्या. परंतु त्यांनीं आंतल्या आंत दुःख दाबलें. बाह्यतः ते शांत झाले, आणि संसार सुरू करते झाले.

मुंबईस त्यांनीं बॅरिस्टरीचें दुकान थाटलें. परंतु तेथें खर्च फार होई. प्राप्ति तर कांहीं नाहीं. मुंबईला रामराम ठोकून ते राजकोटला आले. तेथेंच ते काम करूं लागले. सरासरीनें ३०० रुपये महिन्याची प्राप्ति होई. बरें चाललें होतें. परंतु प्रभूची इच्छा निराळीच होती.

आफ्रिकेंत गमन

पोरबंदरला एक कंपनी होती. आफ्रिकेंतही तिची शाखा होती. ह्या कंपनीचें नांव दादा अबदुल्ला आणि कंपनी. अबदुल्ला शेठ आफ्रिकेंत दर्बान येथें होते. दुसरी एक तय्यब हाजी खानमहंमद ह्यांची कंपनी होती. ह्या दोन कंपन्यांचा कांहीं तंटा होता. प्रकरण कोर्टांत गेलें. कंपनीच्या पोरबंदरच्या लोकांनीं गांधीजींना ह्या कामीं मदत करण्यासाठीं दक्षिण आफ्रिकेंत पाठविलें. बोट दर्बान बंदरांत आली. अबदुल्ला शेठ उतरून घेण्यासाठीं आले होते. तेथील युरोपिअन लोक हिंदी लोकांकडे कसे तिरस्कारानें पाहात होत, तें गांधीजींच्या दृष्टीस पडल्यावांचून राहिलें नाहीं. अबदुल्ला शेठ प्रतिष्ठित व्यापारी. परंतु त्यांना ओळखणारे युरोपिअन लोक त्यांना तुच्छ मानीत होते. गांधीजींना त्या दृश्यानें वेदना झाल्या. परंतु अपमान गिळण्याची अबदुल्ला शेठजींस सवय झाली होती.

लढ्याला सुरुवात

दर्बानला गेल्यावर दोनतीन दिवसांनींच गांधीजी अबदुल्ला शेठजींबरोबर तेथील कोर्ट पाहायला गेले. गांधीजी तेथें बसले. मॅजिस्ट्रेट तीक्ष्ण दृष्टीनें पाहात होता. महात्माजींच्या डोक्यावर एक प्रकारची बंगाली पगडी होती.

मॅजिस्ट्रेट म्हणाला, "पगडी काढा." गांधीजींनीं पगडी काढण्याचें नाकारलें. कोर्ट सोडून ते निघून गेले.

तेव्हांपासून आफ्रिकेचा लढा सुरू झाला. इ. स. १८९३ पासून तों १९१४ पर्यंत महात्माजी आफ्रिकेंत होते. आयुष्याचीं २१ वर्षें तेथें गेलीं. हीं वर्षें अत्यंत महत्त्वाचीं होतीं. ह्या काळांतच सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान परिणत झालें. ह्या काळांतच महात्माजींनीं ब्रह्मचर्याचें व्रत घेतलें. दक्षिण आफ्रिकेंत सत्याग्रहाचें शस्त्र महात्माजींनीं निर्माण केलें आणि तें विजयी शस्त्र हातीं घेऊन हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं ते मातृभूमीला आले.

दक्षिण आफ्रिकेंतील किती गोष्टी सांगाव्या! परंतु येथें कांहीं सांगतों.

अबदुल्ला शेठजींचें प्रिटोरिया येथें कांहीं काम होतें. त्यासाठीं गांधीजी जायला निघाले. पहिल्या वर्गाचें तिकीट काढून ते आगगाडींत बसले. गाडी सुटली. दुसरें एक स्टेशन आलें आणि एक गोरा उतारू आला. एक काळा आदमी तेथें पहिल्या वर्गांत बसलेला पाहून त्याचें पित्त खवळलें. तो गोरा रेल्वेच्या अधिकाऱ्यांना घेऊन आला.

"तुम्ही दुसरीकडे बसा." अधिकारी म्हणाला.

"माझें पहिल्या वर्गाचें तिकीट आहे." गांधीजी म्हणाले.

"तें कांहीं असो. तुम्ही उठा. तुम्हांला अन्यत्र गेलेंच पाहिजे."

"मी जाणार नाहीं. दर्बानला मी येथें बसलों; आणि येथून मी उठणार नाहीं."

"तुम्ही न उठलांत तर तुम्हांला हात धरून खालीं ओढावें लागेल."

"काय करायचें तें करा. मी स्वच्छेनें उतरणार नाहीं."

आणि पोलीस आले. गांधीजींचा हात धरून त्यांनीं त्यांना खालीं लोटलें. त्यांचें सारें सामान खालीं फेकण्यांत आलें. सामान तसेंच टाकून गांधीजी वेटिंग रूममध्यें जाऊन बसले. रात्रीं थंडी होती. गांधीजी कुडकुडत होते. परंतु सामान मागायला ते गेले नाहींत. त्या वेटिंगरूममध्यें

अंधार होता. त्या अंधारांत बसून गांधीजी प्रकाश शोधीत होते. आफ्रिकेंत असे अपमान होतात तर हिंदुस्थानांत परत जावें का ? का येथें राहूनच हक्कांसाठीं झगडावें ? हिंदुस्थानांत परत जाणें म्हणजे भ्याडपणा होता. गांधीजींनीं तेथेंच राहायचें ठरविलें. त्यांना स्वतःच्या वैयक्तिक अपमानाचें तितकेंसें वाटलें नाहीं; परंतु काळ्या लोकांविषयीं युरोपियन लोकांच्या मनांत जो तिरस्कार आहे, जी तुच्छताबुद्धि आहे, तिचें उन्मूलन कसें करावें ह्याचा ते विचार करीत होते.

दुसऱ्या दिवशींच्या गाडींत बसून गांधीजी निघून गेले. वाटेंत अपमान सहन करीत ते प्रिटोरिया येथें गेले. अबदुल्ला शेठजींचें काम करून ते परत दर्बानला आले.

वाटेंत अनेक हिंदी लोक गांधीजींना भेटले. व्यापारी भेटले. हिंदी लोकांचा पदोपदीं कसा अपमान होतो त्याच्या करुण कथा हिंदी लोकांनीं गांधीजींस सांगितल्या. ज्या कामासाठीं गांधीजी आफ्रिकेंत आले होते तें काम संपलें होतें. हिंदुस्थानांत परत जाण्याची त्यांनीं तयारी केली. गांधीजींना निरोप देण्यासाठीं अबदुल्ला शेठजींनीं सभा बोलाविली होती. त्या सभेंत कोणीतरी गांधीजींच्या हातांत एक वर्तमानपत्र टाकलें. काय होतें त्या वर्तमानपत्रांत ? नाताळ सरकार हिंदी लोकांना असलेले थोडेसे अधिकार, तेही एका नवीन कायद्यानें हिरावून घेणार होतें. गांधीजींनीं जाण्याचें रहित केलें. इतक्यांत कायदा पास करूं नका अशी त्यांनीं तार केली. हिंदी लोकांनीं द. आफ्रिकन सरकारला स्वतःच्या हक्कांसाठीं केलेली ती पहिली तार. द. आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या इतिहासांतील तें नवीन पान होतें. गांधीजींनीं एक समिति स्थापिली. तिचे अबदुल्लाशेठजी अध्यक्ष होते. आणि सभा भरूं लागल्या. दररोज सभा. सभेला अधिकाधिक लोक येऊं लागले. चळवळ सुरू झाली. हा नवीन आरंभ होता. स्वयंसेवकदल निर्माण करण्यांत आलें. अर्जावर सह्या घेण्यांत येऊं लागल्या. आणि

इंग्लंडमधील वसाहतमंत्री लॉर्ड रिपन ह्यांच्याकडे तो अर्ज पाठविण्यांत आला.

गांधीजी म्हणाले, "आतां मला हिंदुस्थानांत परत जाऊं द्या."

लोक म्हणाले, "तुम्ही गेल्यावर आम्हांला मार्गदर्शन कोण करील ? तुम्हीं नवीन चैतन्य ओतलेंत. तुम्ही येथें राहा. वसाहतमंत्री काय उत्तर देतो कोणास ठाऊक ?"

लॉर्ड रिपन

आणि गांधीजी राहिले. ते संघटना करूं लागले. १८९४ च्या मे महिन्यांत त्यांनीं नाताळ इंडियन काँग्रेस स्थापन केली. हिंदुस्थानांत हिंदी राष्ट्रीय सभा स्थापन होऊन दहा वर्षें झालीं होतीं आणि इकडे दूर आफ्रिकेंत गांधीजी तेथील हिंदी लोकांची काँग्रेस स्थापिते झाले. महात्माजींचें वय त्या वेळेस केवळ २५ वर्षांचें होतें. परंतु गोऱ्या सत्ताधीशांबरोबर एक महान् लढा त्यांनीं त्या वयांत अंगावर घेतला आणि २० वर्षें झगडून तो लढा यशस्वी करून नंतर ते हिंदुस्थानांत परत आले.

गांधीजींनीं कार्यकर्त्यांस संयम शिकविला. असत्य बोलायचें नाहीं. अतिशयोक्ति करायची नाहीं. पुराव्याशिवाय उगीच बडबडायचें नाहीं. युरोपिअनांच्या म्हणण्यांतही कांहीं तथ्य असेल तर तें मान्य करावयाचें. स्वतःच्या चुका कबूल करायच्या. आपले दोष पाहायचे. शक्य तेथें युरोपिअनांशीं सहकार्य करायचें, अर्थात् समानतेच्या भूमिकेवरून व स्वाभिमान राहात असेल तरच. वर्तमानपत्रांतूनही प्रचार सुरू करण्यांत आला. खोडसाळ आरोपांना उत्तरें देण्यांत येऊं लागलीं.

हिंदुस्थानांत आगमन

आफ्रिकेंत आतां राहायचेंच होतें. पत्नी व मुलें हिंदुस्थानांत होतीं. त्यांना घेऊन जाण्यासाठीं महात्माजी हिंदुस्थानांत आले. १८९६ मध्यें

गांधीजी आले. सहा महिने ते राहाणार होते. परंतु सहा महिने होतात न होतात तों "निघून या" अशी तार आली. दादा अबदुल्ला शेठ ह्यांनीं ह्या सुमारास एक बोट विकत घेतली होती. त्यांनीं गांधीजींना लिहिलें कीं "माझ्या बोटींतूनच या."

पुन्हा आफ्रिका

आणि गांधीजी त्या बोटींत बसून निघाले. दुसरीही एक बोट निघाली. दोन्ही बोटींतून हिंदी लोक होते. जवळजवळ ८०० उतारू होते. बोटी थेट दर्बान येथें येणार होत्या. वाटेंत प्रचंड वादळें झालीं. बोटींतील सारे उतारू प्रभूची प्रार्थना करूं लागले. संकटाच्या वेळेस सारे एक झाले. जातधर्म विसरले. आणि समुद्र शांत झाला; परंतु पुढें येणाऱ्या वादळाची जणूं ही खूण होती.

गांधीजी आपल्या बायकामुलांसह परत येत आहेत ही गोष्ट आफ्रिकेंतील गोऱ्यांना समजली. दर्बान येथील गोरे चिडले. दक्षिण आफ्रिकेंतील वर्तमानपत्रांनीं खोड्या बातम्या छापल्या होत्या. गांधीजींनीं हिंदुस्थानांत आफ्रिकेंतील गोऱ्यांची नालस्ती करणारीं पत्रकें प्रसिद्ध केलीं असें ह्या वर्तमानपत्रांनीं जाहीर केलें. "कशाला येतो हा गांधी? आमचें नांव जगभर बदू करणारा! आ ं तर बायकापोरेंही घेऊन येत आहे. हाच येथल्या लोकांना चिथवितो. आणि बरोबर ८०० कूली घेऊन आला आहे. छे; ह्याला येथें नाहींच उतरूं द्यायचें," इत्यादि दर्बानचे गोरे बडबडूं लागले. वातावरण प्रक्षुब्ध झालें होतें. "सरकारनें मनाई हुकूम काढावा. नाहीं तर ह्या गांधीला आम्हीच समुद्रांत फेकूं." असेंही गोरे गुंड गर्जूं लागले.

क्वारंटाईन

बोटी बंदरांत आल्या. परंतु उतारूंना खालीं उतरूं देत ना.

" तुमच्या देशांत प्लेग आहे. क्वारंटाईन म्हणून कांहीं दिवस बाहेर राहा. "

" आमच्या बोटीवर प्लेगनें लागलेला कोणी नाहीं. "

" तरीही बाहेर समुद्रांतच राहिलें पाहिजे. "

" किती दिवस ? "

" तेवीस दिवस. "

हिंदी बोटी म्हणून का हा खुनशी कडकपणा ? का दर्बानमधलें वातावरण शांत व्हावें म्हणून सरकारचा तो प्रयत्न होता ?

" बोट हिंदुस्थानला परत घेऊन जा. उतारू उतरूं पाहातील तर त्यांना आम्ही समुद्रांत फेकूं " अशा धमक्याही येऊं लागल्या. समोर बंदर दिसत होतें. अठरा दिवस सागराचा प्रवास करून उतारू कंटाळले होते. आणि अजून तेवीस दिवस तेथें पडून राहायचें. परंतु हिंदी उतारू निश्चयाचे खंबीर होते. ते डगमगले नाहींत. तेवीस दिवस संपले. आणि आज उतारू जमिनीवर उतरणार होते. स्थानिक सरकारी अधिकाऱ्याचा " तुम्ही दिवसा उतरूं नका. जिवाला धोका आहे. रात्रीं गुपचूप उतरा " असा गांधीजींना निरोप आला. परंतु एका कायदेपंडित मित्राचा निरोप आला, " रात्रीं चोरासारखें काय म्हणून उतरायचें ? तुम्हांला भीति वाटत नसेल तर दिवसाच उतरा. " गांधीजी कोणत्या एका गोष्टीचा तिरस्कार करीत असतील तर ती गोष्ट म्हणजे भीति. भीति म्हणजे जिवंतपणीं मरण असें त्यांना वाटे. त्यांनीं दिवसा उतरायचें ठरविलें. त्यांनीं पत्नी व मुलें ह्यांना गाडींतून पुढें पाठविलें आणि गांधीजी आपल्या त्या मित्रासह पायीं निघाले.

प्राणांतक हल्ला

" गांधी गांधी, तो पाहा गांधी. पकडा. ठोका. हाणा, मारा " अशा आरोळ्या झाल्या. एका गलेलठ्ठ माणसानें गांधीजींपासून त्यांच्या मित्राला

दूर केलें आणि गांधीजी एकटे राहिले. गोऱ्या गुंडांचा हल्ला सुरू झाला. पगडी फेकली गेली. तडाखे बसूं लागले. कोणीं लाथ मारली. गांधीजी चक्कर येऊन पडणार, तों तेथें एक गोरी स्त्री आली. दर्बानच्या पोलीस अंमलदाराची ती बायको होती. तिनें गांधीजींस संरक्षण दिलें. आपली छत्री उघडून तिनें ती गांधीजींवर धरली. छत्रीवर मार पडूं लागला. इतक्यांत पोलीस आले. त्यांनीं गांधीजींस रुस्तुमशेठजींच्या घरीं पोचविलें.

परंतु ह्या थोर पारशी व्यापाऱ्याच्या घराला गुंडांनीं गराडा दिला. ते का त्या घराला शिलगावून देणार होते? प्रसंग मोठा बाका होता. पोलीस अंमलदारानें गांधीजींस वेष बदलून दुसऱ्या एका मागील दारानें निघून जायला सांगितलें आणि स्वत: बाहेर गुंडांना गुंगवून ठेविलें. 'चला फाशीला लटकवूं गांधीला' असें तो गाणें म्हणूं लागला. आणि तो चरण सारे गुंडही म्हणूं लागले. गांधीजी सुखरूप निघून गेल्यावर तो अंमलदार गुंडांना म्हणाला,

"ह्या घरांत गांधी नाहींत. जा आतां घरोघरीं. गांधींनीं दिला गुंगारा. गेले पळून."

"आम्हांला घरांत पाहूं दे." गुंड गर्जले.

"बघा. एकजणानें आंत जाऊन पाहून यावें." गुंडांचा एक प्रतिनिधि आंत गेला. त्यानें सर्वत्र पाहिलें. गांधीजी दिसले नाहींत. पोलीस अंमलदाराची हुशारी पाहून गुंड लाजले. परंतु शेवटीं सारे हसूं लागले आणि 'झाडावर लटकवूं गांधीला, फाशीला लटकवूं गांधीला' असें गात ते आपापल्या घरीं निघून गेले.

ही हकीकत वर्तमानपत्रांतून आली. इंग्लंडमधील वसाहतमंत्र्याकडून लिहून आलें. तारेनें संदेश आला कीं हल्ला करणाऱ्यांवर खटला भरा. दर्बानचा अधिकारी गांधीजींकडे आला व म्हणाला, "मी दिलगीर

आहें. मीं तुम्हांला रात्रीं उतरा असा निरोप पाठविला होता. तसें करतेत तर हा प्रसंग टळता. अर्थात् दिवसा उतरण्याचा तुमचा हक्क होता. गोष्ट वाईट झाली. तुमच्यावर हल्ला करणाऱ्यांना जर तुम्ही ओळखूं शकाल तर सरकार त्यांच्यावर खटला भरील. ”

क्षमा

गांधीजी कांहीं गुंडांना ओळखूं शकत होते. परंतु त्यांनीं सर्वांना क्षमा केली. ते म्हणाले, “ कोणावरही खटला करण्याची माझी इच्छा नाहीं. त्यांचा काय दोष ? वर्तमानपत्रांतील वार्तांवर त्यांनीं विश्वास ठेवला. येथील पुढाऱ्यांनीं खऱ्या गोष्टी सांगितल्या पाहिजे होत्या. परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं. येथील युरोपिअनांची मी खरोखरच बदनामी करतों असें त्यांना वाटलें. केला त्यांनीं हल्ला. परंतु मीं फिर्याद करून काय होणार ? माझ्यावर हल्ला करणाऱ्यांस सत्य कळल्यावर पश्चात्ताप होईल. तीच त्यांना शिक्षा.”

“ तुम्ही असें लिहून द्या म्हणजे वसाहतमंत्र्यांना कळवूं. तुमच्या ह्या वर्तनानें येथलें वातावरण लौकर शांत होईल. मी आपला आभारी आहें. ”

गांधीजींनीं तसें लिहून दिलें. त्या क्षमेचा जादूसारखा परिणाम झाला. आणि हिंदुस्थानांत गांधीजींनीं जीं पत्रकें प्रसिद्ध केलीं होतीं, त्यांच्या नकला त्यांच्याजवळ होत्या. त्या नकला मुलाखत घेण्यासाठीं आलेल्या बातमीदाराला त्यांनीं दिल्या. हिंदुस्थानांत गांधीजींनीं काय सांगितलें तें कळून आलें. आफ्रिकेंतील गोऱ्यांना वस्तुस्थिति कळली. दर्बानच्या युरोपिअनांस स्वतःच्या वर्तनाची लाज वाटली. वर्तमानपत्रांनीं गांधीजी निर्दोष आहेत, सरळ, सत्यव्रत व सत्यभक्त आहेत असें लिहिलें. गुंडांच्या अत्याचारांचा त्यांनीं निषेध केला.

गांधीजींचें अहिंसेचें शस्त्र अशा रीतीनें तयार होत होतें. स्वतः हालअपेष्टा सहन करून प्रेमानें जिंकण्याचा मार्ग सिद्ध होत होता. सत्याग्रहाच्या भावी प्रयोगांची ही नांदी होती.

स्वावलंबन

गांधीजी बॅरिस्टरी करूं लागले. जरा सुखांत राहूं लागले. परंतु ख्यालीखुशालीसाठीं त्यांचा जन्म नव्हता. लगेच ते आत्मनिरीक्षण करूं लागले. काटकसर करूं लागले. स्वावलंबी होऊं लागले. धोब्याचा खर्च फार होई. पुन्हा तो वेळेवर कपडे देत नसे. दोन तीन डझन शर्ट असूनही ते पुरे पडत नसत. रोज कॉलर बदलावी लागे. शेवटीं स्वतःच धुण्याचें शास्त्र ते शिकूं लागले. त्यांनीं त्यासंबंधींचीं पुस्तकें आणलीं. इस्तरी करण्याचें यंत्र घेतलें. इतर साधनें घेतलीं. आणि गांधीजी स्वतःच धोबी बनले. घरीं धुतलेल्या व घरींच इस्तरी केलेल्या त्यांच्या कॉलरला कोर्टांतील मंडळी हसत. परंतु गांधीजी गंभीर राहात. हळूहळू ते ह्या कलेंत चांगलेच पारंगत झाले.

सहनशील कस्तुरबा

गांधीजींच्या घरीं अनेक मित्र राहायचे. कधीं त्यांचे कारकूनही त्यांच्याकडेच राहात. कुटुंबांतील मंडळींप्रमाणें हे सारे राहात. त्यांत नाना जातींचे व धर्मांचे लोक असत. घरांतील बरेंचसें काम मंडळीच करी. आपापलीं मलमूत्रपात्रें सारे स्वतःच स्वच्छ करीत. परंतु एकदा एक नवीन कारकून राहायला आला. अस्पृश्य आईबापांपासून तो जन्मलेला होता. परंतु ख्रिश्चन धर्म त्यानें घेतला होता. आपलें मलमूत्रपात्र आपणच साफ करायचें हें त्याला माहीत नव्हतें. त्याच्या खोलींत तें तसेंच पडून राहिलें. कोणाचें काम राहिलें तर साध्वी कस्तुरबा तें करीत. परंतु हा तर अस्पृश्य. कस्तुरबांच्या मनांतून अद्याप त्या रूढी गेल्या नव्हत्या. परंतु काय करायचें ? त्या अस्पृश्य बंधूचें तें मलमूत्रपात्र

त्यांनीं उचललें. त्यांच्या कपाळावर दुःखसंतापाच्या आठ्या होत्या. गांधीजींनीं त्या पाहिल्या. त्या आठ्या पाहून गांधीजींना राग आला.

" माझ्या घरांत राहायचें असेल तर असें त्रासल्यासारखें वागून नाहीं चालणार. " गांधीजी रागानें म्हणाले.

" ठेवा तुमचें घर तुमच्यापाशीं. जाऊं दे मला. "

गांधीजींचा राग अनावर झाला. कस्तुरबांचा हात धरून त्यांना ते घरांतून बाहेर काढूं लागले. पत्नीचा सात्त्विक संताप जागृत झाला. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात होत्या.

" कोठें जाऊं मी ? येथें कोण आहे माझें ? पत्नीनें आपलें सारें ऐकलें पाहिजे असें तुम्हांला वाटतें. पत्नीला ना मान ना स्थान. पुरे झाला तमाशा. मनाची नाहीं तर जनाची तरी लाज धरा. तें दार लावा आधीं. लोकांना तरी नको दिसायला. तुमचा सारा विवेक गेला कुठें ? "

शेवटीं गांधीजी ओशाळले. मधूनमधून असे झगडे होत. परंतु कस्तुरबांची सहनशीलता पराकोटीची. खरेंच, हिंदु स्त्रियांच्या सोशिकतेला सीमा नसते. गांधीजी लिहितात, " आमच्या भांडणांत तीच सहनशीलतेंत अधिक ठरे. " असे झगडे पुढें राहिले नाहींत. बा महात्माजींच्या सर्व प्रयोगांत संपूर्णपणें सामील होत. त्यांनीं जणू स्वतःची निराळी इच्छा ठेवलीच नाहीं.

क्षमा

आणि प्रिटोरिया येथील एक गोष्ट सांगायची राहिली. एके दिवशीं गांधीजी नित्याप्रमाणें फिरायला जात होते. फूटपाथवरून जात होते. तेथें मुख्य प्रधान क्रूगर ह्यांचें घर होतें. तेथें पहारा असे. परंतु पहारेकरी गांधीजींस कधीं कांहीं बोलले नाहींत. एके दिवशीं नवीन पहारेकरी आला होता. गांधीजी घरापुढून जात होते. एक काळा आदमी मुख्य प्रधानाच्या घराजवळील फूटपाथवरून जातो ह्याचा त्या पहारेकऱ्यास

नगर वाचनालय सातार

राग आला. त्यानें एकदम गांधीजींस धक्का दिला. लाथ मारली. फूटपाथ-वरून खालीं ढकलून दिलें. शांत होऊन गांधीजी त्या शिपायास जाब विचारणार, तों तेथें एक घोडेस्वार आला. तो गांधीजींस ओळखीत असावा.

" गांधीजी, मीं सर्व प्रकार पाहिला आहे. ह्याच्यावर फिर्याद करा. धडा शिकवा. मी साक्ष देईन. " तो म्हणाला.

" परंतु आमच्या सर्व लोकांशीं हा असाच वागत असेल तर काय अर्थ ? येथलें सारें वातावरणच विषारी आहे. ह्याच्यावर फिर्याद करून काय होणार ? "

शेवटीं त्या शिपायानें गांधीजींची क्षमा मागितली.

प्र ति का र

एकदा गांधीजींस जोहान्सबर्गला जायचें होतें. चार्लस्टाऊनपासून त्या वेळेस जोहान्सबर्गला रेल्वे नव्हती. घोड्याची बगी करून जावें लागे. गांधीजी बगीचें तिकीट काढून तींत बसले. परंतु एका गोऱ्यालाही तींत बसायचें होतें. तो काळ्या आदमीजवळ कसा बसणार ?

" तुम्ही बाहेर गाडीवानाजवळ बसा. उठा. येथें गोऱ्याजवळ काय बसतां ? उठा. "

गांधीजी बाहेर गाडीवानाजवळ बसले.

गाडी चालूं लागली. परंतु गोऱ्या साहेबाला बाहेर बसण्याची हुक्की आली. तो गांधीजींस म्हणाला, " मला तेथें बसायचें आहे. तुम्ही माझ्या पायांशीं गोणपाटावर बसा. मला तेथें बसून चिरूट ओढायचा आहे. "

गांधीजींनीं उठायचें नाकारलें. तो गोरा ठोसे देऊं लागला, ढकलून देऊं लागला. परंतु गांधीजी गाडीचा दांडा धरून तेथेंच मार खात बसून राहिले. त्यांनीं जागा सोडली नाहीं. हात तुटला तरी गज सोडायचा

साने गुरुजी

नाहीं असा त्यांनीं निर्धार केला होता. गांधीजी अहिंसात्मक प्रतिकार करणारे होते. मुकाट्यानें ऐकणारे नव्हते. ते सारें सहन करीत, परंतु आपलें ब्रीद सोडीत नसत.

ह्या सर्व अनुभवांतून सत्याग्रहाचें शस्त्र तयार होत होतें.

शुश्रूषापथक

पुढें दक्षिण आफ्रिकेंतील गोऱ्यागोऱ्यांत युद्ध सुरू झालें. त्या युद्धाला बोअर वॉर म्हणतात. दक्षिण आफ्रिकेंतील डच लोकांना बोअर म्हणतात. ते ब्रिटिशांपासून अलग राहूं इच्छीत होते. ब्रिटिशांच्या साम्राज्यांत राहायची त्यांची इच्छा नव्हती. गांधीजींनीं जखमी शिपायांची शुश्रूषा करण्यासाठीं हिंदी लोकांचें शुश्रूषापथक बनविलें. हिंदी लोकही निर्भय असतात, मरणाला भिणारे नसतात, स्वतःचा जीव धोक्यांत घालूं शकतात हें गांधीजींस दाखवावयाचें होतें. ब्रिटिश साम्राज्यांत मी स्वतःच्या हक्कांसाठीं झगडत आहें. त्या साम्राज्याच्या रक्षणांतही मीं भाग घेतला पाहिजे. अशी त्या वेळची त्यांची विचारसरणी होती. आणि हिंदी पथकानें अपूर्व कामगिरी केली. माऱ्याच्या जागींही जावें लागे. जखमी सेनापतीसही उचलून आणण्याचा मान हिंदी पथकास मिळाला. युद्ध थांबलें. पथक बरखास्त झालें. परंतु मोलाचा अनुभव मिळाला.

त्याग

बोअर वॉर संपल्यावर गांधीजींना पुन्हा वाटलें कीं आपण हिंदुस्थानांत जावें. हिंदुस्थानांतच काम करावें. आफ्रिकेंतील सहकाऱ्यांना त्यांनीं आपला मनोदय कळविला.

"परंतु आम्हीं हाक मारतांच तुम्हीं आलें पाहिजे" मित्र म्हणाले.

"येईन" गांधीजींनीं वचन दिलें.

नामदार गोखले

आणि गांधीजींस प्रेमाचा निरोप देण्यांत आला. त्यांना कितीतरी भेटी देण्यांत आल्या. सोन्याचांदीच्या, हिऱ्यामाणकांच्या सुंदर वस्तु देण्यांत आल्या. गांधीजींचें हृदय कृतज्ञतेनें भरून आलें. परंतु त्या देणग्या गांधीजींनीं स्वतःसाठीं घेतल्या नाहींत. ते सद्गदित होऊन म्हणाले, "मी ह्या वस्तु तुम्हांला परत देतों. ह्या वस्तु म्हणजे तुमची ठेव. येथील जनतेच्या कामासाठीं ह्यांचा उपयोग करा."

कस्तुरबा जरा नाराज होत्या. लोकांनीं प्रेमानें दिलेल्या भेटी. त्या जवळ ठेवण्यांत काय अपराध? परंतु बांनाही पुढें समजून आलें कीं गांधीजींनीं केलें तेंच योग्य. गांधीजी लिहितात, "सार्वजनिक कार्यकर्त्यांनें देणग्यांचा स्वतःसाठीं कधींही स्वीकार करूं नये. माझें हें ठाम मत आहे. अनुभवानें तें दृढतर झालें आहे."

पुन्हा हिंदुस्थान

फेरोजशहा मेथा

गांधीजी हिंदुस्थानांत आले आणि त्या वर्षाची राष्ट्रीयसभा कलकत्त्यास भरायची होती, तेथें गेले. तेथील स्वयंसेवकांस सफाईच्या कामांत त्यांनीं साह्य केलें. झाडूकाम, भंगीकाम, ह्यांत ते पारंगत झाले होते. कॉंग्रेसच्या अधिवेशनांत दक्षिण आफ्रिकेंतील परिस्थितीसंबंधीं त्यांनीं एक ठरावही मांडला. नामदार गोखल्यांची ह्या कामांत त्यांना फार मदत

लोकमान्य टिळक

झाली. मागें जेव्हां गांधीजी हिंदुस्थानांत आले होते तेव्हांपासूनच त्यांना गोखल्यांविषयीं अत्यंत आदर वाटूं लागला होता. गांधीजी लिहितात, "मुंबईचे फेरोजशहा मेथा जणूं सिंह वाटत. ते मला म्हणाले, 'सभेंत बोलणार आहांत तर आधीं लिहून काढा व मला दाखवा.' त्यांची आज्ञा कोण मोडणार? आणि मी लोकमान्य टिळकांना भेटलों. टिळकांना पाहून एक प्रकारची आदरयुक्त भीति वाटली जणूं हिमालयाचें दर्शन. परंतु मी गोखल्यांना भेटलों आणि एकदम मोकळेपणा वाटला, प्रेम वाटलें. शुद्ध गंगोदकांत डुंबत आहें असें वाटलें."

पुन्हा आफ्रिका

नामदार गोखले गांधीजींस म्हणाले, "मुंबईस राहा. बॅरिस्टरी करा आणि मला सार्वजनिक सेवेंत मदत करा." गांधीजी मुंबईस नवा संसार पुन्हा थाटणार तोंच आफ्रिकेंतून पुन्हा तार आली आणि वचनाप्रमाणें गांधीजी पुन्हा दक्षिण आफ्रिकेंत गेले.

जीवनाचें तत्त्वज्ञान

हिंदी लोकांची स्थिति तेथें अधिकाधिक दीनवाणी होत होती. गांधीजींनीं 'इंडियन ओपिनियन' नांवाचें पत्र सुरू केलें. हिंदी प्रश्नांची चर्चा त्यांत सुरू झाली. गांधीजींनीं पुढें हिंदुस्थानांत नवजीवन, यंग इंडिया, हरिजन वगैरे पत्रें चालविलीं. तीं पत्रें कशीं चालवायचीं ह्याचा प्रयोग प्रथम आफ्रिकेंत झाला. तें पत्र म्हणजे गांधीजींच्या जीवनाचें प्रतीक बनलें. जीवनाचें तत्त्वज्ञान, त्यांत येऊं लागलें. त्याच वर्तमानपत्रांत त्यांनीं

आहारमीमांसेवर सुंदर निबंध लिहिले. गांधीजी जीवनाच्या प्रत्येक गोष्टीकडे सत्याच्या दृष्टीनें पाहूं लागले.

गीतेचें अध्ययन अधिक सुरू झालें. शब्दांतील अर्थाशीं ते एकरूप होऊं लागले. अपरिग्रह, समभाव, हे आतां केवळ शब्द राहिले नाहींत. प्रभूकडे जायचें असेल तर सर्वस्वाचा त्याग नको का करायला ? गांधीजी विम्याचे हप्ते भरीत. परंतु मुंबईंतील मित्राला त्यांनीं लिहिलें, " अतःपर हप्ते नकोत. बुडूं दे पॉलिसी." महात्माजी लिहितात, "ईश्वरावर ज्याची श्रद्धा आहे, त्यानें पुढची फिकीर कशाला करावी? विमा म्हणजे ईश्वरावरील श्रद्धेचा अभाव होय."

गांधीजी जे पैसे उरत ते वडील भावाकडे पाठवीत असत. परंतु अतःपर त्यांना निराळी दृष्टि आली. आफ्रिकेंत मिळविलेले पैसे आफ्रिकेंतील लोकांच्या सेवेंतच खर्चायला नकोत का ? ते तिकडे घरीं कोठें पाठवूं ! येथली हिंदी जनता माझीच नाहीं का ? हे सारे माझेच भाऊ. हा समभाव अनुभवायला गांधीजी आतुर झाले होते. त्यांनीं भावाला लिहिलें, " अतःपर माझे पैसे येथील समाजाच्या हितासाठींच खर्च होतील."

गांधीजींच्या जीवनांत संपूर्ण क्रान्ति होऊं पाहात होती. गीतेचें अध्ययन, मनन सुरू होतें. ह्याच सुमारास प्रख्यात इंग्रज लेखक रस्किन ह्याचें " अन्टु धिस लास्ट " हें पुस्तक गांधीजींना एका मित्रानें वाचायला दिलें. मराठींत आचार्य जावडेकर ह्यांनीं ह्या पुस्तकाचा विस्तृत प्रस्तावनेसह सुंदर अनुवाद केला आहे. " अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र " असें त्यांनीं त्याला मराठींत नांव दिलें आहे.

तें पुस्तक वाचून गांधीजी गंभीर झाले. त्यांतील तत्त्वानुसार जीवनाला वळण देण्याचें त्यांनीं ठरविलें. तीन महत्त्वाचे सिद्धान्त त्या पुस्तकांत त्यांना आढळले.


इंग्रज लेखक : रस्किन

१. सर्वांच्या हितांतच आपलें हित असतें.

२. सर्वांना आपापल्या सेवाकर्मानें उपजीविका मिळविण्याचा हक्क आहे आणि त्या अर्थानें सारीं सेवाकर्में सारखींच आहेत. वकिलाचा धंदा काय, न्हाव्याचा काय, सारे समान आहेत.

३. शेतकरी, हस्तश्रमानें जगणारा कामगार ह्यांचें जीवन म्हणजे यथार्थ जीवन होय.

गांधीजी म्हणतात, "पहिली गोष्ट मला माहीत होती. दुसरीचें अंधुक दर्शन झालें होतें. तिसरी अजिबात नवीन होती. परंतु पहिल्या गोष्टींतच दुसऱ्या व तिसऱ्या गोष्टीचा अंतर्भाव होत होता. प्रभात झाली आणि हीं नवीन तत्त्वें जीवनांत आणण्यासाठीं मी उभा राहिलों."

श्रमी जीवन

आचार्य जावडेकर

गांधीजींनीं एक जमीन खरेदी केली. ८० एकर जमीन होती. तेथें सर्वांनीं राहायचें, खपायचें, शेती करायची, फळझाडांची लागवड करायची असें ठरलें. इंडियन ओपिनियन हें पत्रही तेथें आणण्यांत आलें. छापखाना शेतांत सुरू झाला. सर्वांना सारखी मजुरी. महिन्याला प्रत्येकाला ४५ रुपये द्यायचे असें ठरलें. स्वर्गीय मगनलाल गांधी हे महात्माजींचे पुतण्ये. विनोबाजींच्या गोष्टी सांगतांना त्यांचा मीं उल्लेख केला होता.

मगनलाल गांधी

गांधीजींच्या प्रयोगांत ते संपूर्णपणें सामील झाले. मगनलाल गांधी म्हणजे मूर्तिमंत श्रद्धा, मूर्तिमंत उद्योग. त्यांना अशक्य शब्द माहीत नव्हता. गांधीजींनीं एखादी कल्पना मांडतांच ती यशस्वी करून दाखविणें हें मगनलालजींचें काम.

शेतकऱ्याचें जीवन सुरू झालें. परंतु गांधीजींना शेतावर राहातां येईना. जोहान्सबर्ग येथें त्यांना राहाणें भाग पडे. मधूनमधून वसाहतींत जात. परंतु जोहान्सबर्ग येथेंही अत्यंत साधेपणानें गांधीजी राहूं लागले. स्वावलंबन हें जीवनाचें सूत्र ठरलें. ते घरींच भाकरी भाजूं लागले. गांधीजी व त्यांचे मित्र पोलक जात्यावर दळीत. तें दृश्य डोळयांसमोर आणा. ह्या पोलकनींच रस्किनचें तें पुस्तक गांधीजींना दिलें होतें.

ब्रह्मचर्य

आणि आतां ब्रह्मचर्याचे विचार त्यांच्या मनांत सारखे घोळूं लागले. जीवन सेवेंत दवडायचें हा तर त्यांचा निश्चय झालाच होता; परंतु सेवेसाठीं संपूर्ण शक्ति नको का ओतायला? माझी पत्नी उद्यां प्रसूत व्हायची असेल तर इकडे होमकुंडांत मला उडी घेतां येईल का? कुटुंबाची सेवा कीं मानवजातीची सेवा? असे विचार गांधीजींच्या मनांत रात्रंदिवस येत होते. त्यांनीं मित्रांजवळ विचारविनिमय केला आणि ब्रह्मचर्याचें व्रत घेतलें.

व्रत घ्यावें. प्रतिज्ञा करावी. तो बचाव असतो. 'माझें कांहीं तसें व्रत वगैरे नाहीं' असें आपण पुष्कळ वेळां म्हणतों आणि मोहांना बळी पडतों. दुबळेपणा, चंचलता ह्यांना झडझडून टाकायचें असेल तर व्रती होणें हाच

रामबाण उपाय होय. आपण एखाद्या वस्तूचा त्याग करतों. परंतु तो तात्पुरताच असतो. त्या त्या वस्तूबद्दल खरी विरक्ति उत्पन्न झाल्याशिवाय तो त्याग टिकत नाहीं.

त्याग न टिके रे
वैराग्याविना

असें एका गुजराथी संत कवीनें म्हटलें आहे. तुकारामांनींही म्हटलें आहे—

विवेकासहित वैराग्याचें बळ
धगधगीत ज्वाळ वह्नि जैसा

विचारपूर्वक स्वीकारलेल्या वैराग्याची शक्ति प्रखर अग्नीप्रमाणें आहे. साऱ्या मोहांचें मग भस्म होतें.

गांधीजींनीं आपले विचार कस्तुरबांना सांगितले आणि त्या थोर माउलीनेंही संमति दिली. १९०६ मध्यें गांधीजींनीं ब्रह्मचर्याचें व्रत घेतलें. त्या वेळेस त्यांचें वय ३७ वर्षांचें होतें. जीवनांत अपार आनंद आला. ब्रह्मचर्य पाळायचें तर सर्व इंद्रियांवर संयम हवा. काय खायचें, काय बोलायचें, काय वाचायचें, काय ऐकायचें, कसें बसायचें, कसें निजायचें, सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. सुखोपभोग सोडावे लागतात. सुखद स्पर्श, सुखद स्वाद, सुखद सुगंध ह्या सर्वांचा त्याग करावा लागतो. महात्माजी म्हणतात, "ब्रह्मचर्य म्हणजे अखंड सावधानता. ईश्वरावर श्रद्धा ठेवून प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. आपले प्रयत्न हवेतच. परंतु शेवटीं प्रभुकृपा हवी."

सत्यनिष्ठा

गांधीजींची अशी तयारी होत होती. आदर्श सत्याग्रही सिद्ध होत होता. लौकरच अभिनव अशा अहिंसक संग्रामाचें शिंग फुंकलें जाणार

होतें. अद्याप बॅरिस्टरी सुरू होती. परंतु बॅरिस्टरींत खोटा खटला त्यांनीं कधीं घेतला नाहीं. गांधीजींची सत्यनिष्ठा सर्वांना कळली होती. खोटा खटला त्यांच्याकडे कोणी आणीतच नसे. एकदा पारशी व्यापारी रुस्तुमजी शेठ ह्यांच्यावर एक संकट आलें होतें. रुस्तुमजी शेठ व जकात अंमलदार ह्यांचे संबंध चांगले होते. शेठजी मुंबई, कलकत्ता येथून माल मागवीत असत. परंतु कांहीं जादा माल ते जकात चुकवून आणीत. इतकाच माल आहे असें सांगत. माल असे जास्त. एकदा अधिकाऱ्यांस शंका आली आणि खोटी गोष्ट उघडकीस आली. आतां सरकार खटला भरणार !

रुस्तुमजी शेठ गांधींजींकडे आले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रु येत होते. अब्रू जाण्याची वेळ.

" तुम्ही आपला गुन्हा प्रांजलपणें कबूल करा. " गांधीजी म्हणाले.

" तुमच्याजवळ केला ना कबूल ? " ते म्हणाले.

" तुम्हीं सरकारला फसवलें आहे. माझ्याजवळ कबूल करून काय उपयोग ? "

रुस्तुमजी शेठजींचे वकील निराळा सल्ला देत होते. परंतु शेठजींनीं गांधीजींच्या सूचनेप्रमाणें वागण्याचें ठरविलें. गांधीजी जकातीच्या अधिकाऱ्यांस व सरकारी वकिलांस भेटले. तुम्ही सांगाल तो दंड शेठजी देतील असें गांधीजी म्हणाले. अधिकाऱ्यांना अधिक संशयाला जागा नव्हती. सारें सत्य आपल्यासमोर आहे अशी त्यांची खात्री झाली. जेवढी जकात चुकविली होती त्याच्या दुप्पट दंड शेठजींनीं भरावा असें ठरलें आणि तडजोडीनें प्रश्न मिटला. ती सर्व हकीकत नीट लिहून काढून शेठजींनीं आपल्या बैठकीच्या जागीं लावून ठेवली. तो सत्याचा वारसा त्यांनीं आपल्या वारसदारांसाठीं राखून ठेवला. इतर व्यापाऱ्यांसही तो आदर्श होता.

निसर्गोपचार

असे दिवस जात होते. गांधीजींचा पावलोपावलीं विकास होत होता. नवीन नवीन कल्पना, नवीन नवीन प्रयोग. सारें सत्यासाठीं. सारें जीवन म्हणजे सत्याची प्रयोगशाळा झाली. औषधांवरला त्यांचा विश्वास उडाला. ते निसर्गोपचारी बनले. हें शरीर पांचभौतिक आहे. पांचभौतिक उपायांनीं शरीराचे रोग बरे व्हावेत. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंचमहाभूतें. कांहीं रोग पृथ्वीनें म्हणजे मातीनें बरे होतील; कांहीं पाण्यानें; कांहीं प्रकाशानें; कांहीं हवेनें; कांहीं मोकळ्या वृत्तीनें व कांहीं प्रसन्न वातावरणानें. आकाश म्हणजे मोकळेपणा, काळजी नसणें, अशीही मोघम मीमांसा कोणी करतात. गांधीजी अशी मीमांसा करीत नव्हते असें नाहीं; परंतु निसर्गोपचारावर त्यांनीं भर दिला. जलचिकित्सा, प्रकाशचिकित्सा, इत्यादींचे पुरस्कर्ते पुढें आले होते. गांधीजी त्याप्रमाणें प्रयोग करूं लागले. मुलें अत्यवस्थ आजारी असतांही ते आपले प्रयोग करीत. प्रभूवर श्रद्धा ठेवून प्रयोग सुरू ठेवीत. सुदैवानें त्यांचे प्रयोग यशस्वी झाले. माउली कस्तुरबाई अशा वेळेस पतीच्या तंत्रानें वागत. मुलांचे प्राण घुटमळत असावेत, परंतु त्या पतीच्या श्रद्धेवर विसंबून राहात.

सत्याग्रह

नंतर ती सत्याग्रहाची मंगल वेळ आली. ट्रान्सवॉल सरकारनें २२ ऑगस्ट, १९०६ रोजीं एक नवीन वटहुकूम जाहीर केला. ट्रान्स्वॉलमध्यें राहाणाऱ्या प्रत्येक हिंदी माणसानें, आठ वर्षांवरील प्रत्येक स्त्री-पुरुष व्यक्तीनें, राहाण्याची परवानगी काढली पाहिजे, आपलें नांव नोंदवून पास घेतला पाहिजे. प्रत्येकानें आपलें वय, जात, धंदा, राहाण्याचें ठिकाण नोंदवायचें. शरीरावरच्या खाणाखुणा सांगायच्या. आंगठा व बोटें ह्यांचे ठसे द्यायचे. कोठेंही हिंडतां फिरतांना तो पास सदैव जवळ ठेवायचा. असा तो वटहुकूम होता. अमूक एका तारखेच्या आंत सर्वांनीं पास

काढलेच पाहिजेत अशी घोषणा झाली. जो ह्याप्रमाणें न वागेल तो गुन्हेगार ठरेल, त्याला दंड होईल वा तुरुंगवास घडेल. त्याला हद्दपारही केलें जाईल. कोर्टाच्या इच्छेनुसार शिक्षा होईल.

हा हिंदी लोकांचा अपमान होता, सर्वनाश होता. गांधीजी विचार करूं लागले. त्यांनीं कांहीं प्रमुख लोकांची सभा घेतली. चर्चा झाली. शेवटीं जाहीर सभा घेण्याचें ठरलें. १९०६ सेप्टेंबरच्या ११ तारखेस जाहीर सभा झाली. सभेंत चार ठराव झाले. चौथा ठराव महत्त्वाचा होता. "आम्ही सर्व हालअपेष्टा सोसूं; परंतु हा हुकूम मानणार नाहीं." अशा अर्थाचा तो ठराव होता आणि निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ सुरू झाली. ह्या चळवळीलाच पुढें सत्याग्रह असें नांव मिळालें.

परवाना काढायला जाणाऱ्यांवर निरोधनही सुरू झालें. कांहीं थोड्या लोकांनीं परवाने काढले. परंतु ५०० हून अधिक संख्या नव्हती. धरपकड केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें सरकारला वाटलें. १९०७ चा नाताळ होता. २८ डिसेंबर रोजीं कोर्टांत हजर राहा अशा नोटिसा गांधीजी व इतर कांहीं प्रमुख कार्यकर्ते ह्यांच्यावर बजावण्यांत आल्या. सारे कोर्टांत गेले. "१० जानेवारी १९०८ च्या आंत परवाने काढा; नाहीं तर त्या तारखेनंतर ४८ तासांच्या आंत ट्रान्सवॉल सोडून जा." असें त्यांना सांगण्यांत आलें. परंतु कोणींही परवाना काढला नाहीं. ट्रान्सवॉल सोडूनही कोणी गेलें नाहीं. सर्वांवर खटले भरण्यांत आले. ज्या कोर्टांत गांधीजी बॅरिस्टर म्हणून कामें चालवीत तेथेंच आज ते कैदी म्हणून उभे होते. परंतु ते सत्याग्रही कैदी होते. बॅरिस्टरीपेक्षां हा केवढा सन्मान होता! गांधीजी म्हणाले, "जास्तींत जास्त शिक्षा मला द्या." गांधीजींना दोन महिन्यांची साधी सजा देण्यांत आली.

महापुरुष तुरुंगांत चालला. गांधीजींच्या मनांत आलें, "माझ्या पाठीमागें कसें होईल? लोक दबतील कीं शेकडोंनीं तुरुंगांत जायला तयार होतील? लोक न आले तर? दोन्ही महिने का तुरुंगांत दवडावे लागणार?"

गांधीजींना वाईट वाटलें. "काय हे विचार? तुरुंग म्हणजे स्वर्ग समजा असें ना मी सभेंत सांगत असें? सत्यासाठीं तुरुंगच काय, सर्वस्व अर्पण करण्याचा प्रसंग आला तरी त्यांत आनंद मानावा, असें ना मी सांगत असें?" असे विचार मनांत आले आणि ते आनंदले. तोंड फुललें.

जनरल स्मट्स्

गांधीजी तुरुंगांत गेले. तेथें दुसरे दोस्त होतेच. आणि रोज सत्याग्रहींच्या तुकड्या येत होत्या. बाहेरची वार्ता त्यामुळें कळे. अवर्णनीय उत्साह होता. तुरुंगांतील अन्न नीट नसे. तक्रार केली तर अधिकारी म्हणायचे, "हा तुरुंग आहे. येथें जिभेचे चोचले नाहींत. हा हिंदुस्थान नाहीं. कैद्यांनीं डॉक्टराचा आव आणून बोलूं नये. आम्हांला आरोग्याचे नियम माहीत आहेत." परंतु शेवटीं सुपरिंटेंडेंटनें तुम्ही तुमचें अन्न स्वतः शिजवीत जा असें सांगितलें. आणि अन्न जरा रुचकर होऊं लागलें.

परंतु सुखसोयींकडे ह्या सत्याग्रहींचें फारसें लक्ष नव्हतें. ते अभंग निश्चयानें उभे होते. पंधरा दिवसांत दीडशें सत्याग्रही तुरुंगांत जमले. परंतु वार्ता आली कीं सरकार तडजोड करणार. जनरल स्मट्स् ह्यांनीं गांधीजींना बोलावलें व सांगितलें, "तुम्ही आपण होऊन स्वेच्छेनें जर परवाने काढाल तर पुढें हा कायदा आम्ही रद्द करूं. परंतु आज स्वेच्छेनें–सक्तीनें नव्हे–परवाने काढा." सत्याग्रही ह्या नात्यानें गांधीजींनीं तडजोड मान्य केली.

पुन्हा प्राणांवर संकट

परंतु कांहींना ह्यांत स्वाभिमान-हानि वाटली. मीर आलम म्हणून एक पठाण होता. गांधीजींचा तो जुना पक्षकार. तो नेहमीं गांधीजींचा सल्ला

धर्मगुरु डोक

ध्यायचा. परंतु ही तडजोड त्याला मान्य झाली नाहीं. मग चळवळ कशाला सुरू केली असें त्याला वाटलें. पहिला परवाना गांधीजी काढणार होते. पुढाऱ्यानें उदाहरण घालून दिलें पाहिजे. गांधीजी निघाले.

"कोठें जातां ?" मीर आलमनें प्रश्न केला.

"परवाना काढायला. बोटांचे ठसे द्यायला. मी दाही बोटांचे ठसे देणार आहें. परंतु तुम्ही दोन आंगठ्यांचे दिलेत तरी चालेल. चला माझ्या बरोबर." गांधीजी म्हणाले.

इतक्यांत मोठा सोटा डोक्यावर बसला. "हे राम" असे शब्द गांधीजींच्या तोंडांतून बाहेर पडले. ते मूर्च्छित झाले. आणखी तडाखे, आणखी प्रहार, लाथा, बुक्क्या. युरोपियन लोक धावले. मीर आलम व त्याचे साथीदार पळणार, तों त्यांना युरोपियनांनीं धरून ठेवलें. पोलिसही आले. गांधीजींचे स्नेही श्रीयुत डोक हेही तेथें आले.

"कसें वाटतें ?" त्या प्रेमळ धर्मगुरूनें विचारलें.

"बरें वाटतें. परंतु मीर आलम कोठें आहे ?"

"त्याला अटक करण्यांत आली आहे."

"त्यांना सोडून द्या."

"तें असूं दे. परंतु तुम्ही माझ्याकडे येतां का सरकारी दवाखान्यांत जातां ? माझ्या घरीं याल तर मी व माझी पत्नी शुश्रूषा करूं."

"तुमच्या घरींच न्या."

गांधीजींना डोक ह्यांच्या घरीं नेण्यांत आलें. ज्या अधिकाऱ्यासमोर परवाने काढायचे तो गांधीजींना भेटायला आला.

" मी परवाना काढायला येत होतों. आतां आधीं माझा परवाना द्या, माझ्या बोटांचे ठसे घ्या." गांधीजी म्हणाले.

" परंतु बरे व्हा. घाई काय आहे ?"

" पहिलें नांव माझें हवें. लोकांना मी परवाने काढा असें सांगतों; म्हणून आधीं मीं तसें केलें पाहिजे."

त्या अधिकाऱ्याच्या डोळ्यांत पाणी आलें. परवाना काढला गेला आणि मीर आलमचें काय झालें ? गांधीजींनीं सांगितलें, " त्यांची चुकीची समजूत झाली असेल. त्यांना राग आला. त्यांना सोडून द्या." परंतु राजमार्गावरचा हा गुन्हा आहे. गांधीजी क्षमा करीत असले तरी सरकारनें क्षमा करूं नये असें युरोपियन लोक म्हणूं लागले. मीर आलम ह्यास तीन महिन्यांची सजा झाली.

गांधीजींना बरीच दुखापत झाली होती. ओठ कापला गेला होता. गालांतूनही रक्त येत होतें आणि पुढचे दोनतीन दांतही पडले. अंग ठणकत होतें. प्रेमळ लोक सेवा करीत होते. 'पूर्ण विश्रांति घ्या' असें डॉक्टरांचें सांगणें होतें; तरीही गांधीजींनीं एक पत्रक लिहून प्रसिद्धीस दिलें.

" माझ्यावर हल्ला करणाऱ्यांना आपण काय करीत आहोंत ह्याचें भान नव्हतें. हल्ला करणारे मुसलमान होते म्हणून हिंदूंनीं संतापूं नये. हिंदु जर मुसलमानांवर रागावतील तर तो प्रभूचा अपराध होईल. आज सांडलेल्या रक्तानें हिंदु-मुसलमान अधिकच जवळ येवोत. प्रभुच्या कृपेनें दृढ ऐक्य घडो ! माझ्यावर हल्ला होवो वा न होवो; आपला मार्ग स्पष्ट आहे. कराराप्रमाणें सर्वांनीं बोटांचे ठसे देऊन ताबडतोब परवाने घ्यावेत. ज्यांची सदसद्विवेकबुद्धि आड येत असेल त्यांनीं नये काढूं परवाने. परंतु आज सक्ति नाहीं. आणि आपण होऊन आज परवाने काढूं तर हा कायदा

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

सरकार रद्द करणार आहे. म्हणून आपलें सर्वांचें पवित्र कर्तव्य परवाना काढणें हें आहे."

गांधीजी बरे होऊं लागले. डोक ह्यांची छोटी मुलगी आपल्या गोड आवाजांत इंग्रजी प्रार्थना-गीतें म्हणे. महात्माजी दुःख विसरून जात.

प्रेमल ज्योति तारो दाखवी
मुझ जीवनपंथ उजाल

हें ज्या इंग्रजी गीताचें गुजराथी भाषांतर आहे तें गीत ती मुलगी गोड म्हणे.

परवान्यांची होळी

परंतु काळा कायदा रद्द झाला का? नाहीं. सरकारनें दिलेला शब्द पाळला नाहीं. सरकारला कळविण्यांत आलें कीं अमक्या तारखेच्या आंत कायदा रद्द न कराल तर साऱ्या परवान्यांची होळी करूं. सरकारचें उत्तर आलें नाहीं. शेवटचा दिवस आला. प्रचंड सभा भरली. सरकारचें उत्तर आलें तर ह्याच सभेंत सरकारचें अभिनंदन करूं, असें ठरलें होतें. सभेचें काम सुरू होणार तों तारवाला आला. परंतु तारेंत नकार होता. लोकांना आनंद झाला. दोन हजार परवाने तेथें आले होते. त्यांची होळी पेटविण्यांत आली. ज्यांनीं परवाने बरोबर आणले नव्हते त्यांनींही घरीं जाऊन आणले. आणि हा कोण उभा आहे? सहा फूट उंच, धिप्पाड पठाण. अरे! हा तर तो मीर आलम.

"गांधीजी, माझाही परवाना जाळण्यासाठीं द्या. माझ्या अपराधाची तुम्ही क्षमा करा. मीं तुम्हांला पुरें ओळखलें नव्हतें. तुम्ही खरे शूर आहांत."

गांधीजींनीं मीर आलमचे हात हातांत घेतले. तें दृश्य रोमांचकारी होतें. सारी सभा टाळ्यांच्या कडकडाटानें दुमदुमली.

टॉलस्टाय फार्म

कालेनबाख

तुरुंगांत जे सत्याग्रही जात, त्यांच्या मुलाबाळांचें, बायकामाणसांचें काय ? त्यांना रोख मदत दिली जाई. परंतु असें किती दिवस चालणार ? स्वावलंबन बरें. आणि एके ठिकाणीं ११०० एकर जमीन उपयोगासाठीं मिळाली. गांधीजींचे जर्मन स्नेही कालेनबाख ह्यांची ती जमीन होती. फळझाडें भरपूर होतीं. विहिरी होत्या. जवळ एक सुंदर नालाही वाहात होता. येथें झोपड्या बांधण्यांत आल्या. हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी सर्व धर्मांची मंडळी तेथें होती. गुजरात, आंध्रदेश, तामीळनाड, उत्तर हिंदुस्थान, सर्व प्रांतांतून आलेली ती सत्याग्रही मंडळी होती. तें जणूं अखिल भारतीय संमेलन होतें.

येथें सारे खपत. येथें पीक घेतलें जाई. फळें भरपूर होतींच. हातांनीं दळीत. सर्वांच्या तोंडावर टवटवी आली. अशक्त होते ते सशक्त झाले. ही वसाहत म्हणजे उद्योगमंदिर झालें. चपला तयार करण्याचें काम सुरू झालें. गांधीजी सुंदर रीतीनें तयार करीत. किती तरी जोड त्यांनीं शिवले. सुतारीचें कामही सुरू झालें. बाकें, पेट्या, खुर्च्या, टेबलें होऊं लागलीं.

मुलांच्या शिक्षणाचेही प्रयोग सुरु झाले. निरनिराळ्या भाषा बोलणारीं मुलें. निरनिराळ्या धर्मांचीं, निरनिराळ्या हिंदी प्रांतांतील. त्यांना कोणत्या एका भाषेंत शिकवणार ? परंतु प्रयोग सुरू होते; आणि तीं मुलें प्रेमानें वागायला शिकलीं, परधर्मसहिष्णुता शिकलीं, हें काय कमी होतें ? उद्योगधंद्याच्या द्वारा शिक्षण देण्याची वर्धाशिक्षण-पद्धति आफ्रिकेंतील त्या वसाहतींत प्रथम जन्माला आली. त्या वसाहतीला "टॉलस्टाय फार्म" असें नांव देण्यांत आलें.

महर्षि टॉलस्टाय

महात्माजींवर रस्किनच्या पुस्तकाचा जसा परिणाम झाला तसाच टॉलस्टायच्या ग्रंथांचाही झाला होता. टॉलस्टाय प्रेमधर्माचा प्रेषित होता. श्रमजीवनाचा पुजारी होता. म्हातारपणीं टॉलस्टाय शेतांत खपे, गवत कापी. टॉलस्टाय शांततावादी होता. महात्माजींनीं टॉलस्टायच्या शांतींत प्रतिकार ओतला. टॉलस्टाय प्रतिकाराचा पुरस्कर्ता नव्हता. सारें सहन करा म्हणे. परंतु गांधीजी म्हणत, " सत्यासाठीं झगडत असतां सारें सहन करा. " गांधीजी झगडायला शिकवतात; परंतु अहिंसक रीतीनें, अनत्याचारी मार्गानें.

गांधीजींच्या सत्याग्रही संग्रामाला महर्षि टॉलस्टाय ह्यांनीं आशीर्वाद पाठविले होते. आपले डोळे मिटण्यापूर्वी अहिंसक लढा आपण ऐकला म्हणून टॉलस्टायला आनंद झाला. त्या वेळेस ते अति वृद्ध झाले होते. लौकरच ते पुढें देवाकडे गेले.

टॉलस्टायप्रमाणेंच अमेरिकेंतील निसर्गप्रेमी थोरो ह्याच्या विचारांचा गांधीजींवर परिणाम झाला होता. थोरो हा साध्या राहाणीचा भोक्ता. कमींत कमी गरजांचा पुरस्कर्ता. निसर्गाचा तो उपासक. तो झाडामाडांशीं बोले. तो प्रेमानें सर्पही अंगावर घेई. सरकारचे अन्याय्य कायदे तो मानीत नसे. तो म्हणे, " सरकार अन्याय करीत असेल तर न्यायी माणसाचें तुरुंग हेंच स्थान होय. " आणि गांधीजी तेंच करीत होते.

निसर्गप्रेमी थोरो

१९१२ मध्यें नामदार गोखले आफ्रिकेंत भिष्टाईसाठीं आले. गांधीजी गोखल्यांना राजकीय गुरु मानीत. गांधीजी स्वतः गोखल्यांची सर्व सेवा करीत. गोखल्यांचे कपडे ते स्वतः धूत.

" परंतु नीट इस्तरी होईल का ? " गोखल्यांनीं विचारलें.

" पाहा तर खरी. मी ह्यांत पारंगत आहें " गांधीजी म्हणाले.

इस्तरी पाहून गोखले खूश झाले. गांधीजी त्यांचे बूटही नीट पुसून ठेवीत. ती प्रेमसेवा होती. गोखल्यांनीं तेथील सरकारी प्रमुखांच्या भेटीगांठी घेतल्या. गोखले विश्वास ठेवणारे. ते गांधीजींस म्हणाले, " पुढील वर्षीं काळा कायदा रद्द होईल. तीन पौंड डोईपट्टीचा नवीन कर बसला आहे तोही जाईल. सत्याग्रह थांबवा. "

सत्याग्रहांत स्त्रिया सामील नगर वाचनालय सातारा

सत्याग्रह थांबविण्यांत आला. परंतु पुनश्च गोऱ्या सरकारनें हातावर तुरी दिल्या. जुनीं बंधनें राहिलींच, परंतु नवीन अपमानास्पद बंधनें आलीं. चीड आणणारा आणखी एक नवीन कायदा करण्यांत आला.

" जीं लग्नें खिश्चनधर्मविधीप्रमाणें झालेलीं नसतील, किंवा जीं लग्नें नोंदणी-पद्धतीनें झालीं नसतील, तीं सारीं बेकायदा ठरविण्यांत येतील."

असा हा आसुरी कायदा होता. हिंदु, मुसलमान, पारशी, सर्वांचीं लग्नें बेकायदेशीर ठरलीं. धर्मपत्नीचें स्थान कोठें राहिलें ? सतीत्वाचा हा अपमान होता, पातिव्रत्याची विटंबना होती. स्त्रिया संतापल्या. आतांपर्यंत स्त्रियांना सत्याग्रही म्हणून घेण्यांत येत नसे. परंतु स्त्रियांवरचा अन्याय दूर करायला स्त्रियांनीं पुढें यावें असें गांधीजींना वाटलें. स्त्रियांची शक्ति जागी झाली.

त्या दिवशीं टॉलस्टाय फार्मवर स्त्रियांची बैठक होती. गांधीजी सारें सांगत होते. " तुम्हांला तुरुंगांत पाठवतील. सक्तीची शिक्षा होईल.

कपडे जेलचे मिळतील. धोबीकाम वगैरे करावें लागेल. अपमान होतील. सारें कराल सहन ? तुमचीं लहान मुलें, त्यांचे हाल होतील." परंतु स्त्रिया म्हणाल्या, "आम्ही सर्व संकटांना तोंड द्यायला तयार आहोंत."

परंतु कस्तुरबा कोठें होत्या ? गांधीजी इतर भगिनींना सत्याग्रहाची दीक्षा देत होते. त्यांनीं कस्तुरबांना कां नाहीं विचारलें ? आपली इच्छा कां लादावी असें का त्यांना वाटलें ? आपण साधें विचारलें तरी तें लादल्यासारखें होईल असें का त्यांना वाटलें ? परंतु कस्तुरबांना फार वाईट वाटलें.

"तुम्ही मला कां नाहीं कांहींच विचारीत ? मी का सेवेला, सत्याग्रहाला अपात्र आहें ? ज्या मार्गानें जायला तुम्ही इतर भगिनींस बोलावीत आहांत त्या मार्गानें मीही जाईन." त्या म्हणाल्या. "तूंही तुरुंगांत गेलीस तर मला परमानंद होईल. परंतु ह्या गोष्टीचा ज्यानें त्यानें विचार करावा. मला तुझा विश्वास वाटत नाहीं असें नाहीं. परंतु मी आपण होऊन तुला प्रेरित करणार नाहीं. उद्यां खटला झाला, कोर्टांत घाबरलीस, तुरुंगांतील हालअपेष्टांना कंटाळलीस, तर तें तुला व मला आणि आपल्या कार्याला किती वाईट !" गांधीजी म्हणाले.

"तुरुंगांतील हालांना कंटाळून मीं माफी मागितली तर माझा तुम्ही त्याग करा. तुम्ही जर हालअपेष्टा सहन करूं शकतां, इतर भगिनी, लहान मुलें सहन करूं शकतात, तर मी कां नाहीं सहन करणार ?"

"ठीक. तूंही सामील हो. माझा स्वभाव तुला माहीत आहे. माझ्या अटी माहीत आहेत. फिरून विचार कर. आतां निश्चय बदललास तरी त्यांत लाजण्यासारखें कांहीं नाहीं. परंतु एकदा निर्धार केल्यावर मात्र तो अभंग राहिला पाहिजे. विचार कर."

"मला विचार करायचा नाहीं. माझा निश्चय झाला आहे."

हुतात्मा वलीअम्मा

आणि सत्याग्रही नारी बाहेर पडल्या. ट्रान्सवॉलची हद्द ओलांडून त्या नाताळमध्यें शिरल्या. परंतु त्यांना कोणी पकडीना. त्या पुढें चालल्या. न्यू कॅसल येथें खाणी होत्या. तेथें मजूर होते. मायबहिणींनीं सारी करुण-कथा त्यांना सांगितली. तीन पौंडांचा कर, लग्नें बेकायदा ठरवणारा कायदा! कामगार संतापले. त्यांनीं संप पुकारला. वणवा पेटला.

सरकारनें पाहिलें कीं ह्या सत्याग्रही स्त्रियांना ह्यापुढें मोकळें ठेवणें धोक्याचें आहे. स्त्रियांना अटक करण्यांत आली.

तीन तीन महिन्यांची शिक्षा देण्यांत आली. भारतीय नारी तिकडे दूर आफ्रिकेंतील तुरुंगांत खितपत पडल्या. कस्तुरबांचें एकधान्य व्रत होतें. त्यांची दाद लागेना. मोठ्या कष्टानें त्यांना त्यांचा आहार मिळूं लागला. परंतु त्या अशक्त झाल्या. सुटल्या तेव्हां नुसतीं हाडें राहिलीं होतीं. मोठ्या प्रयत्नानें त्यांचे प्राण वांचले.

आणि ती हुतात्मा वलीअम्मा! १६ वर्षांचें तिचें वय. ती तुरुंगांतून ताप घेऊन बाहेर आली. महात्माजी तिच्या समाचारास गेले. ती उंच होती; त्यामुळें तिचा कृशपणा अधिकच भेसूर दिसे.

"वलीअम्मा, तुला तुरुंगांत गेल्याबद्दल वाईट नाहीं ना वाटत?" गांधीजींनीं विचारलें.

"छे:! मुळींच नाहीं. मला अटक करतील तर आजही मी पुन्हा आनंदानें तुरुंगांत जाईन" ती म्हणाली.

"आणि मरण आलें तर?"

" काय पर्वा ? देशासाठीं मरावें असें कोणास वाटणार नाहीं ? " आणि ह्या संवादानंतर थोड्याच दिवसांत वलीअम्मा देवाघरीं गेली. अमर अशी स्फूर्ति ठेवून, भारतीयांना शाश्वत असा वारसा ठेवून वलीअम्मा गेली !

त्या सत्याग्रही ललनांचा तो निर्मळ, निरपेक्ष असा त्याग होता. तें अति निर्दोष बलिदान होतें. प्रभु अशा यज्ञानेंच संतुष्ट होत असतो. वलीअम्माचें तें बलिदान देवाघरीं रुजू आहे. खरा सत्याग्रही सत्यावर उभा असतो. सत्य ह्या शब्दाचा अर्थच मुळीं " जें आहे. " जें आहे तें नाहींसें कसें होणार ? त्याला कोण चिरडणार ? म्हणून सत्याग्रहीस पराभव माहीत नसतो, निराशा ठाऊक नसते. कारण जें कधीं नाहींसें होणार नाहीं तें त्याच्याजवळ असतें. आणि असत्य ह्याचा अर्थच मुळीं जें नाहीं तें. असत्यावर इमारत उभारणें म्हणजे वाळूच्या पायावर घर बांधणें होय. तें कसें टिकेल ?

सक्तमजुरी

आणि हजारों कामगारांचें काय करायचें ? मालक त्यांना चाळींतून राहूं देत ना. आपलें थोडेंसें सामान घेऊन ते बाहेर पडले. स्त्रिया, पुरुष, मुलें ! ती स्वातंत्र्याची महान् यात्रा होती. गांधीजी त्यांना घेऊन टॉलस्टाय फार्मवर येणार होते. तेथें खपूं, राहूं. नाताळमधून ट्रान्सवॉलमध्यें यायचें. तो कायदेभंग होता. गोळीबार होणार का ? काय होणार ? परंतु गांधीजी ती शांतिसेना घेऊन निघाले. ब्रेड व साखर हा आहार असे. वाटोवाट मुक्काम होत. तेथें ब्रेड वांटली जाई. गांधीजींना दोनतीनदा वाटेंत अटक झाली. परंतु जामिनावर पुनः पुन्हा सोडण्यांत येई. परंतु शेवटीं गांधीजींना नऊ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. दुसऱ्याही एका कोर्टांत आणखी तीन महिन्यांची साधी सजा झाली. पुढें कामगारही गिरफदार केले गेले. परंतु ज्या खाणींत ते काम करीत तेथेंच त्यांच्या

सभोवतीं कुंपण घालून तुरुंग करण्यांत आला; आणि त्याच खाणींत त्यांना सक्तमजुरीचें काम देण्यांत आलें! अत्यंत नीच अशी ती गोष्ट होती.

गांधीजी आदर्श कैदी होते. त्यांना सक्तमजुरीची सजा होती. खडी फोडण्याचें काम त्यांना देण्यांत आलें. गांधीजी खडी फोडीत. हातांतून रक्त येई. परंतु ते काम थांबवीत नसत. तुरुंगांत त्यांनीं भंगीकामही केलें. अशी तपस्या हा महापुरुष करीत होता.

लॉर्ड हार्डिंज

सत्याग्रहाचा विजय

आणि तिकडे कामगारांवर जुलूम होत होता. गोळीबारही झाले. कांहीं कामगार ठार झाले. इकडे हिंदुस्थानांत नामदार गोखले संतापले. वचनभ्रष्ट सरकारची त्यांना चीड आली. ते आजारी होते, तरी त्यांनीं दौरे काढले. फंड जमविला. हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज ह्यांनीं दक्षिण आफ्रिकेच्या सरकारवर खरमरीत टीका केली. ब्रि. वसाहतींतील कारभारावर हिंदुस्थान सरकारनें टीका केल्याचा तो पहिलाच प्रसंग.

चौकशीमंडळ नेमलें गेलें. चौकशी झाली. तीन पौंडांची डोईपट्टी गेली. सारीं लग्नें कायदेशीर ठरलीं. वसाहतींत राहाण्याचा परवाना असला म्हणजे कोठेंही जावें, यावें, वगैरे ठरलें. सत्याग्रहाचा तो अपूर्व विजय होता. जगाच्या इतिहासांत एक नवीन पान लिहिलें गेलें.

सेवा व सांत्वन

महात्माजींनीं स्वतः द. आफ्रिकेंतील सत्याग्रहाचा इतिहास लिहिला आहे, तो तुम्ही वाचा. मराठींतही पुष्कळ वर्षांपूर्वीं त्याचें भाषांतर झालें

होतें. त्या सत्याग्रहाच्या संग्रामांत किती तरी करुण व गंभीर प्रसंग आहेत. गोळीबारांत जिचा पति ठार झाला होता, त्या दुःखी विधवेला गांधीजी म्हणाले,

"तुमचें सांत्वन मी कसें करूं? मी अद्याप जिवंत आहें. माझी पत्नीही विधवा झाली असती तर..." गांधीजी काय बोलणार? ते सत्याग्रह-संग्रामाचे सेनापति होते. किती तरी हृदयद्रावक प्रसंग त्यांना पाहावे लागले असतील.

कामगारांचीं बायकामुलें टॉलस्टाय फार्मवर होतीं. गांधीजी सर्वांची काळजी घेत. आजारी स्त्रियांची शुश्रूषा करीत. ते स्वतः सर्वांचीं धुणीं गोळा करून नदीवर जात आणि धुणीं धुवून आणीत. ते सहृदय प्रसंग डोळ्यांसमोर येतांच हृदय सद्गदित होतें.

नामदार गोखले ह्यांच्यावर गांधीजींच्या पवित्र व प्रभावी व्यक्तिमत्वाची अपार छाप पडली. ते म्हणाले, "भारतीय संस्कृतींतील सर्व शुचिता व दिव्यता गांधीजींच्या द्वारा प्रकट झाली आहे. हिंदी संस्कृतीचा परमोच्च विकास म्हणजे गांधीजींची मूर्ति होय." २५।३० वर्षांपूर्वीचे हे उद्गार. आणि ह्या २५।३० वर्षांत गांधीजी आणखी किती पुढें गेले होते! महात्माजी म्हणजे भारताची पुण्याई. जगाचें भूषण.

मातृभूमीस परत

आणि गांधीजी मातृभूमीला परत यावयास निघाले. विजयी सत्याग्रही-सेनापति परत येत होता. भारतमातेचें मुख दक्षिण आफ्रिकेंत उजळ करून सत्पुत्र स्वगृहीं येत होता. आफ्रिकेंतून निघतांना त्यांचा कंठ दाटून आला. किती स्मृति, किती प्रसंग! शेकडों स्नेही-सोबती. १८९३ मध्यें ते प्रथम आफ्रिकेंत गेले आणि १९१४ मध्यें परत निघाले. वीस वर्षें तेथें गेलीं. आयुष्यांतील उमेदीचीं वर्षें, मानवी जीवनांतील सुखदुःखें त्यांनीं तेथें अनुभविलीं. कडू व गोड पेले ते स्वीकारते झाले. इतरांबरोबर

अनुभविते झाले. जीवनाचें ध्येय तेथेंच त्यांना सापडलें. ध्रुवतारा मिळाला. आफ्रिकेंतील सत्याग्रहाची अमोल अनुभवसंपत्ति घेऊन हिंदी स्वातंत्र्याचा लढा लढावयास विजयी वीर परत येत होता. इंग्लंडांत जाऊन तेथून ते हिंदुस्थानास परत येणार होते. ज्या जनरल स्मट्सबरोबर त्यांना झगडावें लागलें, त्याचेंही प्रेम त्यांनीं संपादिलें. महात्माजींनीं स्वतःच्या हातांनीं तयार केलेला चप्पलजोड स्मट्स्साहेबांस भेट म्हणून दिला. स्मट्स-साहेबांनीं ती भेट मोठ्या प्रेमानें जतन करून ठेविली होती.

"चले जाव" ठरावाची चळवळ सुरू झाल्यावर महात्माजींवर सर्व बाजूंनीं आग पाखडली जात होती; परंतु स्मट्स्साहेब म्हणाले, "गांधीजी जगांतील अत्यंत थोर विभूति आहेत. त्यांच्यावर जपान-धार्जिणेपणाचे क्षुद्र आरोप करणें शोभत नाहीं."

गांधीजी इंग्लंडांत जाऊन हिंदुस्थानांत परत आले. नामदार गोखले आजारी होते. गांधीजी त्यांना भेटले. भारतसेवक समाजांत गांधीजी उतरले होते.

"तुम्हीं भारतसेवक समाजास येऊन मिळावें असें मला फार वाटतें. परंतु तुम्ही हिंदुस्थानभर हिंडा, स्वतःचीं मतें बनवा आणि योग्य वाटेल तें करा!" गोखले म्हणाले.

गांधीजी कांहीं दिवस तेथें राहिले. भारतसेवक समाजाची प्रचंड लायब्ररी पाहून गांधीजी म्हणाले, "हीं इतकीं पुस्तकें कशाला? एक गीता पुरेशी नाहीं का? बायबल व कुराणही जवळ असावें; परंतु हा प्रचंड ग्रंथसंभार कशाला?"

शांतिनिकेतनांत गांधीजी

नामदार गोखल्यांचा निरोप घेऊन गांधीजी हिंदुस्थान पाहायला निघाले. दक्षिण आफ्रिकेंत असतांना दीनबंधु ॲण्ड्रूज गांधीजींना म्हणाले होते, "हिंदुस्थानांत गेल्यावर दोन महापुरुषांना भेटा. शांतिनिकेतनांतील

दीनबंधु ॲण्ड्र्यूज

गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर

स्वामी श्रद्धानंद

गुरुदेव रवीन्द्रनाथ ठाकूर ह्यांना भेटा आणि कांग्री येथें गुरुकुल चालवणाऱ्या स्वामी श्रद्धानंदांना भेटा." गांधीजी हिंडत हिंडत शांतिनिकेतनमध्यें आले. येथील विद्यार्थ्यांनीं त्यागपूर्वक दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहास मदत पाठविली होती. गांधीजी तेथील प्रसन्न वातावरणांत रमले. तेथें कांहीं दिवस ते विश्रांति घेणार होते; परंतु एके दिवशीं दु:खद वार्ता आली. देशासाठीं रात्रंदिवस श्रमणारे नामदार गोपाळ कृष्ण गोखले देवाघरीं गेले. गांधीजींना अत्यंत दु:ख झालें. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या नेतृत्वाखालीं देशसेवा करण्याची त्यांची इच्छा होती; परंतु ती तशीच राहिली.

एका झाडाखालीं गांधीजी बसलेले होते; आणि ती वार्ता त्यांना कळली. आचार्य काकासाहेब कालेलकर त्या वेळेस शांतिनिकेतनमध्यें राहात असत. काकासाहेब व इतर विद्यार्थी गांधीजींच्या भोवतीं बसले होते. इतरही मंडळी होती. गांधीजींनीं गोखल्यांच्या कितीतरी पुण्यकथा सांगितल्या.

तें तेजस्वी भाषण

१९१५ साल गेलें. १९१६ साल उजाडलें. ह्या सुमारचीच बनारस

विद्यापीठांतील ही अमर कथा. पंडित मदनमोहन मालवीय ह्यांनीं बनारस हिंदु विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगीं महात्माजींस आमंत्रण दिलें होतें. काठेवाडी फेटा, अंगावर उपरणें, लांब अंगरखा अशा पोषाखांत गांधीजी गेले; परंतु आमंत्रण-पत्रिका बरोबर घ्यायला ते विसरले. द्वारपाल आंत सोडीना. शेवटीं मालवीयजींस कळलें. ते आले आणि गांधीजींना प्रेमानें घेऊन गेले.

आचार्य काका कालेलकर

डॉ. ॲनी बेझंट ह्या अध्यक्ष होत्या. मोठमोठे राजे, महाराजे उपस्थित होते. ते वस्त्रालंकारांनीं सजून आले होते. गांधीजींना बोलण्याची विनंती करण्यांत आली. गांधीजी उभे राहिले. ते हिंदींतून भाषण करूं लागले. ती अपूर्व गोष्ट होती. ते वस्त्रालंकारभूषित संस्थानिक पाहून महात्माजींना वेदना झाल्या. ते म्हणाले, "मला हें दृश्य बघवत नाहीं. संस्थानांतील प्रजा दुःखीकष्टी आहे, अज्ञानी आहे, असें असतां ह्यांना हे अलंकार घालण्याचा काय अधिकार? ही संपत्ति प्रजेची ठेव आहे. प्रजेच्या कल्याणांतच ती वेंचली पाहिजे.

अशा अर्थाचें तें अपूर्व भाषण सुरू होतें. डॉ. ॲनी बेझंटबाईंनीं महात्माजींना "आतां पुरे" असें सांगितलें. त्या भाषणानें खळबळ माजली. ती निर्भयता, ती कळकळ, जनतेच्या हिताशीं एकरूप होण्याची ती वृत्ति, तें सारें अपूर्व होतें. हिंदुस्थानांत

पंडित मालवीय

डॉ. ॲनी बेझंट

एक नवीन प्रभात येणार ह्याची ती निशाणी होती.

पुढें लखनौची १९१६ मधील ती ऐतिहासिक अशी राष्ट्रीय सभेची बैठक झाली. तेथें हिंदु-मुस्लिम ऐक्याचा ठराव झाला. त्या सभेंत दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहासंबंधीं एक ठराव होता. तो ठराव गांधीजींनींच मांडावा असें सांगण्यांत आलें. ह्या ठरावावर गांधीजी सुंदर भाषण करतील, निरनिराळे प्रसंग वर्णितील, असें सर्वांना वाटत होतें. परंतु तो ठराव वाचून गांधीजी म्हणाले, " हा ठराव मी सभेपुढें ठेवतों; तुम्ही संमति द्याल अशी आशा आहे. " आणि एवढें बोलून ते खालीं बसले. गांधीजी म्हणजे निरहंकारता! त्यांनीं स्वतःच तो सत्याग्रहसंग्राम केला होता. ते अधिक काय बोलणार? त्यांचें तें न बोलणेंच अर्थगंभीर होतें.

रिक्रूटभरती

गांधीजी हिंदुस्थानांत आले. परंतु येथें अपरंपार कार्य होतें. ठायीं ठायीं प्रश्न होते, अन्याय होते. कोण झगडणार? ह्या वेळेस महायुद्ध सुरू होतें. सरकारकडून जर मी संरक्षणाची अपेक्षा ठेवतों तर सरकारला अडचणींत मदत केली पाहिजे, असें त्यांना वाटत होतें; त्यामुळें रिक्रूटभरतीसाठींही ते हिंडले. परंतु तो प्रचार करतांना त्यांना आनंद होत नव्हता. " तुमच्या देशासाठीं लढायला उठा, हें युद्ध तुमच्याही स्वातंत्र्यप्राप्तीचें साधन आहे " असें कोठें सांगतां येत होतें? गांधीजी उन्हातान्हांतून हिंडत होते; परंतु रिक्रूट मिळेनात. ज्या गुजराथनें पुढें एकामागून एक सत्याग्रह-संग्राम केले त्या गुजराथमधून रिक्रूट कां

वाचनालय बाल विभाग

मिळाले नाहींत? गांधीजी म्हणाले, "लोकांना उत्साह कसा वाटेल? हें युद्ध आपलें असें त्यांना वाटतच नाहीं."

त्या वेळीं विरमगांव येथें जकातीचा फार त्रास होत असे. गांधींजींनीं सरकारला ताबडतोब लिहिलें कीं हा अन्याय दूर झाला नाहीं तर मला सत्याग्रह करावा लागेल. सरकारनें तो अन्याय ताबडतोब दूर केला.

चंपारण्य

लखनौ-काँग्रेसच्या वेळेसच बिहारमधले कांहीं लोक महात्माजींस भेटले होते. चंपारण्यामधल्या शेतकऱ्यांवर जुलूम होत होता. त्यांना कोण तारणार? त्यांच्या साहाय्यास कोण येणार?

"गांधीजी, तुम्ही चंपारण्यांत या. तुमच्या नेतृत्वाखालीं आम्ही लढावयास उभे राहूं!"

"तुरुंगांत जायला लोक तयार आहेत? शेतकऱ्यांत हिंडायफिरायला लोक तयार आहेत?"

"होय. तुम्ही सांगाल तसे आम्ही वागूं."

२०६ ७४५९ २५१

आणि गांधीजी चंपारण्यांत गेले. तेथील शेतकऱ्यांच्या दैन्याला सीमा नव्हती. सर्वत्र अज्ञान व दारिद्र्य. महात्माजींच्या कार्यांत मदत करायला सर्व प्रांतांतून स्वयंसेवक गेले. महाराष्ट्रांतूनही गेले. शेतकऱ्यांत हिंमत आणायला हवी होती. महात्माजी आलेल्या स्वयंसेवक कार्यकर्त्यांस म्हणाले,

"शेतकऱ्यांत जा. शाळा काढा. त्यांना शिकवा. त्यांच्यांत मिसळा."

"परंतु त्यांना काय शिकवायचें? त्यांची भाषाही आम्हांस नीट येत नाहीं. कसा करावा आरंभ?" कस्तुरबांनीं विचारलें.

"पुस्तकें पढवणें दूर राहो. मुलें येतील त्यांचे दांत बघा, त्यांना नी तोंड धुवायला शिकवा, स्वच्छता शिकवा, त्यांच्याजवळ त्यांच्या घरची चौकशी करा. आरंभ करा."

त्यागमूर्ति राजेन्द्रबाबू

आणि स्वयंसेवक सर्वत्र पसरले. कोठें कोठें गांवाच्या मदतीनें शाळा बांधल्या गेल्या. स्वतः शेतकरी येत, आपल्या हातांनीं शाळा बांधीत. लहानशी शाळा, गवतानें शाकारलेली. असा प्रचार सुरू झाला. गांधीजी गांवोगांव जाऊन सारी माहिती गोळा करूं लागले. त्यांनीं कांहीं मुद्दे काढले. त्या मुद्दयांची माहिती गोळा करायला कार्यकर्ते धावले. "अतिशयोक्ति नको, केवळ खरी तीच माहिती आणा" अशी गांधीजींची सांगी होती.

आफ्रिकेंतील सत्याग्रही वीर बिहारमध्यें आलेला बिहार सरकारला कसा खपेल ! तुम्ही बिहार सोडून जा, चंपारण्यांत शिरूं नका, असें त्यांना कळविण्यांत आलें. परंतु गांधीजींनीं कळविलें, "मी कसा जाऊं? मी सेवा करायला आलों आहें. मी अतिशयोक्ति करणार नाहीं. अन्याय असेल तो दाखवीन. सरकारनें उगीच शंका घेऊं नये." सरकारनें खटला भरला, परंतु सोडून दिलें.

काम जोरांत सुरू झालें. कार्यकर्त्यांना सरकार तुरुंगांत घालूं लागलें, तर पाठीमागून कार्य सुरू ठेवण्याची व्यवस्था केली गेली. सत्याग्रही स्वयंसेवकांची नोंद सुरु झाली. ह्याच वेळेस त्यागमूर्ति राजेन्द्रबाबू गांधीजींच्या बरोबर काम करण्यासाठीं आले. श्री. राजेन्द्रप्रसाद म्हणजे बिहारचे अनभिषिक्त सम्राट. उंच आणि काटकुळी अशी ती मूर्ति. अति बुद्धिमान्, सर्व परीक्षांत पहिले आलेले, अनेक भाषा जाणणारे, डोळ्यांत एक प्रकारची करुण गंभीरता. लांब नाक. निश्चय दर्शविणारी हनुवटी. राजेन्द्रबाबू म्हणजे मूर्तिमंत सेवा व त्याग. ते ह्यापूर्वीच सर्व सोडून

भारतसेवक समाजास मिळणार होते. परंतु शेवटीं गांधीजी त्यांना ओढणार होते. वेळ आली आणि हा महान् सेवक जनतेला मिळाला.

विनोबाजी

चंपारण्यांतील लढा यशस्वी झाला.

गांधीजी गुजराथेंत आले. कोठेंतरी स्थिर राहाण्याची त्यांची इच्छा होती. नामदार गोखले मरण पावले होते. भारतसेवक समाजाच्या कार्यकर्त्यांस गांधीजी म्हणाले, “ मी अलग राहूनच कार्य करीन. अशानेंच आपले संबंध गोड राहातील.” कारण गांधीजींचें सत्याग्रही तंत्र ! तें कसें व कितपत कोणाला पटणार ?

गुजराथमध्यें कोठें राहावयाचें ?

आश्रम

साबरमतीच्या तीरावरची जागा निवडली गेली. अहमदाबादपासून जवळ अशी ती जागा होती. तेथें नदीतीरीं दुधेश्वराचें मंदिर आहे. तेथील आख्यायिका अशी सांगतात कीं प्राचीनकाळीं दधीची ऋषींनीं तेथें स्वतःचें बलिदान केलें होतें. राक्षसांचा संहार करण्यासाठीं स्वतःचीं हाडें वज्र बनविण्याकरितां त्यांनीं देवांना दिलीं होतीं. अशी ती त्यागमयी भूमि होती. एका बाजूला स्मशान होतें. दुसऱ्या बाजूला साबरमतीचा तुरुंग होता. जणूं जीवनाचें ध्येय त्या वातावरणांत होतें. सत्यासाठीं तुरुंगांत जावें लागेल, जनतेच्या सेवेसाठीं बलिदान करावें लागेल, आणि आसक्ति कशाला, एक दिवस मृत्यु आहेच, असे संदेश तो तुरुंग, तें दुधेश्वराचें मंदिर, तें स्मशान जणूं देत होतीं.

१९१५ मध्यें आश्रम सुरू झाला. दक्षिण आफ्रिकेंत महात्माजींच्या सर्व कार्यांत समरस होणारे मगनलाल गांधी हे ह्या आश्रमांत आले, विनोबाजी आले, आणखीही कांहीं साधक येऊन मिळाले. कस्तुरबा

सरदार वल्लभभाई पटेल

होत्याच. आश्रमास आरंभ झाला. महात्माजी अहमदाबादला प्रथम आले, तेव्हां तेथील कोर्टांतील वकील मंडळींत ते जात असत. एका बाजूला बसून ते आपले विचार मांडीत. सरदार वल्लभभाई तेथें असत. ते वकिली करीत. गांधीजींकडे ते बिलकुल लक्ष देत नसत. सरदार हे सामर्थ्याचे उपासक होते. देशांत सामर्थ्य नाहीं असें त्यांना वाटे. एक प्रकारें ते कशांत कांहीं राम नाहीं ह्या मताचे झाले होते. बडबडीचा त्यांना वीट असे. वक्तृत्वबाजीचा त्यांना कंटाळा असे. गांधीजींची ती साधी मूर्ति पाहून वल्लभभाई टिंगल करीत.

गांधीजी आश्रमांत राहूं लागले. आश्रमांत गांधीजी करतात तरी काय हें पाहायला शहरांतील जिज्ञासु येत असत. एकदा कोणी वकील मंडळी आश्रमांत आली. गांधीजी धान्य निवडीत होते. वकील मंडळी बोलूं लागली.

" आम्हांलाही कांहीं काम द्या, कांहीं सुचवा, " एक वकील म्हणाले.

" धान्य निवडण्याचें काम आहे. करतां ? " गांधीजी म्हणाले. त्या वकिलांना अपमान वाटला. पुन्हा ही मंडळी आश्रमांत आली नाहीं.

म्युनिसिपालिटी

अहमदाबाद म्युनिसिपालिटींत जावें असें गांधीजींच्या मनांत आलें. परंतु मतदारांच्या यादींत त्यांचें नांव नव्हतें. ते मित्रांना म्हणाले, " माझें नांव तर आलें पाहिजे होतें. ती व्यवस्था करा. " परंतु इतक्यांत खेडा

जिल्ह्याचा सत्याग्रह सुरू झाला. म्हणून गांधीजी तिकडे गेले. म्युनिसिपालिटींत जायचें राहिलें.

परंतु गांधीजींचे जे मित्र निवडून गेले होते त्यांना गांधीजी म्हणाले, "शहर आरोग्याचें मंदिर करा. सारी घाण दूर करा." आणि डॉ. हरिप्रसाद शहरस्वच्छतेसाठीं उभे राहिले. त्यांच्याबरोबर स्वयंसेवक निघाले. सारे बोळ स्वच्छ होऊं लागले. कोणाच्या घरासमोर घाण होती, कोणाच्या बोळांत कचऱ्याच्या राशी होत्या, हें सारें नांवें देऊन प्रसिद्ध करायचें ठरलें. गाड्या भरभरून घाण वाहून नेण्यांत आली. पाहाणीची फेरी निघाली. एकदोनच बोळ स्वच्छ आढळले. जे आधींच स्वच्छ करण्यांत आले होते, त्यांतील एक बोळ सरदार वल्लभभाई जेथें राहात तो होता. आपलें नांव घाणीच्या यादींत नसावें म्हणून सरदारांनीं आधींच स्वच्छता केली होती.

तें नवदर्शन होतें. म्युनिसिपालिटीचे सभासद स्वतः हातांत पावडीं झाडू, बादल्या घेऊन स्वच्छता निर्माण करीत आहेत असा तो पहिला देखावा. बंगलोरच्या म्युनिसिपालिटीनें एकदा मानपत्र दिलें तेव्हां गांधीजींनीं सांगितलें होतें कीं "सर्वत्र आधीं स्वच्छता करा. विजेचे दिवे नसले तरी चालतील; परंतु आधीं आरोग्य हवें. गरिबांची जेथें वस्ती आहे तेथें आरोग्य हवें. सभासदांनीं केवळ खुर्चीवर बसूं नये. सभासद होणें म्हणजे सेवेचें व्रत घेणें. हातांत खराटा घ्या, बादली घ्या, स्वच्छता करा."

अहमदाबाद शहर सुंदर होऊं लागलें. शहराचा स्वाभिमान जागा झाला. आपण माणसें असून घाणींत कसें राहायचें ह्याचें भान जनतेस आलें.

खेडा सत्याग्रह

पुढें खेडा जिल्ह्याचा सत्याग्रह सुरू झाला. पिकें बुडालीं होतीं तरी सर्व शेतसारा वसूल करण्यांत येणार होता. शेतकरी गांधीजींकडे आले.

गांधीजी उभे राहिले. त्यांनीं अहमदाबादच्या वकिलांना विचारलें, "कोण येतात माझ्याबरोबर? कोण येतात प्रचार करायला?" त्या वेळीं सरदार वल्लभभाई ह्यांनीं पहिलें नांव दिलें. गांधीजी म्हणजे दिव्य कर्मशक्तीचा साक्षात्कार आहे असें त्यांना दिसूं लागलें. येथें केवळ बडबड नाहीं. येथें सेवा आहे, त्याग आहे, निर्भयता आहे, खरी कळकळ आहे, जनतेशीं एकरूप होण्याची वृत्ति आहे, असें त्यांना दिसलें. आणि खेडा जिल्हा घुमूं लागला. गांधीजी व सरदार हिंडूं लागले. ना गाडी, ना घोडे. प्रचारकांच्या निराळ्या कल्पना होत्या. गाडीघोड्यांतून जाऊं, मेजवान्या करूं, रात्रीं सभेंत बोलूं, असें त्यांचें स्वप्न होतें. परंतु येथें तर पायीं प्रवास. गांवापाठीमागून गांवें घेतलीं जाऊं लागलीं. वल्लभभाई महात्माजींचे स्वयंपाकी. सरदारांस स्वयंपाक नीट येत नसे. गांधीजी शौचाच्या विकारानें आजारी पडले, अतिसार झाला. त्या वेळची एक गोष्ट आहे. साबरमतीच्या आश्रमांतून बेडपॅन, टब, वगैरे वस्तु गांधीजींच्या शुश्रूषेसाठीं आणण्यांत आल्या.

"कोठून आणल्या ह्या वस्तु?" महात्माजींनीं विचारलें.

"आश्रमांतून."

"हें बरोबर नाहीं. आश्रमांत स्त्रिया आहेत, लहान मुलें आहेत, तेथें कोणी आजारी पडलें तर? येथें माझें होईल कसेंतरी. परंतु त्यांना तेथें कोठली मदत? हीं उपकरणें आश्रमांत परत न्या." त्या वस्तु गांधीजींनीं परत पाठविल्या.

अस्पृश्य बंधूंत गांधीजी

गांधीजी बरे झाले. प्रचार सुरू होताच. सर्व जनतेचें ऐक्य झाल्याशिवाय सत्याग्रह यशस्वी कसा होणार? स्पृश्य, अस्पृश्य, हिंदु, मुसलमान, सारे एकत्र आले पाहिजेत. एका गांवीं सभा होती. सभेला हरिजन आले होते. ते दूर बसले होते. गांधीजींची तीक्ष्ण दृष्टि.

"ती मंडळी दूर कां ?" त्यांनीं प्रश्न केला.

"ते अस्पृश्य आहेत."

"अस्पृश्य का तुमच्यामध्यें बसूं शकत नाहींत ? आपण सरकारजवळ न्याय मागतों. ह्या बंधूंना न्याय कोण देणार ? अस्पृश्य तुमच्यांत येऊं शकत नसतील, तर मी त्यांच्यांत जाईन ! असें म्हणून गांधीजी अस्पृश्य बंधु जेथें होते तेथें गेले आणि मग त्यांनीं भाषण केलें. हृदयाचा ठाव घेणारें भाषण.

शेतकऱ्यांत हिंमत येत होती. कांहींही होवो, शेतसारा द्यावयाचा नाहीं असे निर्धार केले जात होते. लोकांना जप्तीची भीति वाटे. म्हशी नेल्या तर ? गायी, म्हशी जप्त झाल्या तर बायकांना अधिक वाईट वाटतें. मुलांबाळांना दूध कोठलें, दहीं कसें विरजूं, लोणी कोठलें काढून विकूं, असें त्यांच्या मनांत येतें; परंतु शेतकरी मायबहिणीही तयार झाल्या. एक शेतकरी होता, त्याची बायको मोठी हिंमतवान. ती नवऱ्याला म्हणे, "म्हैस गेली म्हणून काय झालें ? ही लढाई आहे." परंतु म्हशीचा मोह त्याला आवरेना.

त्या गांवांत सभा होती. त्या भगिनीनें गांधीजींस जाऊन सांगितलें कीं, "मी तयार आहें, परंतु कारभारी कचरत आहेत." त्यावर गांधीजींनीं सभेंत सुंदर विनोद केला. तेव्हां तो शेतकरी लाजला. तो उठून म्हणाला, "माझीही तयारी आहे."

जिल्हाभर प्रचार होत होता. गांव न् गांव जागृत झालें. संघटना झाली. सरकारचा जोरजुलूम निरुपयोगी ठरला आणि शेवटीं लढा यशस्वी झाला.

सत्याग्रही लढा कसा करावा ह्याचें शिक्षण गांधीजी देत होते. चंपारण्य, खेडा जिल्हा ह्यांत शेतकऱ्यांस धडा मिळाला. आणि कामगारांस ? किसान

व कामगार म्हणजे राष्ट्रपुरुषाचीं दोन फुप्फुसें होत. त्यांच्यांत जोर आला कीं राष्ट्र उभें राहायला किती उशीर?

मजूर महाजन

अहमदाबादच्या गिरणीकामगारांचीं अनेक गाऱ्हाणीं होतीं. त्यांची संघटना करायला हवी होती. महात्माजींनीं त्यांचें नेतृत्व घेतलें. सारे कामगार संपावर गेले; परंतु कामगार किती दिवस हिंमत धरणार? महात्माजी स्वावलंबनाचे भोक्ते. कामगारांनीं स्वतःच्या शक्तीनें संप लढवावा असें ते म्हणत. दुसऱ्यांच्या मदतीवर किती विसंबून राहायचें? स्वतः अन्यत्र मजुरी करून संप टिकवला पाहिजे, असें ते म्हणत. अहमदाबाद म्युनिसिपालिटी संपवाल्या कामगारांसाठीं कांहीं तात्पुरतें काम शोधूं पाहात होती. विचार चालू होता. कामगार तेथें काम करून पोटापुरती मजुरी मिळवतील, म्हणजे माघार घेण्याची जरुरी नाहीं; परंतु अद्याप काम मिळालें नव्हतें. कामगारांचें धैर्य खचूं लागलें. महात्माजींना दुःख झालें. शेवटीं त्यांनीं जाहीर केलें, "कामगारांचा निर्धार ढळत असेल तर मी उपवास सुरू करीन. कामगारांच्या कार्याची मी हानि कशी होऊं देऊं?" आणि महात्माजींचा उपवास सुरू झाला. महात्माजींचा हिंदुस्थानांतील तो पहिला उपवास. कामगारांत काम करणाऱ्या अनसूयाबेन वगैरेंच्या डोळ्यांत पाणी आलें. गिरण्यांच्या मालकांतही खळबळ सुरू झाली; आणि शेवटीं तडजोड झाली.

गांधीजींनीं त्या लढ्यांतून अहमदाबादच्या कामगारांची नवीन संघटना साधली. अहमदाबादची मजदूर-महाजन-संस्था आदर्श संघटना मानली जाते. ह्या संस्थेमार्फत कामगारांचें सारें हित पाहिलें जातें. शाळा, दवाखाने, वाचनालयें, क्रीडांगणें, सारें कांहीं आहे. त्यांचा स्वतंत्र खादी-बाजार आहे. अहमदाबादचे कामगार कसे संघटित आहेत तें आपल्या चले जाव चळवळीच्या वेळेस दिसून आलें. चार महिने हे कामगार

संपावर राहिले. जगाच्या इतिहासांत, कामगारांच्या चळवळीच्या इतिहासांत असें उदाहरण नाहीं. सरकारनें जंग जंग पछाडले परंतु कामगार कामावर गेले नाहींत. तुरुंगांतून श्री. गुलजारीलाल नंदा ह्यांचा निरोप आला तेव्हांच ते कामावर गेले. असा तो अपूर्व राजकीय संप होता.

गुलजारीलाल नंदा

गांधीजींची अशी ही साधना सुरू होती. अशा प्रकारचे स्थानिक स्वरूपाचे सत्याग्रही लढे लढवले जात होते. अद्याप अखिल भारतीय लढा झाला नव्हता. परंतु लौकरच होणार होता. आश्रमांत महापुरुष तपस्या करीत होता. तेथें नाना उद्योग सुरू झाले. आफ्रिकेंतील टॉलस्टाय फार्म येथें सुरु झालें. राष्ट्रीय शाळा सुरू झाली. आचार्य काकासाहेब कालेलकर, श्री. नरहरभाई परेख, मगनलाल, विनोबाजी अशी थोर थोर मंडळी तेथें तपस्या करूं लागली. तेथें गीतेवर उद्बोधक चर्चा व्हायची ; कधीं तुलसीरामायण वाचलें जायचें. आश्रम म्हणजे कर्म, भक्ति, ज्ञान ह्यांचें मनोहर मीलन होतें.

प्रार्थना

आश्रमांतील सारी मंडळी पहाटे चारला उठत. महात्माजींचें हें उठणें कधीं बंद पडलें नाहीं. उठल्यावर आधीं प्रभूचें स्मरण. दिवसाचा आरंभ प्रभुस्मरणानें आणि दिवसाचा अंतही प्रभुस्मरणानें. सामुदायिक प्रार्थना महात्माजींनीं रूढ केली. त्यांच्या प्रार्थनेस हजारों लोक कसे जमत तें तुम्हीं पाहिलें आहे. ख्रिश्चन, मुसलमान ह्यांच्यांत सामुदायिक प्रार्थना आहे. सामुदायिक प्रार्थनेनें अधिक ऐक्यबुद्धि व समत्वबुद्धि येते.

'आश्रमभजनावलि' हें पुस्तक तुम्हीं पाहिलें असेल. त्या पुस्तकाच्या कितीतरी आवृत्त्या निघाल्या. डायरीच्या आकाराचीं दोन अडीचशें पानें.

नगर वाचनालय सातारा

किंमत असे केवळ दोन आणे! त्या आश्रमभजनावलींत सर्व भाषांतील व सर्व धर्मांचीं पदें आहेत. महात्माजी ध्येयाची पूजा सर्वत्र करीत. सारे धर्म समान आहेत. आश्रमांत सर्व धर्मांचे लोक असत, म्हणून प्रार्थनाही सर्व धर्मांतील म्हटल्या जात. कांहीं ख्रिश्चन प्रार्थनागीतांचा सुंदर गुजराथी अनुवाद आश्रमभजनावलींत आहे. हिंदुधर्मांचीं, शीखधर्मांचीं, मुसलमानी सुफी संतांचीं भजनगीतें ह्या पुस्तकांत आहेत. तुलसीदास, कबीर, मीराबाई, सुरदास, नानक, तुकाराम सारे येथें आहेत. रवींद्रनाथांचीं गीतें आहेत. गुजराथी संतांचीं तर आहेतच. शेवटीं इंग्रजी गीतें आहेत; आणि तें 'वंदे मातरम्' गीत आहे.

एकच नागरी लिपी

निरनिराळ्या भाषांतील गीतें, परंतु लिपी एकच. गीत गुजराथी असो वा बंगाली, लिपी देवनागरीच. गांधीजींनीं कितीतरी वेळां लिहिलें, "भारतांतील सर्व भाषांनीं जर देवनागरी ही एकच लिपी ठेवली, तर फार सुंदर होईल. कारण मग सर्व भाषा वाचतां येतील. हजारों समान शब्द असतात. लिपीची जरा अडचण असते. रवींद्रनाथांचीं गीतें नागरी लिपींत छापलीं तर सर्वांना पटकन् वाचतां येतील आणि शेकडों संस्कृत शब्दच असल्यामुळें समजतीलही. परंतु आपापल्या लिप्यांचे अभिमान कोण सोडणार?"

महात्माजींची गुजराथी आत्मकथा देवनागरी लिपींतही प्रसिद्ध केली होती. त्या पुस्तकाला लिहिलेल्या 'दोन शब्दांत' गांधीजींनीं वरील अर्थाचे शब्द लिहिले आहेत.

कलाप्रेमी गांधीजी

गांधीजी कलाहीन नाहींत. संगीतानें ते दुःख विसरत नव्हते. त्यांच्या आश्रमांत गायनाचार्य खरे दाखल होते. श्री. खरेजी ह्यांनीं गुजराथभर

बाळ विभाग

आश्रमभजनावलीच्या द्वारा पवित्र संगीत जागृत केलें. गांधीजी अभिजात भारतीय कलेचे कसे भोक्ते होते, तें तुम्हांला सांगतों.

१९१७–१८ मधील गोष्ट असेल. काठेवाडमधील सुप्रसिद्ध ढसा ह्या गांवीं हरिजनपरिषद भरणार होती. ढसा ही जहागीर होती. एक लहान संस्थानिक तेथें असत. त्यांचें नांव दरबार गोपाळदास. पुढें संपूर्णपणें ते महात्माजींच्या चळवळीस मिळाले, म्हणून त्यांची जहागीर जप्त झाली. पण त्या गोष्टी आज नकोत. दरबार गोपाळदास ह्यांनीं हरिजनपरिषदेची अतिसुंदर व्यवस्था ठेवली. स्वत: गांधीजी येणार होते, परंतु कांहीं कामामुळें त्यांना तेथें जातां आलें नाहीं. आचार्य काका कालेलकर व श्री. नरहरभाई परेख हे परिषदेला गेले. तेथील सहकार्य व स्नेहभाव पाहून दोघे उंचबळले. "दांडिया रास" हा उत्कृष्ट नृत्यप्रकार तेथील शेतकऱ्यांनीं करून दाखविला. शांतिनिकेतनमधील श्री. क्षितिमोहन सेन ह्यांनीं एकदा हें नृत्य पाहिलें. ते म्हणाले, "अशी उत्कृष्ट नृत्यकला मीं पाहिली नाहीं." काकासाहेब व श्री. नरहरभाई परत आले. त्यांनीं गांधीजींना सर्व वृत्तान्त निवेदन केला. दरबारसाहेबांची आदर्श राजवट त्यांनीं वर्णिली. ते नृत्यप्रकार वर्णिले. गांधीजी म्हणाले, "आपल्या आश्रमांत बोलवा ना त्यांना नृत्य करायला. दरबारसाहेबांनाही बोलवा." आणि श्री. मगनलाल गांधींनीं निमंत्रण दिलें. गांधीजींनीं आपल्यासही शेतकऱ्यांबरोबर नाचायला सांगितलें तर, असें मनांत येऊन दरबारसाहेबही तें नृत्य शिकले आणि हे कलावान् शेतकरी आपल्या समभावी व प्रेमळ संस्थानिकासह आश्रमांत आले. गांधीजी स्वत: त्या शेतकऱ्यांस वाढीत होते. शेतकऱ्यांनीं पुरे म्हटलें तर गांधीजी हसून म्हणायचे, "मी काठेवाडीच आहें. काठेवाडी खेडुतांना किती लागतें तें मला माहीत आहे." आणि ते आणखी वाढायचे. नंतर तो अपूर्व दांडिया रास नाच झाला.

गायनाचार्य दिलीपकुमार रॉय

" तुमच्याबरोबर दरबारसाहेब कां नाहीं नाचत ? त्यांना नाहीं का ही कला येत ? " गांधीजींनीं विचारलें.

" त्यांनाही नाचतां येतें. आमच्यांत ते भाग घेतात. " शेतकरी म्हणाले.

" मग का मीच तेवढा दुर्दैवी आहें की तें मनोहर दृश्य मला पाहायला मिळूं नये ? "

आणि दरबारसाहेब उठले. तेही त्या रमणीय नृत्यांत रमले. श्रीमती अनसूयाबेन म्हणाल्या, " आमच्या कामगारांना दाखवा ना ही कला ! "

" गांधीजी तेथें पाहायला आले तर आम्ही येतों. " शेतकरी म्हणाले.

" मी कशाला ? " गांधीजी म्हणाले.

" तुम्ही कलारसिक आहांत म्हणून. आमच्या कलेचा आत्मा तुम्ही जाणतां ! " शेतकरी म्हणाले.

आणि गांधीजीही बरोबर गेले. अहमदाबाद शहरांत त्या नृत्याचे प्रयोग झाले.

असे गांधीजी होते. प्रख्यात बंगाली गायनाचार्य दिलीपकुमार रॉय ह्यांनीं कितीतरी वेळां गांधीजींना आपलीं गीतें ऐकविलीं आहेत. तेव्हां गांधीजींची जणूं समाधि लागे.

रौलेट ॲक्ट

आणि १९१८ साल आलें. युद्ध संपलें. राष्ट्रीय सभेच्या वतीनें विलायतेंत शिष्टमंडळ पाठवण्यांत आलें. लोकमान्यही चिरोलसाहेबा-विरुद्ध अपील करण्यासाठीं विलायतेला गेले होते. परंतु हिंदुस्थानांत

निराळीच घटना घडावयाची होती. महायुद्धाच्या काळांत बंगालमध्यें शेकडों तरुणांना केवळ संशयावरून अटक करून ठेवण्यांत आलें होतें. त्यांची ना चौकशी, ना कांहीं ! ना मुदत, ना मर्यादा ! त्यांचा कैवार कोणीं घ्यायचा ?

न्यायमूर्ति सर सुब्रह्मण्यम्

सरकारनें हे स्थानबद्ध तर नाहींच सोडले; उलट आणखी धरपकड सुरू केली. देशांत होमरूल चळवळ सुरू झाली होती. लो. टिळक, डॉ. ॲनी बेझंट ह्यांनीं 'स्वराज्य' शब्द सर्वत्र नेला; परंतु सरकारनें धरपकडीचें सत्र सुरू केलें. काँग्रेससमोर 'काय करावें' हा प्रश्न होता. १९१७ मध्यें निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ सुरू करावी, असा सूर निघूं लागला होता. प्रांतिक समितीचें मत मागविलें होतें. मद्रासनें सर्वांच्या पुढें आघाडी मारिली होती. त्यांनीं शपथपत्रिकाही तयार केल्या. सर सुब्रह्मण्यम् हे न्यायमूर्ति होते. पेन्शनर होते ते. त्यांनीं सर पदवीचा त्याग केला आणि शपथपत्रिकेवर पहिली सही केली. गांधीजींनीं १९१९ मध्यें जो सत्याग्रह सुरू केला, त्याच्या आधीं १९१७ मध्यें निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीचे विचार चालू होते; परंतु नवीन सुधारणा देणार आहेत अशी सरकारी घोषणा झाली, म्हणून तेवढेंच राहिलें.

परंतु आतां वेळ आली. बंगालमधील तरुणांची चौकशी करण्यासाठीं सरकारनें रौलेट कमिटी नेमली. ह्या कमिटीनें चौकशी करून ठरविलें कीं देशांत क्रान्तिकारक संघटना आहे, गुप्त जाळीं आहेत आणि ह्यांचीं मुळें खणून काढायचीं असतील तर कडक कायदे केले पाहिजेत. रौलेट कमिटीच्या शिफारशीप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें रौलेट बिल पास केलें.

संशयावरून कोणासही अटक करावी असे भरमसाट अधिकार पोलिसांना देण्यांत आले. महायुद्धांत हिंदुस्थानचे लाखों सैनिक ठार झाले, कोट्यवधि रुपये मदत म्हणून दिले आणि शेवटीं हें बक्षीस मिळालें.

सत्याग्रह

साबरमतीचा सिंह उभा राहिला. गांधीजींनीं व्हाइसरॉयास पत्र लिहिलें, "हा कायदा पास कराल तर सत्याग्रह करणें प्राप्त होईल." परंतु घमेंडी सरकार थोडेंच ऐकणार ? आणि सत्त्वसिंधु गांधीजी बाहेर पडले. हिंदुस्थानभर त्यांनीं दौरा काढला. तें नवतेज होतें. ती राष्ट्राच्या आत्म्यास हाक होती. ३० मार्च, १९१९ रोजीं हिंदुस्थानभर प्रार्थना होणार होत्या. उपवास केला जाणार होता. हरताळ होता. परंतु ३० तारखेऐवजीं ६ एप्रिल तारीख केली गेली. कांहीं ठिकाणीं हा फरक कळला नाहीं. दिल्ली वगैरे शहरीं ३० तारखेस प्रचंड सभा झाल्या. परंतु गोळीबार झाले. निरपराधी, निष्पाप रक्त सांडलें गेलें. गांधीजी स्वत: मुंबईस होते. तेथें विराट सभा भरली. असें दृश्य पूर्वीं कधीं कोणीं पाहिलें नव्हतें. परंतु पंजाबमध्यें हत्याकांड झालें. जालियनवाला बागेंत कत्तली झाल्या. पंजाबभर लष्करी कायद्याचा धुमाकूळ सुरू झाला. सरपटत जायला लावणें, उन्हातान्हांतून अनवाणी मैल मैल रपेट करायला लावणें, लोकांना मोठमोठ्या पिंजऱ्यांत पशूंप्रमाणें कोंडणें, जाहीर रीतीनें फटके मारणें, स्त्रियांचा अपमान, जनतेला पाणी उजेडही मिळूं न देणें, एक का दोन, किती अत्याचार सांगावे ! ज्या पंजाबनें लाखों रिक्रूट दिले, त्या पंजाबवर हे अत्याचार ! किती तरी दिवस बातमीही बाहेर पडूं दिली नव्हती. कळल्यावर गांधीजी पंजाबमध्यें जायला तडफडत होते; परंतु त्यांना जाऊं दिलें नाहीं.

सरकारनें चौकशीसाठीं हंटर कमिटी नेमली. सारी सफेती करण्यांत आली. कॉंग्रेसनेंही चौकशी कमिटी नेमली. आणि तो सारा अमानुष प्रकार भरपूर पुराव्यासह प्रसिद्ध केला. सरकारनें तो रिपोर्ट जप्त केला.

१९१९ मध्यें अमृतसर येथें कॉंग्रेस भरली. लष्करी कोर्टांनें ज्यांना भरमसाट शिक्षा दिल्या होत्या, त्या रद्द करण्यांत आल्या. पुष्कळसे पुढारी मुक्त होऊन अधिवेशनास आले. गांधीजींनीं सरकारच्या निषेधाबरोबर आपल्या लोकांनींही जे अत्याचार केले त्यांचा निषेध करावा असें सांगितलें. तसेंच मॉंटेग्युसाहेबांनीं सुधारणा जाहीर केल्या होत्या. त्यांचे आभार मानावे असें गांधीजींचें म्हणणें होतें. लोकमान्य व महात्माजी ह्यांचे वाद झाले. दोघांचे स्वभावच भिन्न.

मॉंटेग्युसाहेब

असहकार

आणि १९२० साल उजाडलें. क्रान्तिकारक वर्ष. सरकारनें पंजाब-मधील पापाचें परिमार्जन केलें नव्हतें. अशा ह्या सरकारशीं संपूर्णपणें असहकार करावा असें महात्माजींनीं राष्ट्रासमोर मांडलें. गुजराथींत 'नवजीवन' हें साप्ताहिक गांधीजींनीं सुरू केलेंच होतें. आतां इंग्रजींत त्यांनीं 'यंग इंडिया' सुरू केलें. ती निर्मळ स्फूर्तिदायक वाणी नवराष्ट्राला निर्मूं लागली. महात्माजींचीं वर्तमानपत्रें म्हणजे अपूर्व प्रकार. त्यांत जाहिरात नाहीं, कांहीं नाहीं. राष्ट्रसंवर्धक विचारांनाच तेथें स्थान. तीं पत्रें म्हणजे गांधीजींचें जीवन-दर्शन होतें. ती त्यांची साधना होती. कर्मवीराची ती गीता होती. अनुभवांतून जन्मलेली ती सत्यवाणी होती.

नवविचार हिंदुस्थानभर जाऊं लागले. वातावरण विद्युन्मय झालें. दास्यांत पिचत पडलेल्या निःशस्त्र राष्ट्राला आशा दिसूं लागली.

त्यागमूर्ति पं. मोतीलाल नेहरू

आणि ह्याच वेळेस लोकमान्य मरणशय्येवर असल्याचें कळलें. स्वराज्याचा मंत्र देणारा महर्षि आजारी होता. महात्माजी अस्तास जाणाऱ्या सूर्यनारायणाला भक्तिमय वंदन करायला आले.

" लोकमान्य, असहकाराविषयीं आपला काय विचार ? " महात्माजींनीं विचारलें.

" मुसलमान बरोबर येत असतील तर घ्या उडी " लोकमान्य म्हणाले.

आणि प्रभुस्मरण करीत लोकमान्य गेले. १ ऑगस्ट हा दिवस चिरस्मरणीय आहे. त्या दिवशीं लोकमान्य स्वर्गवासी झाले आणि त्याच दिवशीं असहकार सुरू होणार होता. आपोआपच देशभर हरताळ पडले. महात्माजी अति दुःखी झाले होते. लोकमान्यांच्या पवित्र देहाला त्यांनीं खांदा दिला.

" सिंहाची वाणी आज शांत झाली " असें त्यांनीं लिहिलें.

आणि १९२० मधली नागपूरची कॉंग्रेस भरली. असहकाराचा क्रान्तिकारक ठराव पास झाला. त्यागमूर्ति मोतीलाल, देशबंधु दास, असे महान् नेते गांधीजींस मिळाले. देशभर चैतन्य आलें. गांधीजी विजेप्रमाणें सर्वत्र संचरत होते. नवतेज निर्मीत होते. निर्भयतेचें वातावरण हिंदुस्थानांत आलें.

देशबंधु दास

" गांधीजी हिंदी राजकारणांत आले व रस्त्यावरचें पोरही उघड म्हणूं लागलें कीं ' हें इंग्रजांचें राज्य नको ' असे उद्गार

कलकत्याच्या एका मोठ्या पुढाऱ्यानें खाजगी बैठकींत काढले.

प्रचंड संकल्प

न्यायमूर्ति अब्बास तय्यबजी

गांधीजी नवशक्ति निर्मीत होते. वकील वकिली सोडून येत होते. शाळा, महाशाळा सोडून विद्यार्थी येत होते. व्यापारधंदा दूर करून व्यापारी येत होते. ह्या सर्वांची शक्ति विधायक कार्यांस लावण्यासाठीं गांधीजी उभे राहिले. महात्माजी प्रतिभाशाली कर्मयोगी होते. त्यांच्या प्रतिभेला, कल्पनेला सीमा नव्हती. ३१ मार्च, १९२१ रोजीं बेझवाडा येथें काँग्रेसची कार्यकारिणी समिति भरली. १ कोट रुपयांचा टिळक स्वराज्यफंड जमवावयाचा; २० लाख चरखे सुरू करावयाचे; १ कोटि काँग्रेसचे सभासद करायचे; असे संकल्प सोडण्यांत आले. सारें राष्ट्र कामाला लागलें.

कार्यकर्ते भिरिभिरि हिंडत होते. चरख्याचें गूं गूं सुरू झालें. चरखा शोधण्यासाठीं महात्माजींनीं मगनलाल गांधी ह्यांना गुजराथभर हिंडण्यास सांगितलें. तेव्हां खेडेगांवांत एक भगिनी कांतीत होती. चरख्याचें दर्शन झालें. तो आश्रमांत आला. आणि आतां हिंदुस्थानभर त्याचा प्रचार होणार होता. खेड्यापाड्यांत अद्याप चरखे होते. त्यांना अधिक चालना मिळाली. चरखासंशोधन सुरू झालें. राष्ट्रीय शाळा सुरू झाल्या. स्वदेशी स्टोअर्स निघाले. एक प्रकारें सर्वच गोष्टींना चालना मिळाली. चहाचा त्याग होऊं लागला. पोषाखांत साधेपणा आला. कोट, उपरणीं, फेटे ह्यांना रजा मिळूं लागली. एक प्रकारें आचारविचारांत क्रान्ति होत होती. जीवनांतही क्रान्ति होत होती.

बडोद्याचे सेवानिवृत्त वृद्ध न्यायमूर्ति अब्बास तय्यबजी ह्या चळवळींत सामील झाले. ते म्हणाले, " पूर्वी मी खेड्यांत गेलों तर मला सारे

भीत. माझ्याजवळ कोणी येत नसे. परंतु मी साधी खादी घालून जाऊं लागलों आणि लोक जवळ येऊं लागले." महात्माजींनीं सुशिक्षितांचें तोंड जनतेकडे वळविलें. दरिद्रीनारायणाकडे वळविलें.

स्वागतावर बहिष्कार

हिंदुस्थानांत राजपुत्र येणार होता. देशभर असंतोष होता, जालियनवाला बागेंतील हत्याकांड ताजें होतें. राजपुत्राचें कोण स्वागत करणार? स्वागतावर बहिष्कार घालण्याचा ठराव झाला. स्वयंसेवकदलें स्थापन होऊं लागलीं. परकी मालावर निरोधनें होऊं लागलीं. सरकारनें स्वयंसेवकदलें बेकायदा ठरविलीं. स्वयंसेवकदलांत सर्वांनीं सामील व्हावें असा कॉंग्रेसनें ठराव केला.

मुंबई बंदरांत राजपुत्र आला. शहरभर हरताळ होता; परंतु कांहीं पारशी मंडळी स्वागतार्थ गेली. शेवटीं शहरांत दंगा सुरू झाला. महात्माजी त्या मारामारींत सर्वांना शांत करण्यासाठीं शिरले. शेवटीं त्यांनीं पांच दिवसांचा उपवास सुरू केला. त्या उपवासांतही ते शांति निर्मिण्यासाठीं हिंडत होते. तिकडे कलकत्त्यास देशबंधूंना अटक झाली. १९२१ मध्यें अहमदाबाद येथें कॉंग्रेस भरणार होती. देशबंधु अध्यक्ष होते, परंतु ते कारागृहांत होते. हकीम अजमलखान अध्यक्ष झाले. त्यांनीं देशबंधूंनीं लिहून ठेवलेलें भाषण वाचलें.

अहमदाबाद कॉंग्रेस

अहमदाबादची राष्ट्रीय सभा अपूर्व होती. येथेंच प्रथम तिरंगी राष्ट्रीय ध्वज उभारला गेला. सर्व मंडप खादीचा होता. त्या वेळेस खादी महाग होती. दोन लाख रुपयांची खादी सजावटीस लागली. परंतु ते सारे पैसे गरिबांनाच मिळाले. खादीच्या पुनरुज्जीवनांत गेले. फुलांच्या माळांनीं मंडप शृंगारला होता. साधी स्वदेशी सजावट. देशी चित्रकारांचीं रमणीय चित्रें होतीं. कलांचें प्रदर्शन होतें. संगीताच्या सर्व साधनांचें

प्रदर्शन होतें. काँग्रेसची बैठक म्हणजे राष्ट्राच्या सर्वांगीण संसाराला जणूं चालना.

सरदार वल्लभभाई अहमदाबाद काँग्रेसचे स्वागताध्यक्ष होते. त्यांनीं अत्यंत छोटें भाषण केलें. राष्ट्रीय अधिवेशनांत राष्ट्रभाषेला प्राधान्य प्रथमच मिळालें. महात्माजींनीं १९१७ मध्यें कलकत्त्यास लोकमान्यांचें इंग्रजींत भाषण झाल्यावर लोकमान्यांच्या परवानगीनें लोकमान्यांचें भाषण किती लोकांना समजलें तें विचारलें. फार थोड्यांना समजलें असल्याचें लोकमान्यांना आढळलें. लोकमान्यांनीं हिंदी शिकावयाची प्रतिज्ञा केली. महात्माजींनीं राष्ट्रीय सभा जनतेंत आणण्याचें सुरू केलें. भाषणें इंग्रजींतून कशाला ?

बार्डोलीचा बार थांबला

१९२१ साल संपलें आणि २२ साल आलें. महात्माजी बार्डोली तालुक्यांत करबंदीची चळवळ करणार होते. साऱ्या हिंदुस्थाननें तो प्रयोग पाहावयाचा होता. परंतु त्या वेळेस प्रभूची इच्छा नव्हती. संयुक्त प्रांतांत अत्याचार झाले. चौरीचुरा येथें हिंसात्मक प्रकार झाले. महात्माजींना धक्का बसला. देशांत शांततेचें वातावरण नव्हतें. अशा परिस्थितींत बार्डोलीचा प्रयोग करणें बरोबर नाहीं असें त्यांच्या मनोदेवतेला वाटलें. त्यांनीं बार्डोलीचा सत्याग्रह तहकूब केला. सारें राष्ट्र आशेनें बार्डोलीकडे पाहायला उत्सुक होतें. महात्माजींच्या ह्या निश्चयानें राष्ट्राला तेजोभंग झाल्यासारखें वाटलें. अनेकांनीं कटु टीका केल्या. तुरुंगांत देशबंधु रागावले. परंतु महात्माजी अचल होते.

“ तुमच्या आयुष्यांतील सर्वांत मोठी गोष्ट कोणती ? ” एकदा कोणीं गांधीजींस प्रश्न केला.

“ बार्डोलीचा लढा सुरू करायचा नाहीं असें मीं ठरविलें ती गोष्ट अत्यंत मोठी. सर्व राष्ट्राचा विरोध असतांही मीं ती गोष्ट केली. मी सत्याला धरून राहिलों; स्वत:च्या सदसद्विवेकबुद्धीला धरून वागलों. ”

ज्या गोष्टींत महात्माजींची मावार आहे असें सर्वांना वाटलें, तीच गोष्ट त्यांना सर्वांत महत्त्वाची वाटली. नाथांच्या घरची उलटी खूण म्हणतात ती अशी.

खटला

सरकारनें महात्माजींवर खटला भरला. १८ मार्च, १९२२ रोजीं खटला सुरू झाला. ती कृश परंतु वज्रासमान निश्चयाची मूर्ति न्यायमंदिरांत आली. अंगावर साधें खादीचें वस्त्र. गंभीर प्रशान्त मुद्रा. महात्माजी येतांच सारे उभे राहिले. खटला सुरू झाला. महात्माजी म्हणाले, "सरकारी कायद्याच्या दृष्टीनें मीं गुन्हा केला आहे. जास्तींत जास्त शिक्षा मला द्या. परंतु न्यायाधीशांना माझा मार्ग सत्याचा वाटत असेल तर त्यांनीं सरकारी नोकरी सोडून द्यावी." न्यायाधीश म्हणाला, "तुम्ही एक अति थोर विभूति आहांत. असा खटला चालविण्याचें काम क्वचितच वांट्यास येतें. मी तुम्हांला कोणती शिक्षा देऊं? परंतु टिळकांच्या खटल्याचें उदाहरण माझ्यासमोर आहे. त्यांना जशी सहा वर्षांची शिक्षा झाली होती, तशीच मी आपणांस देतों."

महात्माजी म्हणाले, "लोकमान्यांच्या नांवाशीं माझा संबंध जोडलात हें माझें मोठें भाग्य होय."

खटला चालवतांना महात्माजींस त्यांचा धंदा विचारण्यांत आला. त्यांनीं काय बरें उत्तर दिलें असेल?

क्रान्तिकारक महात्माजी

'विणकर व शेतकरी' असें त्यांनीं उत्तर दिलें. ह्या प्रसंगासंबंधींची बंगालमधील एक गोष्ट आहे. एका बंगाली क्रान्तिकारकानें आत्मकथा लिहिली आहे. तो लिहितो,

"त्या दिवशीं आमच्या घरचा नोकर रडत होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रु गळत होते.

" कां रडतोस ? " मीं त्याला विचारलें.

" महात्माजींस शिक्षा झाली म्हणून. "

" परंतु त्यासाठीं तूं कां रडतोस ? "

" महात्माजी आमचे आहेत. 'मी विणकरी व शेतकरी आहें' असें त्यांनीं सांगितलें. ते आमचे आहेत. आमच्यासाठीं झटत आहेत. "

" त्या नोकराचें भाषण ऐकून मी चकित झालों. आम्ही क्रान्तिकारक असें आम्हांस वाटे. परंतु खरे क्रान्तिकारक महात्माजी होत. त्यांनीं क्रान्ति केली अशी कोणीं केली ? साऱ्या दरिद्री जनतेशीं ते एकरूप झाले. आणि हा महापुरुष आपला असें सर्व दरिद्री जनतेस वाटूं लागलें."

शस्त्रक्रियेनें सुटका

महात्माजींस येरवड्यास सरकारनें ठेवलें. देशांत उदासीनता पसरली. आणि देशबंधु २३ सालीं सुटले. त्यांनीं पुन्हा कौन्सिलप्रवेशाचा कार्यक्रम देशापुढें मांडला. मोतीलाल नेहरू त्यांना मिळाले. स्वराज्यपक्ष काढण्यांत आला. कॉंग्रेसमध्यें फेरवाले, नाफेरवाले असे दोन भाग झाले. महात्माजी तुरुंगांत विचार करीत होते, मराठी भाषा शिकत होते, मनाचे श्लोक वाचीत होते; ॲपेंडिसाइटिसचा रोग झाला. शस्त्रक्रियेवांचून गत्यन्तर नव्हतें. ससून हॉस्पिटलमध्यें शस्त्रक्रिया झाली. महात्माजींस सरकारनें मुक्त केलें.

मुंबईजवळ जुहू येथें महात्माजी विश्रांतीसाठीं गेले. तेथें देशबंधु आले, सरदार वल्लभभाई आले. चर्चा झाल्या. महात्माजींनीं स्वराज्यपक्षास आशीर्वाद दिला. ज्यांना कौन्सिलमध्यें जावयाचें असेल त्यांना जावयास कॉंग्रेसनें परवानगी दिली. परंतु महात्माजींनीं स्वतःला विधायक सेवेस वाहून घेतलें.

बेळगांवला

१९२४ मध्यें बेळगांव येथें राष्ट्रीय सभा भरली. महात्माजी अध्यक्ष होते. कॉंग्रेसनें दोन्ही कार्यक्रम स्वीकारले. परंतु महात्माजींनीं विधायक कार्यावर भर द्या असें सांगितलें.

त्यांचा सर्व वेळ देशासाठीं, सेवेसाठीं. त्यांतच सारा आनंद, सारी गोडी. प्रभूचें सौंदर्य ते सभोवतालच्या सृष्टींत पाहात. रात्रींच्या ताऱ्यांत पाहात. पडणाऱ्या वृष्टींत पाहात. फिरायला जातांना दिसणाऱ्या सृष्टींत पाहात. निराळें सौंदर्यशोधन कशाला ?

बेळगांव कॉंग्रेसच्या वेळेसच राष्ट्रीय शिक्षणाचीही परिषद तेथें भरली होती. महात्माजी तेथें होते. एक महत्त्वाचा ठराव वाचून दाखविण्यांत आला. परंतु एक प्रतिनिधि म्हणाले, “ तो ठराव पुन्हा वाचून दाखवा. ” महात्माजी त्या तरुणाला म्हणाले, “ अधिक लक्षपूर्वक तुम्हीं नको होतें का ऐकायला ? ”

दक्षता, सावधानता हे दैवी गुण आहेत. आपण उगीच वेळ दवडतों. कार्याकडे लक्ष देत नाहीं. परंतु जो आपल्या प्रत्येक क्षणाचा हिशेब देऊं पाहातो, त्याला अशी बेफिकिरी कशी खपेल ?

ऐक्यार्थ उपवास

१९२४ मध्येंच महात्माजींनीं हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठीं २१ दिवस उपवास केला. त्या वेळेस ते दिल्लीस होते. देशांत सर्वत्र हिंदु-मुसलमानांचे दंगे सुरू झाले होते. २० सालचें तें ऐक्य नष्ट झालें होतें. महात्माजी म्हणजे ऐक्यमूर्ति. ते आपली तळमळ अन्य कोणत्या रीतीनें प्रकट करणार ?

उपवास हा भारतीय संस्कृतीचा सनातन मार्ग आहे. इतरही धर्मांतून उपवासाचें महत्त्व आहे. उपवास स्वतःच्या व आपल्या मित्रांच्या शुद्धीसाठीं असतो. परंतु महात्माजी बहुधा आत्मशुद्धीसाठींच करीत.

परंतु त्यांची शुद्धि म्हणजे जनतेची शुद्धि. जनतेशीं महापुरुष एकरूप झालेला असतो.

साबरमतीच्या आश्रमांत एकदोन वेळां आश्रमाच्या नियमाविरुद्ध वर्तन घडलें. विद्यार्थांनीं व्रतांना न शोभेसें वर्तन केलें. त्याचा दोष महात्माजींनीं स्वतःवर घेतला. ते म्हणाले, "माझ्यांतच दोष आहे म्हणून मुलांच्या चुका होतात. मी निर्दोष असेन, तर त्यांना असद्बुद्धि कां सुचेल ?" आणि त्यांनीं एकदा ७ दिवसांचा व एकदा १४ दिवसांचा उपवास केला.

मौलाना महंमदअली

आतां हा दिल्लीस २१ दिवसांचा उपवास ! महात्माजी त्यांतून पार पडले. दिल्लीस सर्व धर्मांची ऐक्य परिषद भरली.

महात्माजी रडले

ह्या १९२४ मधीलच तो करुण प्रसंग आहे. गोपीनाथ साहा नांवाच्या एका बंगाली तरुणानें टेगार्ट नांवाच्या पोलीस अधिकाऱ्यास मारण्याचा प्रयत्न केला. परंतु दुसराच एक गोरा मेला. गोपीनाथच्या निःस्वार्थ त्यागाचा व देशभक्तीचा गौरव करण्यांत आला होता. परंतु अहमदाबाद येथें अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या सभेंत गोपीनाथच्या कृत्याचा निषेध करण्यांत आला. ही देशभक्ति असली तरी चुकीची आहे असें म्हटलें गेलें. देशबंधूंनीं विरोध केला. देशबंधु अहिंसावादी असले तरी गोपीनाथच्या त्यागाचा गौरव व्हावा असें म्हणणारे. आणि तो विरोध पाहून महात्माजींचा हृदयसागर हेलावला. आपले अत्यंत जवळचे कार्यकर्तेच विरोध करीत आहेत हें पाहून त्यांच्या डोळयांतून गंगायमुना वाहूं लागल्या. मौलाना महंमदअली महात्माजींस मिठी मारून स्वतः

जमनालाल बजाज

अश्रुसिंचन करीत त्यांना शांत करीत होते. "माझ्या दुःखाला अंत नाहीं" अशा शीर्षकाखालीं महात्माजींनीं त्या वेळीं एक हृदय विरघळवणारा लेख लिहिला.

पुढें १९२५ मध्यें देशबंधु आजारी पडले. दार्जिलिंग येथें ते होते. मृत्यु समोर होता. गांधीजी तेथें जाऊन राहिले. देशबंधूंचें भक्तिमय आंतरिक जीवन महात्माजींना दिसलें. रामनामानें वेडे होणारे देशबंधु. महात्माजींनीं लिहिलें, "देशबंधूंचें जीवन थोर आध्यात्मिक वृत्तीचें आहे. त्यांचें स्वरूप मला आज नीट समजलें."

परंतु देशबंधु देवाघरीं गेले.

खादी

काँग्रेसमध्यें कायदेकौन्सिलांत जाण्याची वृत्ति व विधायक सेवेची वृत्ति अशा दोन वृत्ति होत्या. गांधींजींनीं दुसऱ्या वृत्तीस वाहून घेतलें. काँग्रेसच्या इतर कार्यांपासून ते जरा दूर झाले. ते सल्लामसलत देत.

खादीला भक्कम पायावर उभारण्यासाठीं त्यांनीं उद्योग आरंभिला. स्वर्गीय जमनालाल बजाज ह्यांना महात्माजींनीं तुरुंगांत जातांना खादीचें काम दिलें होतें. जमनालालजी पिढीजाद संपन्न घराण्यांतील. व्यापारी पेशा. अति हुशार. दिसायला ते भव्य व दिलदार होते. असहकारितेचा तो आरंभ होता. आणि एके दिवशीं तरुण जमनालालजी साबरमतीस येऊन उभे राहिले.

"माझं एक मागणं आहे." तरुण जमनालाल म्हणाले.

"काय? शक्य असेल तर मी मान्य करीन."

"शक्य आहे."

"माग तर."

"आजपासून तुम्ही मला स्वतःच्या मुलाप्रमाणें माना."

जमनालालजींची पहाडाप्रमाणें धिप्पाड मूर्ति पाहून महात्माजी हसून म्हणाले, "तुला कसं निभावूं? माझी मांडी लहान, एवढं मोठं मूल कसं सांभाळूं?"

असा तो सहृदय प्रसंग; आणि हें जणूं पितापुत्रांचें आध्यात्मिक नातें जमलें. जमनालालजींच्या सांगण्यावरूनच महात्माजींनीं विनोबाजींस पाठवून वर्ध्यांस सत्याग्रहाश्रमाची शाखा काढली. त्या वेळीं वर्षांतून एक महिना महात्माजी वर्ध्यांस रहायला जात.

जमनालालजींनीं खादीला चालना दिली होती. महात्माजी सुटल्या-वर कामाला अधिकच व्यवस्थित रूप आलें. अखिल भारतीय-चरखा-संघ ही संस्था स्थापन करण्यांत आली. तिच्या शाखा सर्वत्र सुरु करण्यांत आल्या. प्रांताप्रांतांतून चरखासंघाच्या शाखा निघाल्या. टिळक-स्वराज्य फंडांतील २५ लाख रुपये भांडवल ह्यांत ओतलें गेलें. त्या त्या प्रांतांतून खादी निर्माण होऊं लागली. चरखासंघाचीं खादीभांडारें जिल्ह्याजिल्ह्याला उघडण्यांत आलीं. एक मोठी अखिल भारतीय अशी संघटना उभी राहिली.

सीलोनमधील प्रसंग

महात्माजींनीं खादी-प्रसारार्थ दौरा काढला. हिंदुस्थानभर ते हिंडले. विधायक कार्याला चालना देऊं लागले. ह्या दौऱ्याच्या वेळेस ते सीलोनमध्येंही गेले होते. आणि त्या वेळची एक गोड गोष्ट आहे. महात्माजीं-बरोबर कस्तुरबा होत्या. महात्माजींचें स्वागत करणारे गृहस्थ म्हणाले,

"आज आपल्या येथें महात्माजी आले आहेत. आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या मातुःश्रीही आहेत." महात्माजींनीं स्मित केलें. आपल्या भाषणांत ते म्हणाले, "माझी ओळख करून देणाऱ्या सद्गृहस्थांनीं थोडी चूक केली. माझ्याबरोबर माझी माता नसून माझी पत्नी आहे.

परंतु एका अर्थानें मित्रांचें म्हणणें खरें आहे. कारण माझ्या पत्नीकडे कित्येक वर्षें मी माता ह्या दृष्टीनेंच पाहात आलों आहें."

किती थोर उद्गार ! असे उद्गार काढण्याचें भाग्य कितींना मिळत असेल !

खादी व चरखा

खादीचा महात्माजींस ध्यास लागला. चरखा हें त्यांचें दैवत बनलें. एकदा बेळगांवजवळ हुदली ह्या गांवीं गांधीसेवासंघाचें संमेलन होतें. महात्माजी म्हणाले, "माझ्या देवाचें नांव चरखा." ईश्वराचीं अनंत नामें आहेत. महात्माजींनीं चरखा हें नांव जणूं प्रभूला दिलें. गरिबाला घास देणारा चरखा हें प्रभूचें रूप नव्हे तर काय ?

"एका हातांत पेळू व दुसऱ्या हातांत चरख्याची दांडी असें असतांना मरण येवो" असें ते म्हणत. चरखा-भगवानाची सेवा करतां करतां आलेलें कृतार्थ मरण !

एकदा ते म्हणाले, "मरतांना ईश्वराचें नांव तोंडांत घेण्याऐवजीं चरखा चरखा असें तर नाहीं मी म्हणणार ? ह्या चरख्याचें माझ्या मृत्यूनंतर कसें होईल अशी चिंता तर नाहीं वाटणार ? चरख्याची आसक्ति का मनांत राहील ?"

किती कळकळीचे उद्गार !

त्या वेळेस जमनालालजी म्हणाले, "महात्माजी, चरखा आतां मरणार नाहीं. त्याची काळजी नका करूं."

आणि चरखा खरेंच मरणार नाहीं. चीनमध्येंही तो आपलें संगीत घुमवूं लागला आहे. उद्यांच्या राष्ट्रीय संवर्धनांत चरख्याला स्थान राहील.

चरख्यांत शोध, बोध सारखे होत आहेत. महात्माजींनीं एक बक्षीसही ठेवलें होतें. ताशीं दोन हजार वार सूत कातून देणारा चरखा त्यांना हवा

होता. तो खेड्यांत दुरुस्त करतां येण्यासारखा असावा. सुटसुटीत असावा. किंमत शक्तीबाहेर नसावी. येरवडाचक्र, किसानचक्र, निरनिराळे नमुने निघाले. आणि दोन्ही हातांनीं चालणारा व पायांनीं फिरविला जाणारा मगनचरखा निघाला. सत्यन् चरखाही निघाला आणि ती लहानशी वस्त्रपूर्णा, स्वयंपूर्णा तकली! तिच्यावर पटकन् सूत कसें गुंडाळावें, मांडीवर गती कशी द्यावी, असे अनेक प्रयोग झाले. तकलीवर तासांत चारचारशें वार सूत निघूं लागलें. कापूस कसा पिंजावा, ह्याचें संशोधन सुरू झालें. रंगसंशोधन सुरू झालें. गांधीजी संशोधनाचे शत्रु नव्हते; परंतु त्यांना असें संशोधन हवें होतें कीं जें खेड्यांना संपन्न करील, ग्रामोद्योगांस सतेज व संपन्न करील.

देशांत खादीकार्यालयें निघालीं. ठायीं ठायीं आश्रम सुरू झाले. आश्रमांतील प्रचारक खादी घेऊन गांवोगांव गाणीं म्हणून हिंडूं लागले. हातांत झाडूही घेत. गांवांत स्वच्छता करीत. शेतकऱ्यांशीं बोलत. संबंध जोडीत. असें हें नवजीवन निर्माण होत होतें. यंग इंडियांतून प्रकाश मिळत होता.

प्रभूवर श्रद्धा

साबरमतीच्या आश्रमांतील किती गोष्टी सांगूं? १९१५ मध्यें आश्रम सुरू झाला. आश्रमांत हरिजन आले तर किती छान होईल असें गांधीजी म्हणत. आणि प्रभूनें इच्छा पूर्ण केली. एक अंत्यज कुटुंब आश्रमांत आलें. महात्माजींना परम आनंद झाला.

कधीं कधीं आश्रमाजवळ पैसे नसायचे. एके दिवशीं मगनलाल गांधीजींना म्हणाले, "बापू, पिशवी तर रिकामी झाली! आतां कसें करायचें?"

"प्रभूला काळजी" गांधीजी म्हणाले.

महादेवभाई

आणि दुसऱ्याच दिवशीं एक संपन्न सद्‌गृहस्थ आश्रम पाहायला आले: आणि त्यांनीं १५ हजार रुपयांची देणगी दिली.

"योगक्षेमं वहाम्यहम् ।"

असें भगवंतांनीं आश्वासन दिलें आहे. परंतु अशी श्रद्धा किती जणांची असते ?

आश्रमांत हिंसा वर्ज्य असे. साप, विंचू कोणासही मारण्यांत येत नसे. साबरमतीचें तें ओसाड तीर. जीवजिवाणू असत. परंतु प्रभूनें सांभाळलें. एकदा गांधीजी बसले होते. इतक्यांत एक साप अंगावर ! त्यांनीं अंगावरच्या उपरण्यांतच तो गुंडाळून जवळ ठेवला आणि "ह्याला सोडून द्या" असें म्हटलें. आश्रमांत अशी निर्भयता व अहिंसक शक्ति वावरत होती.

आत्मचरित्र

आणि ह्याच सुमारास गांधीजींनीं आपलें 'सत्याचे प्रयोग' हें आत्मचरित्र लिहायला आरंभ केला. ते नवजीवनमध्यें गुजराथींत लिहीत. महात्माजींचे सेक्रेटरी श्री. महादेवभाई त्याचें इंग्रजी भाषांतर यंग इंडियांत करीत. महादेवभाई हे महात्माजींना सेक्रेटरी लाभले. भारताची सेवा करतां करतां महादेवभाई देवाघरीं गेले. त्यांची थोरवी किती वर्णू ? पुढें त्यांच्या गोष्टी सांगेनच. महात्माजींचे ते उजवा हात बनले होते. महात्माजींचें हृदय तेच जाणूं शकत. महात्माजींजवळ ते चर्चा करीत. कधीं कधीं स्वतःचें म्हणणें महात्माजींना पटवीत. महादेवभाई म्हणजे मोठी शक्ति होती. ते भक्त होते, परंतु ते डोळस भक्त होते. ते अति बुद्धिमान् होते, हृदयसंस्कारी होते. ते उत्कृष्ट लिहीत. महात्माजींच्या विधायक सेवेचें महत्त्व त्यांनीं ओळखलें होतें. यंग इंडिया चालवण्यांत आणि पुढें हरिजन चालवण्यांत

सर जॉन सायमन

त्यांचें असाधारण बुद्धिवैभव व हृदयवैभव दिसून आलें. महादेवभाई इंग्रजी सुंदर लिहीत. गांधीजींचें इंग्रजी लिहिणें अपूर्व आहे. तें अति प्रभावशाली वाटतें. सत्याचा त्यांत अनुभव असतो. गांधीजींच्या इंग्रजी भाषेवर बायबलचा ठसा आहे. गांधीजींच्या लिहिण्यांत मोजके शब्द. त्यांत पाल्हाळ नाहीं. त्यांच्या लिहिण्यांत किती जिवंतपणा वाटतो! केवढी स्फूर्ति! प्रचंड सामर्थ्याचा साक्षात्कार गांधीजींच्या शब्दाशब्दांत येतो. तेथें आत्मप्रत्यय आहे. गांधीजींची भाषाशैली म्हणजे त्यांचें निर्मळ जीवनच होय.

महादेवभाई गांधीजींसारखें लिहीत. जणूं ते गांधीजींशीं एकरूप झाले होते. महात्माजींच्या होणाऱ्या मुलाखती, दौरे, चर्चा, इत्यादींचें वर्णन महादेवभाईनींच करावें. तसेंच गांधीजींच्या विचारांना, कल्पनांना अनुसरून असणारे जगांतील विचारही ते नेमके शोधून काढीत व प्रसिद्ध करीत.

नवजीवनामार्फत गुजरातमध्यें व यंग इंडियाच्या द्वारा हिंदुस्थानांत गांधीजी प्रचंड संघटना उभारीत होते. पुन्हा केव्हांतरी लढा करावा लागणार ह्याची त्यांना खात्री होती. ते वाट पाहात होते. विधायक सेवेच्या द्वारा सर्वत्र संदेश नेऊन अनेक सेवकांच्या द्वारा सामर्थ्य निर्माण करीत होते.

मी शक्ति उत्पन्न करतों

त्या वेळीं हिंदुस्थान स्वराज्यास लायक आहे कीं नाहीं तें पाहावयास सायमन कमिशन आलें. कॉंग्रेसनें त्यावर संपूर्ण बहिष्कार घातला. हें

गोविंद वल्लभ पंत

कमिशन जेथें जेथें गेलें, तेथें तेथें काळीं निशाणें दाखविलीं गेलीं. अशा काळ्या मिरवणुकींत असतांनाच, पंडित जवाहरलाल, गोविंद वल्लभ पंत, लाला लजपतराय, वगैरे मोठमोठ्यांवर लाठीमार झाले. लालाजी तर त्या मारानें छाती सुजून त्यांतच मरण पावले.

काँग्रेसनें हिंदुस्थानची घटना ठरविण्यासाठीं एक नेहरू कमिटी नेमली. ह्या कमिटीनें एक योजना तयार केली. ह्या योजनेवर विचार करण्यासाठीं एकदा वर्किंग कमिटी भरली. महात्माजींना बोलावण्यांत आलें. परंतु महात्माजींनीं काय कळविलें, आहे माहीत ?

"तुम्ही योजना करून ठेवा. त्या योजनेच्या पाठीमागें उभी करण्यासाठीं मी शक्ति उत्पन्न करून ठेवीत आहें."

लाला लजपतराय

बार्डोलीचा प्रयोग

सरकार आपल्या शाब्दिक योजनांना थोडेंच महत्त्व देणार? आपल्या योजनांच्या पाठीमागें प्रचंड शक्ति असेल तरच सरकार कदाचित विचार करील. गांधीजी अशी शक्ति निर्मीत होते. त्या शक्तीचा प्रयोग १९२८ मध्यें बार्डोली तालुक्यांत करण्यांत आला. १९२१ मध्यें जो प्रयोग होणार होता तो सात वर्षांनीं सुरू झाला.

महात्माजी आश्रमांतच होते. सरदार वल्लभभाईंच्या नेतृत्वाखालीं तो रोमहर्षक लढा झाला. सरदार महात्माजींना म्हणाले, " तुम्ही नका येऊं. आम्हांला आशीर्वाद द्या. आम्ही लढा चालवूं." आणि महात्माजी गेले नाहींत. बार्डोली विजयी झाली. किती जुलूम, किती छळ, किती अत्याचार! परंतु शेतकरी डगमगले नाहींत. घरें दारें सोडून ते बडोदें संस्थानच्या हद्दींत निघून गेले. केवढी तयारी! आणि अशा त्यागाला का फळ येणार नाहीं?

सुभाषचंद्र बोस

बार्डोलीनें नवीन प्रयोग केला व राष्ट्राला शिकविला. 'आपल्या तालुक्याची बार्डोली करूं' असे शब्दप्रयोग सुरू झाले. इंग्रजींत Bardolize असा शब्द निर्माण झाला. बार्डोलीनें नवीन इतिहास बनविला. सरदार वल्लभभाई प्रेमानें व सात्त्विक अभिमानानें गुजराथी जनतेस म्हणावयाचे, " गुजराथला तेजस्वी असा अर्वाचीन इतिहास नाहीं. आपण तो निर्माण करूं या." आणि खरेंच गुजराथ इतिहास निर्मूं लागला.

१९२८ च्या डिसेंबरमध्यें कलकत्त्यास राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें. पंडित जवाहरलाल, सुभाषचंद्र, इत्यादि नवतरुण स्वातंत्र्यासाठीं अधीर झाले होते. जुनी मंडळी वसाहतीच्या स्वराज्यावर राजी होती. कॉंग्रेस फुटते कीं काय वाटत होतें. परंतु महात्माजींनीं सर्वांना सांभाळून घेतलें. ते म्हणाले, " सरकारला आपण एक वर्षाची मुदत देऊं. तेवढ्या मुदतींत सरकारनें वसाहतीचें स्वराज्य न दिलें तर आपण स्वातंत्र्य पुकारूं व लढा करूं." आणि राष्ट्रीय सभा पार पडली.

१९२९ चें वर्ष संपत आलें. डिसेंबर महिना आला. सरकारनें कांहीं दिलें नाहीं. कॉंग्रेसचें म्हणणें, " आधीं वसाहतीचें स्वराज्य जाहीर करा

तरुणांचे आवडते जवाहरलाल

आणि मग तें कसें अंमलांत आणायचें त्याचा तपशील ठरविण्यासाठीं आम्ही येऊं " परंतु सरकार 'चर्चेला या' एवढेंच म्हणे. फुकाच्या बोलण्यानें का पोट भरत असतें ?

लाहोर काँग्रेस

१९२९ च्या डिसेंबरमधील काँग्रेसचे अध्यक्ष कोण होणार ? महात्माजींनीं, तरुणांचे आवडते जवाहरलाल ह्यांनीं अध्यक्ष व्हावें असें सुचविलें. महात्माजींनीं लिहिलें, "जवाहरलाल स्फटिकाप्रमाणें निर्मळ आहेत. राष्ट्र त्यांच्या हातांत सुरक्षित आहे."

आणि लाहोरला काँग्रेस भरली. अपार उत्साह उसळला होता. स्वातंत्र्याचा ठराव रावी नदीच्या तीरावर पास करण्यांत आला. स्वातंत्र्यासाठीं लढा करावा लागणार का? गांधीजींकडे ती कामगिरी सोपविण्यांत आली. राष्ट्र देशभक्तीनें पेटलें.

महात्माजी काय करणार ?

जवाहरलालनीं २६ जानेवारी, १९३० हा पहिला स्वातंत्र्यदिन म्हणून पाळला जावा असें जाहीर केलें आणि देशभर सभा झाल्या. लाखों ठिकाणीं तिरंगी झेंडे फडकले. राष्ट्रीय गाणीं दुमदुमूं लागलीं.

परंतु गांधीजी काय करणार ?

व्हाइसरॉयांना पत्र

रेनॉल्ड्स नांवाचा एक तरुण दिलदार इंग्रज महात्माजींकडे आला होता. त्याच्याबरोबर महात्माजींनीं व्हाइसरॉयसाहेबांस एक पत्र लिहिलें. त्या पत्रांत ११ मागण्या केल्या होत्या. आम्ही स्वराज्य मागत होतों,

महर्षि दादाभाई नौरोजी

स्वातंत्र्य मागत होतों म्हणजे काय? त्या ११ मागण्या म्हणजे स्वातंत्र्याचा गाभा होता. लष्करी खर्च निम्मे करावा, सरकारी अधिकाऱ्यांचे पगार कमी करावेत, शेतसारा कमी व्हावा, दारूबंदी व्हावी, मिठावरचा कर उठवावा, शस्त्रें वापरण्यास परवानगी द्यावी, वगैरे मागण्या होत्या. अति सुंदर व सहृदय असें तें पत्र होतें. त्यांत राष्ट्रप्रेम होतें, परंतु संयम होता. आणि संयमांतच सामर्थ्य असतें. किंबहुना खरें सामर्थ्य संयमशील असतें.

परंतु व्हाइसरॉयांनीं केवळ नकार पाठविला. महात्माजी म्हणाले, "मीं भाकर मागितली, परंतु मला दगड मिळाले." आतां पुढें काय?

साऱ्या राष्ट्राचे डोळे साबरमतीकडे होते. तेथें राष्ट्राच्या विद्युच्छक्तीचें केन्द्र होतें. महात्माजी काय करणार?

ह्याच सुमारास गुरुदेव रवीन्द्रनाथ साबरमतीच्या आश्रमांत आले. रवीन्द्रनाथांनीं महात्माजींस विचारलें, "काय करणार तुम्ही? कोणता कार्यक्रम?"

"मी खूप विचार करीत आहें." महात्माजी म्हणाले.

आणि गुरुदेव जायला निघाले. त्यांच्या कपाळावर कुंकुमतिलक लावण्यांत आला. दोन महात्म्यांची भेट म्हणजे अति धन्य असें दृश्य होय.

मिठाचा उपाय

महात्माजींना उपाय सापडला. वास्तविक तो उपाय महर्षि दादाभाई नौरोजी ह्यांनीं कधींच सांगून ठेवला होता. 'हिंदुस्थानचें दारिद्र्य' ह्या

ऐतिहासिक ग्रंथांत दादाभाईंनीं लिहून ठेवलें, "मिठासारख्या वस्तूच्या बाबतींत सरकारनें जो अपरंपार अन्याय केला आहे, तो जेव्हां जनतेस कळेल तेव्हां जनता संतापानें बंड करील." आणि गांधीजींना मिठाच्या सत्याग्रहाचें दर्शन झालें. हिंदुस्थानभर मिठाचा कायदेभंग सुरू होणार होता. परंतु कधीं? महात्माजी सांगतील तेव्हां.

दांडीयात्रा

महात्माजी गुजराथमधील दांडी ह्या गांवीं जाऊन सत्याग्रह करणार होते. समुद्रकांठीं तें गांव होतें. साबरमतीच्या आश्रमांतून महात्माजी पायीं यात्रा करीत जाणार होते. १२ मार्च १९३० रोजीं प्रातःकाळीं ते निघणार होते. त्यांच्याबरोबर अखिल हिंदुस्थानांतून निवडलेले ८० सत्याग्रही होते. आणि ही मंगल यात्रा सुरू झाली. सारें राष्ट्र संस्फूर्त झालें.

सरदारांना आधींच अटक झाली. महात्माजी निघणार तों सरदारांची जेलमध्यें जाणारी मोटर आली.

"माझ्यासाठीं पुढें जाऊन जागा करा" महात्माजी म्हणाले. दांडीपर्यंत कसें कसें जायचें, कोठें मुक्काम करायचा, त्याची नीट योजना आंखली होती. योजनेप्रमाणें यात्रा सुरू झाली. आणि महात्माजींना किती काम! रोज पायीं प्रवास, व्याख्यानें, मुलाखती, पत्रव्यवहार, यंग इंडियासाठीं मजकूर! महात्माजींचा कामाचा उरक दांडगा.

ह्या यात्रेत किती सहृदय प्रसंग! एकदा नडीयादला, मला वाटतें, ती गोष्ट घडली. महात्माजी थकून आले होते. रात्रीं सभा झाली. प्रार्थना झाली आणि महात्माजी झोपले. परंतु रात्रीं दोन वाजतांच उठले. पत्रव्यवहार उरकायचा होता. कंदील होता. त्याच्या प्रकाशांत ते लिहीत बसले. परंतु कंदिलांतील तेल संपलें. स्वयंसेवक थकून निजले होते.

महात्माजींनीं त्यांना उठविलें नाहीं. तेथें गच्चींत चंद्रप्रकाशांतच तो राष्ट्रपुरुष पत्रें लिहीत बसला. इतक्यांत कोणी तरी उठलें.

" बापू, लिहायला दिसतें का ? "

" लिहायला दिसत आहे, परंतु वाचायला मात्र दिसणार नाहीं. " असें हसून ते म्हणाले.

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

" मग उठवलें नाहींत कोणाला ? "

" सारे स्वयंसेवक थकून झोपलेले ; त्यांना कशाला उठवायचें ! आणि लिहिण्यापुरतें मला दिसतें आहे. "

किती शांति ! स्वयंसेवकांवर किती प्रेम !

खेडा जिल्ह्यांतून यात्रा जात होती. ज्या ज्या गांवीं मुक्काम होणार होता तेथील लोक म्हणाले, " येणाऱ्या मंडळीस आम्ही जेवण देऊं. " परंतु जेवण नीट नसे. भाकरी कच्ची असे. स्वयंसेवकांची तक्रार आली, तेव्हां गांधीजी म्हणाले, " आपल्या तुकडींतील दहा जणांनीं पुढें जावें आणि रसोयी करून ठेवावी. " त्याप्रमाणें सुरू झालें. परंतु स्वयंसेवक आधींच थकून येत आणि त्यांत पुन्हा स्वयंपाक ! लोकांनाही वाटलें कीं आपण काळजीपूर्वक व्यवस्था ठेविली नाहीं. जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं सांगितलें, " आम्ही काळजीपूर्वक रसोयी केली जाईल असें करूं. " गांधीजी म्हणाले, " ठीक. " स्वयंसेवकांचा स्वयंपाकाचा त्रास वांचला. त्यांनीं पुन्हा कुरकुर केली नाहीं. गांधीजींची दृष्टि बघा. ते व्यवस्था ठेवणाऱ्यांवर रागावले नाहींत. स्वतःच स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारा असें त्यांनीं सांगितलें.

स्वयंसेवक चालतांना थकत. गांधीजी फार झपाट्यानें चालत. त्यांच्या चालण्यांत वेग, दृढता हीं असत. हातांत दंड असे. जगाला पुढें घेऊन जाणारी जणूं ती महान् शक्ति वाटते. स्वयंसेवक मागें राहात, थकत. स्वयंसेवकांत पुष्कळ तरुण मंडळी होती. तरुणांचा दुबळेपणा पाहून महात्माजींस खेद वाटला. त्यांनीं यंग इंडियांत लेख लिहिला.

सातारा
संगणकीकृत

" शरीराची काळजी घेतली पाहिजे, व्यायाम घेतला पाहिजे. इतर व्यायाम नाहीं तर निदान रपेट करण्याचा व्यायाम करावा. सकाळ संध्याकाळ खूप फिरावें. झपझप फिरावें; चालणें म्हणजे व्यायामांचा राजा होय."

अशा अर्थाचा तो लेख होता. गांधीजींना दुबळेपणाचें वावडें आहे. मरतुकडें राष्ट्र त्यांना नको आहे.

एका प्रसंगीं महात्माजींनीं सर्वांना रडवलें. भडोचचा प्रसंग असावा तो. मला नक्की गांव आठवत नाहीं. येणाऱ्या स्वातंत्र्याच्या यात्रेकरूंसाठीं लोकांनीं टरबुजें, खरबुजें, नाना प्रकारचीं उन्हाळी फळें ह्यांच्या गाड्याच्या गाड्या भरून आणल्या होत्या. फळांची खूप नासाडी झाली. ती एक प्रकारची उधळपट्टी होती. त्या दिवशीं महात्माजींनीं आत्मनिरीक्षण केलें, सर्वांना आत्मनिरीक्षण करायला लावलें. ते म्हणाले, " तुम्ही अशी उधळपट्टी कराल, तर व्हाइसरॉयांस मी कोणत्या तोंडानें नांवें ठेवूं? व्हाइसरॉय एका दिवसास ७०० रुपये पगार घेतो. सरकारी अधिकाऱ्यांचे भरमसाट पगार म्हणजे ह्या गरीब राष्ट्रावर अन्याय आहे. ही केवळ लूट आहे, उधळपट्टी आहे, असें आपण म्हणतों. मीं तसें यंग इंडियांत लिहिलें. परंतु आपण काय करीत आहोंत? देशांत कोट्यवधि लोक भुकेलेले असतात. आणि आपण का अशी उधळपट्टी करावी? प्रभूला आपण काय जाब देऊं शकूं?"

अशा अर्थाचें तें भाषण होतें. तें ऐकून लोक रडले.

ह्या प्रवासांतील एक गंमत सांगतों. मॉडर्न रिव्ह्यूच्या संपादकांनीं महात्माजींजवळ एक लेख मागितला होता. लेख देण्याचें महात्माजींनीं कबूल केलें होतें. परंतु वेळ तर होईना. रोज महात्माजी म्हणायचे, " लेख द्यायचा आहे, केव्हां वेळ होईल तें खरें." दिलेला शब्द पार पाडण्यासाठीं महात्माजी अधीर असत. त्यांना तें सारखें स्मरण असे.

रामानंद चतर्जी

विस्मृति म्हणजे तमोगुण. स्मरण म्हणजे सत्त्वगुण. मुमुक्षु सदैव दक्ष व सावधान असतो.

शेवटीं वेळांत वेळ काढून महात्माजींनीं लेख पाठविला. परंतु मॉडर्न रिव्ह्यूच्या कचेरींत तो लेख कचऱ्याच्या टोपलींत चुकून गेला. त्यांचें पुन्हा पत्र आलें, "लेख पाठवा." महात्माजींचें उत्तर गेलें, "लेख पाठवला." मग कचेरींत शोध सुरू झाला आणि तो लेख सापडला.

ती ऐतिहासिक यात्रा आतां संपणार होती. एके ठिकाणीं योजलेल्या गांवांत थोडा फरक करावा असें मंडळी म्हणाली. एका गांवांत जाऊन पुन्हा मागें यावें लागणार होतें. "तो गांव गाळावा" मंडळीनें सुचविलें. महात्माजी म्हणाले, "नाहीं. ठरलें तें ठरलें. त्या गांवाची कां निराशा ?"

महात्माजींची स्वातंत्र्ययात्रा सुरू होती आणि देशभर उत्साहाच्या लाटा उसळत होत्या. मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक स्वर्गीय रामानंद चतर्जी ह्यांनीं लिहिलें, "ही यात्रा म्हणजे प्रभु रामचंद्रांच्या यात्रेप्रमाणें स्मरणीय होईल. ज्याप्रमाणें आपण सांगतों कीं राम येथें राहिले, येथें गुहास भेटले, येथें पंचवटींत राहिले, येथें जटायू भेटला, येथें शबरी. तसें महात्माजीं-विषयीं सांगितलें जाईल." महात्माजी येथें हसले, येथें त्यांनीं रडविलें, येथें त्यांनीं चांदण्यांत पत्रें लिहिलीं, अशा कथा नाहीं का सांगितल्या जाणार ? सारा गुजराथ पावन झाला; राष्ट्रासाठीं लढायला सिद्ध झाला.

एक गोष्ट आठवली. एका गांवीं महात्माजींचा मुक्काम व्हायचा होता. महात्माजी येतांच व्याख्यान देतील म्हणून सारी व्यवस्था करून कार्यकर्ते

महात्माजींना सामोरे गेले. व्यासपीठ तयार होतें. चौरंगावर खादीची सुंदर बैठक होती. परंतु व्यवस्थापक दूर गेल्यावर कोणा एकाच्या मनांत आलें कीं बैठक चांगली नाहीं. त्यानें विलायती कापडाची सुंदर गादी आणून तेथें घालून ठेवली !

महात्माजी आले. व्यासपीठाजवळ आले. तों विदेशी वस्त्रांचें दर्शन !

" हें काय ? " एवढेंच ते म्हणाले. कार्यकर्ते चूपचाप होते. ती गादी दूर करण्यांत आली. लाकडी पाटावर बसून महात्माजींनीं संदेश दिला.

चोवीस दिवस ही स्वातंत्र्ययात्रा सुरू होती. आणि आतां दांडी येथें जाऊन महात्माजी सत्याग्रह करणार होते. देशभर सत्याग्रह सुरू होण्याची ती खूण होती. महात्माजींनीं सांगितलें होतें, " मला दांडीला पोचूं दे. मिठाचा खडा उचलूं दे. मग विचारवह्नि सर्वत्र पेटेल ! "

वर विमानें फिरत होतीं. सागरतीरीं ती मूर्ति उभी राहिली. जणूं प्रभु रामचंद्राची मूर्ति ! " ही पाहा साम्राज्यसत्ता मी नष्ट करतों " असें म्हणून महात्माजींनीं मिठाचा खडा उचलला.

देशभर सत्याग्रहाचें शिंग वाजलें. महात्माजी सुरत जिल्ह्यांतील शिंदीचीं झाडें तोडायला निघाले. " सारीं झाडें तोडा. " ते स्वयंसेवकांस म्हणाले. महात्माजी डोक्यावर काळ्या मातीचें फडकें ठेवीत. नेसूं एक पंचा असे. उन्हाळ्याचे ते दिवस होते. महापुरुष राष्ट्राला पेटवीत होता.

तेजस्वी धडे

त्या वेळचे यंग इंडियांतील लेख म्हणजे आगीचे लोळ वाटतात. ही ब्रिटिश सत्ता म्हणजे सापानें दिलेले विळखे, असें त्यांनीं म्हटलें. एकदा लिहिलें कीं " ससासुद्धा आणीबाणीच्या वेळेस लांडग्यावर उलटतो. उंदीरसुद्धा मांजराशीं झुंज घेतो. हिंदी जनता का सश्यापेक्षां उंदरापेक्षां दुबळी झाली ? "

मिठाचा सत्याग्रह सुरू झाला. लोक मुठी भरून मीठ आणूं लागले. परंतु "मूठ सोडा" असें पोलिसानें सांगतांच लोक मूठ सोडीत. महात्माजींनीं लिहिलें, "पोलिसाला तुमच्या रक्तबंबाळ हातांतून मीठ घेऊं दे. त्यानें द्या म्हणतांच देऊं नका. तुम्ही अहिंसक प्रतिकार करा. नाहीं देत असें म्हणा."

महात्माजी निर्भयता शिकविणारे महान् आचार्य होते. मागें जेव्हां खेडा जिल्ह्याचा सत्याग्रह झाला होता, तेव्हां सरकारनें अन्यायानें जप्त केलेल्या शेतांतील पीक निःशंकपणें घेऊन या असें महात्माजींनीं सांगितलें होतें. आणि शेतकरी पिकें घेऊन आले. त्यामुळेंच मोहनलाल पंड्या ह्या निर्भय सत्याग्रही वीरास "डुंगरी-चोर" कांदे चोरणारा असें प्रेमळ नांव गुजराथमध्यें मिळालें.

महात्माजींस केव्हां अटक होईल त्याचा नेम नव्हता. "अटक झाली तर" ह्या मथळ्याखालीं त्यांनीं एक प्रेरक लेख लिहिला आणि पुढें अटक झालीच. एके दिवशीं मध्यरात्रीं अधिकारी आले. गांधीजींची सिद्धता होतीच. आणि त्यांचें तें आवडतें गीत म्हणण्यांत आलें. तें गीत म्हणून साबरमतीच्या आश्रमांतून ते बाहेर पडले होते. स्वराज्य मिळेपर्यंत आश्रमांत पुन्हा येणार नाहीं, अशा प्रतिज्ञेनें ते बाहेर पडले होते. आणि आज अटक झाली. तें पद तुम्हांला माहीत असेल. तें पाठ करा. मी म्हणूं? ऐका—

आवडतें गीत

वैष्णवजन तो तेने कहिए
जे पीड पराई जाणे रे
परदुःखे उपकार करे तोये
मन अभिमान न आणे रे ॥ वै० ॥

सकल लोकमां सहुने वंदे
निंदा न करे केनी रे
वाच काछ मन निश्चळ राखे
धनधन जननी तेनी रे ॥ वै० ॥
समदृष्टि ने तृष्णा त्यागी
परस्त्री जेने मात रे
जिव्हा थकी असत्य न बोले
परधन नव झाले हाथ रे ॥ वै० ॥
मोहमाया व्यापे नहि जेने
दृढवैराग्य जेना मनमां रे
रामनाम शुं ताळी लागी
सकळ तीरथ तेना तनमां रे ॥ वै० ॥
वणलोभी ने कपटरहित छे
काम क्रोध निवार्या रे
भणे नरसैंयो तेनु दरसन करतां
कुळ एकोतेर तार्या रे ॥ वै० ॥

असें तें उदात्त गीत आहे.

देशांतील वणवा

महात्माजींना सरकारनें नेलें. येरवड्यास नेऊन ठेवलें; परंतु राष्ट्रव्यापी महात्माजींच्या शक्तीस कोण कोंडणार? स्त्रीपुरुषांत, लहानथोरांत एक अपूर्व चैतन्य संचरलें होतें. ह्या राष्ट्रांत माणसें राहातात असें जगाला दिसून आलें. शिरोडा, धारासना, धारावी, इत्यादि ठिकाणीं मिठागरें लुटलीं गेलीं. घोडेस्वारांच्या टापांखालीं अहिंसक सत्याग्रही चिरडले गेले. कोणाचीं डोकीं फुटलीं. कोठें लाठीमार झाले. कोठें गोळीबार झाले. सोलापूरला तर कहर झाला. लष्करी कायद्याचा तेथें धिंगाणा सुरू झाला.

पंजाबची पुनरावृत्ति झाली. कोवळीं मुलेंही गोळीबारानें जागच्या जागीं मेलीं. सरहद्द प्रांतांत तर शब्दांतीत अत्याचार झाले. फटके म्हणूं नका, गोळीबार म्हणूं नका. परंतु त्या सत्याग्रही पठाणांची धन्य होय. पंचवीस लाख वस्तीच्या एका सरहद्द प्रांतांतून १५ हजारांवर सत्याग्रही तुरुंगांत गेले. ज्या खैबर खिंडींतून मुसलमान आले, त्याच ठिकाणीं अपार बलिदान झालें.

असा लढा जगांत झाला नाहीं. एकीकडे साग्रसंगीन पाशवी शक्ति, तर दुसरीकडे स्वातंत्र्यार्थ उभी राहिलेली निःशस्त्र जनता. साऱ्या दुनियेचें लक्ष ह्या पुण्यभूमीकडे लागलें. जगाचे वार्ताहर ह्या सत्याग्रही संग्रमाचीं वर्णनें करायला आले.

लहान मुलांच्या वानरसेना हिंदुस्थानभर कोठून कशा निर्माण झाल्या तें कळेना. जणूं चमत्कार झाला. लहान लहान मुलें! परंतु झेंडे हातीं घेऊन गुपचूप निघून जात व सरकारला आव्हान देत. ' महात्मा गांधी की जय ' असें म्हणत. मुलांनीं फटके खाल्ले, लाठीमार घेतले. गुजराथमधील बोरसद गांवीं स्त्रियांची मिरवणूक होती. पोलिसांनीं लाठी चालविली. स्त्रिया रस्त्यांत बसल्या. डोंपरें रक्तबंबाळ झालीं. परंतु त्या हलल्या नाहींत. मुंबईस आझाद मैदानावर गरोदर शीख भगिनी घोडदळाखालीं चिरडली गेली. कलकत्त्याकडे सत्याग्रही स्त्रियांना लॉऱ्यांत घालून दूर जंगलांत नेऊन सोडून देण्यांत आलें. परंतु राष्ट्र हटलें नाहीं. कोठें जंगल सत्याग्रह सुरू झाले तर कोठें करबंदी सुरू झाली. कर्नाटकांतील शूर शेतकरी कलेक्टरांस सांगत, " गांधीबाप्पाची चिठी आणा, मग शेतसारा भरूं. " गुजराथमध्यें बार्डोली वगैरे भाग नवतेजानें तळपत होते. एक पैही शेतसारा त्यांनीं भरला नाहीं. जमिनीचें लिलांव झालें तरी पर्वा नव्हती.

मुंबईचें आझाद मैदान हिंदुस्थानभर दुमदुमलें. मदनमोहन मालवीयही तेथें सत्याग्रहास आले. रस्त्यांत बसून राहिले. सुटून आल्यावर

महर्षि अण्णासाहेब कर्वे

सरदार वल्लभभाई तेथेंच म्हणाले, "माझा मुलगा अशा वेळेस शिकत बसेल तर त्याला मी गोळी घालीन!" जळजळीत तेजस्वी वाणी.

असा तो रोमहर्षक लढा. किती सांगूं? राष्ट्राची मान उंच झाली. होअरसाहेब लिहितात, "गांधींच्या चळवळीमुळें हिंदुस्थानकडे आम्ही आदरानें पाहायला शिकलों." गांधीजींनीं राष्ट्राला माणुसकी दिली. नवराष्ट्र जन्माला आलें. गांधीजी नवराष्ट्राचे निर्माते होते.

स्त्रीशिक्षणाला सारें जीवन देणारे कर्मवीर महर्षि अण्णासाहेब कर्वे त्या वेळेस जगाचा प्रवास करून आले होते. ते म्हणाले, "गांधीजी मिठाचा सत्याग्रह करणार असें मीं जपानमध्यें वाचलें. मी हसलों व ही कसली चळवळ असें मनांत म्हटलें. परंतु मुंबईस आल्यावर तें भव्य दृश्य पाहिलें. स्त्रिया कायदेभंग करून समुद्राचें पाणी नेत आहेत, पोलिसांस न भितां जात आहेत, असा देखावा मीं पाहिला. स्त्रियांचा जागृत आत्मा पाहिला. माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें. विलेंपार्लें येथील सत्याग्रहींच्या शिबिरांत आपणही एक सेवक व्हावें असें वाटलें."

सर तेजबहादुर सप्रु

मोतीलालजींचें मरण

आणि शेवटीं सरकारनें तडजोड करण्याचें ठरविलें. सप्रु, जयकर ह्यांनीं वाटाघाटी केल्या. २६ जानेवारी, १९३१ रोजीं, म्हणजे स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं

बॅ. जयकर

पुढारी सुटले. महात्माजी तडक अलाहाबादला गेले. ते थोर मोतीलाल मरणशय्येवर होते आणि शेवटीं त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. महात्माजी सर्वांना धीर देत होते. ते म्हणाले, “ मोतीलाल गेले. मी विधवा झालों. ” मोतीलाल म्हणजे निर्धाराची प्रचंड शक्ति होती.

जवाहरलाल लिहितात, “ महात्माजींच्या डोक्यावर सर्व देशाचा भार होता. परंतु ते आमचे अश्रु पुशीत होते. आम्हांला धीर देत होते. ”

महात्माजींनीं तेथें प्रार्थना केली. त्या पवित्र देहाला त्यांनीं खांदा दिला आणि करुणवाणीनें ते म्हणाले, “ कितीजणांना खांदा देण्याचें माझ्या नशिबीं आहे कोणास ठाऊक ? त्यांना का लोकमान्यांचें स्मरण झालें ? देशबंधूंचें का निधन आठवलें ?

अ वि श्रा न्त श्र म

परंतु रडायला वेळ नव्हता. महात्माजी वाटाघाटी करायला दिल्लीस आले. रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत बोलणीं चालत. क्षणाची विश्रांति नाहीं. आणि दमून भागून आलेला तो महापुरुष रात्रीं दोन वाजतां पुन्हा चरखा घेऊन बसे. ते म्हणत, “ आजचें कातणें राहिलें. ” अठरा अठरा तास काम पडे. जरा संधि मिळतांच पंधरा मिनिटें झोप घेत. निद्रा त्यांच्या स्वाधीन होती. अशी ती कर्ममय मूर्ति डोळ्यांसमोर आणा व भक्तिमय प्रणाम करा.

वाटाघाटी फिसकटतील असें क्षणांत वाटे तर क्षणांत सफल होतील असें वाटे. दारू, परदेशी कापड ह्यांवर निरोधन करण्याचा हक्क मंजूर झाला. स्वत:च्या उपयोगासाठीं समुद्रकांठचें निसर्गनिर्मित मीठ नेण्याला मुभा

सरदार भगतसिंग

मिळाली. परंतु ज्या शेतकऱ्यांनीं तहशील भरले नव्हते, त्यांनीं भरले पाहिजेत असें सरकारचें म्हणणें होतें. आणखी कांहीं प्रश्न होते; परंतु शेवटीं तडजोड झाली. महात्माजी म्हणाले, "भगवान् खिस्ताचें तें पर्वतावरील प्रवचन मला आठवलें. आणि त्या वृत्तीनें प्रेरित होऊन मीं तडजोड केली."

कराची कॉंग्रेस

कराचीस मार्च महिन्यांत राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरण्याचें ठरलें. देशांत आनंद होता. परंतु पुन्हा काळीं अभ्रें आलीं. सोलापूरचे चार हुतात्मे फांशीं दिले गेले होते. तें दुःख ताजें होतें. आणि आतां त्या तीन वीरशिरोमणींवर पाळी आली. सरदार भगतसिंग, सुखदेव व राजगुरु ह्यांना लालाजींवर लाठीमार करणाऱ्या सँडर्सच्या खुनाच्या बाबतींत फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली. थोर राजबिंडे! भारतमातेचे पुत्र! साऱ्या राष्ट्रानें सरकारला पदोपदीं विनविलें. तडजोडीचें वातावरण होतें. परंतु सरकारनें आपलें तेंच खरें केलें. ते तिघे हुतात्मे झाले.

सुखदेव

एक काळी छाया पसरली. परंतु दुःख गिळून कार्यास प्रवृत्त होणें हाच पुरुषार्थ. स्वातंत्र्य म्हणजे अपरंपार बलिदानाचें फळ. पेशावर प्रांतांत लाल डगलेवाल्यांची अहिंसक संघटना उभी राहिली होती. त्यांनीं अपार जुलूम सहन केले होते. परंतु लाल डगले-वाल्यांचा गांधीजींवर राग झाला. त्यांना

वाटलें कीं महात्माजींनीं भगतसिंगादींस वांचविण्याचे प्रयत्न केले नाहींत. परंतु गांधीजींनीं सारे प्रयत्न केले होते.

राजगुरु

महात्माजी कराचीस जात होते. एका स्टेशनावर लाल डगलेवाल्यांनीं त्यांना काळीं फुलें निषेध म्हणून दिलीं. महात्माजींनीं शांतपणें तीं स्वीकारलीं. महात्माजी कराचीस आले. अधिवेशन सुरू झालें. शेतकरी वल्लभभाई अध्यक्ष होते. समर्पक, तेजस्वी, सुटसुटीत त्यांचें भाषण. आणि एके दिवशीं रात्रीं महात्माजींचें जाहीर भाषण झालें. लोक प्रक्षुब्ध, आहेत, तुम्ही जाऊं नका, असें महात्माजींस सुचविण्यांत आलें. परंतु ती निर्भय मूर्ति गेली. अमर अशी ती सभा झाली. सारे श्रोते विरघळले, विरोधी होते ते स्फुंदूं लागले. महात्माजी म्हणाले, " मी तुम्हांला का नको आहें ? माझ्यावर तुमचा का राग आहे ? हीं मूठभर हाडें तुम्ही सहज चिरडूं शकाल. गांधी जातील, परंतु ज्या तत्त्वासाठीं गांधी लढत आहेत, तीं तत्त्वें मरणार नाहींत. तीं चिरंजीव तत्त्वें आहेत." अशा अर्थाचें तें भाषण होतें. महात्माजींनीं आपला हृदयसिंधु तेथें ओतला. त्यांत डुंबून लोक कृतार्थ झाले.

कराचीची कॉंग्रेस संपली. महात्माजींनीं कॉंग्रेस प्रतिनिधि ह्या नात्यानें विलायतेंत वर्तुळ परिषदेस जावें असें ठरलें. जाण्यापूर्वी सर्व ठाकठीक करण्यासाठीं महात्माजी निघाले. ते बार्डोलींत आले. तुम्ही शेतसारे भरा असें ते शेतकऱ्यांस सांगूं लागले. शेतकरी नाराज होते. परंतु राष्ट्राचा पिता त्यांची समजूत घालीत होता. ते सर्वत्र पायीं हिंडत होते. एके दिवशीं हिंडतांना कांटेरी झुडपें लागून पायांना चांगलेच ओरखडे निघाले. रात्रीं मायमाउली कस्तुरबा म्हणाल्या, " पायांना थोडें तेल लावूं का ? "

" लाव. उद्यां पुन्हा हिंडायला पाय हवेत ना ? " गांधीजी म्हणाले. तें वाचून माझे डोळे ओले झाले होते. त्या पायांना विसांवा नव्हता. महात्माजींना जिवंतपणीं कोठली विश्रांति ?

विलायतेच्या मार्गावर

आणि भारताची मंगलमूर्ति बोटीवर चढली. बरोबर श्री. महादेवभाई, प्यारेलाल, मीराबेन, वगैरे मंडळी होती. पंडित मदनमोहनही त्याच बोटीनें गंगोदकाचे घडे घेऊन निघाले होते. भारतीय पुण्याच्या गंगायमुना विलायतेंत जात होत्या. महात्माजी व मालवीयजी ! थोर नांवें !

आणि बोटींत बसल्यावर महात्माजींच्या लक्षांत एक गोष्ट आली. बोट तर सुरू झाली होती. मंडळींनीं भरपूर कपडे बरोबर घेतले होते. विलायतेंत थंडी फार. परंतु महात्माजी म्हणाले, " मी दरिद्रीनारायणाचा प्रतिनिधि म्हणून जात आहें. हे इतके कपडे पाहून आपणांस कोण म्हणेल कीं हे दरिद्रीनारायणाचे प्रतिनिधि म्हणून ? " अगदीं जरूरीपुरते कपडे ठेवण्यांत आले. बाकीचे एडनहून परत पाठवायचे असें ठरलें. महात्माजींनीं ७८० रुपये किंमतीची एक शाल सात हजारांस बोटींत एकाला विकली ! महात्माजींच्या जवळची म्हणून का ती त्या गृहस्थानें घेतली ? एडन येथें हिंदी व अरब लोकांनीं महात्माजींचें स्वागत केलें. त्यांनीं ३८० गिनीही दिल्या. आणि बोट पुढें चालली. इजिप्तच्या पुढाऱ्यांनीं महात्माजींस अभिनंदनपर संदेश पाठवला. इजिप्तचे राष्ट्रीय पुढारी झगलूल पाशा मरण पावले होते. त्यांच्या पत्नीनें फारच सहृदय संदेश पाठवला होता. आणि नाहस पाशानेंही पत्र पाठवलें, " तुम्हांला यश येवो, विलायतेंतील बैठकींतून फळ हातीं पडो वा न पडो, तुम्ही तुमच्या देशासाठीं जें करीत आहांत तें किती थोर व उदात्त आहे ! "

ब्रिटिश सरकारनें इजिप्तमधील शिष्टमंडळास भेटण्याची परवानगीही दिली नाहीं. बोट मार्सेलिस येथें आली. येथें रोमाँ रोलाँच्या बहिणीनें

डॉ. आंबेडकर

थाटाचें स्वागत केलें. येथेंच इजिप्तचा एक प्रतिनिधि भेटून त्यांचें अभिनंदन करता झाला.

महात्माजी लंडनला आले. गरीब लोकांच्या वस्तींत ते राहायला गेले. तेथील मुलांत ते प्रिय झाले. कडक थंडी. परंतु महात्माजींचें खादीच्या चादरीवर भागे. ब्रिटिश साम्राज्याच्या सम्राटांस ते भेटायला गेले. परंतु खादीचा पंचा नेसूनच गेले. आणि चर्चिल रागावला. एक नंगा फकीर अशा रीतीनें बादशहांची भेट घेतो हा अपमान आहे असें त्यानें म्हटलें.

महात्माजींचें मुख्य काम वर्तुळपरिषदेंत होतें. कॉंग्रेसची बाजू त्यांनीं उत्कृष्टपणें मांडली. परंतु तेथें ऐक्य होणार कसें? सरकारनें असेच लोक बोलावून आणले होते कीं ज्यांना ऐक्याचें महत्त्व वाटत नव्हतें. मुसलमानांजवळ जमेना. गांधीजी म्हणाले, "तुमच्या सर्व मागण्या मंजूर. परंतु ब्रिटिश सरकारनें तरीही स्वराज्य न दिलें तर माझ्या खांद्याला खांदा लावून लढाल का? कॉंग्रेसबरोबर बलिदान करायला निघाल का?" कोण कबूल करणार! आणि डॉ. आंबेडकर होतेच. महात्माजी अतिदु:खानें म्हणाले, "आंबेडकरांना माझ्यावर थुंकण्याचाही अधिकार आहे. कारण हिंदूंच्या पापाचा बोजा माझ्या शिरावर आहे." वर्तुळपरिषदेंतून कांहीं निर्माण झालें नाहीं. समारोपाच्या वेळेस महात्माजी म्हणाले, "तुमचे माझे मार्ग भिन्न आहेत. उद्यां कोणत्या वादळांतून जावें लागेल तें प्रभूला माहीत. तुमचे माझे मार्ग भिन्न असले तरीही तुमचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे. मी तुमचा मित्रच आहें."

विश्वविख्यात साहित्यिक बर्नार्ड शॉ

महात्माजी अनेक ठिकाणीं गेले, बोलले, प्रश्नांना उत्तरें देते झाले. एके ठिकाणीं एकानें प्रश्न केला, "हिंदी जनतेला हिंदी लोकही नाहीं का छळीत? हिंदी सावकार, हिंदी जमीनदार, हिंदी कारखानदार गरिबांचें रक्तशोषण नाहीं का करीत? केवळ ब्रिटिशांनाच कां नांवें ठेवतां?"

"समजा, मी हिंसक असतों तर हिंदी सावकार, जमीनदार, वगैरे छळतात म्हणून त्यांना जर मीं एक गोळी घातली असती तर तुम्हांला दहा घालूनही माझें समाधान झालें नसतें. अर्थात् मी तर अहिंसक आहें." सर्वांना प्रेमानें जिंकूं पाहात आहें." गांधीजींनीं उत्तर दिलें.

एके ठिकाणीं ते म्हणाले, "माझ्या आयुष्याच्या सायंकाळीं पुन्हा अशी चळवळ करीन कीं तींत साठ हजारच नाहीं, तर साठ लाख लोक भाग घेतील."

विनोदी नटसम्राट चार्ली चॅप्लीन

आणि विश्वविख्यात साहित्यिक बर्नार्ड शॉ ह्यांना महात्माजी भेटले. शॉ म्हणाले, "महात्माजी, आपली दोघांची जात एकच आहे. परंतु आपल्या जातीचे लोक जगांत फार थोडे आहेत."

विनोदी नटसम्राट चार्ली चॅप्लिन ह्याची व गांधीजींचीही भेट झाली होती, गांधीजींना अमेरिकेंतून आमंत्रणें येत होतीं.

"माझा देश स्वतंत्र केल्याशिवाय कशाला येऊं?" असें महात्माजींनीं सांगितलें.

थोर रोमाँ रोलाँ

फ्रान्समध्यें त्या थोर रोमाँ रोलाँना महात्माजी भेटले. महादेवभाईंनीं त्या भेटीचें वर्णन केलें : "आत्मा आत्म्याला भेटत होता." गांधीजी इटलींत गेले. व्हेनिस येथील चर्चमधलीं सुंदर चित्रें त्यांनीं पाहिलीं. ख्रिस्ताला क्रॉसवर बळी देतात त्या प्रसंगाचें एक चित्र होतें. गांधीजींना तेथून हालवेना. त्यांचा पाय निघेना. मोठ्या कष्टानें ते तेथून निघाले.

"तुमचें ध्येय काय? वस्तुमात्रावर, चराचरावर प्रेम करूं पाहाणार का?" कोणीं विचारलें.

"ह्या जन्मीं सर्व मानवांवर पुरेसें प्रेम करूं दे." त्यांनीं उत्तर दिलें. आणि एकदा बोलतांना म्हणाले, "मला फांशीं देणाऱ्यांनीही भले चिंतीत फांशीं जावें असें मला वाटतें. कोणाला सर्प चावला तर त्याचें विष चोखून घेऊन आपण मरावें असें मला वाटतें."

मानवावर प्रेम करण्याची केवढी तहान!

अमेरिकेंतील कोणा ग्रंथकारानें गांधीजींना विचारलें, "जगावें असें तुम्हांला कां वाटतें? जगण्याचें ध्येय काय?"

"अन्यायाशीं झगडणें हा माझा आनंद. जगांतील अंधाराशीं झगडणें व प्रकाश आणूं पाहाणें ह्यासाठीं मी जगतों. प्रेम हें माझें साधन. दिवसेंदिवस सारीं माझींच, हा अधिकाधिक अनुभव यावा असें मला

वाटतें. हा अनुभव म्हणजेच परम आनंद. तो थोडा मिळाला तरीही कृतार्थ वाटतें."

स्वदेशांत

गांधीजी स्वदेशांत परत यायला निघाले. परंतु देशांत असंतोष धुमसत होता. नवीन व्हाइसरॉय आले होते. कॉंग्रेसचा जय त्यांना झोंबला होता. कॉंग्रेसला चिरडून टाकण्यासाठीं सरकारनें जय्यत तयारी करून ठेविली होती. महात्माजी मुंबईस येण्याच्या आधींच जवाहरलाल नेहरूंस सरकारनें तुरुंग दाखविला. देशभर विषण्णता पसरली होती. महात्माजींचें प्रचंड स्वागत होणार होतें, परंतु तें रहित केलें गेलें. गांधीजींनीं 'तुम्हांस भेटण्याची इच्छा आहे' अशी व्हाइसरॉयांस तार केली. एकदा केली, दोनदा केली. परंतु अहंकारी साम्राज्यसत्ता उत्तर द्यायलाही तयार नव्हती.

आणि जानेवारीच्या चार तारखेस महात्माजींसही अटक झाली. पहिल्या तारखेस ते किनाऱ्यावर उतरले. चार तारखेस पुन्हा येरवड्यास. हिंदुस्थानभर धरपकड झाली. सरकारजवळ याद्या तयारच होत्या. देशभर पुन्हा चळवळ पेटली. लाठीमार, गोळीबार सुरू झाले.

वर्तुळपरिषदेचें ऑफस् झालें होतें. साम्राज्य सरकारनें अस्पृश्य बंधूंना हिंदुसमाजापासून कायमचें तोडून टाकण्याचें ठरविलें. गांधीजींनीं विलायतेंत असतांनाच "अशा गोष्टीस मला प्राणार्पणानें विरोध करावा लागेल" असें सुचविलें होतें. परंतु त्या वेळेस त्या शब्दांचा अर्थ फारसा गंभीरपणें कोणीं घेतला नव्हता.

उपवास

तुमचें एकमत होत नाहीं, तर मग आम्ही देतों तो निर्णय; असें म्हणून ब्रिटिश सरकारनें जातीय मसुदा जाहीर केला. हिंदुस्थानांत

राजगोपालाचारी

१२ सेप्टेंबर १९३२ रोजीं तें सारें वाङ्मय प्रसिद्ध झालें. गांधीजी अस्वस्थ झाले. ते रात्रभर विचारमग्न होते आणि त्यांचा हृदयदेव त्यांना म्हणाला, "जा, उपवास कर."

अस्पृश्य कसे असले तरी हिंदु समाजाचे आहेत, आम्ही त्यांना जवळ करूं. पांच सहा कोटि लोक हिंदु समाजापासून कायमचे दूर होणार का? हिंदु समाजाला तो चिरकलंक राहिला असता. महात्माजींनीं २० सेप्टेंबर-पासून प्राणान्तिक उपोषण जाहीर केलें. कांहीं सुचेना. सारें राष्ट्र हादरलें. जवाहरलाल तुरुंगांत अस्वस्थ झाले. कोणाला कांहीं सुचेना. पुढाऱ्यांची धावपळ सुरू झाली. सरकार म्हणालें, डॉ. आंबेडकर व तुम्ही काय तें ठरवून आम्हांला सांगा. तुमचें पटत नाहीं म्हणून आम्हीं निकाल दिला. पंडित मदनमोहन मालवीय, सप्रु, राजगोपालाचारी, घनश्यामदास बिर्ला सारे आले. पुण्यास सारे आले. महात्माजींची प्रकृति झपाट्यानें अशक्त होत होती.

राजाजी वल्लभभाईंस म्हणाले, "तुम्ही असा निर्णय कसा घेऊं दिलात?"

वल्लभभाई म्हणाले, "त्यांच्याहून अधिक पवित्र कोण आहे? त्यांच्या हृदयदेवाची हाक, तिला मी विरोध कसा करूं? प्रभूची इच्छा!"

घनश्यामदास बिर्ला

वाटाघाटी सुरू होत्या. आंबेडकर नाहीं का मिळतें घेणार?

सरोजिनीदेवी

"मीं मरावें असें तुम्हांलाही खात्रीनें वाटत नसेल!" गांधीजी डॉक्टरांस म्हणाले.

करुण करुण उद्गार !

उपवासांत महात्माजी नेहमीं काळजी घेत. परंतु ह्या वेळेस त्यांनीं सारें प्रभूवर सोपविलें होतें. कस्तुरबा जवळ आल्या होत्या. शेवटीं तडजोड ठरली. बिर्लाशेठनीं एक योजना महात्माजींस आणून दाखविली. "साधु" ते क्षीण स्वरांत म्हणाले.

येरवडा जेलमध्यें त्या वेळेस किती धावपळ ! उपवास ज्या तारखेस सुरू झाला त्या दिवशीं म्हणजे २० सेप्टेंबर, १९३२ रोजीं वर्तमानपत्रांच्या बातमीदारांस महात्माजींनीं गंभीरपणें मुलाखत दिली होती आणि २६ तारखेस उपवास सुटला. भारतांतील सारी पुण्याई त्या वेळेस येरवड्यास गोळा झाली होती. तेथील त्या आंब्याच्या झाडाखालीं पलंगडीवर राष्ट्राचा पिता शरपंजरीं पडला होता. २६ तारखेस गुरुदेव रवीन्द्रनाथ तेथें आले. महात्माजींच्या वक्षःस्थलावर डोकें ठेवून गुरुदेव मुलाप्रमाणें रडले.

उपवास सुटायची वेळ आली. "वैष्णवजन तो" हें गीत म्हणण्यांत आलें.

" गुरुदेव, तुम्ही म्हणा गीत. " गांधीजी म्हणाले.

आणि " जीवन ज्यारे सुकाम त्यारे " हें गीतांजलींतील गाणें त्यांनीं म्हटलें. देशबंधूंच्या पत्नी वासंतीदेवी तेथें आल्या होत्या. कस्तुरबा होत्या. सरोजिनीदेवी होत्या. भारतांतील सारें 'सत्यं शिवं सुंदरम्' तेथें जमलें होतें. मी त्या वेळेस नाशिक जेलमध्यें होतों. येरवडा तुरुंगांत महात्माजी आहेत, सभोवतीं गुरुदेव वगैरे आहेत, उपवास सुटत आहे असें तें दृश्य

डोळ्यांसमोर येऊन मला अश्रु आवरत ना. माझे मित्र म्हणाले, "गुरुजी, काय झालें ?"

वाचनालय सातारा
बाल विभाग

"येरवड्यांतला भव्य, दिव्य देखावा डोळ्यांसमोर येऊन डोळे भरून येत आहेत." असें मीं म्हटलें.

२६ तारखेस सायंकाळीं ५॥ वाजतां उपवास सुटला आणि दोन तीन दिवसांनीं २९ तारखेस गांधीजींना उपवासांत दिलेल्या सर्व सवलती काढून घेण्यांत आल्या; परंतु पत्रव्यवहार होऊन हरिजन वर्तमानपत्रास लेख वगैरे पाठविण्यास, हरिजनांसंबंधीं कार्य करण्यास, प्रश्नांना उत्तरें पाठविण्यास सवलत मिळाली. ७ नोव्हेंबर रोजीं सवलती पुन्हा मिळाल्या.

आध्यात्मिक भांडवल

परंतु गांधीजी विचारमग्न होते. बाहेर हरिजनकार्यास चालना मिळाली. कोठें मंदिरें उघडूं लागलीं. परंतु गंजलेलीं हृदयमंदिरें खुलीं होऊं लागलीं, ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट होती. हरिजनकार्यास जास्त चालना कशानें मिळेल? आणि २१ दिवसांचा उपवास करण्याचें महात्माजींनीं ठरविलें. १९३३ मधील मे च्या ८ व्या तारखेपासून गांधीजी हा उपवास सुरू करणार होते. सरकारनें त्यांना लगेच सोडलें. विठ्ठलभाई ठाकरसी ह्यांच्या पर्णकुटींत महात्माजी राहिले. अग्निदिव्य सुरू झालें.

महात्माजींच्या उपवासाच्या वेळेस त्यांचे सेक्रेटरी प्यारेलाल जवळ असत. परंतु त्या वेळेस प्यारेलाल नाशिक तुरुंगांत होते. त्यांना महात्माजींचीं पत्रें येत. उपवासाविषयीं महात्माजींनीं लिहिलें,

"हरिजनकार्यास धनिक मित्र मोठमोठ्या रकमा देतील; परंतु ह्या सर्व भांडवलांत आध्यात्मिक भांडवल नको का? आत्मा नसेल तर सारें व्यर्थ. मी उपवासानें आध्यात्मिक भांडवल ओतीत आहें."

एका पत्रांत पुढील मजकूर होता—

"तुम्ही जवळ नाहीं. परंतु उपनिषदांतील 'यद्दूरे तदंतिके' (जें दूर तें जवळ) ह्या वचनाचा अशा वेळेसच नाहीं का अनुभव घ्यायचा?"

आणि एकदा "शरीराला इतर अन्नरस मिळत नसले तरी रामनामाचा अमृतरस तर मिळत आहेच" असें त्यांनीं कळविलें. अशीं तीं पत्रें येत. एका पत्रांत महादेवभाईंनीं पुढील आशयाचें लिहिलें होतें—

"बापू पडून आहेत. त्यांना झोप लागली आहे. जणूं प्रभूच्या, सृष्टिमातेच्या मांडीवर निजलेलें मूल. शांतपणें आहेत. किती भव्य व उदात्त दृश्य!"

देशभर प्रार्थना होत होत्या आणि महात्माजी उपवासांतून पार पडल्यावर प्यारेलालजींस पत्र आलें: "उपवासांतून पार पडलों. प्रभूची कृपा! परंतु पार पडलों नसतों तरीही ती प्रभूची कृपाच झाली असती!"

अशी अलोट श्रद्धा दुनियेंत कोठें आढळणार?

वर्तुळपरिषदेस जात असतांना आगबोटींत एकानें महात्माजींस देव आहे का म्हणून विचारलें. महात्माजी म्हणाले, "तोच एक आहे; बाकी मिथ्या आहे. नास्तिकांचा नकार, त्यांतही मला प्रभूच दिसतो. माझी तर श्रद्धा दिवसेंदिवस वाढत आहे. ही श्रद्धा नसती तर मी जिवंत राहिलों नसतों." गांधीजींचें तें छोटें प्रवचन पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालें आहे.

उपवास सुटला. प्रकृति हळूहळू सुधारली. त्यांचा उजवा हात पूर्वीं दुखे. ह्या उपवासांत तो उलट बरा झाला. आतां पुढें काय? साबरमतीच्या आश्रमांत ते परत जाणार नव्हते. परंतु आश्रमाच्या जमिनीचा कर वगैरे भरावयाचा नव्हता. म्हणून गांधीजींनीं सर्व आश्रम सरकारच्या स्वाधीन केला. परंतु सरकार हात लावीना. तेव्हां गांधीजींनीं हरिजन-कार्यास सर्व आश्रम देऊन टाकला. संस्था उभाराव्या, त्यांची आसक्ति क्षणांत सोडावी हें महात्माजीच करूं जाणोत.

उंदीरमांजराचा खेळ

आश्रमांतील ३४ सत्याग्रही बरोबर घेऊन गांधीजी निघाले. ते सत्याग्रह करणार होते. सारे कार्यकर्ते तुरुंगांत असतां ते कसे बाहेर राहतील? लढा सुरू होता. सरकारनें लादलेला लढा. गांधीजी बोरसद तालुक्यांतील रास गांवीं जाऊन सत्याग्रह करणार होते. रास गांव सरदारांचा जन्मग्राम. १९३२ सालीं रासगांवानें त्यागाची सीमा केली. त्या गांवांतील तीन तीन हजार रुपये शेतसारा भरणारे धनिक शेतकरीही तुरुंगांत आले. एक पैही तहशील कोणीं भरला नाहीं. आजोबा, बाप, नातू सारे तुरुंगांत. नाशिक जेलमध्यें डोळ्यांच्या भिवयाही पिकून गेलेला रासचा एक वृद्ध शेतकरी होता. त्याचें वय ९० हून अधिक होतें. तो चालतांना थरथरे. त्याचा मुलगाही तुरुंगांत. मुलाचा मुलगा तुरुंगांत. तीन पिढ्या तुरुंगांत होत्या. आणि ९० वर्षांचा तो धैर्यशाली वृद्ध सुटणार होता. तीन तीन मजली त्याचीं घरें जप्त करण्यांत आलीं होतीं!

"मी सुटल्यावर कोठें जाऊन उतरूं?" वृद्धानें पुत्रास विचारलें. "धर्मशाळेंत उतरा बाबा" तो मुलगा म्हणाला. अशी तयारी गुजराथची होती. नवीन इतिहास निर्मिला जात होता. उज्ज्वल इतिहास.

अशा गांवीं महात्माजी जाणार होते. स्वतःचा सर्व आश्रम सरकारच्या स्वाधीन करून जात होते. शेतकऱ्यांचें सारें जप्त होत असतां माझा आश्रम मुक्त कशाला? महात्माजी सर्वस्वाची होळी करीत होते.

संसारासी आग लावूनियां हातें
मागुतें परौतें पाहूं नये

संसाराला काडी लावून मागें ढुंकूनही पाहूं नये, असें करणारे महात्माजी होते. थोर अनासक्त जीवन!

परंतु महात्माजींना रास गांवीं सरकारनें जाऊं दिलें नाहीं. १ ऑगस्ट, १९३३ चा तो दिवस होता. लोकमान्यांच्या पुण्यतिथीचा पवित्र दिवस.

आणि ज्या गांवीं ३० सालीं वल्लभभाईंस अटक झाली, त्या गांवीं सत्याग्रह ! आणि करणार कोण, तर विश्ववंद्य महात्माजी. असा तो योग होता. परंतु सरकारनें आदल्या दिवशीं रात्रींच महात्माजी व त्यांचे चौतीस सहसत्याग्रही ह्यांना कैद केलें. पुन्हा महात्माजी येरवड्यास आले. सरदारांच्या प्रेमळ सहवासांत आले; परंतु ४ ऑगस्ट रोजीं सरकारनें त्यांना सोडलें व येरवडा गांवाची हद्द सोडून जाण्यास सांगितलें. परंतु त्या गांवांतच महात्माजी सत्याग्रहासाठीं निघाले. अर्ध्या तासांत त्यांना पुन्हा अटक करण्यांत आली. महात्माजींनीं, हरिजनकार्यार्थ ज्या सवलती पूर्वी देण्यांत आल्या होत्या त्यांची मागणी केली. परंतु नाठाळ सरकारनें कारण नसतांही ह्या वेळेस त्या नाकारल्या. महात्माजींनीं सवलती मिळाव्या म्हणून ऑगस्टच्या १६ तारखेस पुन्हा उपवास सुरू केला. त्यांची प्रकृति अत्यवस्थ झाली. २० तारखेस उपवासाच्या पांचव्या दिवशीं त्यांना ससूनमध्यें पाठविण्यांत आलें. ते अद्याप कैदी होते. २६ ऑगस्ट रोजीं त्यांना सोडण्यांत आलें. असा हा उंदरामांजराचा खेळ सरकारनें चालवला होता. चाळीस कोटि जनतेचा हृदयसम्राट, विश्ववंद्य महात्मा, त्याची ही अशी कुतरओढ साम्राज्यसत्तेनें चालविली होती.

फक्त हरिजनकार्य

महात्माजींनीं काय करावयाचें ? पुन्हा चळवळ करतील तर पुन्हा अटक. सवलती न मिळाल्या तर पुन्हा उपवास. पुन्हा सुटका. असें चक्र चालणार. शेवटीं मर्यादापुरुषोत्तम महात्माजींनीं निर्णय केला. “ सरकारनें सोडलें तरी मी कैदीच आहें. मीं चळवळींत भाग घेतां कामा नये. फक्त हरिजनकार्य करीत राहावें, शिक्षेची मुदत मनांत ठेवून ती संपेपर्यंत हा कार्यक्रम योग्य ” असें त्यांनीं ठरविलें. सरदारांनींही त्यांना सांगितलें होतें कीं “ तुम्हीं चळवळींत भाग घेतां कामा नये. कारण, सरकारनें तुम्हांस मुक्त केलें असलें तरी त्या मुक्तीचा अर्थ बंदी

असाच आहे." उपवासामुळें सरकारनें सोडलें. नाहींतर थोडेंच सोडणार होतें ?

लोकनायक अणे

महात्माजींनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें. "मी चळवळींत भाग घेणार नाहीं. परंतु चळवळ अयोग्य मार्गानें जाऊं नये म्हणून सल्ला देईन. आज चळवळींत गुप्तता शिरली आहे. गुप्ततेनें समाजांत भीति निर्माण होते. आपणांस तर जनता निर्भय करावयाची आहे. म्हणून गुप्ततेचा त्याग केला जावा. लोकनायक अणे कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष आहेत. त्यांनीं वाटलें तर सामुदायिक चळवळ बंद करून वैयक्तिक कायदेभंगास वाव ठेवावा" अशा अर्थाचें तें पत्रक होतें. पत्रकांत वल्लभभाईंविषयीं फार प्रेमानें लिहिलें होतें. सरदारां-बरोबर ह्या वेळेस मी एकूण १६ महिने राहिलों. किती त्यांचें माझ्यावर प्रेम ! रात्रीं बेरात्रीं माझ्यासाठीं उठत, जरा दुखलें, खुपलें तर धावपळ करीत, मला इवलीही तकलीफ होऊं नये म्हणून त्यांचे व सर्वांचे किती प्रयत्न ! सरदारांजवळ आईचेही गुण आहेत हें मला माहीत नव्हतें. परंतु तो गोड अनुभव आला !

पुण्यास लो. अणे ह्यांनीं कॉंग्रेस पुढाऱ्यांची – जे बाहेर होते त्यांची – बैठक बोलावली आणि सामुदायिक सत्याग्रह थांबवण्यांत आला. वैयक्तिक सत्याग्रहास परवानगी देण्यांत आली.

हरिजनपत्र

आणि महात्माजी विश्रांतीसाठीं वर्ध्याच्या सत्याग्रहाश्रमांत आले. पू. विनोबाजी नालवाडीस हरिजन वस्तींत राहायला गेले होते, हरिजनांची सेवा करीत होते. महात्माजींनीं अस्पृश्यबंधूंस हरिजन शब्द दिला. अस्पृश्य

ह्या शब्दांत सारा इतिहास आहे. नवीनच शब्द योजूं म्हणजे स्पर्शास्पर्शाचा सारा इतिहासच विसरला जाईल. हरिजन – जणूं देवाचे लाडके ! आणि हरिजन साप्ताहिकही सुरू करण्यांत आलें. हरिजनांचे पुढारी महात्माजींच्या हरिजन साप्ताहिकावर पुष्कळ वेळां टीका करीत. नांव हरिजन, परंतु पत्रांत हरिजनांचें कितीसें असतें ? महात्माजींनीं तें नांव प्रतीकात्मक दिलें. त्या वेळेस तेंच कार्य डोळयांसमोर होतें. तारीख ३ ऑगस्ट, १९३४-पर्यंत हरिजनकार्याशिवाय अन्य कार्य गांधीजी करणार नव्हते. त्या वेळेस त्या कार्यांत ते तन्मय होते. महात्माजींची झोप गाढ असते. जणूं योगी पुरुषाची निद्रा ! परंतु त्या वेळेस त्यांनीं लिहिलें, "हरिजनांसाठीं मंदिरें उघडत आहेत अशीं मला स्वप्नें पडतात !" केवढा ध्यास त्यांना लागला होता ! म्हणून त्या काळीं "हरिजन" हेंच नांव त्यांनीं दिलें; परंतु पुढें सर्व देशाचा संसार पुन्हा त्यांच्या शिरावर आला. आणि त्यांचें विराट् जीवन, विराट् कार्य हरिजनमध्यें प्रतीत होऊं लागलें. आणि सर्व देशाचें काम म्हणजे हरिजनांचें काम नाहीं का ? आपण एक प्रकारें सारे हरिजनच आहोंत. जोंपर्यंत आपण गुलाम आहोंत, तोंपर्यंत जगाच्या बाजारांत, जगांतील समारंभांत अस्पृश्यच नाहीं का ? म्हणून साप्ताहिकाचें "हरिजन" हें नांव योग्य नव्हतें का ? सहानुभूतीनें विचार केला तर सारें भलें दिसतें.

दौरा

हरिजनकार्यासाठीं हिंदुस्थानभर दौरा काढण्याचें त्यांनीं ठरविलें. जनतेची धर्मबुद्धि जागृत करायला थोर संत उद्युक्त झाला. हजारों वर्षांचीं कश्मलें दूर करावयाचीं होतीं, झडझडून टाकावयाचीं होतीं. जें कार्य साधुसंत करीत आले तेंच पुन्हा एकदा करायला हा युगप्रवर्तक निघाला.

मध्यप्रांतांतून ह्या दौऱ्यास सुरुवात होणार होती. सद्धर्माचा प्रचार व हरिजनकार्यासाठीं निधि जमविणें हीं दोन कार्यें होतीं. नागपूरचे नरवीर

बॅ. अभ्यंकर मध्यप्रांतांत महात्माजींबरोबर राहाणार होते. बॅ. अभ्यंकरांची महात्माजींवर भक्ति आणि महात्माजींचेंही त्यांच्यावर प्रेम.

मंगलयात्रा सुरु झाली. मोटरींतून जात असतां बॅ. अभ्यंकर एकदा हसत हसत गांधीजींना म्हणाले, " गांधीजी, तुमच्याबरोबर हिंडणें म्हणजे फार त्रास बोवा ! "

" कोणता त्रास ? " महात्माजींनीं हसून विचारलें.

" तुमच्याबरोबर असतांना सिगारेट ओढतां येत नाहीं. "

" तुम्ही ओढूं शकतां. " महात्माजी म्हणाले. परंतु मध्यप्रांतांतील दौरा संपेपर्यंत बॅ. अभ्यंकरांनीं धूम्रपान केलें नाहीं.

हिंदुस्थानभर तो अपूर्व दौरा होता. किती प्रसंग, किती गमती, किती गंभीर घटना. एकदा महात्माजींचा हात पुसायचा रुमाल कोठें तरी हरवला. महात्माजी 'माझा रुमाल कोठें आहे ?' म्हणून विचारीत होते. परंतु रुमाल हरवला म्हणून कोणीं सांगायचें ? शेवटीं महादेवभाई पुढें झाले व म्हणाले,

" बापू, तो रुमाल मागील मुक्कामांत कोठें तरी राहिला. दुसरा देऊं ? "

" दुसरा नको. तो रुमाल आणखी चार महिने टिकला असता. ठीक. चार महिनेपर्यंत रुमालाशिवायच राहीन ! "

असे काटकसरी महात्माजी होते. राष्ट्राच्या पै न् पैला जपत. आणि अशा पुरुषाला त्या एक कोटि टिळकफंडाचें काय झालें म्हणून कोणी पुनः पुन्हा विचारीत असत !

तगमग

आणि ओरिसा प्रांतांत दौरा आला. जगन्नाथपुरी हें पवित्र तीर्थक्षेत्र ओरिसामध्यें आहे. एके दिवशीं काय झालें, महादेवभाई व कस्तुरबा जगन्नाथाच्या मंदिरांत दर्शनाला गेलीं. आणि महात्माजींना तें कळलें.

महात्माजी स्वतःला अस्पृश्य समजतात. ते एकदा म्हणाले होते, "जन्मानें मी वैश्य आहें, स्पृश्य आहें. परंतु मी स्वतःला अस्पृश्य समजणेंच पसंत करतों." ज्या मंदिरांत हरिजनांना जातां येत नाहीं, तेथें स्वतः कसें जायचें ? निदान महादेव व बा ह्यांनीं तरी जायला नको होतें. माझ्याशीं एकरूप झालेली ही मंडळी. ही कशी गेली ? महात्माजींना अपार वेदना झाल्या. आणि त्याचा एकदम हृदयावर परिणाम झाला. महात्माजींचा जीव घाबरला. सारे सचिंत झाले. असा परिणाम होईल अशी कोणाला कल्पना नव्हती. महादेवभाई व कस्तुरबा ह्यांना मेल्याप्रमाणें झालें. सारें प्रभूच्या हातीं होतें.

परंतु रात्र निभावली. हृदयाचे ठोके नीट पडूं लागले. सर्वांच्या जिवांत जीव आला. हरिजन साप्ताहिकांत ही करुणकथा लिहितांना शेवटीं महादेवभाई म्हणाले, "महात्म्यांची सेवा करणें कठीण! तें जणूं ज्वालामुखीवर बसणें! त्यांच्या हृदयाचा थांग कसा लागणार ?"

कांहीं ठिकाणीं पायीं प्रवास करावा लागे. महात्माजी काठी टेकीत पायीं जात. पायीं जाण्यांत त्यांना फार आनंद वाटे, मोकळेपणा वाटे.

अनासक्ति

आंध्र प्रांतांत यात्रा आली. आणि एक चित्रकार महात्माजींकडे आला. त्यानें महात्माजींची सुंदर तसबीर काढली होती.

"महात्माजी, ह्या तसबिरीचा स्वीकार करा." तो म्हणाला.

"गड्या, कोठें ठेवूं ही तसबीर, कोठें लावूं ? ह्या देहाचाही बोजा आतां नको असें वाटूं लागलें आहे." महात्माजी म्हणाले.

तुकारामांच्या एका अभंगांत आहे.

"उद्योगाची धांव बैसली आसनीं
पडलें नारायणीं मोटळें हें"

सारे कर्मवेग शांत झाले आहेत आणि देहाची मोटली प्रभुचरणीं पडली आहे. महात्माजींचे ते उद्गार ऐकून हृदय सद्गदित नाहीं होत ?

बॉंबस्फोट

आणि लोकमान्यांच्या पुण्यास महात्माजी आले. शनिवारवाड्यासमोर विराट् सभा भरली होती. श्री. शंकरराव लवाटे महात्माजींना विरोध करायला आले होते. त्यांचें भाषण झालें. महात्माजींस महाराष्ट्रातर्फे जमलेली रक्कम अर्पण करण्यांत आली, आणि त्यांचें हृदयस्पर्शी भाषण झालें. ते म्हणाले, " मी माझी सदसद्विवेकबुद्धि मानतों. वेद थोर आहेत, माझ्या समजुतीप्रमाणें वेदांत अस्पृश्यता नाहीं. परंतु असेल तर तो वेद वेदच नव्हे. तो वेद मी प्रमाण मानणार नाहीं. माझी सदसद्विवेकबुद्धि हीच मला प्रमाण. " महात्माजी बुद्धिप्रामाण्यवादी आहेत. शंकराचार्यांनीं भाष्यांत एके ठिकाणीं लिहिलें आहे, " अग्नि शीतल आहे, असें शेंकडों श्रुतींनीं सांगितलें म्हणून का तें प्रमाण मानायचें ? " तर्काच्या, बुद्धीच्या कसोटीस उतरेल तेंच खरें. पू. विनोबाजी एकदा माझ्याजवळ बोलतांना म्हणाले, " ईश्वराखालोखाल मी बुद्धीला मान देतों. "

सभा शांतपणें पार पडली. आणि विश्रामबागवाड्यामध्यें महात्माजींस म्युनिसिपालिटीतर्फे मानपत्र देण्यांत येणार होतें. मोटर निघाली, परंतु हा कसला आवाज ? धुडूमधुड्‌ ! ! काय झालें ? महात्माजी आधीं उतरूनही गेले होते. ते म्हणाले, " काय आहे ? "

बॉंब टाकण्यांत आला होता ! अरेरे !

देशासाठीं रात्रंदिवस राबणाऱ्या त्या प्रेमसिंधूवर बॉंब टाकण्यासाठीं कोणा सनातन्याचे हात कसे धजले ? ते सनातनी हात कीं सैतानी हात ? परंतु देव तारी त्याला कोण मारी ? बॉंब दुसऱ्याच मोटरीवर पडला. थोड्या फार दुखापती झाल्या. परंतु प्रभुकृपेनें कोणी दगावला नाहीं.

"ईश्वराची इच्छा नसेल तर एक क्षणभर मी अधिक जगूं शकणार नाहीं." असें महात्माजी म्हणत.

थोर सेवक ठक्करबाप्पा

सात दिवसांचा उपवास

पुन्हा उत्तरेकडे दौरा वळला. अजमीरला ह्याच्या उलट प्रकार घडला. काशीचे पंडित लालनाथ हे अजमीरला होते. ते पक्के सनातनी, कट्टर वर्णाश्रम स्वराज्य संघवाले. त्यांनीं काळ्या निशाणांची मिरवणूक काढली. एका सुधारकानें, नवमतवाल्यानें त्यांच्या डोक्यावर काठी हाणली! महात्माजींना अत्यंत वेदना झाल्या. ह्या भरतभूमींत मतप्रचाराचें केवढें स्वातंत्र्य होतें! येथें चार्वाकही मतप्रचार करी. त्या त्या तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते वाद करीत जिंकत. बुद्धिवाद हेंच बळ. तें मतस्वातंत्र्य, विचार-स्वातंत्र्य का मेलें? भारतीय संस्कृतीचा तो एक महान् विशेष होता. विरुद्ध मतेंही जनतेनें शांतपणें ऐकावीं म्हणून महात्माजींनीं प्रायश्चित्तरूप सात दिवसांचा उपवास केला. त्यांच्या एका भक्तानें केलेली ती चूक, त्यांचीच जणूं त्यांना वाटली. अर्थात् तो मारणारा महात्माजींच्या परिचयाचा नव्हता. परंतु अस्पृश्यता जावी ह्या मताचा तो होता.

अशा रीतीनें हा अपूर्व दौरा संपला. शेकडों मंदिरें उघडलीं. सर्व उघडलीं नाहींत, परंतु चालना मिळाली ही केवढी गोष्ट. गंजलेलीं हृदयकपाटें उघडलीं गेलीं. हृदयमंदिरें उघडणें ही महत्त्वाची गोष्ट आहे; मग बाहेरचीं मंदिरें आज ना उद्यां उघडतीलच.

जवळजवळ आठ लाख रुपये गोळा झाले. महात्माजींनीं अखिलभारतीय हरिजनसेवक संघाची स्थापना केली. आणि गुजराथेंत भिल्लांची सेवा करून वृद्ध झालेले भारतसेवकसमाजाचे थोर सेवक श्री. ठक्करबाप्पा ह्यांना

केशवराव जेधे

महात्माजींनीं अध्यक्ष केलें. प्रांताप्रांतांतून हरिजनसेवक संघ निघाले. त्यांच्या शाखा पुन्हा जिल्हावार, तालुकावार निघाल्या. तीं तीं ठिकाणें हरिजनांसाठीं जेवढी रक्कम जमवतील त्या रकमेच्या प्रमाणांत मध्यवर्ति संघाकडून मदत देण्यांत येऊं लागली. ठायीं ठायीं हरिजनछात्रालयें निघालीं. विहिरी खणल्या जाऊं लागल्या. शेकडों कार्यकर्ते प्रायश्चित्त म्हणून हरिजनांची सेवा करूं लागले.

आतां सत्याग्रह अजिबात थांबविण्यांत आला. वैयक्तिक सत्याग्रहही बंद झाला. कायदेमंडळांवरचा बहिष्कार उठवावा असें ठरलें. १९२० मध्यें कार्यकर्ते थोडे होते. तेही कायदेमंडळांत अडकले तर बहुजनसमाजांत जागृति कोण करणार? परंतु आतां सेवक बरेच होते. ३० सालची व ३२ सालची प्रचंड जागृति झाली होती. शेतकरी, कामगार राजकीय दृष्ट्या शिक्षित झाले होते. आतां निवडणुकी करण्यांत अर्थ होता. पाठीशीं प्रचंड संघटना होती. जनतेचें जागृत मत होतें. पाठिंबा होता. महात्माजी म्हणाले, "सनदशीर चळवळीची वेळ आली आहे. कांहीं लोकांना आपण कायदेमंडळांत पाठवूं शकतों." आणि दिल्लीच्या असेंब्लीची बडी निवडणूक प्रथम हातीं घेण्यांत आली. प्रांताप्रांतांतून कॉंग्रेसचे उमेदवार निवडले गेले. महाराष्ट्रांत श्री. केशवराव जेधे व श्री. काकासाहेब गाडगीळ ह्यांची निवड करण्यांत आली. काकासाहेब प्रथम तयार

काकासाहेब गाडगीळ

डॉ. मुंजे

नव्हते. परंतु शेवटीं राष्ट्राची आज्ञा म्हणून ते तयार झाले. ते गांधीजींना भेटले.

"निवडणुकींतील यशाविषयीं तुम्हांला काय वाटतें?" गांधीजींनीं हसून विचारलें.

"तुमचा आशीर्वाद असला म्हणजे पुरे" काका म्हणाले. काकांना महाराष्ट्राचा विश्वास वाटत होता.

तिकडे मध्यप्रांतांत काँग्रेसला विरोधी डॉ. मुंजे उभे राहिले. मुंजांना जोड कोण? बॅ. अभ्यंकरांना गळ घालण्यांत आली. त्यांची प्रकृति बरी नव्हती. शेवटीं तेही तयार झाले. महाराष्ट्रांत श्रीमंत वालचंदशेठ काँग्रेसला विरोधी उभे राहिले. केसरी वगैरे पत्रांचा त्यांना पाठिंबा. त्यांनीं हजारों रुपये जिल्ह्याजिल्ह्याला पेरले. महाराष्ट्रांत व मध्यप्रांतांत मोठी निकराची निवडणूक होती.

मुंबईची काँग्रेस

आणि १९३४ च्या ऑक्टोबरमध्यें मुंबईस काँग्रेसचें अधिवेशन भरलें.

श्रीमंत वालचंदशेठ

बिहारमधील भूकंपाच्या अपरिमित आपत्तींत राजेंद्रबाबूंनीं अपार सेवा केली होती. ते मुंबईस अध्यक्ष होते. महात्मा गांधी काँग्रेसपासून दूर होणार होते. टीकाकार म्हणत असत, 'महात्माजी जणूं हुकूमशहा आहेत. त्यांच्या तंत्राप्रमाणें सारे वागतात. स्वतंत्र बुद्धि कोणी चालवीत नाहीं.' वास्तविक महात्माजीं-सारखा लोकशाहीचा पुरस्कर्ता कोण आहे? एवढेंच नव्हे, तर बहुमतानें एखादा ठराव पास झाला असला आणि विरुद्ध

नगर वाचनालय सातारा

बाजूलाही कांहीं प्रमुख मंडळी असली तरी गांधीजींना तें कसेंसेंच वाटतें. जनमताला ते फार मान देतात. परंतु कोणाची तक्रार राहूं नये म्हणून ते अधिकृतरीत्या दूर होणार होते. अर्थात् सल्लामसलत द्यायला ते सदैव सिद्ध होतेच. महात्माजींनीं काँग्रेसमधून दूर होण्यापूर्वीं काँग्रेसला नवीन घटना दिली. पूर्वीं १९२० मध्यें काँग्रेसप्रतिनिधींची संख्या सहा हजार ठरविण्यांत आली होती. त्यापूर्वीं सभासदसंख्येला मर्यादाच नव्हती. नागपूरच्या काँग्रेसमध्यें वीस हजार प्रतिनिधि होते! हजार दोन हजार प्रतिनिधि पुरेत असें महात्माजींचें म्हणणें होतें. परंतु त्या वेळेस सहा हजार संख्या ठरली. आतां १९३४ च्या ह्या अधिवेशनांत दोन हजार संख्या ठरविण्यांत आली. आणि प्रांतवार त्यांची विभागणी करण्यांत आली. तसेंच खेड्यापाड्यांतून काँग्रेसचा प्रचार होऊन तेथें भरपूर सभासद होऊन शेतकऱ्यांचे भरपूर प्रतिनिधि यावे, अशी योजना नवीन घटनेंत करण्यांत आली. प्रतिनिधींपैकीं $\frac{2}{3}$ खेड्यांतील असावेत व $\frac{1}{3}$ शहरांतील असावेत, असा नियम केला गेला. एक दिवस ही काँग्रेस शेतकऱ्यांच्या हातांत जावी असा महात्माजींचा हेतु.

शहरांत वावरणाऱ्या कार्यकर्त्यांना अतःपर खेड्यांतून प्रचार केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. महात्माजींनीं अशी ही सुटसुटीत व कार्यक्षम नवीन घटना दिली.

राजगोपाळाचारी भाषण करतांना म्हणाले, " महात्माजींचें काँग्रेसमधील येणें जेवढें भव्य, तेवढेंच काँग्रेसमधून त्यांचें आजचें जाणेंही भव्य आहे. परंतु ते कोठें जाणार? ते आपल्याजवळ आहेतच. त्यांचा सल्ला घ्यायला जावें लागणार. ते आहेतच सेवेला सिद्ध."

सरदार म्हणाले, " आम्ही महात्माजींचे अंध अनुयायी आहोंत, असें म्हणणें हा महात्माजींचाही अपमान आहे व आमचाही. गांधीजींना आंधळेपणानें जाणाऱ्या शेळ्यामेंढ्या नको आहेत. ते बुद्धिवादानें शांतपणें

नगर वाचनालय सातारा.

आपलें म्हणणें पटवितात व आमच्या बुद्धीला पटतें म्हणून आम्ही त्यांच्या पाठोपाठ जातों."

महात्माजींचें त्या वेळचें भाषण किती सहृदय व सरळ. गांधीजी बोलूं लागले म्हणजे पित्याची आठवण होई. जणूं राष्ट्राचा पिता चार मोलाच्या गोष्टी सांगत आहे, असें वाटे. त्यांचे शब्द सरळ हृदयाला भिडतात.

ह्याच कॉंग्रेसमध्यें अखिल भारतीय ग्रामोद्योग संस्था गांधीजींनीं स्थापिली. अखिल भारतीय चरखा संघ होताच; परंतु आणखी इतर पुष्कळ उद्योग खेड्यांतून पुन्हा सुरू करण्यासारखे होते. ज्यांना उत्तेजन देणें जरूर होतें, अशा विधायक सेवेमार्फत जनतेला जागृत करणें शक्य आहे.

एक हृदयंगम दृश्य

ह्या कॉंग्रेसच्या वेळच्या हकिकती मी सांगत नाहीं. मला गांधीजींच्या गोष्टी सांगायच्या आहेत. त्या कॉंग्रेसच्या वेळेस मीं एक मोठें सहृदय दृश्य पाहिलें. अधिवेशन संपलें होतें. पुढारी परत जायचे होते. राजेन्द्रबाबू जायला निघाले. महात्माजी, सरदार, वगैरे सारे उभे होते. आणि राजेन्द्रबाबूंनीं महात्माजींस वंदन केलें. त्यांच्या पायांना भक्तिभावानें स्पर्श केला. वातावरण जरा गंभीर झालें. भावनांनीं ओथंबून आलें. इतक्यांत महात्माजींनीं गंमत केली. तेथील एका स्वयंसेवकाची टोपी काढून त्यांनीं वल्लभभाईंच्या डोक्यावर ठेवली आणि सारे एकदम हसूं लागले. स्फुंदूं लागणारे, हुंदका देऊं पाहाणारे हसूं लागले. वातावरण एकदम मोकळें झालें.

मुक्तहास्य

महात्माजींमध्यें ही मोठी शक्ति आहे. वातावरणांत काय पाहिजे तें त्यांना पटकन् समजतें. लाहोर कॉंग्रेसच्या वेळची गोष्ट आहे. त्या वेळेस पंडित जवाहरलाल अध्यक्ष होते. आदल्या वर्षीचे अध्यक्ष मोतीलाल होते.

पित्यानें पुत्राच्या हातांत सूत्रें दिलीं. जवाहरलाल स्थानापन्न झाले. त्यांच्या आईला कृतार्थ वाटलें. एकुलता एक मुलगा! भारतीय जननेचा लाडका जवाहरलाल ! मातेला वाटलें, माझ्या बाळावर दृष्ट नाहीं ना पडणार ? मातृहृदय वात्सल्यानें ओसंडून आलें. स्वरूपराणी उभ्या राहिल्या व कपाळावर बोटें मोडूं लागल्या. तो भोळसटपणा पाहून जवाहरलाल खिजले, चेहेऱ्यावर चिडखोरपणा चमकला; परंतु महात्माजी कडकड मोडलेलीं तीं बोटें पाहून मोठ्यानें हसले आणि जवाहरलालही हसूं लागले. वातावरण एकदम आनंदाचें झालें. गांधीजींचें हास्य ही एक मोठी शक्ति होती. काकासाहेब कालेलकर गांधीजींच्या हास्याला "मुक्तहास्य" असें म्हणतात. गांधीजींचें हास्य ज्यानें पाहिलें नाहीं, त्याला गांधीजींचें स्वरूप कसें समजणार? निर्मळ व निरहंकारी अशा जीवनवृक्षाचा फुलोरा म्हणजे महात्माजींचें हास्य.

त्यांना असें हसायला कोणीं शिकविलें ? श्रीभगवद्गीतेनें. महात्माजी म्हणतात, "संकटांतही मोकळ्या मनानें हसायला गीतेनें मला शिकविलें आहे." गांधीजी फार विनोदी होते. आणि त्यांचा विनोद किती गोड असे. न खुपणारा, न बोंचणारा. एकदा ते म्हणाले, "माझ्यामध्यें विनोद नसता तर मी इतका जगलों नसतों."

गांधीजी सर्वत्र प्रसन्नतेचें वातावरण निर्माण करतात. अब्बास तय्यबजी भेटायला आले तर लगेच हसून म्हणायचे, "क्यों दाढी कब आयी ?" आणि सारे हसायचे.

हृदयांत संगीत

त्यांच्या अनासक्त वृत्तींत त्यांच्या ह्या मुक्तहास्याचा जन्म आहे. पू. विनोबाजींचे बंधु श्री. बाळकोबा ह्यांनीं एकदा गांधीजींस विचारलें, "तुमच्यावर किती विषारी टीका होते! लोक वाटेल तें बोलतात. तरी तुम्ही शांत ! आणि केवढाल्या चळवळी तुम्ही करतां ! कधीं त्या मागें

घ्याव्या लागतात. तुम्हांला हजारों व्याप, हजारों उद्योग. अशा ह्या सर्व परिस्थितींत तुमच्या हृदयाची स्थिति कशी असते ?"

"माझ्या हृदयांत संगीत असतें. तंबोरा लागलेला असतो." असें महात्माजींनीं उत्तर दिलें.

मुंबईची काँग्रेस संपली. महात्माजी आतां राहाणार कोठें? साबरमती आश्रम त्यांनीं हरिजनकार्यास देऊन टाकला होता. ते कोठें तरी खेड्यांत राहूं इच्छीत होते. वर्धा हें मध्यवर्ति ठिकाण. वर्ध्याच्या जवळचें शेगांव हें खेडें पसंत करण्यांत आलें. श्री. जमनालालजी, विनोबाजी ह्यांच्याजवळ महात्माजी राहावयास आले. गुजराथची आतां चिंता नव्हती. शेकडों झुंजार कार्यकर्ते गुजराथेंत तयार झाले होते. वर्षांतून एक महिना बार्डोलीस येऊन राहाण्याचें गांधीजींनीं कबूल केलें. पूर्वी वर्ध्याच्या आश्रमांत एक महिना येत. आतां बार्डोलीच्या स्वराज्य आश्रमांत एक महिना जाणार !

शेगांवचें नांव सेवाग्राम असें ठेवण्यांत आलें. आणि ग्रामोद्योगाची सेवा सुरू झाली. ह्या नवीन प्रयोगांत महात्माजींना मगनलाल गांधींची पदोपदीं आठवण होत होती. आफ्रिकेपासून गांधीजींच्या विधायक सेवेंत ते रमलेले. परंतु १९२८ मध्यें मगनलाल देवाघरीं गेले होते.

"मंगल मंदिर खोलो
दयामय, मंगल मंदिर खोलो"

हें पद म्हणत मगनलाल प्रभुचरणीं लीन झाले. श्री. जमनालालजींनीं मोठी जागा मगनलालांच्या स्मारकासाठीं दिली, तेथें मगनवाडी वसवण्यांत आली. तेथें अखिल भारतीय ग्रामोद्योग विद्यालय सुरू करण्यांत आलें. सर्व प्रांतांतून विद्यार्थी येथें येऊं लागले. त्यांना शिष्यवृत्त्याही देण्यांत येत. कागद करणें, सुधारलेली तेलघाणी, सुधारलेली चक्की, नाना

अर्थशास्त्रज्ञ कुमारप्पा

प्रकार सुरू झाले. आणि जवळच नालवाडीला चर्मालय सुरू झालें. खादीकार्यालय होतेंच. पुढें थोड्या दिवसांनीं शास्त्रीय गोशाला सुरू झाली. जमनालालजींनीं गोसेवेस वाहून घेतलें. त्यांनीं तेथें गोपुरी भाग वसविला. हिंदुस्थानांतील खेड्यांचीं पुन्हा गोकुळें कशीं होतील ह्याचे प्रयोग, ह्याचे उद्योग तेथें सुरू झाले. प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ कुमारप्पा ग्रामोद्योगाचे प्रमुख झाले. गांधीजींसारखा महान् संग्राहक झाला नाहीं. राष्ट्राच्या कार्यांत त्यांनीं लहानमोठीं शेकडों, हजारों माणसें ओढलीं. आणि त्या त्या कार्यांत तज्ज्ञ माणसें. महात्माजींनीं एकदा म्हणावें, " एक महादेव मी तयार केला तरी पुरे. तीच माझी भारताला भेट." परंतु किती माणसें त्यांच्या भोवतीं ! कुमारप्पा असेच अर्थशास्त्रांतील अतिरथी. आणि प्यारेलाल. वसाहतींसंबंधीं ते हरिजनमध्यें लेख लिहूं लागले, ते किती माहितीपूर्ण ! अशीं रत्नें महात्माजींनीं गोळा केलीं. भिन्न भिन्न प्रवृत्तीचीं माणसें ! सरदार, राजाजी, राजेन्द्रबाबू, जवाहरलाल, विनोबाजी, कृपलानी, हीं का एकाच प्रवृत्तीचीं माणसें आहेत ? परंतु सर्वांना गांधीजी सांभाळतात. ते हुकूमशहा असते तर असें करूं शकते ना.

आचार्य कृपलानी

सेवाग्रामांत पर्णकुटी करून गांधीजी राहूं लागले आणि तेथील खेडुतांची सेवा करूं लागले. हिंदुस्थानांतील खेड्यांतून स्वच्छता

नाहीं. शौचास वाटेल तेथें बसतील. गांधीजींनीं पुष्कळ सांगितलें. ते स्वतः हातांत पत्रा व झाडू घेऊन बाजूस उभे राहात आणि विष्ठा उचलून नेत. ते म्हणाले, " मी सेवा करायला आलों आहें. येथें बसूं नका असें कसें सांगूं? त्यांच्यावर कसा रागावूं?"

पारतंत्र्याची घाण दूर करणारा महात्मा खेड्यांतील मलमूत्राची घाणही दूर करीत होता.

ग्रामीण संशोधन

त्यांचें सारें लक्ष गरिबांच्या संसाराकडे वळलें. खेड्यांत कोणत्या भाज्या होतात, कोणते पाले असतात, जीवनसत्त्वें कशांत आहेत, घोळीची भाजी चांगली कीं वाईट, चिंचेमध्यें लिंबाचे गुण आहेत कीं नाहींत, साखरेपेक्षां गूळ बरा नाहीं का? कांहीं आरोग्यदायी गुण गुळांत अधिक नाहींत का? एक का दोन, शेकडों प्रश्नांची त्यांनीं चिकित्सा सुरू केली. त्यांनीं सरकारी रसायनशास्त्रज्ञांकडे निरनिराळे पाले पाठविले. निंबाच्या पाल्यांत काय आहे, घोळीच्या भाजींत काय आहे, त्याचें पृथक्करण मागवलें. आणि तुम्ही गरीब असलां तरी अमूक भाज्या खा, त्या भरपूर असतात, असें हा महात्मा सांगूं लागला. सरकारी रसायनशास्त्रज्ञांकडून माहिती आली कीं चिंचेंत लिंबाचे बरेच गुण आहेत. झालें! महात्माजी गूळ घालून चिंचेचेंच सरबत घेऊं लागले. एकदा अमळनेरवरून महात्माजी जाणार होते. अमळनेर स्टेशनवर आहारव्यवस्था करायची होती. श्री. महादेवभाईंचें पत्र आलें होतें. त्यांत पुढील मजकूर होता—

निंबाच्या कोवळया पानांची चटणी; आणि चिंचेचें (जें गरिबांचें लिंबू आहे) गूळ घातलेलें सरबत, वगैरे.

हातसडीचे तांदूळ चांगले, न सडलेले तर अधिकच छान. तांदूळ सडणें म्हणजे साखरेचा अंश गमावणें. मिलमध्यें पांढरे फटक झालेले

तांदूळ खाणें आरोग्यास अपायकारक आहे. एका उंदराला सडलेले तांदूळ दिले, दुसऱ्यास न सडलेले दिले. तर पहिल्याचें वजन घटलें, दुसऱ्याचें वाढलें असें सिद्ध झालें आहे. पुन्हा, हातसडीचे तांदूळ घेऊं तर खेड्यांतील बायांना धंदा मिळेल. गिरणीच्या तांदुळांनीं बेरीबेरी रोगही होतो.

गुळांत ग्लूकोज असतो, साखरेंत तो नसतो. बद्धकोष्ट दूर व्हायला गूळ बरा असें संशोधन सुरू झालें. ग्रामोद्योगी संशोधन, दरिद्री-नारायणाची स्थिति सुधारणारें संशोधन !

गांधीजींनीं ग्रामोद्योगी अर्थशास्त्र राष्ट्राला शिकविलें. श्री. कुमारप्पा ह्यांनीं गुजराथ कॉलेजमध्यें असतांना विद्यार्थ्यांच्याबरोबर खेड्यांतील अर्थशास्त्राचें संशोधन केलें. एक तालुका घेऊन त्याचा अर्थशास्त्रीय दृष्ट्या अभ्यास कसा करावा तें दाखविलें. हिंदुस्थानांतील सात लाख खेड्यांना सुखी करणारें अर्थशास्त्र हवें आहे. ह्या सात लाख खेड्यांचीं सातशें शहरें करण्यांत काय अर्थ? उद्यां विमानें येतील व प्रचंड शहरांचा क्षणांत विध्वंस करतील. लाखों खेड्यांतूनच जनता नांदू दे. तेथेंच त्यांना धंदे देऊं. तेथें ज्ञानविज्ञान नेऊं. कलेचा आनंद नेऊं, आरोग्य नेऊं. प्रचंड उद्योगधंदे चालवायला तज्ज्ञांची सदैव आवश्यकता असते. आणि ह्या तज्ज्ञांचीच एक नवीन हुकूमशाही निर्माण होते. परंतु मित्रांनो, ह्या वादांत मी जात नाहीं. मी तुम्हांला गोष्टी सांगत आहें. नवहिंदुस्थानच्या निर्मितींत आपण समन्वय करूं. जें जें चांगलें असेल तें तें घेऊं.

जगाच्या पुढें असणारे गांधीजी

महात्माजी मागें नेणारे नव्हते. उलट, जगाच्या पुढें ते होते. प्राचीनकाळीं संघटित धर्मसंस्थांना प्राबल्य होतें. परंतु धर्मसंस्था मागें पडून अर्थशास्त्राचें युग आलें. ह्यांतून स्पर्धा व युद्धें ह्यांची पैदास झाली.

भविष्यकाळांत युद्धांचा वीट येईल. जगाची आर्थिक स्थिति तर सुधारली पाहिजे. परंतु तिच्यासाठीं जे झगडे करायचे ते शस्त्रास्त्रांनीं करीत बसूं तर मानवजात नष्ट होईल. आजचीं युद्धें पाहून जगाला युद्धाची शिसारी येईल. ह्या महायुद्धांतून राष्ट्रातीत वृत्तीचीं माणसें निर्माण होतील. तुम्हांला मी एक गोष्ट सांगतों.

युद्धोत्तर पिढी

गनिमी पद्धतीनें लढणारा युगोस्लावियांतील एक शिपाई होता. जर्मनीविरुद्ध स्वदेशासाठीं तो लढत होता. त्याचें नांव पीटर. त्याचें लग्न झालें होतें. त्याचें गांव जर्मनांनीं व्यापलें. तो पळाला. तो गनिमी शिपाई झाला. त्याला गोळी घालून जर्मनांनीं ठार केलें. परंतु मरण्यापूर्वी स्वतःच्या पत्नीच्या पोटांत असलेल्या बाळाला उद्देशून त्यानें पुढील पत्र लिहिलें. तें त्याच्या खिशांत होतें. त्याचें प्रेत त्याच्या मित्रांना आढळलें. आणि खिशांत तें पत्र! तें सर्वत्र लोकप्रिय झालें, लोकवाङ्मयांत जाऊन बसलें. काय होतें त्या पत्रांत?

"बाळ, आईच्या उदरांत तूं आहेस. अंधारांत झोपलेला आहेस. जगण्यासाठीं तुला धडपड करायची आहे आणि त्यासाठीं आईच्या पोटांत तूं शक्ति मिळवीत आहेस. तुला अजून नीट आकारही आला नसेल. दृष्टि आली नसेल. श्वासोच्छ्वास करतां येत नसेल. परंतु तुझ्या जन्माची वेळ येईल. तुझी आई, जिच्यावर माझें अपार प्रेम आहे, तिच्या प्रसूतीची वेळ येईल. बाळ, तुझ्यामध्यें चैतन्य संचरेल. प्रकाश, हवा ह्यांच्यासाठीं तूं धडपड करूं लागशील. ही धडपड हा तुझा वारसा. जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाची प्रकाशासाठीं धडपड असते. ही आपली धडपड कां हें त्यालाही माहीत नसतें.

"तुझ्यांतील ही प्रकाशज्वाला अमर असो! तुझ्या वाढत्या वयाबरोबर अधिक प्रज्वलित होवो! त्या प्रकाशानें तुझें तारुण्य तळपो! आणि

तुझ्या आयुष्याच्या अखेरीसही ती ज्वाला पेटत राहो! तूं जो मंगल प्रकाश मिळविलास व दिलास त्याच्यासाठीं सारे तुला दुवा देतील. कारण सर्व वाटसरूंना अंधारांत प्रकाशाची जरूर भासेल. प्रेमाच्या उबेची जरूर भासेल.

" साहस व कुतूहल हीं तुला जन्मतःच मिळतील. अमृतत्वाची खूण म्हणजे ही जिज्ञासा, ही कुतूहलवृत्ति, साहसाची वृत्ति. ही वृत्ति मरूं देऊं नको. इंद्रधनुष्यापलीकडचें सुवर्ण ह्या वृत्तीला दिसतें. वाळवंटापलीकडची रमणीय हिरवळ अशा वृत्तीला दिसते. अंधारापलीकडचा प्रकाश, समुद्रापलीकडची उषा अशा दृष्टीला दिसत असते.

" संसारांत सारे कंटाळतात. परंतु तुझा उत्साह अमर असो! श्रद्धेनें व धैर्यानें सदैव नवीन शोधीत, मंगल शोधीत पुढें जा.

" सर्वसंग्राहक हो! ह्यांतून तुला जें बरोबर वाटेल तें निवडून घे. तें हृदयाशीं धर.

" जीवनावर सदैव प्रेम कर. परंतु मरणाची भीति दूर ठेव. जीवनावर आपण प्रेम न करूं तर तें असून नसल्यासारखेंच आहे. परंतु जीवनावर प्रेम करणें म्हणजे त्याची आसक्ति नव्हे, तें कुरवाळीत बसणें नव्हे.

" मैत्रींत आनंद मान; परंतु आपले मित्र कोण तें ओळखण्यास शीक. जें वाईट आहे त्याच्याविषयीं फक्त असहिष्णुता दाखव. उदात्त व सुंदर गोष्टींचें कौतुक कर. सूर्यप्रकाश, तळपणारी विद्युल्लता, पावसाच्या सरी, आणि तारे, तसेंच ते वारे आणि समुद्र, झाडें कशीं वाढतात, पिकें कशीं तयार होतात आणि वीरपुरुषांचा मोठेपणा ह्या सर्वांविषयीं तुला कौतुक व औत्सुक्य असो! नवीन ज्ञानासाठीं तुझें हृदय सदा भुकेलेलें असो! द्वेष फक्त असत्यासाठीं ठेव; तसेंच तुला कधीं कधीं रागही आला पाहिजे.

" बाळ, मी आतां मरणार आहें. मीं केलेल्या चुकांच्या राशीवर तूं जन्माला येशील; परंतु मला त्यांची क्षमा कर. तुला ह्या दुःखमय व

अशान्त जगांत सोडून जातांना मला लाज वाटत आहे. परंतु त्याला इलाज नाहीं.

" आणि तुला माझा शेवटचा आशीर्वाद म्हणून मी तुझा मनोमय मुका घेतों. तुला रात्र कल्याणप्रद जावो आणि मंगल उषा व सोज्ज्वळ प्रभात तुला लाभो ! "

असें हें पत्र आहे. परंतु त्या गरोदर दुःखी मातेला तें पत्र पोचण्यापूर्वींच तिचीही कत्तल झाली. हें पत्र जन्माला येणाऱ्या सर्व मुलांसाठीं आहे. नवीन पिढीसाठीं हें पत्र आहे. मित्रांनो, ह्या पत्रांत स्वतःच्या देशाचा उल्लेख तरी आहे का ? आपलें राष्ट्र, आपली संस्कृति असें येथें कांहीं आहे का ? उद्यांचें जग कदाचित् युद्धांना कंटाळेल आणि प्रकाशार्थ धडपडण्याचे नवीन मार्ग दिसतील. कदाचित् नैतिक मूल्यांवर अधिक भर देऊन लढे होतील. आणि महात्माजी तर ती शिकवण न्हते ना देत ! ते आपल्या काळाच्या फार पुढें होते का ? तुम्ही विचार करा. परंतु मला गांधीजींच्या गोष्टी सांगायच्या आहेत. खरें ना ? आज संपल्याच पाहिजेत पुण्यकथा.

बोरसद प्लेग

ग्रामोद्योगांत गांधीजी रमले होते. परंतु सरदारांनीं त्यांना बोरसद तालुक्यांत बोलावलें. कां बरें ? बोरसद तालुका म्हणजे शूरांचा तालुका. तेथें कोणता होता प्रश्न ? तेथें प्लेगनें कहर उडविला होता. परंतु लोक उंदीर मारूं देत ना. ते म्हणत, " ही हिंसा होईल. " शेवटीं वल्लभभाईंनीं गांधीजींना लिहिलें, " तुम्ही या व ह्यांची समजूत घाला. "

महात्माजींनीं हरिजनमध्यें लिहिलें, " सारें जीवन थोर आहे. एखाद्या लहानशा घुंगुरख्यासही माझ्याइतकाच जगण्याचा हक्क आहे. परंतु जीवन अपूर्ण आहे. मी मोठ्या दुःखानें सांगतों कीं उंदरांचा संहार करा.

नाहींतर रोग सर्वत्र फैलावेल. उंदीर होऊं न देणें, घाण होऊं न देणें एवढाच अहिंसक साधकाला मार्ग आहे."

श्रीमद्भगवद्गीता सांगते, "सर्व कर्मांत दोष आहे. अग्नीजवळ ज्याप्रमाणें थोडा तरी धूर असतो, त्याप्रमाणें कोणतेंही कर्म घ्या; त्यांत थोडा तरी दोष येतोच." मग मनुष्याचें कर्तव्य काय? कर्मांत कमी दोष येईल अशा रीतीनें वागणें.

विठ्ठलभाई पटेल

महात्माजी स्वतः बोरसद तालुक्यांत गेले. स्वयंसेवकांची छावणी उघडण्यांत आली होती. महात्माजी सर्वांना टोचून घ्या, म्हणून सांगत होते. परंतु त्यांनीं टोचून घेतलें नाहीं. उंदरांची धरपकड सुरू झाली. स्वयंसेवक सेवेंत चूर होते.

सुखसंवाद

एके दिवशीं छावणींतून सरदार वगैरे सारेच कामाला निघाले. महात्माजी कौतुकानें म्हणाले, "मी येथें एकटा काय करूं? एखादा खुळखुळा तरी आणून द्या, म्हणजे वाजवीत बसेन." महात्माजींची अशी बालवृत्ति आहे.

आणि एके दिवशीं सायंकाळीं सारे फिरायला गेले होते. नाना प्रकारचीं बोलणीं चाललीं होतीं. आणि महात्माजी सरदारांना म्हणाले, "मी तुम्हांला नसतों भेटलों तर तुमची काय गत झाली असती? कोठें वाहावत गेले असतेत?"

हृदयांत प्रेम आहे का?

वल्लभभाई व विठ्ठलभाई भाऊ भाऊ. विठ्ठलभाई युरोपांत मरण पावले. त्यांचे व महात्माजींचे पुढें मतभेद झाले. परंतु महात्माजींवर

त्यांचें भक्तिप्रेम होतें. १९१७ मधील गोष्ट सांगतों. विठ्ठलभाई म्हणजे मोठे विनोदी. गोध्रा येथें जिनांच्या अध्यक्षतेखालीं गुजराथ राजकीय परिषद भरली होती. गांधीजी गेले होते. विठ्ठलभाई आले होते. तेथील हरिजनवस्तींत गांधीजी गेले. विठ्ठलभाईही तेथें आले. परंतु तेथें येतांना त्यांनीं फकिरासारखा बावळा पोषाख केला होता. तेथें हरिजनांची सभा होती. महात्माजींनीं विठ्ठलभाईंना बोलण्यास सांगितलें. विठ्ठलभाई उभे राहिले. गांधीजींनीं त्यांच्या छातीवर हात ठेवला.

"हें काय?" विठ्ठलभाईंनीं विचारलें.

"पोषाखाचें सोंग तर खूप आहे; परंतु हृदयांत ऊब आहे का? तेथें हरिजनांचें प्रेम आहे का, तें मी पाहात आहें."

"ह्यापुढें हरिजनांत मी जात जाईन." ते म्हणाले.

विठ्ठलभाई दिल्लीच्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे अध्यक्ष होते, परंतु ते आपला बहुतेक पगार गांधीजींकडे पाठवून देत.

गोध्रा परिषदेचा प्रश्न आला म्हणून एक गोष्ट आठवली. लोकमान्य टिळकांना परिषदेस बोलावलें होतें. अहमदाबादला लोकमान्य येणार होते. त्यांची मिरवणूक काढण्याची कार्यकर्त्यांना इच्छा होती. परंतु जमेना. गांधीजींना गोष्ट कळली. त्यांनीं एक पत्रक काढून जाहीर केलें, "लोकमान्य येत आहेत. त्यांच्या स्वागतासाठीं मी स्टेशनवर जाणार आहें." आणि पत्रकाचा विद्युत्परिणाम झाला. हजारों लोक आले. आणि आपोआप मिरवणूक निघाली.

बॅ. अभ्यंकर व गांधीजी

असो. बोरसदमधील कार्य संपलें. गांधीजी सेवाग्रामला परतले; परंतु ह्याच्या आधींच्या गोष्टी राहिल्या. बॅ. अभ्यंकर हे महात्माजींच्या आग्रहावरून निवडणुकीस उभे राहिले होते. ते आजारी होते. ते म्हणत,

" मी निवडणूक जिंकीन परंतु मृत्यु मला जिंकील." आणि खरेंच ते आजारी पडले. महात्माजींचें ह्या वीरपुरुषावर प्रेम होतें. हरिजन दौऱ्याच्या वेळेस नागपूरला प्रचंड सभा होती. त्या सभेंत बॅ. अभ्यंकरांनीं स्वत:च्या पत्नीचे सारे दागिने हरिजनकार्यास दिले आणि ते महात्माजींस म्हणाले,

" महात्माजी, हे शेवटचे दागिने."

" परंतु अद्याप तुम्हांला दोन वेळां नीट जेवण मिळत आहे. ज्या दिवशीं तुम्हांला नीट जेवणही मिळत नाहीं असें मी ऐकेन त्या दिवशीं मी आनंदानें नाचेन." महात्माजी म्हणाले. महात्माजी जवळच्या मित्रांजवळून अधिकाधिक त्यागाची अपेक्षा करीत. ज्यांच्यावर प्रेम आहे त्यांचें ते हवन करूं पाहात. त्यांचें प्रेम मृदुमधुर होतें परंतु कठोरही होतें.

अभ्यंकरांच्या व गांधीजींच्या गोड गोष्टी आहेत. एकदा एक मसुदा करायचा होता.

" महात्माजी, तुम्हीच द्या लिहून." अभ्यंकर म्हणाले.

" तुम्हीच लिहा." गांधीजी हसून बोलले.

मसुदा लिहून बॅरिस्टरांनीं गांधीजींजवळ दिला. गांधीजींनीं तो वाचला. आणि त्यांनीं दुसरा एक लिहून काढला.

" हा बघा वाचून." गांधीजी म्हणाले.

" माझ्यांत व ह्यांत फारसा फरक नाहीं. तुम्हीं जरा हात फिरविला आहे. थोडें पॉलिश केलें आहे."

" परंतु तें पॉलिश असलें म्हणजे बरें. उगीच ओबडधोबड कशाला!"

असे हे बॅरिस्टर आजारी पडले, बरे होतील असें वाटेना. एके दिवशीं सेवाग्रामहून गांधीजी नागपूरला आले. बॅरिस्टर अभ्यंकरांच्या खोलींत ते गेले व तेथें त्यांनीं प्रार्थना म्हटली आणि गंभीरपणें परत आले. महात्माजींच्या भावना तुम्ही समजून घ्या. ते भावनासिंधु होते, म्हणूनच ते

डॉ. अन्सारी

संत बनले. लोकमान्यांना आपण तत्त्वज्ञानी म्हणूं तर महात्माजींना संत म्हणूं. महात्माजींच्या जीवनांत भावनांचा ओलावाही भरपूर होता.

दिल्लींत गेले तर पैगंबरवासी डॉ. अन्सारी ह्यांच्या पत्नीकडे उतरतील. ऋणानुबंध चालू ठेवतील. गांधीजींच्यामध्यें हें फार होतें. दुसऱ्याच्या भावना ते ओळखीत. उपवासांत असतांही जवाहरलालांना केलेल्या तारेंत इंदिरेच्या प्रकृतीविषयीं विचारतील, तिचें वजन वाढलें का विचारतील. हरिजन-उपवास सुटल्यावर नाशिक जेलमध्यें प्यारेलाल, स्वामी आनंद, वगैरेंना जें त्यांचें पत्र आलें, त्यांत ह्या सर्वांच्या प्रकृतीविषयींच विचारणा. स्वत:चें कांहीं नाहीं. ही जी प्रकृतिमधुरता महात्माजींजवळ होती तिनें ते सर्वांचीं हृदयें जिंकीत. ते दुसऱ्यास मोठेपणा देतील. अलीबंधूंना म्हणतील, " मी तुमचा आहें. तुमच्या खिशांत आहें. " त्या त्या प्रांतांत गेले तर त्या त्या प्रांतांतील भाषेंत चार वाक्यें तरी तेथील मित्रांजवळ, मुलांबाळांजवळ बोलतील. महात्माजी म्हणजे भारताचें प्रतीक आहेत, ऐक्यमूर्ति आहेत.

स्वामी आनंद

हिंदी ही त्यांनीं राष्ट्रभाषा केली. ती हिंदी कीं जी हिंदु व मुसलमान दोघांसही समजेल. केवळ संस्कृतप्रचुर नव्हे, केवळ उर्दुप्रचुर नव्हे. तिला नांवच त्यांनीं राष्ट्रभाषा हें दिलें. परंतु लिप्या मात्र दोन्ही शिका, असें ते सांगत. उर्दू लिपीही शिका.

देवनागरीही शिका. आश्रमांत ते स्वतः उर्दू लिपी शिकवीत. "तासा दोन तासांचें काम" असें ते म्हणायचे. त्यांच्या पत्रांच्या कागदावर सेवाग्रामचा पत्ता दोन्ही लिपींतून लिहिलेला असे. ध्येयाची पूजा बारीकसारीक गोष्टींतही ते करीत.

ते स्वदेशीचे मूर्तिमंत पुतळे होते. स्वतःसाठीं त्यांनीं चाकू, सुई, वस्तरा, वगैरे सारें स्वदेशी करून घेतलें होतें. लेखणीनें झपझप लिहीत. ते ग्रामोद्योगाचा कागद वापरीत.

स्वच्छता व व्यवस्थितपणा

महात्माजी स्वच्छतेचे फार भोक्ते. त्यांचें सारें स्वच्छ व नीटनीटकें असे. एकदा येरवडा जेलमध्यें काय झालें, जेलचा सुपरिंटेंडंट बूट घालून अगदीं जवळ आला. परंतु तो गेल्यावर महात्माजींनीं सारवून टाकलें. त्यांची निर्मलता त्यांच्या निर्मल आत्म्याचें प्रतिबिंब आहे.

ते अत्यंत नियमित होते. घड्याळ सदैव कमरेला खोवलेलें असे. क्षणाक्षणाचा ते हिशेब ठेवीत. ते प्रकृतीची काळजी घेत. ते कधीं फारसे आजारी पडत नसत. आजारी पडले तर लौकर बरे होत. स्वतःच्या शरीराचें ज्ञान त्यांनीं करून घेतलें होतें. इतकीं वर्षें ह्या शरीरांत राहिलों. त्याला काय मानवतें, काय मानवत नाहीं तें मला का अजून कळणार नाहीं ? महात्माजी मिताहारी होते. पांच पदार्थांहून अधिक पदार्थ ते घेत नसत. चटणी असली तरी पदार्थच.

स्वतःचें सारें काम शक्य तों ते स्वतः करीत. एकदा अमळनेरवरून ते जात होते. त्यांना आंब्यांचा रस वाटींतून दिला. रस घेतल्यावर त्यांची वाटी मीं विसळण्यासाठीं मागितली. ते म्हणाले, "नाहीं, मलाच विसळूं दे."

साबरमतीच्या आश्रमांतील मला वाटतें ती गोष्ट आहे. ते रोज १६० वार सूत कांतीत. सूत गुंडाळायला ते दुसऱ्याजवळ देत. परंतु गुंडाळणारा बरोबर मोजून गुंडाळीत नाहीं असें दिसून आलें.

"मीं उगीच दिलें. मींच स्वतः गुंडाळणें योग्य." असें म्हणून ते स्वतःच गुंडाळून ठेवूं लागले.

स्मरणशक्ति

महात्माजींची स्मरणशक्ति असाधारण होती. शेकडों कार्यकर्त्यांचीं नांवें त्यांना पाठ असत. ते कोठें राहातात तें माहीत असे. खानदेशांतून जातांना नंदुरबार आलें कीं म्हणत, "बाळूभाई, शंकरराव ठकार ह्यांचें हें गांव." एरंडोल आलें, तर लगेच म्हणत, "शंकरभाऊ काबरे ह्यांचें गांव." भुसावळ आलें तर म्हणत, "अण्णासाहेब दास्ताने ह्यांचें गांव." अशी त्यांची स्मृति होती. लहानमोठ्या कार्यकर्त्यांचें असें जाणीवपूर्वक स्मरण ठेवणारा महात्मा कोणाचें हृदय मोहून घेणार नाहीं?

महात्माजी ईश्वराला सत्य हें नांव देत. सत्यामध्यें ते परमेश्वर पाहात. ते म्हणत, "मी इतर साऱ्या अपराधांची क्षमा करीन. परंतु असत्याची क्षमा नाहीं. खुनी मनुष्य आला, परंतु त्यानें जर सारी खरी हकीकत सांगितली तर मी त्याला हृदयाशीं धरीन." सत्य म्हणजे महात्माजींचा प्राणवायु.

नम्रता

आणि त्यांची नम्रता किती! आगगाडींतून ते जात होते. एका स्टेशनवर गाडी थांबली. एक शेठजी, गांधीजी ज्या डब्यांत होते त्याच डब्यांत चढत होता. परंतु त्याचा पाय निसटला. गाडीही सुरू झाली. मोठ्या कष्टानें तो शीरसलामत डब्यांत चढला. पुढें त्याला कळलें कीं डब्यांत महात्माजी आहेत. त्याला वाटलें, 'ह्या डब्यांत गांधीजी होते म्हणून आपण वांचलों." तो भावनांनीं ओथंबून महात्माजींकडे गेला व हात जोडून म्हणाला,

"महाराज, तुम्ही येथें होतेत म्हणून वांचलों."

" मी येथें होतों म्हणून तुम्ही पडत होतेत. परंतु प्रभूनें वांचविलें. त्याची कृपा. " महात्माजी म्हणाले.

...वाचनालय सात...
...ळ विभाग

१९३० सालची चळवळ अभूतपूर्व झाली. महात्माजी म्हणाले. " अशी चळवळ होईल म्हणून कोणाला कल्पना होती ? मीं प्रभूच्या हातीं चळवळ सोपविली होती. त्याची प्रेरणा. नाहीं तर लहान लहान मुलेंही निर्भयपणें कशीं झुंजतीं ? "

मी निरवानिरवीच्याच गोष्टी सांगू लागलों. परंतु अद्याप अवकाश आहे. मी १९३५ सालपर्यंत आलों होतों. आणि १९३६ साल आलें. मुंबईच्या कॉंग्रेसच्या वेळेस महात्माजींनीं अशी इच्छा प्रदर्शित केली होती कीं " खेड्यांत कॉंग्रेसचें अधिवेशन भरावें. " कॉंग्रेसचें सिंहासन खेड्यांतच शोभतें. १९३६ मध्यें महाराष्ट्रांत कॉंग्रेस भरण्याचें ठरलें. अनेक अडचणी आल्या. विरोधकांनीं विरोधाची परमावधि केली. परंतु फैजपूरचें फजीतपूर न होतां फत्तेपूर झालें.

महात्माजी व सरहद्द गांधी असे दोघे तेथें होते. अहिंसेचे परम उपासक असे ते दोघे महापुरुष आजूबाजूच्या खेड्यांतून पायीं हिंडत. महात्माजी एके दिवशीं खिरोदें गांवीं गेले. तेथें ते " विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । " ह्या तुकारामांच्या अभंगावरच बोलले. त्या दोन पुरुषांना खेड्यांतून हिंडतांना पाहूनच कृतज्ञतेनें हृदय भरून येई. " महाराष्ट्र म्हणजे सेवकांचें पोळें " असा महाराष्ट्राचा त्यांनीं गौरव केला.

पुढें असेंब्लीच्या निवडणुकी आल्या. कॉंग्रेसला बहुमत मिळालें. मंत्रिपदें स्वीकारावीं कीं न स्वीकारावीं ह्याचे वाद झाले. महात्माजींनीं व्हाइसरॉयांशीं बोलणें चालविलें. " गव्हर्नर दैनंदिन कारभारांत ढवळाढवळ करणार नाहींत " असें अभिवचन मिळालें. आणि कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें स्थापन झालीं.

कराची कॉंग्रेसमध्यें उद्यांच्या स्वराज्यांत ५०० रुपयांहून अधिक पगार कोणाला देण्यांत येणार नाहीं असें ठरविण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें कॉंग्रेसमंत्र्यांनीं ५०० रु. पगार घेण्याचें ठरविलें. आणि महात्माजींनीं दारूबंदी आधीं हातांत घ्या असें सांगितलें. हिंदी जनतेचे दारूपायीं दरसाल ७५ कोटि रुपये खर्च होतात. हे रुपये जर समाजांत खेळूं लागले तर किती छान होईल! परंतु इंग्रज सरकारनें दारूचें उत्पन्न शिक्षणासाठीं थोडें फार लावून दिलें आहे. दारूबंदी केली तर उद्यां शिक्षणाला पैसा कोठून आणावयाचा? ह्यासाठीं स्वावलंबी शिक्षण-पद्धतीची जरूरी होती.

वर्धा शिक्षणपद्धति

महात्माजींनीं चरखा संघ, ग्रामोद्योग संघ, राष्ट्रभाषाप्रचार, हरिजन-सेवक संघ, गोरक्षण, इत्यादि गोष्टी भक्कम पायावर नीट उभारल्या होत्या. परंतु राष्ट्रीय शिक्षणाचा अद्याप नीट विचार झाला नव्हता. हिंदुस्थान गरीब देश आहे. उद्यां स्वराज्य आलें तरी आपण एकदम श्रीमंत थोडेच होणार आहोंत! हिंदुस्थानचें प्रांतिक व मध्यवर्ति उत्पन्न एकत्र केलें तर २००।२२५ कोटि भरेल. हिंदुस्थानांत सध्या शिक्षणावर १२।१५ कोटि रुपये सरकार खर्च करतें. आणि शेकडा साक्षरता किती आहे? तर दहा. शेकडा दहा लोक साक्षर करायला जर १५ कोटि रुपये खर्च, तर सर्वच्या सर्व जनता साक्षर करायला १५० कोटि रुपये लागतील. एकंदर उत्पन्नच २२५ कोटि. त्यांतून १५० कोटि शिक्षणालाच द्यायचें म्हटलें तर इतर राष्ट्रसंवर्धक कार्यांस कोठला पैसा?

हिंदुस्थानच्या शिक्षणाचा प्रश्न निराळ्या रीतीनें सोडवावा लागेल. खेड्यांतून मुलगा ६।७ वर्षांचा झाला कीं तो शेळ्यामेंढ्या पाळूं लागतो, शेण गोळा करतो, महिना चार आणे मिळवतो. केवळ सक्तीचें शिक्षण करून भागणार नाहीं. आईबापांना तो अन्याय वाटेल. जपानसारख्या

लेनिन

उद्योगप्रधान देशांतही १० टक्के मुलांची सक्ति बंद केली आहे. कारण आईबाप इतके गरीब कीं मुलांच्याही श्रमांची त्यांना जरूर लागते. जपानसारख्या देशाची ही स्थिति, मग हिंदुस्थानचें कसें होईल ही सक्ति कराल तर?

म्हणून हिंदुस्थानांतील शिक्षण उद्योगद्वारा देऊं या असें महात्माजी म्हणत. आणि ही पद्धति मानसशास्त्रदृष्ट्याही निर्दोष आहे. कांहीं तरी निर्माण करावें असें मुलांना वाटत असतें. हातांचा, डोळ्यांचा नीट उपयोग करावा असें त्यांना वाटत असतें. बऱ्यें शिक्षण म्हणजे मुलांचीं मनें मारणें होय. उद्योगाच्या साधनांतून शिक्षण देऊं तर बुद्धि मारली जाणार नाहीं. कल्पनाशक्ति वाढेल. संशोधन वृत्ति वाढीस लागेल आणि मुलें ज्या वस्तु निर्माण करतील त्यांतून शाळेचा खर्च भागवावा. मुलालाही घरीं आठ आणे महिना देतां आले तर चांगलें. आईबाप म्हणतील, "जाऊं दे शाळेंत, बाळ आठ आणे मिळवून आणतो."

लेनिननें आपल्या एका पुस्तकांत अशाच शिक्षणाचा पुरस्कार केला आहे. तो लिहितो, "ठराविक वयाचीं मुलें झालीं कीं त्यांना उत्पादक श्रमाचें शिक्षण दिलें पाहिजे. सामाजिक उत्पादन वाढावें म्हणून नव्हे, तर पूर्ण विकास व्हावा म्हणून."

महात्माजींनींसुद्धा सांगितलें, "उद्योगद्वारा शिक्षण देण्यानें कांहीं अर्थनिष्पत्ति होईल; परंतु केवळ त्यासाठीं म्हणून ही शिक्षणपद्धति नाहीं, तर मुलांच्या विकासासही बालमानसशास्त्राच्या दृष्टीनें हीच पद्धति योग्य होय."

तात्यासाहेब केळकर

वर्धाशिक्षणपद्धति ही महात्माजींची थोर देणगी होय. आफ्रिकेंत असल्यापासून ह्या गोष्टीचे प्रयोग व विचार ते करीत होते, त्यांतून ही पद्धति जन्माला आली.

राजकोट

काँग्रेसचे मंत्री निरनिराळ्या गोष्टी करीत होते. महात्माजी मार्गदर्शन करीत होते. परंतु महात्माजींसमोर पुन्हा एक गंभीर समस्या आली. काँग्रेसचा थोडाबहुत कारभार ब्रिटिश हिंदुस्थानांत सुरू झाला. त्यामुळें संस्थानी प्रजेला स्फूर्ति आली. जिकडेतिकडे संस्थानांतून चळवळ सुरू झाली. हैदराबाद संस्थानांतही स्टेट काँग्रेसनें आपला लढा सुरू केला. परंतु हिंदुमहासभेनेंही त्यांत पिलूं घुसडलें. त्यामुळें काँग्रेसनें आपला लढा थांबविला. महात्माजी तेथील कार्यकर्त्यांस म्हणाले, "खादी, साक्षरता, स्वच्छता, इत्यादि सेवासाधनें घेऊन जनतेंत जा. जनतेची शक्ति जागृत झाल्याशिवाय सारें व्यर्थ आहे." श्री. तात्यासाहेब केळकर हिंदुमहासभेच्या सत्याग्रहाविषयीं म्हणाले, "आम्ही बाहेरून तेथें जातों. गिरफदार होतों. तेथील जनतेला स्पर्शही नाहीं." अशा चळवळीनें फळ कसें मिळणार?

लहान लहान संस्थानांचे लढे सुरू करावेत. ज्या संस्थानांत सत्याग्रही आहेत, जेथें प्रचार आहे, तेथेंच सुरू करावेत. काँग्रेसनें स्वतः जाऊन नये करूं. परंतु ज्यांचा त्या संस्थानांशीं संबंध आहे, अशा काँग्रेसकर्त्यांनीं तेथें जावें. लढावें. ह्या धोरणानुसार महात्माजींनीं श्री. जमानालालजींस जयपूर स्टेटमध्यें सत्याग्रहासाठीं पाठविलें. इकडे काठेवाडांत राजकोट येथें लढा सुरू झाला, लढा चांगलाच रंगला. स्वतः कस्तुरबाही तेथें गेल्या.

बॅ. जिना

महात्माजींचा, कस्तुरबांचा राजकोटशीं जुना ऋणानुबंध. संस्थानिकानें सुधारणा देतों म्हटलें. परंतु पुन्हा वचन मोडलें. महात्माजींना वचनभंग म्हणजे मोठें पाप वाटलें. ते स्वत: राजकोटला गेले आणि उपवास सुरू झाला. करार मंजूर झाला, परंतु त्याची अंमलबजावणी कशी करायची ? हिंदुस्थानचे सारे प्रश्न त्या लहान संस्थानामध्यें उभे राहिले. बॅ. जिना तेथें धावले. तेथें बॅ. आंबेडकर धावले. मुसलमानांचे काय, अस्पृश्यांचे काय, असे प्रश्न उभे करण्यांत आले. महात्माजींना वाटलें, उपवासाची थोडी चूक झाली. ज्या गोष्टी अपेक्षायला नको होत्या त्या मीं अपेक्षिल्या. संस्थानिकाचा हृदयपालट एवढीच गोष्ट मीं अपेक्षिली पाहिजे होती. सरकारकडे कशाला धावलों? फेडरल कोर्टाकडे कशाला गेलों ? माझा संबंध ठाकुरसाहेबांशीं. महात्माजींनीं तो प्रश्न तसाच सोडला. त्यांना फार वाईट वाटलें. ते राजकोट सोडून दु:खानें निघून आले.

राजकोटला असतांना एकदा प्रार्थनेच्याभोवतीं गुंडांनीं खूप गोंधळ केला. महात्माजी अत्यंत अशक्त झालेले, ब्लड प्रेशर वाढलेलें. मोटरीपर्यंत जायला रस्ता मिळेना. परंतु महात्माजी निर्भयपणें निघाले.

" बापूजी, जाऊं नका. गुंड आहेत. वेडेंवाकडें करतील. " भक्त म्हणाले.

" भीति कशाची ? " ते म्हणाले.

आणि धैर्यानें स्थिर पावलें टाकीत ते निघाले. सभोवतीं गर्दी. घेरी येईल असें त्यांना वाटलें. परंतु शेवटीं मोटर त्यांनीं गांठली. ते मोटरींत बसले. परंतु पाठीमागच्या काचेवर कोणीं दगड मारले. काचा फुटून महात्माजींच्या डोक्यांतच घुसायच्या ; परंतु प्रभूनें वांचविलें.

हें सारें राजकोटप्रकरण उद्वेगजनक आहे. परंतु महात्माजी म्हणाले, " मी शुद्ध झालों. सत्याची सूक्ष्मता समजलों. "

हा घुंगट खालीं नका आणूं

एकदा सेवाग्रामला असतांना महात्माजी नित्याप्रमाणें फिरायला गेले होते. तों समोरून कांहीं मारवाडी मंडळी आली. लग्न लागलेलें एक नववधूवरांचें जोडपें होतें. आणि त्यांचे आईबाप, आप्तेष्टही बरोबर होते. वधूवरांना महात्माजींच्या पायांवर घालण्यासाठीं आणण्यांत आलें होतें. वरानें महात्माजींच्या पायांवर डोकें ठेवलें आणि वधूनेंही ठेवलें. तिच्या तोंडावर तो लांब घुंगट होता. महात्माजींना करुणा आली. त्यांनीं त्या मुलीच्या मुखावरचा घुंगट दूर केला व सासूसासऱ्यांस ते म्हणाले, " मीं हा घुंगट दूर केला आहे. पुन्हा तो लादूं नका."

ती मंडळी प्रणाम करून गेली. त्या नववधूला केवढी धन्यता मिळाली असेल ! केवढें स्वातंत्र्य महात्माजींनीं तिला दिलें !

ती गोष्ट

आणि बार्डोलीकडची एक गोष्ट आहे. कोणी बडी मंडळी महात्माजींच्या दर्शनार्थ आली होती. आणि एका स्त्रीनें थाळींत रुपये भरून महात्माजींसमोर ठेवले. महात्माजींची मुद्रा खिन्न व उद्विग्न दिसली. ते म्हणाले, "माझ्यासमोर अशी उघडी तूं कशाला आलीस ?" सारे चकित झाले. ती भगिनी तर झकपक विलायती वस्त्र परिधान करून आली होती. महात्माजींच्या शब्दांचा त्यांना अर्थही समजेना. शेवटीं महात्माजी म्हणाले, " परदेशी वस्त्रानें स्वतःची अब्रू झाकतां येते का ? परदेशांतून वस्त्र न आलें तर उघडें बसायची पाळी यायची ! स्वदेशी वस्त्रानेंच अब्रू सांभाळली जाते. "

महात्माजींचें तीव्र दुःख त्या उद्गारांत होतें.

महात्माजींचें सारें जीवन हेतुमय असे. दोन्ही हातांनीं ते लिहूं शकत. एका हातानें नाहीं लिहितां आलें तर दुसरा तयार असावा. तसेंच ते आगगाडी धावत असतांही लिहीत. ते मांडीवर कागद घेऊन लिहीत. टेबल वगैरेंची जरूर नाहीं. ते नेहमीं ताठ बसत.

पोषाखांतील क्रान्ति

आणि त्यांच्या पोषाखाचा इतिहास नाहींच सांगितला. दक्षिण आफ्रिकेंत प्रथम ते कॉलर, नेकटाय, वगैरे साहेबी पोषाख करीत. परंतु पुढें जीवन साधें झालें. ते सत्याग्रही झाले. एक सदरा वापरीत व पायजमा घालीत. कधीं मद्रासी लोकांप्रमाणें लुंगीही गुंडाळीत. हातांत दंड असे.

परंतु हिंदुस्थानांत १९१४ च्या अखेरीस परत आले ते काठेवाडी पोषाखांत. ते अंगरखा घालीत. धोतर असे. अंगावर उपरणें. डोक्याला काठेवाडी फेटा. एकदा आगगाडींतून ते जात होते. जवळच्या माणसास तुम्ही खादी कां वापरीत नाहीं वगैरे ते विचारीत होते. त्या माणसानें म्हटलें, " तुमच्या इतके कपडे मी खादीचे वापरायला जाईन तर माझें दिवाळेंच निघेल."

महात्माजी विचार करूं लागले. एवढा फेटा कशाला? ह्या एका फेट्याच्या दहा टोप्या होतील. आणि हा लांब अंगरखा आणि हें उपरणें, हें पायघोळ धोतर, हें सारें कशाला? गुंड्यांचा एक सदरा व लहान धोतर ते वापरूं लागले. गांधी टोपीचा जन्म झाला. स्वातंत्र्याची ती निशाणी बनली. त्यागानें पवित्र झाली.

इतर टोप्या घामानें घामट होतात! त्यांचा वास घेतला तर वांतीच होईल. परंतु ही स्वच्छ पांढरी टोपी! धुतां येते. जरा मळली तर ती दिसते. रंगीत टोप्याही मळतात. परंतु त्यांचा मळ दिसत नाहीं. पांढऱ्या टोपीचें मळणें पटकन् समजतें. मळखाऊ रंगीत कापड काय कामाचें? स्वच्छ गांधी टोपी — शुभ्र अशी तीच चांगली.

परंतु पुढें गांधीजींची टोपीही गेली व सदराही गेला. ओरिसा प्रांतांत गांधीजींनीं बदलायला दुसरें वस्त्र नाहीं म्हणून ज्यांना स्नान करतां येत नाहीं अशा मायभगिनी पाहिल्या. बिहारमध्यें चंपारण्यांतही असें दारिद्र्य-दर्शन झालें. महात्माजी म्हणाले, " मलाही एका वस्त्रानें राहूं दे. " आणि ते कमरेभोवतीं फक्त एक पंचा गुंडाळूं लागले. ते उघडे असत. क्वचित् खादीचें उपरणें अंगावर घेत. शीतोष्ण जणूं त्यांनीं जिंकलें होतें.

गरिबांच्या जीवनाशीं समरस झालेलें असें हें जीवन होतें.

तावडतोब उत्तर

महात्माजींना कोणींही पत्र लिहिलें तर ते लगेच उत्तर पाठवीत. होतांहोईतों ते कार्डच लिहीत आणि अगदीं कामापुरता मजकूर. पाल्हाळ करायला त्यांना वेळ कोठें असे? कामाचा व्याप असल्यामुळें शब्दांची काटकसर करायला ते शिकले. थोडक्यांत सांगायला शिकले. कोणीं फारसा मजकूर नसतांना, उगीचच्या उगीच पाकीट लिहिलें, तर ते उत्तरांत लिहीत, पाकीट कशाला पाठवलेंत? कार्डानें भागलें असतें.

३२ सालीं ते येरवडा जेलमध्यें होते. तेथें ते निरनिराळे कागदाचे कपटे सांठवून ठेवीत आणि त्यांवर आश्रमांतील मंडळींस, मुलांमुलींस पत्रें लिहीत. राष्ट्राची संपत्ति इवलीही वायां जाऊं नये असा त्यांचा कटाक्ष असे.

गांधीजी महान् प्रयोगी होते. एकदा सेवाग्रामला त्यांच्या मनांत आलें कीं कागदाचें पांघरूण करावें. मध्यें कागद व दोहों बाजूंनीं कपडा. कारण कागद हा उष्णताग्राही नाहीं. शरीरांतील उष्णता बाहेर जाऊं न देणें हा पांघरुणाचा अर्थ.

झोपलेलीं पानें

गांधीजींची प्रेममय वृत्ति मीं अनेकदा सांगितलीच. परंतु एक प्रसंग आठवतो. गांधीजी पुष्कळ वेळां स्वतःच पिंजून पेळू करीत. एकदा ते

मुमुक्षु मीराबेन

कापूस पिंजीत होते. जरा रात्र झाली होती. कापूस पिंजण्याच्या तांतेला सारखा चिकटत होता. गांधीजी मीराबेनला म्हणाले, "थोडा निंबाचा पाला आण जा." मीराबेन गेल्या व मोठी डहाळी तोडून घेऊन आल्या. महात्माजी म्हणाले, "चार पानें आणायचीं, एवढी डहाळी कशाला? आणि हीं पानें बघ. जरा निजल्यासारखीं दिसताहेत नाहीं?" कसा सहृदय भाव!

मीराबेन ह्या मुमुक्षु आहेत. त्या हिंदुस्थानी सुंदर बोलतात. त्या निर्भय आहेत. महात्माजींनीं त्यांना सरहद्द प्रांतांत खादीप्रचारार्थ पाठविलें होतें. मीराबेन म्हणजे मूर्तिमंत सेवा व श्रद्धा. सेवाग्रामच्या आजूबाजूस त्या सफाई करीत. हातांत औषधें घेऊन शेतकऱ्यांत जात. आणि आपण काय करीत आहोंत?

कर्तव्याची स्मृति

महात्माजी थोर. कर्तव्याला ते कधीं विसरले नाहींत. दीनबंधु अँड्रयूज वारले तेव्हां गुरुदेव रवींद्रनाथांनीं दीनबंधूंचें स्मारक उभारण्याचें योजिलें. परंतु ती योजना पुरी होण्यापूर्वींच रवीन्द्रनाथही अवतार संपवितें झाले. रवींद्रनाथांचें स्मारक उभारण्यापूर्वी जें स्मारक त्यांनीं हातांत घेतलें होतें, तें पुरें करणें सर्वांचें कर्तव्य होतें. परंतु महात्माजीच त्यासाठीं उभे राहिले. ते मुंबईत आले आणि एका दिवसांत काय पांच सात लाख रक्कम हवी होती ती त्यांनीं गोळा केली. चले जाव चळवळ सुरू करण्यापूर्वीं उरलींसुरलीं कर्तव्यें महापुरुष पुरीं करून ठेवीत होता. कारण पुढचें कोणास माहीत?

भाई जयप्रकाश

१९३० मध्यें पेशावर प्रांतांत गढवाल पलटणींतील लोकांनीं गोळीबार करण्याचें नाकारलें.सरकारनें त्यांना दहा-दहा,वीस-वीस वर्षांच्या सजा दिल्या. त्या वीरांचें महात्माजींस सदैव स्मरण असे. सेवाग्रामांत त्यांच्या आश्रमांत त्या सैनिकांचीं कांहीं मुलें होतीं.

आणि १९१९ मध्यें जालियनवाला बागेंत जें हत्याकांड झालें, तें तरी महात्माजी कसे विसरतील? एप्रिल ६ ते १३ आपण राष्ट्रीय सप्ताह म्हणून पाळतों. १३ एप्रिल, १९२१ रोजीं सर्व राष्ट्रानें उपवास करावा असें महात्माजींनीं सांगितलें होतें. त्या वेळेस लाखोंनीं उपवास केला. महात्माजी प्रतिवर्षी १३ एप्रिलचा दिवस आला कीं उपवास करीत.

मौन व उपवास

आठवड्यांतून एक दिवस गांधीजी मौन पाळीत. तो दिवस म्हणजे सोमवार. ह्या दिवशीं ते शिल्लक पडलेलें काम उरकून टाकीत. वर्तमानपत्रांचा मजकूर ह्या दिवशींच ते लिहीत. मनही प्रभुमय व एकाग्र असे. फारच आणीबाणीची वेळ असली तर मौनवार असूनही महात्माजी बोलले आहेत. परंतु अपवादच तो. महात्माजींचें मौन २४ तासांचें असे. आज संध्याकाळपासून उद्यां संध्याकाळपर्यंत.

भाई जयप्रकाश

मतभेद असले तरी महात्माजी अति गुणग्राही होते. भाई जयप्रकाश ह्यांच्याविषयीं महात्माजींना फार प्रेम वाटे. देवळी तुरुंगांत असतांना १९४१ मध्यें जयप्रकाश भेटायला आलेल्या पत्नीजवळ गुप्तपणें एक पत्र

देणार होते, परंतु तें पकडलें गेलें. सरकारनें तें प्रसिद्ध केलें. तें प्रसिद्ध करतांना सरकारनें त्याला टीकाही जोडली. जयप्रकाश सत्य व अहिंसा ह्यांचे कितपत पुजारी आहेत तें महात्माजींनीं पाहावें वगैरे सरकारनें प्रवचन लिहिलें. महात्माजी काय म्हणाले? ते म्हणाले, "देशभक्ति खून करूनही दाखवितां येते असें सारे पाश्चात्य इतिहास सांगतात. देशासाठीं सारें माफ असेंच सारे समजत आले आहेत. आमच्या राज्यकर्त्यांचा इतिहास हेंच सांगतो. तेव्हां जयप्रकाशांना नांवें ठेवण्याचा त्यांना मुळींच अधिकार पोचत नाहीं. जयप्रकाशांनीं देशासाठीं फकिरी घेतली आहे; परंतु मी त्यांना एवढेंच सांगतों कीं आपलीं साधनें शुद्ध असतील तरच साध्य हातांत पडेल. सत्य व अहिंसा निरुपयोगी नाहींत. ह्या अतिप्रभावी वस्तु आहेत."

वर्ध्यास वर्किंग कमिटीनें चले जावचा जो ठराव केला आणि मुंबईच्या ऑ. इं. कॉं. कमिटींत जो मांडला गेला, त्यांत सारी सत्ता शेवटीं शेतकरी व कामकरी ह्यांच्या हातीं द्यायची असें आहे. परंतु शेतकऱ्यांच्या हातीं द्यायची म्हणजे काय? वर्किंग कमिटींत ह्याचा खल झाला होता. उद्यां सारी जमीन पुन्हा वांटून द्यावी लागेल असें महात्माजी व जवाहरलाल ह्या दोघांचेंही मत होतें.

वल्लभभाईंची भक्ति

वेळ बराच झाला. आतां काय सांगूं? हो. वल्लभभाईंची महात्माजीं-वर नितान्त भक्ति. महात्मजींनीं सरकारला सांगितलें होतें कीं वल्लभभाई आजारी आहेत, त्यांना माझ्याजवळ ठेवा; परंतु सरकारनें ऐकलें नाहीं. वल्लभभाई प्रेमानें महात्माजींस म्हणायचे, "तुमच्या पाठीमागें जिवंत राहाणें नको. आपण बरोबर मरूं." जगांत अशी भक्तिश्रद्धा दुर्मिळ.

सेवेची पराकाष्ठा

आणि तुम्हांला परचुरेशास्त्री माहीत आहेत का? सातारा जिल्ह्यांतील एक कळकळीचे कार्यकर्ते. वेदविद्या-अधीत असे त्यागी ब्राह्मण. सातारा

जिल्ह्यांत ते सर्वत्र हिंडले होते व त्या यात्रेचें त्यांनीं पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. परंतु त्यांना महारोग जडला. ते अनेकदा तुरुंगांतही होते. शेवटीं ते सेवाग्रामला असत. महात्माजी त्यांचें अंगही प्रेमानें चेपीत! अशा ह्या निरपेक्ष प्रेमळ सेवेची कल्पना करा.

एकदा गांधीजींस कोणीं विचारलें, "कम्युनिस्ट, समाजवादी. सारे तुमच्याकडे येतात. प्रेमानें बोलतात. तुमचे त्यांचे मतभेद असले तरी तुमचें त्यांचें प्रेमही असतें हें कसें?"

महात्माजी म्हणाले, "मी त्यांना हिडीसफिडीस करीत नाहीं. त्यांना माझ्या मताला मी आणीन अशी मला श्रद्धा असते."

ते दोन फोटो

महात्माजींचे शेकडो फोटो तुम्हीं पाहिले असतील. परंतु फोटोसाठीं बसणें त्यांना फारसें आवडत नाहीं. गुजरात विद्यापीठाच्या गच्चीवर एकदा ते बसले होते. इतक्यांत कोणीं कॅमेरा लावला. गांधीजींनीं पटकन् तोंडावर उपरणें घेतलें. घुंगट घेतल्यासारखा तो फोटो तेथें ठेवलेला आहे.

आणि एकदा महात्माजी सायकलवर बसले होते. गुजरात विद्यापीठांत ते बराच वेळ बोलत बसले. परंतु कोठें तरी सभेला जायचें होतें. उशीर होणार कीं काय? ते निघाले. इतक्यांत एकाची सायकल त्यांना दिसली. त्यांना सभेची आठवण द्यायला आलेल्या विद्यार्थ्याची ती होती.

त्यांनीं ती सायकल घेतली. आणि बसले वर नि गेले! सायकलवर बसलेल्या गांधींचा फोटो तुम्हीं पाहिला आहे का? वरचे दोन्ही फोटो गुजराथ विद्यापीठाची जी ग्रंथशाला आहे तींत आहेत असें म्हणतात.

गाय

गायीवर गांधीजींचें फार प्रेम. गाय म्हणजे करुणेचें काव्य असें सुंदर वर्णन त्यांनीं केलें होतें. आणि गायीप्रमाणेंच गरीब विधवा नारी! त्यांना

महात्माजी त्यागमूर्ति असें संबोधीत. महात्माजींना विधवा, विशेषतः बालविधवा ह्यांचा पुनर्विवाह मान्य होता. अर्थात् जी व्रती राहील ती परमोच्च आदर्शाची मूर्ति होय!

भित्रेपणा म्हणजे सर्वांत मोठी हिंसा

महात्माजी अहिंसेची मूर्ति होते. परंतु अहिंसा पेलत नसेल तर हिंसेनें जा असेंही ते सांगत. त्यांना भित्रेपणा सहन होत नसे. विशेषतः स्त्रियांच्या अब्रुरक्षणाच्या वेळेस हिंसा, अहिंसा कोणत्या तरी मार्गानें उभें राहावें असें ते सांगत. मोपला बंडाच्या वेळेस त्यांनीं हेंच सांगितलें, " तुझ्या पत्नीवर हात टाकायला कोणी येत असेल तर तुझ्या मुडद्यावरून त्याला येऊं दे. परंतु हें धैर्य तुला नसेल तर त्याच्याजवळ हिंसात्मक लढाई कर, परंतु पळून जाऊं नको."

एकदा आंध्र प्रांतांत हिंदु-मुसलमानांचा दंगा झाला. हिंदु भीतीनें बाहेर येत ना. गांधीजींनीं लिहिलें, " अहिंसा नसेल पेलत तर हिंसेचा आश्रय करा, परंतु भीतीनें घरांत बसूं नका; कारण भिणें म्हणजे मोठी हिंसा. भिणें म्हणजे आत्म्याची हिंसा होय."

स्त्रियांचें शीलरक्षण

मुंबईस युद्धकाळांत आरंभीं आरंभीं ऑस्ट्रेलियन सैनिकांनीं जरा स्वैरलीला सुरू केल्या होत्या. स्त्रियांना संकट वाटूं लागलें. कोणी वर्तमानपत्रकार ब्र काढीना. हिंदुमहासभेचीं पत्रेंही आळीमिळी करून बसलीं होतीं. परंतु शेवटीं सेवाग्रामचा महात्माच सात्त्विक संतापानें लिहिता झाला,

" मुंबईंत स्त्रियांचें शीलरक्षण होऊं नये याचा अर्थ काय? गव्हर्नर वगैरे सारे कोठें आहेत? आणि मुंबईचे मेयर काय करीत आहेत? आणि

जनता का निर्माण झाली? हिंसा वा अहिंसा. स्त्रियांच्या अब्रूचें रक्षण झालेंच पाहिजे."

निर्भयता देणारा असा हा धीरोदात्त महात्मा होता.

गुरुदेवांशीं मतभेद

आणि रवीन्द्रनाथांजवळ १९२० सालच्या सुमारास महात्माजींचा वाद झालेला नाहीं सांगितला. विलायती कापडाच्या होळया करणें गुरुदेवांस पसंत नव्हतें. "अशानें परकीयांविषयीं द्वेष माजेल" असें त्यांना वाटे. महात्माजी म्हणत, "प्लेगच्या जंतूंची होळीच केली पाहिजे."

रवीन्द्रनाथ आपल्या काव्यमय वाणीनें लिहिते झाले, "हिंदुस्थानची नवप्रभात येणार आहे. अशा वेळेस चंडोलाप्रमाणें उंच वातावरणांत आपण गेलें पाहिजे."

परंतु महात्माजींनीं लिहिलें, "चंडोल उजाडत उंच उड्डाण घेतो. परंतु आदल्या दिवशीं तो पोटभर जेवलेला असतो. ज्याचें पोट उपाशी आहे तो कसा उड्डाण करणार?"

महात्माजींनीं एकदा लिहिलें, "जोंपर्यंत सर्वांना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मला देतां येत नाहीं, तोंपर्यंत मी देवाचें नांव कोणत्या तोंडानें शिकवूं?"

"स्वतःची काव्यवीणा जरा बाजूस ठेवून रवींद्रांनीं चरखा हातांत धरला तर अधिक बरें!" असेंही एकदा गांधीजींनीं लिहिलें.

"भगवान् बुद्ध माझ्यासमोर आले तर त्यांनाही चरखा चालवा असें सांगायला मी संकोचणार नाहीं" असें एका प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले.

समाजवाद

"सारा समाजवाद वाईट असें नाहीं. त्यांतही पुष्कळ चांगलें आहे." असें ते एकदा लिहिते झाले.

...वाचनालय सातारा.
बाल विभाग

आणि महादेवभाईंनीं तर हरिजनमध्यें लिहिलें होतें कीं "तुम्ही समाजवादी कार्यक्रम आखा, तो जनतेसमोर मांडा. जनतेनें बहुमतानें तुम्हांस निवडून दिल्यावर त्या कार्यक्रमाप्रमाणें तुम्ही कायदे करूं लागलांत, तर त्यांत वावगें कांहीं नाहीं."

लोकशाही समाजवाद, ग्रामोद्योगास प्राधान्य देणारा समाजवाद, त्यांना हवा आहे. परंतु ग्रामोद्योगांत सामुदायिक उत्पादनच नाहीं, तेव्हां तेथें समाजवादच नाहीं असें कोणी म्हणतील; परंतु समाजवाद म्हणजे सर्वांना पोटभर मिळणें हा अर्थ असेल तर ग्रामोद्योगांतही समाजवाद दिसेल; कारण अर्थसंचयन एका हातीं न होतां आपोआपच धन विभागलें जाईल.

परंतु असा ग्रामोद्योगी समाजवाद केव्हां येईल? लोक म्हणतात, हें यंत्रयुग आहे. परंतु युग जो करील त्याचें असतें. जुने लोक कलियुग म्हणतात त्याचप्रमाणें हे नवे लोक 'यंत्रयुग यंत्रयुग' म्हणतात. गांधीजी नवीन युग निर्माण करूं पाहात. सुधारलेल्या ज्ञानविज्ञानमय ग्रामोद्योगाचें युग. ते श्रद्धेनें सारखे त्या त्या मार्गानें जात होते. आणि हिंदुस्थानांत कोट दोन कोटीची खादी होत आहे. अर्थात् कार्य प्रचंड आहे. हा नुसता आरंभ आहे. परंतु महापुरुष श्रद्धेनें जात असतात. काळाला कलाटणी देण्याची हिंमत त्यांच्यांत असते आणि ते आशेनें कार्य करीत असतात. मी एकदा एका खेडेगांवीं आश्रमांत राहात होतों. थोडीफार सेवा करीत होतों. स्वच्छता, साक्षरता, सूत कांतणें ह्या गोष्टी करीत होतों. एकदा अमळनेरहून गांधीजी जात होते. माझ्या मित्रांनीं ओढून मला महात्माजींच्या डब्यांत पांच मिनिटें बसवलें. मीं त्यांना म्हटलें, "मी खेड्यांत राहातों. परंतु मी काय करणार? कशी सुधारूं त्यांची स्थिति? कशा त्यांना गोष्टी पटवूं?" महात्माजी म्हणाले, "श्रद्धा हवी. आपल्या विचाराचा मनुष्य दहा वर्षांत एक मिळाला तरी

फजलुल हक्क

समाधान मानलें पाहिजे. अशा श्रद्धेनें व आशेनें काम करीत राहिलें पाहिजे."

"श्रद्धा होना" हे त्यांचे शब्द माझ्या कानांत घुमत आहेत.

परंतु ह्या खोल वादांत मी कशाला जाऊं ?

बंगाली राजबंदी

कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांच्या काळांत ज्या प्रांतांत कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें होतीं, त्या प्रांतांतील राजबंदी मुक्त झाले. परंतु बंगालमध्यें शेकडों राजबंदी होते. त्यांची बाजू कोण घेणार? महात्माजी म्हणाले, "मी बंगालला विसरलों नाहीं." महात्माजी बंगालमध्यें गेले. तेथील फजलुल हकांच्या मंत्रिमंडळाशीं त्यांनीं विचारविनिमय केला. महात्माजी तेथील तुरुंगांत जाऊन राजबंदींच्या भेटी घेत. चर्चा करीत. अहिंसेवर विश्वास नसेल तर सांगा. हिंसेचा मार्ग ह्या देशाला नाहीं. तुम्ही विचार करा. तरच तुमची मुक्तता होणें शक्य. गांधीजी तासन् तास ह्या राजबंदींजवळ बोलत, बुद्धिवाद करीत. त्यांची प्रकृति त्या वेळेस बरी नव्हती. सारखें ब्लड प्रेशर वाढे. तुरुंगांतून डोकें दोन्ही हातांत धरून बाहेर येत. देशासाठीं असे कोणीं घेतले आहेत का कष्ट ? महाराष्ट्रांतील कोणी म्हणत असतात कीं स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या बाबतींत गांधीजींनीं कांहीं केलें नाहीं. परंतु महात्माजींनीं एकदा उत्तर दिलें होतें कीं "माझ्यापरी त्यांच्यासाठीं माझ्या पद्धतीनें मीं कसे व किती प्रयत्न केले तें त्यांना माहीत आहे." तरीही आम्ही कंड्या उठवीतच असतों आणि विश्ववंद्य महात्म्याला, उच्चारूं नयेत अशीं विशेषणें लावीत असतों. गड्यांनो, तुम्ही ह्या पापापासून दूर राहा. स्वतःचें महत्‌भाग्य समजा कीं महात्माजी ह्या भरतभूमींत वावरत असतांना तुम्ही जन्मास आलेत.

भाई अच्युतराव पटवर्धन त्या वेळची महात्माजींची स्थिति एकदा नगरला मला सांगत होते. ते म्हणाले, " गुरुजी, काय सांगूं ? वर्किंग कमिटीला महात्माजी आले. परंतु त्यांना घेरी येईल असें वाटे. तरीही ते पुन्हा राजबंदींसाठीं जातच होते. तें दृश्य पाहून डोळे भरून येत. आणि वाटे, महात्माजी आहेत तोंवर त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागावें. अशा सेवामय यज्ञपुरुषाला कसा विरोध करावा, काय त्या विरोधांत तेज ? " अशा अर्थाचे त्यांचे शब्द होते असें वाटतें.

भाई अच्युतराव पटवर्धन

आणि वर्किंग कमिटीची बैठक चालून बराच वेळ झाला असावा. महात्माजी हसून म्हणायचे, " आतां जरा सुट्टी घ्या. चहा वगैरे नको का ? " ते स्वत: चहा घेत नाहींत. परंतु दुसऱ्याविषयींची कशी सहृदयता.

प्रेममय मूर्ति

कलकत्त्याचीच ती एक गोष्ट आहे. बांबूची बांसरी त्यांनीं पाहिली. कोणी बांसऱ्या विकणारा वाजवीत जात होता. बांबूच्या ग्रामोद्योगी बांसऱ्या. कृष्णपरमात्म्याची बांसरी. आणि गांधीजींनीं एक बांसरी खरेदी केली म्हणतात. कोणासाठीं ? आश्रमांतील एका मुलासाठीं ! देशाचा संसार चालवणाऱ्या गांधीजींना सेवाग्रामांतील एका लहान मुलाचीही आठवण होती.

सेवाग्राममधील एका मुलानें खाऊ समजून कोयनेलच्या त्या गोड गोळ्या खूप खाल्ल्या, गिळल्या आणि आजारी झाला. वर्ध्याच्या

हॉस्पिटलमध्यें पाठवून त्याची व्यवस्था लावीपर्यंत महात्माजींस चैन पडलें नाहीं.

पू. विनोबाजी प्रकृतीकडे लक्ष देत ना. शेवटीं महात्माजी म्हणाले, "तुला आतां माझ्या ताब्यांत घेतों." महात्माजी सर्वांचे मायबाप होते. शुश्रूषा त्यांनींच करावी. राजेन्द्रबाबूंना दम्याचा फार त्रास होतो. पुष्कळ वेळां महात्माजी त्यांना सेवाग्राममध्यें ठेवून घेत. त्यांची शुश्रूषा करीत.

एकदा वर्ध्याजवळ खादीधारींची यात्रा भरली होती. तें संमेलन होतें. शेतकरी आले होते. सकाळीं त्यांना कांजी देण्यांत आली. महात्माजी हिंडत आले. ते म्हणाले, "हें काय ? ह्यांना कांजी देऊन कसें होणार ? चांगली कडक भाजलेली रोटी द्यायला पाहिजे होती."

बंगालमधील शेकडों राजबंदी महात्माजींनीं मुक्त केले. आणि ते परत सेवाग्रामला आले. १९३७ मध्यें गुजरायेंत कॉंग्रेस झाली. १९३८ मध्यें त्रिपुरीस झाली. देशगौरव सुभाषचंद्र बोस ह्यांचे व महात्माजींचे मतभेद झाले. सुभाषबाबू सेवाग्रामला आले. दोन दिवस राहिले. खूप बोलणें झालें.

"महात्माजी, आज मला कळलें." असें सुभाष म्हणाले. परंतु वर्किंग कमिटीशीं सुभाषचंद्रांचें जमेना. फार खेदजनक परिस्थिति होती. कलकत्त्यास ऑ. इं. कॉं. कमिटी भरली आणि राष्ट्राध्यक्ष सुभाषचंद्र ह्यांनीं शेवटीं राजीनामा दिला. त्या वेळेस सर्वांत वाईट जवाहरलाल ह्यांस वाटलें. जवाहरलाल म्हणतात कोणाजवळ म्हणाले, "त्या वेळेस पृथ्वीनें दुभंग होऊन मला पोटांत घ्यावें असें वाटलें."

नरीमनप्रकरण, खरेप्रकरण, सुभाषबाबूप्रकरण ह्याचा राग पुष्कळजण महात्माजींवर करतात. परंतु महात्माजी निर्दोष आहेत. कॉंग्रेसचा कारभार लोकशाहीतत्त्वानुसारच चालतो. तुम्ही पुढें अधिक वाचा व त्या बाबतींत मतें बनवा.

खरें म्हणजे सुभाषबाबू, जवाहरलाल, वगैरेंच्या विचारांत फरक होते. कॉंग्रेस ज्या एका धोरणानें चालत आली होती, तिच्याशीं सुभाषबाबूंचें जमेल असें नव्हतें. जवाहरलाल सुभाषबाबूंना म्हणत, " तुमचे विचार मांडा. राष्ट्रीय परिस्थिती-संबंधींचें तुमचें धोरण मांडा. मोघम मतभेद नकोत. स्पष्ट विचारसरणी हवी. "

अबदुल गफारखान : सरहद्द गांधी

वर्किंग कमिटींत काय काय चर्चा झाल्या असतील त्या कोणास माहीत ? आणि तें सारें कळल्याशिवाय आपण काय बोलणार ?

परंतु सुभाषबाबूंना आपण शतशः प्रणामच करूं. कसेही असोत, कोठेंही असोत ! भारतमाता त्यांच्या हृदयांत आहे. त्यांचें सारें जीवन एका ध्येयासाठींच आहे. देशाचाच एक संसार त्यांना माहीत, अन्य संसार त्यांनीं केला नाहीं. ज्या वेळेस विमानांतून कोसळून मरण पावल्याची त्यांची वार्ता आली तेव्हां महात्माजी व राष्ट्राध्यक्ष अबुल कलामआझाद ह्यांनीं सुभाषबाबूंच्या आईस सांत्वनपर संदेश पाठवला होता.

सरहद्दीला भेट

सरहद्द प्रांतांत अबदुल गफारखान ह्यांनीं १९३० सालीं महान् चळवळ केली. सरहद्दीवरच्या पठाणांना त्यांनीं नवदीक्षा दिली. आपसांतल्या वंशपरंपरा चालविण्यांत येणाऱ्या हेव्यादाव्यांनीं व खुनाखुनींनीं सारा सरहद्द प्रांत रक्तरंजित होत होता. आपल्याच रक्तामांसांच्या पठाण बंधूचा गळा कापायला कोणी मागें पुढें पाहात नसे. आणि ब्रिटिश सरकारनें त्या पठाणांना ना कधीं ज्ञान दिलें, ना उद्योग. अबदुल गफारखानांना ह्या परिस्थितीमुळें अति दुःख होई. आपसांतल्या हेव्यादाव्यांत एवढें शौर्य

दाखविणारे हे पठाण इंग्रजांच्या पुढें मात्र थरथर कांपत. लहान लहान इंग्रज मुलांना पाहून भीत. अबदुल गफारखानांनीं ही स्थिति पालटून टाकायचें ठरविलें. पठाण खऱ्या अर्थानें शूर बनला पाहिजे. जो निर्भय बनतो तोच शूर बनतो, ही गोष्ट त्यांच्या मनानें घेतली. त्यांना हें दिसून आलें कीं अहिंसेशिवाय अभय अशक्य. त्यांनीं अहिंसक अशी संघटना करावयास आरंभ केला. खुदाई खिदमतगार—ईश्वराचे सेवक ह्या नांवानें त्यांनीं संघटना सुरू केली. आणि १९३० सालीं ह्या खिदमतगारांनीं अलौकिक शौर्य दाखविलें. इंग्रज अधिकारी म्हणाले, "We fear a non-violent Pathan than a violent Pathan – आम्ही हिंसक पठाणापेक्षां अहिंसक पठाणाला अधिक भितों." बादशहाखान म्हणून अबदुल गफारखानांना सारे ओळखत. सरहद्दीच्या द्वेषानें भरलेल्या विषारी वातावरणांत त्यांनीं प्रेमाचें नवजीवन आणलें. सरहद्द प्रांतांत १९३० सालीं जेवढें अहिंसक शौर्य प्रत्ययास आलें तेवढें भारतांत केव्हांही दुसरीकडे कोठें प्रत्ययास आलें नाहीं. बादशहाखान गांधीजींच्याकडे १९३४ आणि १९३६ सालीं वर्ध्याला राहिले होते. १९३५ नंतरच्या निवडणुकींत सरहद्द प्रांतांत कॉंग्रेसचें बहुमत झालें. सरकारनें सर्व प्रकारें विरोध केला. जातीयवाद्यांना प्रचाराची मुभा ठेवली, परंतु जवाहरलालजींना प्रचारार्थ यायला बंदी केली. पण तरीही कॉंग्रेसची तेथें जीत झाली. लौकरच कॉंग्रेस अधिकारारूढ झाली. बादशहाखानांनीं गांधीजींना सरहद्द प्रांतास भेट देण्याचें आमंत्रण दिलें आणि गांधीजी आपल्या अहिंसेचा प्रचार करण्यासाठीं १९३८ मध्यें सरहद्द प्रांतांत दौऱ्यावर गेले. गांधीजींना खात्री होती कीं जर सरहद्द प्रांतानें अहिंसेचा स्वीकार केला तर अहिंसेच्या दृष्टीनें ती एक फार मोठी घटना ठरणार आहे.

खुदाई खिदमतगारांत

हिंदुस्थानच्या महत्त्वाच्या प्रश्नांत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सरहद्दीपलीकडच्या टोळ्यांचा. ब्रिटिश सरकारनें त्यांच्यापैकीं कांहीं गुंडांना

पैसे चारून आपल्या काबूंत आणलें होतें व कांहींवर गोळ्यांचा वर्षाव करून जरब बसविली होती. परंतु एवढ्यानें हा प्रश्न कायमचा मिटत नव्हता. गांधीजी खुदाई खिदमतगारांपुढच्या पहिल्याच भाषणांत म्हणाले, "जर तुमची अहिंसा ही खरी हृदयाची अहिंसा असेल, केवळ तोंडदेखली अहिंसा नसेल तर तुम्हांला सरहद्दीपलीकडच्या टोळीवाल्यांशींही मैत्री करतां आली पाहिजे. तुमच्या अहिंसेची ती खरी कसोटी आहे. स्वतंत्र हिंदुस्थानच्या सरहद्दीवरचे प्रश्न जर तुम्ही मिटवूं शकलां तर जगापुढें तें एक उदाहरण होईल."

कठीण परीक्षा

ब्रिटिशांशीं प्रतिकार करतांना खुदाई खिदमतगारांनीं शंभर टक्के अहिंसा पाळली होती. गांधीजी त्यांच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यापुढें म्हणाले, "अमानुष प्रकारचा त्रास तुम्हांला देण्यांत आला तरी तुम्हीं त्याला आनंदानें तोंड दिलें पाहिजे. ईश्वराच्या नांवानें वाटेल तो त्याग करावयाला तुमची अखंड तयारी असली पाहिजे. तुमच्या जिभेवर अखेरच्या क्षणीं ईश्वराचें नांव असलें पाहिजे आणि मनांत द्वेषाचा अल्पसाही अंश नसला पाहिजे. त्याला मी पराकोटीचें शौर्य म्हणतों. जर आपल्या देशांतले लोक असें शौर्य दाखवूं शकले तर जगाला तो एक पदार्थ-पाठ होईल." पण गांधीजी कठोर परीक्षा घेणारे होते. त्यांना वाटे, कदाचित् बादशहाखानांच्यावरील प्रेमामुळें ह्या लोकांनीं अहिंसेचा स्वीकार केला असेल. उतमंझाई येथें खुदाई खिदमतगारांच्या अधिकाऱ्यांसमोर गांधीजींनीं भाषण केलें. म्हणाले, "समजा, होणार नाहीं तें झालें. बादशहाखानांनीं अहिंसेचा आधार सोडला तर तुम्ही काय कराल?" पण ते शूर खुदाई खिदमतगार परीक्षेंत उतरले. त्यांनीं गांधीजींना सांगितलें, "बादशहाखान अहिंसा सोडणार नाहींतच. पण त्यांनीं सोडली तरी आम्ही सोडणार नाहीं." सरहद्द प्रांताच्या आणि पठाणांच्या अस्तित्वाच्या दृष्टीनें

अहिंसेचा आश्रय करणें जरूर आहे. गांधीजी सरहद्द प्रांतांत प्रत्येक वेळीं सांगत, " तुमची अहिंसा ही शूराची, वीराची असली पाहिजे. हातांतली तलवार टाकून देण्यानें हृदयांत अधिक सामर्थ्य प्रतीत झालें पाहिजे. पण जर तसें सामर्थ्य वाढल्याचें प्रतीत होत नसेल तर अहिंसेचा स्वीकार करण्यापेक्षां तलवार हातीं घेणें अधिक श्रेयस्कर. कारण शस्त्रधारी शूर योद्धा हा भित्र्या शस्त्रत्यागी माणसापेक्षां मी अधिक पसंत करतों. "

ईश्वरी सेवकाची व्याख्या

अहिंसेचें वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून गांधीजींनीं पठाण बंधूंच्यापुढें विवेचन केलें. अहिंसेची कसोटी सांगतांना ते म्हणाले, " खुदाई खिदमतगार म्हणजे ईश्वराचा सेवक, म्हणजेच मानवतेचा सेवक. ज्याला ईश्वराचा सेवक व्हायचें त्यानें वाणी, विचार, करणी हीं पवित्र ठेवलीं पाहिजेत. त्यानें अखंड प्रामाणिक परिश्रम केले पाहिजेत. कारण मनाचें पावित्र्य आणि निष्क्रियता ह्या दोन विसंगत गोष्टी आहेत. ह्यासाठीं खुदाई खिदमतगारांनीं एकादी हस्तकला आत्मसात केली पाहिजे. अशा प्रकारची हस्तकला रेचाई, पिंजाई, कताई ही आहे, कारण घरोघर हा हस्तोद्योग करतां येईल व लाखों लोकांना हा उद्योग सहज पुरवितां येईल. ज्यानें ईश्वराचे सेवक बनण्यासाठीं शस्त्राचा त्याग केला त्याचे हात रिकामे असतां कामा नयेत. एक क्षणभरही त्यानें निरुद्योगी असतां कामा नये. आळशी माणसाचें मन म्हणजे सैतानाच्या तांडवाची जागा अशी म्हणच आपल्याकडे आहे. आळसानें आत्मा कलंकित होतो, बुद्धीला गंज चढतो. ज्यानें हिंसेचा त्याग केला तो प्रत्यहीं ईश्वराचें नांव घेऊन, समाजहितार्थ उद्योग करीत राहील. ईश्वर आपल्या सेवकाला रोटी देतो पण त्यासाठीं त्यानें कष्ट केले पाहिजेत. जो श्रम करीत नाहीं त्याला खायचा अधिकार नाहीं. हा जो निसर्गाचा नियम तोच तुमचा असला पाहिजे. " पुढें गांधीजींनीं त्यांना सांगितलें, " तुम्ही हिंदुस्तानी शिका. त्यामुळें

तुमचें मन सुसंस्कृत बनेल; उदार, व्यापक बनेल. जास्त व्यापक प्रदेशाशीं तुमचा संबंध येईल. त्याचबरोबर तुम्ही स्वच्छतेचें शास्त्रही शिकून आपलेंसें करा. प्रथमोपचाराचें शिक्षण घ्या. त्याचबरोबर सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्वधर्मसमभाव बाणवण्याचा प्रयत्न करा. खुदाई खिदमतगार व्हायचें म्हणजे केवळ गणवेष घालून, शिस्तीनें वागून भागणार नाहीं. खुदाई खिदमतगाराला आंतून ईश्वरी सामर्थ्य प्रतीत झालें पाहिजे."

तुम्ही येथें आमच्यांत राहा

आणि दौऱ्यांत एकदा बादशहाखानांच्या खेड्याजवळ खेडुतांनीं गांधीजींची मोटर अडविली. गांधीजींना मोटरींतून बाहेर यायला त्यांनीं भाग पाडलें. गांधीजींना त्यांनीं द्राक्षें, ऊंस, फळें आणि भाजी प्रेमानें नजर केली. बादशहाखानांचे चुलते समोर येऊन म्हणाले, "गांधीजी, तुम्हीं आमच्या प्रांतांतच येऊन कायम राहावें आणि हा प्रांत तुमचा करावा अशी फार इच्छा आम्हांला आहे. आणि आम्हांला तसा आतां हक्कही आहे. आमच्या बादशहाखानांना कैदी म्हणून कां होईना, सहा वर्षें तिकडे ठेवलें होतें. आतां आमच्या प्रेमाचे कैदी बनून निदान सहा महिने तरी तुम्हीं इथें राहिलें पाहिजे." गांधीजी हें ऐकून अगदीं मनापासून सर्वांच्या बरोबर हसले आणि गांवांतलीं छोटीं छोटीं मुलेंही आलीं होतीं. ऐटीनें तीं एकेक पुढें आलीं. गांधीजींचे दोन्ही हात हातांत घेऊन "लीडा मारो मलंग बाबा" म्हणजे "तुम्हांला कधींही थकवा न येवो" असें म्हणून गेलीं. आणि डेरा येथें गांधीजी गेले. डेराच्या खानानें गांधीजींचें स्वागत केलें. म्हणाला, "गांधीजी, तुम्ही फार हुशार आहांत. तुम्ही तर हिटलरच्याही वर ताण केलीत. मी तुमचें अभिनंदन करतों." गांधीजींनीं क्रूर समजल्या जाणाऱ्या पठाणांना प्रेमानें जिंकून घेतल्यानें सरहद्द प्रांतांत सर्वत्र असा आनंद दिसून येत होता.

खरा थोर कोण?

गांधीजी अबोटाबादला गेले. तेथल्या जनतेनें त्यांचें भक्तिभावानें स्वागत केलें. त्यांनीं गांधीजींना दिलेल्या मानपत्रांत "जगांतील सर्वांत थोर पुरुष आज आमच्यांत आल्यानें आम्हांला फार आनंद झाला" असें लिहिलें होतें. गांधीजी उत्तराच्या भाषणांत म्हणाले, "जेव्हां तुमच्या मानपत्रांतले ते शब्द मीं ऐकले तेव्हां मी विचार करूं लागलों कीं हा जगांतला सर्वांत थोर पुरुष इथें कोण असावा? आणि तो सर्वांत थोर पुरुष मी तर नक्कीच नाहीं. कारण मला माझे दोष चांगले ठाऊक आहेत असें मला आढळलें. पण मला ती जुनी ग्रीक गोष्ट आठवली. सॉलोन हा अथेन्सचा नाणावलेला न्यायाधीश होता. तेथेंच कोर्सस हा एक धनाढ्य गृहस्थ राहात असे. एक दिवस तो सॉलोनकडे गेला आणि त्यानें विचारलें, 'ह्या जगांत सर्वांत सुखी मनुष्य कोण आहे?' त्याची अपेक्षा अशी होती कीं सॉलोननें कोर्ससचें नांव घ्यावें! पण सॉलोन म्हणाला, 'मनुष्याचें आयुष्य संपल्यावांचून तो सुखी कीं दुःखी कसें ठरवितां येणार?' जर सॉलोनला माणसाच्या सुखाबद्दलही सांगणें कठीण वाटलें तर माणसाच्या थोरपणाबद्दल सांगणें किती कठीण असणार! खरा थोरपणा कांहीं एकाद्या पर्वतावर विराजमान झालेला नसतो कीं लोकांनीं येऊन त्याचें दर्शन घ्यावें. ह्या उलट माझा सत्तर वर्षांचा अनुभव सांगतो आहे कीं खरे थोर असे असतात कीं जगाला ते ठाऊकच नसतात, त्यांची थोरवी माहीत नसते. देवच खरा थोर पुरुष कोण ह्याचा निवाडा करूं शकेल; कारण त्याला मानवाचीं मनें ठाऊक असतात. आपल्या नेत्यांची अशी स्तुति करणें बरें नसतें. ईश्वरानें दिलेल्या वेळाची स्तुति ऐकण्यांत उधळपट्टी करणें मला आवडत नाहीं. ह्या उलट अशा मानपत्रांतून नेत्याचे दोष दाखवावे म्हणजे त्यांना हृदयसंशोधनाला मदत होते." गांधीजींनीं ह्या आपल्या दौऱ्यांत तक्षशीलेच्या प्राचीन विद्यानगरीच्या अवशेषांनाही भेट दिली.

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

दोन गांधी

सरहद्दीवर सत्य-प्रेमाचा संदेश ऐकविण्याचें कार्य सरहद्द गांधींच्या बरोबरच फिरून गांधीजींनीं केलें. सरहद्द गांधी अबदुल गफारखानांनीं १९२० पासून आपलें आयुष्य ईश्वरसेवेला अर्पण केलें आहे. राष्ट्रीय शाळांपासून त्यांनीं आपल्या कार्याचा आरंभ केला. नंतर व्यापक समाज-शिक्षण करून द्वेषावर अधिष्ठित असलेलीं पठाणांचीं जीवनें प्रेमानें भरून टाकावींत म्हणून त्यांनीं आपली खुदाई खिदमतगार संघटना सुरू केली. सरहद्दीवरचा हा फकीर आज 'फक्रे अफगान' म्हणजे पठाणांचा अभिमान बनून गेला आहे. सरहद्दीच्या जनतेला त्यांनीं नवजीवन दिलें. आपल्या प्रेमानें त्यांनीं पठाणांचीं जीवनें सुधारलीं एवढेंच नव्हे, तर गांधीजींनाही आपल्याकडे आकर्षून घेतलें. भगवान् बुद्धाचें जीवनकार्य सर्व जगाला दाखविण्यासाठीं तक्षशीलेला प्राचीन काळचें विद्यापीठ होतें. त्यानंतर कित्येक शतकांनीं गांधीजींनीं पुन्हा तोच प्रेमाचा संदेश १९३८ मध्यें पठाणांना दिला. अबदुल गफारखान गांधीजींच्या जीवनतत्त्वज्ञानाशीं इतके समरस झाले आहेत कीं त्यांना लोक सरहद्द गांधी म्हणूनच ओळखतात. हा ह्या दोन गांधींचा दौरा अपूर्व होता. गांधीजी सरहद्द प्रांतांतून आपला दौरा आटोपून परत निघाले, तेव्हां बादशहाखानांचे डोळे भरून आले. त्यांनीं गांधीजींना पुन्हा सरहद्द प्रांतांत येण्याचें आमंत्रण दिलें. गांधीजी १९३९ सालीं पुन्हा तिकडे गेले; परंतु ह्या वेळीं त्यांची प्रकृति चांगली राहूं शकली नाहीं. ते दौरा स्थगित करून परतले. तिकडे युरोपांत महायुद्धाचे ढग जमत होते. सारें जग भयभीत झालें होतें. देशांतले पुढारी विचारमग्न होते.

ऐतिहासिक पत्रक

व्यक्ति येतात, जातात. लहान वा मोठ्या. परंतु संस्था आपलें कार्य घेऊन पुढें जात असतात. कॉंग्रेस पुढें जात होती, स्वातंत्र्याकडे जात

होती. आंतरराष्ट्रीय परिस्थितीकडे काँग्रेसचें लक्ष होतें. आणि एके दिवशीं महायुद्धाची भीषण वार्ता आली. ३ सेप्टेंबर, १९३९ रोजीं इंग्लंडनें जर्मनीशीं युद्ध जाहीर केलें, आणि लगेच चार तारखेस हिंदुस्थानही युद्धांत सामील आहे, असें व्हाइसरॉयसाहेबांनीं जाहीर केलें. एका शब्दानें कोणास विचारलें नाहीं. काय आमच्या प्रतिनिधींची किंमत ?

काँग्रेसला सात्त्विक संताप आला. आणि युद्धासंबंधींचें तें अति उत्कृष्ट असें पत्रक ठरावरूपानें काँग्रेसनें जाहीर केलें. महात्माजी म्हणाले, "जवाहरलाल कलावान् आहेत. सुंदर शब्दरचना कशी करावी हें ते सुंदर रीतीनें जाणतात."

एक हिंदुमहासभावादी गृहस्थ मला म्हणाले, "काँग्रेसचा तो ठराव प्रत्येक घरांत फ्रेम करून लावण्यासारखा आहे."

काँग्रेसच्या मंत्र्यांनीं राजीनामे दिले, कारण वटहुकुमाचें राज्य सुरू होणार होतें. मंत्र्यांची काय शोभा ? आणि आपण पाहिलेंच, फजलुल हक्क वगैरेंची काय दशा झाली ती ! सरकारच्या तंत्रानें वागाल तरच आज मंत्री म्हणून वागतां येईल. सरकारी धोरणाच्या जरा विरुद्ध जाल तर तुम्हांला गचांडी मिळेल. बंगालमध्यें हेंच दिसलें. इतरत्रही हाच अनुभव येईल. अशी विटंबना करून घेण्यापेक्षां स्वाभिमानपूर्वक काँग्रेसमंत्री बाहेर आले.

परंतु पुढें काय ?

राष्ट्रीय सरकार

काँग्रेसनें सरकारला सांगितलें, "तुम्ही राष्ट्रीय सरकार द्या, म्हणजे आम्ही तुमच्या खांद्याशीं खांदा लावून लढूं." जवाहरलाल म्हणाले, "चीनसाठीं मी तडफडत आहें. माझा हात कापून द्यावा असें वाटतें." मौलाना अबुल कलाम आझाद म्हणाले, "मी हातांत बंदूक घेऊन शत्रूशीं लढेन."

आणि काँग्रेसची अहिंसा ?

ब्रिटिशांशीं आम्ही अहिंसेनें लढूं. परंतु परकी आक्रमकांशीं शस्त्रानें लढूं. असा काँग्रेसनें विवेक केला. १९४० मध्यें पुण्यास ऑ. इं. काँ. कमिटी भरली. महात्माजी आले नाहींत. ते म्हणाले, " शत्रु आला तर मी व माझ्या मताचे अहिंसक त्या शत्रूला प्रतिकार करूं. हिंसामय प्रतिकारांत मी भाग घेऊं शकणार नाहीं." पुण्याच्या सभेंत राजाजींचा राष्ट्रीय सरकारच्या मागणीचा ठराव मंजूर झाला. सरदार वल्लभभाई म्हणाले, " महात्माजी संत आहेत. ते सारखे पुढें जात आहेत. त्यांच्याबरोबर सारें राष्ट्र आलें तर मला का नको आहे ? परंतु आपण आपली मर्यादा ओळखतों. उद्यां स्वराज्यांतही आपणांस फौजफांटा ठेवावाच लागणार. परकी आक्रमण आलें तर लढावें लागणार. महात्माजींची शिकवण म्हणून स्वतंत्र हिंदुस्थान जगांत अहिंसा व्हावी म्हणून झटेल ; परंतु तोंपर्यंत काय ? " परकी शत्रूशीं आम्ही शस्त्र घेऊन लढूं असें काँग्रेसनें जाहीर केलें. पण सरकारनें राष्ट्रीय सरकार दिलें तरच.

प्रतीकात्मक सत्याग्रह

परंतु सरकार विशेष कांहीं करायला तयार दिसेना. अर्थात् पुन्हा महात्माजी मार्गदर्शनार्थ आले. ते म्हणाले, "सरकार अडचणींत असतां आपण सामुदायिक राष्ट्रव्यापक सत्याग्रह करूं नये. परंतु काँग्रेसचें अस्तित्व तर टिकवलेंच पाहिजे. सरकारनें आम्हांला प्रचारस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य द्यावें ; आमचे विचार मांडायला परवानगी द्यावी. सरकारनें स्वत:चा प्रचार करावा. आम्हांला आमचा करूं दे. जनता योग्य तें करील. " परंतु सरकार युद्धविरोधी प्रचारस्वातंत्र्य थोडेंच देणार ?

महात्माजींनीं प्रतीकात्मक, एक खूण म्हणून, वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. आम्हांला स्वातंत्र्य देत नसाल तर आमचा ह्या युद्धाला विरोध आहे ; हें जगाला कळलेंच पाहिजे. महात्माजी स्वत: सत्याग्रहींच्या याद्या

समाजवादी स्टॅफर्ड क्रिप्स

मंजूर करीत होते. ह्या वेळेस ते स्वतः बाहेर राहिले. बाकी सारे तुरुंगांत गेले.

क्रिप्स

वर्षभर, अधिकच, सत्याग्रह सुरू होता. परंतु जागतिक परिस्थिति झपाट्यानें बदलत होती. जपाननें युद्ध पुकारलें आणि विद्युद्वेगानें विजय मिळवीत तो हिंदुस्थानच्या दाराशीं आला. तिकडे जर्मनीनें करार मोडून रशियावर एकदम प्रहार केला. आणि मुसंडी मारीत तो कॉकेशसपर्यंत येऊन ठेपला; हिंदुस्थानचें काय होणार !

ब्रिटिश सरकारला वाटलें कीं संकट दारांत आहे. कदाचित् कॉंग्रेस तडजोड करील. सारे सत्याग्रही मुक्त करण्यांत आले आणि रशियांत यशस्वी वकिली करून आलेले समाजवादी स्टॅफर्ड क्रिप्स हिंदुस्थानांत वाटाघाटीसाठीं येण्यास निघाले. देशांत आशेचें वातावरण होतें. कम्युनिस्ट "लोकयुद्धाच्या" घोषणा करीत होते.

क्रिप्स आले. वाटाघाटी सुरू झाल्या. त्यांनीं आणलेली योजना जाहीर झाली. युद्ध जिंकल्यावर काय करूं तें त्या योजनेंत होतें. परंतु आज कांहीं देणार होते का ? युद्धकाळांत व्हाइसरॉयच सर्वाधिकारी !

महात्माजी क्रिप्सला भेटायला जाणार नव्हते. परंतु ते शेवटीं गेले आणि क्रिप्ससाहेबांशीं त्यांचें काय बोलणें झालें ?

"तुमच्यासारख्यानें तरी ही योजना घेऊन यायला नको होतें. काय आहे त्या योजनेंत ?" असें महात्माजी स्पष्ट म्हणाले आणि मग दोघे आहारशास्त्राच्या गप्पा करते झाले.

पंडित जवाहरलाल व मौलाना अबुल कलाम आझाद ह्यांनीं तडजोड व्हावी म्हणून पराकाष्ठा केली. जवाहरलाल म्हणाले, "आयुष्यांत इतक्या कडू गोळ्या मीं क्वचितच कधीं गिळल्या असतील. परंतु मीं किती माघार घेतली, तडजोड व्हावी म्हणून. परंतु यश आलें नाहीं."

आणि क्रिप्स काँग्रेसवर दुगाण्या झाडीत गेले.

चले जाव

वाटाघाटी फिसकटल्या ह्याला कारण हें परकी सरकारच. त्यांचें फोडा व झोडा धोरण. मुस्लिम लीगचा प्रचंड धोंडा आड उभा करण्यांत आला. महात्माजींना वाटलें, ही परकी सत्ता आहे तोंवर कधींही ऐक्य होणें शक्य नाहीं. म्हणून "चले जाव" ही घोषणा त्यांनीं केली आणि हरिजनमधून तेजस्वी लेख येऊं लागले. त्यांनीं लिहिलें कीं, "हें जगणें म्हणजे मरणें आहे. अशा जगण्याला काडी लावून देणें बरें. माझ्या जीवनाला मी आधीं काडी लावूं इच्छितों."

महात्माजींच्या हृदयाची तगमग कोणास कळणार? श्री. प्यारेलाल १९३२–३३ मध्यें नाशिक जेलमध्यें माझ्याजवळ एकदा म्हणाले, 'महात्माजी म्हणजे होमकुंड आहेत. हिंदी स्वातंत्र्यासाठीं त्यांचें हृदय सारखें जळत आहे."

जवाहरलाल महात्माजींकडे विचारविनिमयार्थ गेले. त्या वेळचें महात्माजींचें त्यांनीं वर्णन केलें आहे, "महात्माजींच्या बोलण्यांत भावनांचा सिंधु होता. त्यांच्या डोळ्यांत मूर्तिमंत उत्कटता, कळकळ व देशभक्ति दिसत होती."

ते करुण डोळे

ॲमिल नांवाच्या एका तत्त्वज्ञानें एके ठिकाणीं लिहिलें आहे, "संतांच्या, महात्म्यांच्या डोळ्यांत एक प्रकारची खिन्न करुणा असते. कां बरें?

तत्त्वज्ञ ॲमिल

ज्यांच्यावर आपण प्रेम करतों त्यांनींच जर गैरसमज करून घेतला तर त्यासारखें दुःख नाहीं. ती करुणा ह्या दुःखांतून जन्मलेली असते."

महात्माजींचे डोळे कधीं कधीं असेच दिसत. ह्या देशावरच नव्हे, तर सर्व मानवजातीवर प्रेम करणारा त्यांच्यासारखा कोण होता? परंतु ज्यांच्या ज्यांच्या हित-मंगलार्थ ते झगडले, ते ते त्यांचे विरोधी बनले. हरिजनांसाठीं त्यांच्याइतकें कार्य कोणीं केलें? परंतु डॉ. आंबेडकर महात्माजींवर जास्तींत जास्त जळफळत. हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठीं महात्माजींहून अधिक भुकेलेला कोण आहे? परंतु गांधी म्हणजे आपला मुख्य शत्रु असें मुसलमानांस सांगण्यांत येत असतें. महात्म्यांचें हेंच दुर्दैव असतें.

साऱ्या जगांतून महात्माजींवर टीकांचा भडिमार झाला. इंग्लंडमधील वेल्स, बर्ट्रांड रसेल ह्यांसारखे उदार तत्त्वज्ञातेही हिंदी स्वातंत्र्याच्या विरुद्ध गेले. ४० कोटि लोकांचें स्वातंत्र्य म्हणजे का क्षुद्र वस्तु?

एच्. जी. वेल्स

माझी झोप गेली

महात्माजी म्हणाले, "माझी झोप उडाली. मला कांहीं सुचत नाहीं. युद्ध आहे तोंपर्यंत चळवळ नको असें मी म्हणत होतों. परंतु ह्या देशाचें उद्यां काय होणार? दोहोंकडे शत्रु. येथें आपलें सरकार झाल्याशिवाय सारें फोल आहे. आणि जगभर हिंसा

बर्ट्रांड रसेल

चालली असतां मी का स्वस्थ बसूं ? माझ्या अहिंसेंत कांहीं शक्ति असेल तर ती ह्याच वेळेस कसोटीला लागूं दे."

चँग कै शेक व मॅडम चँग कै शेक

चीन्ला हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकार व्हावें असें फार वाटत होतें. हिंदुस्थानची व ब्रि. सरकारची तडजोड झाली तर तो चीनला मोठा आधार होता. स्वतः चँग कै शेक व त्यांची पत्नी उभयतां हिंदुस्थानांत आलीं. इतर पुढाऱ्यांच्या भेटीगांठी त्यांनीं घेतल्या; परंतु मुख्य भेट महात्माजींची होती. त्या भेटींत काय काय बोलणीं झालीं प्रभूला माहीत.

चरख्याचे नवे नमुने त्यांनीं नेले. महात्माजींनीं खादीचीं वस्त्रें त्या थोर पाहुण्यांस दिलीं. मॅडम चँग कै शेक खादीचें पातळ नेसल्या. त्यांना खादी फार आवडली.

पुढें महात्माजींनीं चँग कै शेकला एक पत्र लिहिलें. तें उदात्त पत्र हिंदुस्थानच्या इतिहासांत अमर राहील. त्यांत महात्माजींनीं ग्वाही दिली होती कीं, "चीनच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन हिंदुस्थानला स्वातंत्र्य नको आहे. चीनच्या स्वातंत्र्यासाठींच हिंदुस्थान स्वतंत्र झाला पाहिजे. परतंत्र हिंदुस्थान चीनसाठीं कितीसें करणार ?" तें पत्र पुण्याच्या लोकशक्तींत समग्र प्रसिद्ध झालें होतें.

चँग कै शेक

मॅडम चँग कै शेक

ठराव पास

वर्ध्याला वर्किंग कमिटी जमली. महात्माजींनीं जवाहरलाल वगैरेंच्या साऱ्या शंका दूर केल्याच होत्या. मित्र ह्या नात्यानें दोस्तांचें सैन्य येथें राहिलें तरी चालेल, असें महात्माजींनीं स्पष्टीकरण केलें होतें. वर्किंग कमिटीनें तो अमर ठराव तयार केला. आतां मुंबईस त्यावर ऑ. इं. कॉं. कमिटींत शिक्कामोर्तब करायचें उरलें. १ ऑगस्ट लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीचा पवित्र दिवस. परंतु महात्माजींच्या कितीही मनांत असलें तरी ती तारीख कांहीं जमली नाहीं. ऑगस्टच्या ७ तारखेला मुंबईला ती ऐतिहासिक अशी ऑ. इं. कॉं. कमिटीची बैठक भरली. जणूं छोटी कॉंग्रेसच. आणि चले जाव ठराव पास झाला. त्या उत्साहाचें मी कसें वर्णन करूं? मी त्या वेळेस धुळें जेलमध्यें होतों. तुम्हीं स्वतः तें भव्य दृश्य पाहिलें असेल. आणि ८ तारखेचें तें शेवटचें महात्माजींचें भाषण! त्यांना कल्पना नव्हती. ते सव्वादोन तास बोलले. राष्ट्राचा पिता अमृत पाजीत होता. धन्य ते, ज्यांनीं ती वाणी ऐकली. त्या भाषणांतील कांहीं कांहीं उद्गार हृदयाला घरें पाडतात.

" मुसलमानांचा मी मित्र आहें. मीं कधींही त्यांचें अहित चिंतिलें नाहीं. परंतु ते विषारी टीका करतात. त्यांचे शब्द बंदुकीच्या गोळयांप्रमाणें हृदयांत घुसतात. परंतु एक दिवस कायदे आझम जिनांना कळेल कीं मी त्यांचा मित्र आहें. प्रभु त्यांना भरपूर आयुष्य देवो. "

आणि "उद्यांपासून तुम्ही स्वतंत्र आहांत" असें त्यांनीं हात हलवून म्हटलें. आणि श्रोते सांगतात कीं एक विद्युल्लतेची लहर सर्वांच्या अंगांतून गेली असें वाटलें.

महात्माजी व्हाइसरॉयांना भेटणार होते. लढा होतां होईतों होऊं नये अशी त्यांची इच्छा होती. परंतु झालाच तर स्वातंत्र्यासाठीं जगा किंवा मरा असा संदेश त्यांनीं देऊन ठेवला.

९ ऑगस्ट

देवाच्या मनांत निराळेंच होतें.

९ ऑगस्टला पहाटे महात्माजी व वर्किंग कमिटीचे सर्व सभासद पकडले गेले. इतरही शेकडों धरपकडी झाल्या. हिंदुस्थानभर पकडापकड झाली. महात्माजींना कोठें नेलें? वर्किंग कमिटीच्या सभासदांस कोठें नेलें? अफवा पसरली कीं आफ्रिकेंत नेणार. परंतु महात्माजींस पुण्यास आगाखान पॅलेसमध्यें ठेवलें. कस्तुरबाही मागून आल्या. महादेवभाई, प्यारेलाल, सरोजिनिदेवी ह्यांसही तेथें ठेवलें. पुढें पुष्कळ दिवसांनीं कळलें कीं वर्किंग कमिटी नगरच्या किल्ल्यांत आहे म्हणून.

कारावासांत

गांधीजींना मुंबईहून अटक करून एकदम आगाखान महालांत नेलें. तेथें सर्व तयारी अगोदरच करून ठेवली होती. पोलिसांचे पहारे बसविले होते. राष्ट्रपित्याचें ठावठिकाण कोणाला कळूं नये, त्यांचें दर्शन होऊं नये म्हणून कडेकोट बंदोबस्त करून ठेवला होता. गांधीजी ठराव झाल्यावर व्हाइसरॉयला भेटणार होते. अटक करण्यांत येईल अशी त्यांना कल्पनाही नव्हती. ते जेलमधल्या सहकाऱ्यांजवळ नेहमीं म्हणत, "सरकारनें मला अटक करण्यांत फार मोठी चूक केली आहे." ८ ऑगस्टला त्यांनीं तें ऐतिहासिक भाषण केलें होतें! त्यांनीं कांहीं ठरविलें नव्हतें. मनांत म्हणत होते, प्रभूची

इच्छा असेल तसें होईल. सव्वादोन तास ते बोलले. म्हणाले, " तो मला बोलवीत होता. मला तर वाटलें, इथेंच आपली अवतारसमाप्ति आतां होते. " अनपेक्षित अटक झाल्यामुळें त्यांच्या मनांत फार खळबळ माजली होती. सारखें चिंतन चालू असे. महादेवभाई, कस्तुरबा, सरोजिनी, सुशीला नायर, मीराबेन ही मंडळी जवळ होती. महादेवभाईंना गांधीजी उपास करतील अशी सारखी काळजी वाटावयाची. गांधीजींनीं उपास करूं नये असें त्यांना सारखें वाटावयाचें.

महादेवभाई गेले!

आणि १५ ऑगस्टचा दिवस उजाडला. सकाळची प्रार्थना झाली. महादेवभाईंनीं गांधीजींच्यासाठीं नास्ता बनविला. जेलमध्यें गांधीजींच्या जेवणाची व्यवस्था तेच करीत. गांधीजींचे कपडेही धूत, मालीश करीत. त्या दिवशीं एकाएकीं बोलतां बोलतां त्यांना चक्कर आली. पलंगावर ते पडले. सुशीला नायरनीं त्यांना पाहिलें. गांधीजींना हाका मारण्यांत आल्या. गांधीजी आले. महादेवभाई बेशुद्ध झाले होते. त्यांना मनावरचा ताण सहन झाला नाहीं. त्यांचे डोळे मिटलेले होते. गांधीजी म्हणाले, " एकदा जर डोळे उघडून तो माझ्याकडे पाहील तर खात्रीनें वांचेल. " परंतु महादेवभाईंनीं डोळे उघडले नाहींत. त्यांची प्राणज्योत मालवली. गांधीजींचा आणि महादेवभाईंचा २५ वर्षांचा संबंध. महादेवभाई म्हणजे जणूं गांधीजींचे बहिश्चर प्राण झाले होते. कस्तुरबा एकवेळ त्यांच्यापासून दूर झाल्या असतील, पण महादेवभाई कधीं दूर गेले नाहींत. गांधीजींच्यामध्यें त्यांनीं स्वत:ला अर्पण केलें होतें. स्वतंत्र अस्तित्व त्यांनीं ठेवलें नव्हतें. गांधीजींजवळ १९१७ मध्यें ते आले. प्रथम ते मुंबईला ओरिएंटल ट्रान्सलेटरच्या ऑफिसांत होते. नंतर वकील होऊन ते अहमदाबादला गेले. पुढें गांधीजी आफ्रिकेंतून परतल्यावर त्यांच्याकडे ते गेले. त्यांचें अक्षर मोत्यासारखें सुंदर, त्यांचा स्वभाव दिलदार, गांधीजींच्या

विषयीं त्याची श्रद्धा अपार. महापुरुषाच्या कामांत आपण साहाय्यभूत होऊं शकतों म्हणून त्यांना धन्यता वाटायची. आणि महादेवभाईंचीं किती स्मरणें गांधीजींना आलीं ! २५ वर्षांचा काळ त्यांच्यापुढें उभा राहिला. महादेवभाईंना त्यांनीं पहिलें पत्र लिहिलें. त्यांत लिहिलें, " मी अशा एका तरुणाच्या शोधांत होतों कीं ज्याच्यावर मी आपलीं सारीं कामें सोपवूं शकेन आणि कामांतून थोडी विश्रांति घेऊं शकेन. असा मनुष्य तुमच्यांत मला आढळला. तुम्ही माझ्याकडे या. मला मदत करा. " आणि महादेवभाईही इतर कोणत्याही गोष्टींचा विचार न करतां गांधीजींच्याकडे आले ते कायमचे. गांधीजींची त्यांना फार फिकीर असायची. एकदा त्यांची प्रकृति बिघडली. गांधीजींच्या बरोबर सारखे श्रम करून त्यांना थकवा आला होता. गांधीजींनीं त्यांना विश्रांतीसाठीं दूर पाठविलें. परंतु थोड्याच दिवसांत ते परत आले. गांधीजींना एवढा कामाचा बोजा सहन कसा होईल ह्याची त्यांना तेथें चिंता वाटे, म्हणून परत आले.

गिरसप्पा धबधबा

आणि एकदा गांधीजी दक्षिणेंत दौऱ्यावर होते. महादेवभाईही बरोबर होतेच. गिरसप्पा तेथून जवळच होता. गांधीजी आपलें काम सोडून येणार नाहींत हें तर नक्कीच होतें. पण निदान महादेवभाईंना तरी पाठवावें अशी लोकांची इच्छा होती. गांधीजींची परवानगी विचारायला काका कालेलकरच, मला वाटतें, गेले होते. त्यांनीं सांगितलें, " गिरसप्प्याचा धबधबा साऱ्या जगांत प्रसिद्ध आहे. दुरून दुरून लोक हा धबधबा पाहायला येतात. " गांधीजींनीं विचारलें, " विशेष त्यांत काय आहे ? "

" खूप उंचावरून तिथें पाणी पडतें.

" मग त्यांत विशेष काय ? आकाशांतून जलधारा किती उंचावरून पडतात. त्यापेक्षां का गिरसप्प्याच्या धारा उंचावरून पडतात ? "

"तुम्ही नका येऊं हवे तर. पण महादेवभाईंना तरी पाठवा."

"अरे त्याचा गिरसप्पा मीच आहें."

आणि महादेवभाई गेले नाहींत गिरसप्पा पाहायला.

गांधीजींशीं संबंध

गांधीजींचें महादेवभाई आईसारखें करीत. गांधीजींना जपत. त्यांनीं भंग्यापासून तों सेक्रेटरीपर्यंत गांधीजींचीं सारीं कामें केलीं. गांधीजींना छोटें मोठें कोणतेंही काम जर मनापासून उत्साहानें न केलें तर आवडत नसे. महादेवभाई गांधीजींच्या ह्या परीक्षेंत फार चांगल्या प्रकारें पास झाले होते. गांधीजींचीं सारीं कामें ते उत्साहानें, एकाग्रतेनें, मन लावून करीत. गांधीजी नेहमीं म्हणत, "महादेवला इतकें मोठें यश मिळालें हा त्यानें सुरुवातीच्या छोट्याछोट्या कामांतून मिळविलेल्या शिक्षणाचा परिणाम आहे." घाईंत लिहिलेल्या लहान पत्राच्या बाबतींतही कानामात्रेची चूक निघालेली गांधीजींना खपत नसे. साध्या कार्डावरही 'पुन्हा वाचलें नाहीं' असें लिहून तें पोस्टांत टाकणें गांधीजींच्या दृष्टीनें अक्षम्य गुन्हा असे. आणि गांधीजींच्या सल्ल्यासाठीं पत्रांचीं उत्तरें द्यायचें काम तसेंच ठेवणेंही गांधीजींना आवडत नसे. गांधीजींचा सल्ला ह्या बाबतींत काय मिळाला असता असा विचार करून पत्रें लिहावीं लागत. १९२१ मध्यें मोतीलालजींनीं 'इंडिपेंडंट' नांवाचें वर्तमानपत्र काढलें होतें. त्यांनीं त्याच्या संपादकीय कामाची जबाबदारी घेण्यासाठीं महादेवभाईंना पाठवा म्हणून मागणी केली. महादेवभाईंनीं लाला लजपतरायांच्या जवळचा एक मनुष्य पाठविला तर नाहीं का चालणार असें विचारलें. गांधीजी म्हणाले, "तो तर लालाजींचा उजवा हात आहे." महादेवभाई म्हणाले, "आणि मी?" गांधीजींनीं लगेच उत्तर दिलें, "मी तर तुला माझा मेंदू म्हणतों!" आणि ही गांधीजींची अपेक्षा महादेवभाईंनीं पूर्ण केली होती. गांधीजींच्या विचारांशीं ते इतके

समरस झाले होते कीं खालचीं अक्षरें जर न पाहिलीं तर गांधीजींचें लिखाण कोणतें आणि महादेवभाईंचें कोणतें हें समजणेंही कठीण पडे. आणि "न प्रमादितव्यम्"–'चूक करूं नका' हा गांधीजींचा जणूं मंत्र होता. महादेवभाई हें सर्व व्यवस्थित करीत. चंपारण्याच्या सत्याग्रहाच्या वेळीं गाडींत रात्रीं दिवे नसत. महादेवभाई जवळ मेणबत्ती व काड्यांची पेटी ठेवीत आणि रात्रीं सारे झोपले म्हणजे काम करीत. चालत्या गाडींत ते लिहीत. गांधीजींचा दौरा चालू असला तरी त्यांचें वर्तमानपत्र वेळेवर निघे. त्याला वेळेवर मजकूर पाठवावा लागे. एकदा रात्रीं गाडीचा संडास साफ करून, इतरांना प्रकाशाचा त्रास होऊं नये म्हणून ते तेथें यंग इंडियाचा मजकूर तयार करीत बसले होते. गांधीजी रात्रीं उठले आणि संडासांत चाललेलें हें काम त्यांनीं पाहिलें.

त्यांची स्मरणशक्ति

महादेवभाईंची स्मरणशक्ति अति तीव्र होती. गांधीजींना संदर्भ-ग्रंथासारखा त्यांचा उपयोग होई. महादेवभाई १९२३ ते १९४२ पर्यंत हरिजनचे संपादक होते. गांधीजी कितीही मजकूर देवोत, महादेवभाई बाकीचा अंक पूर्ण करीत. आजारी असतांनाही त्यांचें लिखाण नियमित यावयाचें. एम्. डी. हीं अक्षरें हरिजनच्या वाचकांना अतिप्रिय अशीं होतीं. त्यांच्या स्मरणशक्तीची कमाल म्हणजे एकदा हरिजनवर एक हजार ग्राहकांचे पत्ते त्यांनीं स्मरणशक्तीनें एकटाकी लिहून टाकले होते. महादेवभाई ह्या अपार कष्टांना भीत नव्हते. ते म्हणत, "मला दुसरें कांहीं नको. सेवा करतां करतां बापूंच्या मांडीवर मरण येवो. हीच एक इच्छा माझ्या मनांत आहे." महादेवभाईंची ही इच्छा पुरी झाली.

महादेवभाईंचा मृत्यु ही गांधीजींच्या जीवनांतली एक महान् घटना होती. स्वराज्याच्या बलिवेदीवरचें तें महान् बलिदान होतें. गांधीजी नेहमीं म्हणत कीं महादेव मेल्यामुळें माझी जी हानि झाली ती कधींही

कस्तुरबा

भरून निघणार नाहीं. महादेवभाईंचा अंत्यविधि आगाखान महालांतच करण्यांत आला. गांधीजींनीं आपल्या हातांनीं त्यांची समाधि बनविली. ते नित्य त्या समाधीवर फुलें वाहून येत. म्हणत, "त्याच्या समाधीच्या दर्शनानें मला शांति आणि प्रेरणा मिळते." त्यांना महादेवभाईंची प्रत्यहीं आठवण यायची. "महादेवच्या बलिदानानें हिंदुस्थानचें स्वातंत्र्य निश्चित जवळ आलें आहे." असें ते म्हणावयाचे.

आगाखान महालांत

गांधीजींना आणि कॉंग्रेसच्या इतर प्रमुख पुढाऱ्यांना सरकारनें तुरुंगांत डांबलें. जनतेवर लाठीमार, गोळीबार सुरू करून त्यांची स्वातंत्र्याकांक्षा दडपण्याची, मारण्याची खटपट सरकारनें चालविली. कॉंग्रेसविरुद्ध अपप्रचाराची इंग्लंड-अमेरिकेंत त्यांनीं जणूं आघाडीच उघडली होती. "Fraud, Force, Falsehood and Flattery ह्या साधनांनीं सरकार माझ्यावर हल्ला करीत आहे. जें मी उघड बोललों त्याबद्दल मी कट करीत आहें असा आरोप करीत आहे" असें गांधीजी म्हणत. त्यांना सरकारच्या ह्या प्रचारानें वाईट वाटे. परंतु ते सर्व सहन करीत होते. मनांतून ते अस्वस्थ असत, परंतु इतर सहकैद्यांच्या जीवनांत आनंद आणीत असत.

बांना भालीशचें काम

बा गांधीजींच्या इतक्या जवळ असत, परंतु बापू त्यांच्यासाठीं वेळ देऊं शकत नसत. एकत्र राहात असूनही कित्येक दिवसांत त्यांची गांठही कधीं कधीं पडावयाची नाहीं. बांनाही काम असे. स्वयंपाकपाणी, पाहुणे-

नगर वाचनालय सातारा
बाल विभाग

रावणे, सारें त्यांनाच बघावें लागे. परंतु मग बापूंनीं युक्ति केली. त्यांनीं त्यांच्यासाठीं एक काम शोधलें. म्हणाले, " माझ्या डोक्याला तूंच मालीश करीत जा, म्हणजे त्या वेळीं आपल्याला बोलतां येईल." दिवसभर राष्ट्राची काळजी वाहाणाऱ्या बापूंना बांचाही विसर पडला नव्हता. परंतु बा कधीं कामामुळें वेळेवर येऊं शकत नसत. मग दुसऱ्या कोणाला तरी नाइलाजानें पाठवून देत. पुष्कळ वेळां मालीश करतां करतां बापूंना झोप लागे. बांना बापू ऐकतच आहेत असें वाटे आणि त्या बिचाऱ्या सारें सांगत.

रामदास गांधी

बापूंचें वात्सल्य

आणि एक दिवस बांना उशीर झाला. बापू वाट पाहात होते. त्यांनीं विचारलें, "बा, तुला उशीर कां झाला आज? मघांपासून स्वयंपाकघरांत खडखड ऐकूं येत होती." बांनीं सांगितलें कीं रामदास, त्यांचा मुलगा, गांवाला जाणार होता, त्याला प्रवासांत आणि नंतर दोन दिवस पुरावे म्हणून कांहीं पदार्थ त्या करीत होत्या. त्यांनीं हें सांगितलें. गांधीजी म्हणाले, "तुझ्यावर कामाचा खूप ताण पडतो. तुझीं कामें पाहून मी तर थक्क होतों. असें कोठवर चालणार? रोज आपल्या येथून कोणीना कोणी गांवाला जाणार; त्यांना कुठवर तूं करून देणार?"

बा म्हणाल्या, "रामदास आपला मुलगा आहे म्हणून करीत होतें. इतरांच्यासाठीं कुठें करतां येतें?" बापू म्हणाले, "हीं इतर मुलें का आपलीं नाहींत? तीं आपलीं घरेंदारें सोडून आपल्या आश्रमांत आलीं

आहेत. आपल्याला मातापित्यांसारखें तीं मानतात. आपण राजकोटच्या घरीं असतों नि मग तूं रामदासकरतां कांहीं करून दिलें असतेंस तर हरकत नव्हती; पण इथें तर सारे आपल्याला सारखेच." परंतु गांधीजी असे कधीं रागावत असले तरी त्यांचें सर्वांवर प्रेम असे.

बांना शिकवीत

आगाखान महालांत आल्यावर गांधीजींचा वेळ मननचिंतनांत निघून जाई. पण इतरांचा वेळ जेलमध्यें जातां जात नसे. गांधीजी इतरांचा वेळ नीट जावा म्हणून दक्ष असत. अहिंसक मनुष्य एक क्षणही निष्कारण घालविणार नाहीं असें तर ते सदैव शिकवीत असत. जेलमध्यें ते इतरांसाठीं वेळ खर्च करीत. आगाखान महालांत आल्यावर त्यांनीं बांना शिकवायला आरंभ केला. बांच्यासाठीं रामायणाचा गुजराथी अनुवाद करून ते समजावून देत. रामायण बापूंना फार आवडे. कस्तुरबांना, एकेका शब्दाचा अर्थ त्यामागच्या भावासुद्धा समजून सांगायला ते दहा दहा मिनिटें खर्च करीत. दुपारीं कस्तुरबांना गीता शिकवीत. साऱ्या सृष्टीचा परिचय करून घेऊन विविधतेंतील ऐक्य अनुभवण्यासाठीं, साऱ्या जगांतला मानव एक आहे, कारण मानवाच्या मागची प्रेरणा एक आहे हें दाखवून देण्यासाठीं ते बांना नव्या दृष्टीनें भूगोलही शिकवीत. रात्रीं पुन्हा बांच्यासाठीं ते वेळ देत. रात्रीं बांना गुजराती चांगलें लिहितां यावें म्हणून ते त्यांच्याकडून कांहींतरी लिहवून घेत. प्रार्थना, गाणेंही ते शिकवीत. सरोजिनीदेवी मग म्हणायच्या, "७४ वर्षांचा म्हातारा पाहा कसा नवपरिणितासारखा वागतो आहे." बापूही सरोजिनींना 'अम्मा' म्हणून चिडवायचे.

सुशीला नायर

बापूंच्या बरोबर, महादेवभाई गेल्यावर, त्यांचे दुसरे सेक्रेटरी प्यारेलाल ह्यांना आणून ठेवलें होतें. प्यारेलालजींची बहीण सुशीला नायर.

त्या एम्. डी. आहेत. बापूंच्याजवळ त्याही होत्या. महादेवभाईच्या मृत्यूमुळें त्यांच्या मनांत नाना शंकाकुशंका येत. त्यांचें मन हळवें. मग बापू म्हणतात, "तुझें डॉक्टरीचें सर्टिफिकेट काढून घेतलें पाहिजे. डॉक्टरनें स्थितप्रज्ञ असलें पाहिजे." आणि सुशीला नायरनाही ते शिकवूं लागले. त्यांच्यासाठीं इंग्रजी कोष, नेसफील्डचें व्याकरण, संस्कृतचें भांडरकरांचें पुस्तक त्यांनीं आणलें. आपले विचार सम्यक्पणें प्रगट करावयाचे तर भाषेचा कसून अभ्यास केला पाहिजे म्हणत. त्यांनाही बापू शिकवीत. आफ्रिकेनंतर अशा प्रकारें शिकवायला त्यांना वेळच कधीं मिळत नसे.

सेक्रेटरी प्यारेलाल

मादाम क्यूरींचें चरित्र

जेलमध्यें बापूंचें वाचनही जोरांत चाले. तेथें त्यांनीं मादाम क्यूरींचें चरित्र वाचून काढलें. मादाम क्यूरींच्या कन्या ईव्ह क्यूरी ह्यांनीं तें लिहिलें आहे. गांधींजींना तें चरित्र फार आवडलें. म्हणाले, "सुशीला, तूं ह्याचा अनुवाद करून टाक हिंदीमध्यें." मादाम क्यूरींच्या संशोधनाबद्दलही त्यांना फार आदर वाटे. म्हणत, "मादाम क्यूरी खरी तपस्विनी होती. मनांत येतें कीं आतां जाऊन तिचें तें संस्मरणीय घर पाहून यावें. किती विपरीत परिस्थितींत, किती कमी सामुग्रींत तिनें संशोधन केलें. आमच्या हिंदी शास्त्रज्ञांनीं मादाम क्यूरीचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला

डॉ. सुशीला नायर

मादाम क्यूरी

पाहिजे." मादाम क्यूरींची कन्या हिंदुस्थानांत आली तेव्हां ती गांधीजींना भेटली होती.

गांधीजी जेलमध्यें उर्दूचाही अभ्यास करीत होते. उर्दूचा महाकवि म्हणून अकबर इलाहाबादी ओळखला जातो. त्यांच्या काव्यांत जणूं जादू आहे. आपल्या शिवरामपंत परांजप्यांच्या लेखनाप्रमाणें अकबराचें काव्य आहे. गांधींना त्याचें काव्य फार आवडे.

सरकारशीं पत्रव्यवहार

गांधीजींना आगाखान महालांत बंद करण्यांत आलें. गांधीजी व्हाइसरॉयशीं पत्रव्यवहार करणार होते, जरूर तर भेटणार होते; परंतु सरकारनें तशी संधि दिली नाहीं. गांधीजींच्याविषयीं अपप्रचार मात्र सरकारनें सुरू केला. गांधीजींनीं १४ ऑगस्ट, १९४२ ला सरकारला पहिलें पत्र पाठविलें. त्यांत सरकारनें पुढाऱ्यांना पकडण्यांत चूक केली आहे हें पटविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. पण लिनलिथगोनीं ताठरपणा स्वीकारला होता. ब्रिटिश सत्तेला कशासाठीं 'चले जाव' म्हणून सांगितलें हें लक्षांत न घेतां 'चले जाव' ठराव परत घ्यावा म्हणून सरकार अडून बसलें होतें. गांधीजींनीं एका पत्रांत लिहिलें, "चलेजावचा ठराव मला प्राणांहून प्यार आहे. तो ठराव परत घ्या म्हणणें म्हणजे मूर्खपणा आहे; कारण त्यांत ब्रिटिशांनीं आपली सत्ता

ईव्ह क्यूरी

अकबर इलाहाबादी

काढून घेतांच लोकशाही राष्ट्रांना मदत करण्याचें आश्वासन आहे आणि रशिया व चीन ह्यांचें संरक्षण कार्यक्षम रीतीनें व्हावें म्हणून स्वतंत्र भारत मदत करील असें म्हटलें आहे." १ जानेवारीला शेवटीं गांधीजींनीं पुन्हा लिनलिथगोना पत्र लिहिलें. प्रो. भन्साळींचा उपवास सुरू झाला होता. अष्टी-चिमुरला जे अत्याचार झाले त्यांच्या चौकशीची त्यांनीं मागणी केली होती. पण सरकारनें ऐकलें नाहीं. गांधीजींना भन्साळींशीं पत्रव्यवहार करूं दिला नाहीं. सरकारनें कळविलें, "तुम्ही त्यांना उपास बंद करावयाला सांगत असाल तर तें पत्र त्यांना पोचवूं" गांधीजींनीं लिहिलें, "मला खरी परिस्थिति त्यांच्यापासून कळूं द्या. त्यांच्याशीं मला टेलिफोनवरून बोलूं द्या. मग काय तो सल्ला मी त्यांना देईन." त्याच पत्रांत त्यांनीं लिहिलें, "मी १९१४ मध्यें भारतांत आलों. १९०६ मध्यें मला माझें ईश्वरदत्त कार्य समजलें. मानव-जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सत्य आणि अहिंसेचा प्रचार करणें हें माझें जीवनकार्य म्हणून एक सत्याग्रही ह्या नात्यानें तुम्ही मला माझा गुन्हा शाबीत करून द्या. मी माफी मागेन." पण सरकारनें अपप्रचार चालूच ठेवला होता.

शिवरामपंत परांजपे

गांधीजींचा उपवास

गांधीजी जेलमध्यें नेहमीं म्हणत,

लॉर्ड लिनलिथगो

हा लढा सहा महिने चालेल. सहा महिन्यांत कांहींतरी निकाल लागला पाहिजे. पण सरकार दडपशाही करीत होतें, वाटेल ते आरोप कॉंग्रेसवर करीत होतें व कॉंग्रेसची बाजू कोणाला मांडूं देत नव्हतें. गांधीजींनीं वारंवार विनंती केली, आमच्या वरचे आरोप सिद्ध करा. सरकार प्रत्येक वेळीं गांधीजींना लिही कीं तुम्ही हिंसेचा धिक्कार करा. ही हिंसक चळवळ परत घ्या, 'चले जाव' ठराव परत घ्या. गांधीजींनीं लिहिलें, "ठराव परत घेण्याचें काम वर्किंग कमिटीचें. चळवळ आम्हीं सुरू करण्यापूर्वींच तुम्हीं पकडलेंत. आणि हिंसेचा धिक्कार करावयाचें तुम्ही म्हणतां, पण सरकारनें व्यापक प्रमाणावर निर्बुद्ध अटकांचें सत्र सुरू करून हिंसेचें पाऊल टाकलें. हिंसा सुसंघटित आणि व्यापक प्रमाणावर सरकारनें केली म्हणजे कांहीं ती कमी हिंसा होत नाहीं. आणि ह्याच्याच भरीला हिंदुस्थानांत जे लाखों लोक आज अन्नाला मोताद झाले आहेत त्यांची भर घाला. ही हिंसा जर बंद करायची तर त्याला कॉंग्रेसनें सुचविलें तसें राष्ट्रीय सरकारच हवें." पुढें त्यांनीं लिहिलें, "जर मला ह्यांतून न्याय मिळाला नाहीं तर सत्याग्रहाचें अखेरचें शस्त्र–उपवास–मला हातीं घ्यावें लागेल. मी २१ दिवसांचा उपवास करावयाचें ठरवीत आहें. देवाची इच्छा असेल तर ह्या दिव्यांतून पार पडेन. तुमच्या न्यायासनापेक्षां ईश्वरी न्यायासन वरिष्ठ आहे. त्याच्याकडे मी न्याय मागत आहें."

सरकारनें गांधीजींच्या पत्रानंतरही आपला ताठरपणा सोडला नाहीं. उलट गांधीजींना "तुमचा हा उपवास म्हणजे 'पोलिटिकल ब्लॅकमेलिंग' आहे" असें लिहिलें. पण गांधीजींनीं लिहिलें, "तुमच्याकडून न्याय न

मिळाल्यानें मला ईश्वरी न्यायासनासमोर माझी बाजू मांडली पाहिजे. मला माझ्या निष्पापतेबद्दल पूर्ण खात्री आहे."

न्यायासाठीं उपवास

आणि १० फेब्रुवारीला गांधीजींचा उपवास (Capacity fast) सुरू झाला. साऱ्या जगाला धक्का बसला. हिंदुस्थानची जनता काळजीनें चूर झाली. ह्या उपवासानें गांधीजींचा ठावठिकाणा जाहीर रीतीनें लोकांना कळला. साऱ्या हिंदुस्थानांतून सत्याग्रहींचे जथ्थे आगाखान महालावर सत्याग्रहार्थ येऊं लागले. पुन्हा जेलं भरूं लागले. पण राष्ट्रपित्याच्या जिवाशीं सरकार खेळ करीत होतें. आपल्याच घमेंडींत होतें. उपवासासंबंधीं आपलें निवेदन सरकारनें प्रसिद्ध करावें अशी गांधीजींनीं मागणी केली, पण सरकारनें ती धुडकावली. अशी गांधीजींची व काँग्रेसची बदनामी करावी म्हणून ह्याच वेळीं "१९४२ मधील घातपाताची काँग्रेसवरील जबाबदारी" म्हणून एक पुस्तिका सरकारनें टॉटनहॅम ह्यांच्या नांवानें प्रसिद्ध केली. पुस्तकाच्या निवेदनांत निर्लज्जपणें लिहिलें कीं "लोकांच्या मागणीवरून ही पुस्तिका प्रसिद्ध करीत आहोंत." गांधीजींच्या उपवासाचें तर ह्या पुस्तिकेनें एक प्रकारें समर्थनच केलें. राष्ट्रपित्याच्या प्रकृतीच्या वार्तेकडे सर्वांचें लक्ष लागून राहिलें होतें. सरकार डॉक्टरांच्या सहीचें एक त्रोटक पत्रक रोज प्रसिद्ध करीत असे. दिवसेंदिवस त्यांची प्रकृति खालावत होती. डॉक्टर चिंताक्रान्त झाले. पण सरकारनें ह्या वेळीं सर्व लाजलज्जा सोडली होती. गांधीजींचा मृत्यु झाला तरी त्याची त्यांना फिकीर नव्हती. गांधीजींचा मृत्यु घडला तर काय करावयाचें ह्याविषयीं त्यांच्या योजना चालल्या होत्या. एक दिवस मोठा बाका आला. गांधीजींची नाडी त्या दिवशीं लागेना. सारे डॉक्टर घाबरले. काय करावें त्यांना सुचेना. पण मोसंबीचा रस पाणी घालून त्यांना दिला. त्यांची नाडी पुन्हा लागूं लागली. डॉक्टरांच्या जिवांत जीव आला. त्यांनीं पत्रक काढलें कीं गांधीजी कसे वांचले ह्याचें आम्हांला आश्चर्य वाटतें.

सर होमी मोदी

आमचें शास्त्र येथें निकामी ठरलें. गांधीजींनीं मृत्यूलाही पराभूत केलें आहे आणि सरकारनें गांधीजींच्या मृत्यूनंतर करावयाची योजना, ती बातमी लोकांना कळूं देऊं नये म्हणून घेतलेली खबरदारी, ह्याचें वृत्त चळवळ चालविणाऱ्यांना कळलें. ते चिंताक्रांत झाले. राष्ट्रपित्याच्या मृत्यूनंतर का राष्ट्र असेंच मेल्यासारखें राहाणार? त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले, पण जयप्रकाशनीं अति दुःखानें पत्रक लिहिलें. गांधीजी उपवासांतून खात्रीनें वांचणार असा लोकांना विश्वास वाटूं लागला. उपवासाच्या काळांत आगाखान महालाचे दरवाजे थोडे मोकळे झाले. कांहीं जवळच्या माणसांना त्या वेळीं आगाखान महालांत प्रवेश दिला होता.

ह्या उपवासाच्या काळांतही गांधीजींचा हास्यविनोद चाले. १९३२ सालीं त्यांनीं उपवास केला तेव्हांही जवळच्यांना ते प्रसन्न पत्रें लिहीत. ह्या उपवासाच्या काळांतही ते प्रसन्न असत. गांधीजींनीं उपवास केला, सरकारनें उपवासाची जबाबदारी गांधीजींच्यावरच टाकली. पण त्यांनीं उपवास कां केला हें जाहीर केलें नाहीं. एक दिवस कोणी तरी गांधीजींच्या उशाशीं म्हणालें, " हा उपवास गांधीजींनीं कां केला? "

गांधीजी म्हणाले, " देशांत लाखों लोक मानवनिर्मित उपासमारीनें मरत असतांना अहिंसक मनुष्य डोळ्यांवर कातडें ओढून बसूं शकत नाहीं. हा उपासमारीनें होणारा मनुष्यसंहार हेंही कांहीं उपवासाला लहान सहान कारण नाहीं. " गांधीजींना वाटे बंगालमध्यें पडलेल्या ह्या दुष्काळांतून हे लाखों लोक वांचवावयाचें म्हणजे आज राष्ट्रीय

नलिनीरंजन सरकार

सरकारच देशांत असलें पाहिजे. तेंच ह्या उपासमारीला आळा घालील, ही लाखों पीडित जनता वांचवूं शकेल.

२१ दिवसांचें उपोषण सुखरूप पार पडलें. देशांतल्या जनतेला हायसें वाटलें. सरकारनें ह्या उपासाच्या वेळीं जी अमानुष वृत्ति दाखविली तिच्या निषेधार्थ अणे, मोदी आणि सरकार ह्या व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीच्या तीन सभासदांनीं राजीनामे दिले. व्हाइसरॉय तेव्हां ताठरपणें म्हणाले, "हे तीन गेले तर तीनशें लोक माझ्या खिशांत तीं कामें करायला तयार आहेत." उपवास संपला आणि आगाखान महालाचे दरवाजे पुन्हा बंद झाले.

टॉटनहॅम बायबल

गांधीजींच्या उपवासाच्या वेळींच त्यांची बदनामी करण्यासाठीं सत्यासत्याची विशेष चाड न बाळगतां चार इकडलीं, चार तिकडलीं वाक्यें घेऊन सरकारनें एक पुस्तिका प्रसिद्ध केली होती. गांधीजींनीं ती पुस्तिका सरकार-कडून मागवून घेतली. त्यांतील असत्य गोष्टी पाहून त्यांना वाईट वाटलें. परंतु गांधीजी जन्मतःच विनोदी होते. त्यांनीं ह्या असत्यमय पुस्तकाचें नांव 'टॉटनहॅम बायबल' ठेवलें. त्यांचे सारे सहकारी त्या पत्रकाचा उल्लेख सरकारी बायबल किंवा टॉटनहॅम बायबल ह्या नांवानेंच करीत. कारण तें असत्यमय पुस्तक सरकारला सत्याची मूर्ति वाटत होतें.

टॉटनहॅम

प्रेसिडेंट रुझवेल्ट

गांधीजींनीं तें पुस्तक काळजीपूर्वक वाचलें. नंतर त्यांनीं त्या पुस्तकाचें एकेक वाक्य घेऊन उत्तर द्यावयाला सुरुवात केली. छापील ऐशीं पानें होतील एवढें विस्तृत उत्तर त्यांनीं लिहिलें. ह्या कामासाठीं त्यांनीं ४८ दिवस खर्च केले. टॉटनहॅमनें केलेल्या आरोपांच्या त्यांनीं चिंधड्या चिंधड्या उडविल्या. भारताच्या स्वातंत्र्य-संग्रामांतला तो एक ऐतिहासिक खलिता आहे. शेवटीं त्यांनीं लिहिलें, "सरकार ह्या बाबतींत फिर्यादी व न्यायाधीश दोन्ही बनूं पाहात आहे, पण हें न्यायाच्या दृष्टीनें विसंगत आहे. सरकारला आपली बाजू न्यायाची आहे असें वाटत असेल तर सरकारनें सर्व पत्रव्यवहार प्रसिद्ध करावा आणि एखाद्या नि:पक्षपाती न्यायासनासमोर आम्हांला उभें करावें." पण सरकारचा उद्दामपणा कायम होता. अमेरिकेचे प्रेसिडेंट रुझवेल्ट ह्यांचे वैयक्तिक प्रतिनिधि त्या वेळीं हिंदुस्थानांत आले होते. ते गांधीजींना भेटूं पाहात होते, पण त्यांनाही सरकारनें भेटूं दिलें नाहीं.

जेलमधील इतर प्रसंग

आगाखानांच्या प्रासादांत मुख्यत: गांधीजींनाच ठेवलें होतें. त्यामुळें त्यांच्यासाठीं सर्व स्वतंत्र व्यवस्था होती. प्रासादाच्या व्यवस्थेसाठीं इतर कैदी होते. आंत शिपायांचा व बाहेर दुसरा पाहारा असे. स्वतंत्र एक जेलरही होता. ह्या सर्वांच्यासाठीं सरकारचा खूप खर्च होत असे. गांधीजींना हें आवडत नसे आणि ब्रिटिश पार्लमेंटमध्यें गांधींच्यावर होणाऱ्या खर्चाबद्दल कोणींसा प्रश्न विचारला. गांधींना वर्तमानपत्रांत हें वाचायला मिळालें. त्यांना दु:ख झालें. त्यांनीं सरकारला लिहिलें, "माझ्यासाठीं सरकार विनाकारण एवढा खर्च करीत आहे. आगाखान प्रासादांत न

ठेवतां सरकारनें मला इतर सर्व राजबंद्यांच्या बरोबर जेलमध्यें ठेवावें." पण सरकारनें ऐकलें नाहीं. कोणीसें त्यांना म्हणालें, "बापू, तुमचें काय जातें! करीना सरकार खर्च करतें तर." गांधीजी म्हणाले, "ते कांहीं विलायतेंतून पैसा नाहीं आणीत खर्चायला. येथल्या कोडों गरिबांच्या खिशांतून पै पैसा सरकार काढीत असणार." गांधीजींना देशांतल्या कोट्यवधि गरीब बांधवांचें विस्मरण कधींच झालें नाहीं.

आणि एकदा जेलमध्यें कोणीं हापूसचे आंबे पाठविले. गांधीजींनीं ते खायचें नाकारलें व म्हणाले, "देशांतल्या लाखोंना हे आंबे कुठें खायला मिळत असतील."

गांधीजींच्या वर देखरेखीसाठीं कटेली नांवाचे एक जेलर सरकारनें नेमले होते. परंतु ते ह्या कैद्यांशीं समरस होऊन गेले. त्यांनीं गांधीजीच्या पहिल्या वाढदिवसाला ७४ रुपये व दुसऱ्याला ७५ रुपये हरिजन फंडासाठीं दिले. ते आगाखान महालांतच राहात. आणि एकदा पारशांचा सण पटेटी आला. ह्या सत्याग्रहींनीं कटेलींना नजराणे दिले. सुटतांना कटेलींना अश्रु आवरत ना. गांधीजींना ते म्हणाले, "पुन्हा आतां तुम्हांला जेलमध्यें ठेवण्याचा प्रसंग न येवो." त्याही दिवशीं त्यांनीं ७५ रुपये दिले व म्हणाले, "दुसरे मोठमोठ्या भेटी देतील, पण ह्या कटेलीची ही छोटी भेट पहिली."

जेलमध्यें ९ ऑगस्टचा क्रांतिदिन, २६ जानेवारीचा स्वातंत्र्यदिन, राष्ट्रीय सप्ताह, साजरे करण्यांत येत. ह्या प्रत्येक दिवशीं कैद्यांना जेवण देण्यांत येत असे. आणि ते कैदी भाग्यवान्! राष्ट्रीय सप्ताहांत गांधीजींनीं स्वतः त्यांना त्या राष्ट्रीय सप्ताहाचें महत्त्व समजावून सांगितलें. त्यांना जेवूं घातलें. स्वतः मात्र हुतात्म्यांच्या स्मरणार्थ उपवास केला.

विविध चर्चा

आगाखान महालांत गांधीजींनीं मार्क्सचीं पुस्तकेंही पाहून टाकलीं. रोज सकाळ संध्याकाळ ते नियमानें फिरत. त्या वेळीं विविध विषयांवर चर्चा चालत.

कार्ल मार्क्स

एकदा ट्रस्टीशिपच्या कल्पनेवर चर्चा निघाली. गांधीजी म्हणाले, "भांडवलदारांना मी स्वतःच्या संपत्तीचे तुम्ही मालक राहूं नका, विश्वस्त बना म्हणून सांगतों. पण मी असें नाहीं म्हणालों कीं पुढें भांडवलदारांवर अंकुश असणारच नाहीं. कायद्यानें त्यांचें कमिशन ठरविलें जाईल. जर स्वतः होऊन एखाद्या भांडवलदारानें विश्वस्ततेचा सिद्धान्त मानला नाहीं, तर मी म्हणेन, "तुम्हांला मालकी सोडावी लागेल. बहुसंख्यांकांच्या पुढें अल्पसंख्यांकांनीं मान तुकविलीच पाहिजे." प्रत्येक क्रांतीबरोबर वातावरण निर्माण होतें. लोक त्यागाला तयार होतात. आम जनतेंतील जागृति आणि त्यांच्या संघटनेच्या प्रभावापुढें भांडवलदार गुडघे टेकतील. पुंजीपतींचें बळ काँग्रेसच्या बंदुकांवर राहात असेल; पण जेव्हां ती बंदूकच राहाणार नाहीं तेव्हां त्यांना जनतेपुढें हार खावी लागेल. जर त्यांनीं स्वतः होऊन त्याग केला नाहीं तर एक गृहयुद्ध येथें होईल. पण गृहयुद्धाच्या भीतीनें समाजसुधारणेचें कार्य सोडतां येत नाहीं. जर आमच्यांत पुरेपूर अहिंसा असेल तर पंधराच दिवसांत सर्व ठाकठीक होईल. पण नाहींतर अधिक काळ संकट टिकेल. पण त्यानंतर जर माझा एखादा प्रतिनिधि शिल्लक राहिला तर अहिंसेच्या राज्यासाठीं तो प्रयत्न करील."

एक दिवस मार्क्सवादाबद्दल चर्चा निघाली. तेव्हां गांधीजी म्हणाले, "मार्क्सनें एक फार मोठें काम केलें आहे ह्यांत शंकाच नाहीं. त्यानें केलेलें समाजाच्या दुःखाचें निदान बरोबर असो, चूक असो, इतकें मात्र निश्चित कीं गरीब वर्गासाठीं कांहींतरी करण्याची तळमळ त्याच्याजवळ होती. मलाही मार्क्सप्रमाणें वाटतें कीं गरीब पायतळीं तुडविले जात आहेत, त्यांच्यासाठीं कांहींतरी केलें पाहिजे. मार्क्सनें जें पाहिलें त्याच्यावर

विचार केला. तो प्रतिभाशाली होता, विद्वान् होता. आपले विचार त्यानें प्रभावीपणें मांडले आहेत."

आणि एक दिवस अहिंसेबद्दल चर्चा निघाली. गांधीजी म्हणाले, "कुठें हिंसा झाली कीं पूर्वी मी लढा बंद करीत असें. परंतु हिंसेच्या थैमानांतही आतां मी माझी अहिंसा चालवीन. मागें चंपारण्याच्या सत्याग्रहाच्या वेळीं बिहारमध्यें पोलीस अन्याय करीत असतांनाही लोक केवळ पाहात राहिले. मीं विचारलें, तेव्हां ते म्हणाले, तुम्हींच सांगितलें ना, हिंसा करावयाची नाहीं. म्हणून आम्हीं प्रतिकार केला नाहीं. त्या उत्तरानें मला फार दुःख झालें. कायद्यांतही अहिंसक विरोधाला जागा असली पाहिजे. संघटित सरकारी हिंसेलाही तोंड देतां आलें पाहिजे."

एकदा हिंदुस्थानच्या खेड्यांबद्दल प्रश्न निघाला. गांधीजी म्हणाले, "खेड्यांचा प्रश्न केवळ चरखा, ग्रामोद्योगानें सुटणार नाहीं. त्याच्या जोडीला जमीनही हवी. स्वतंत्र हिंदुस्थानांत जमिनीची फेरवांटणी होईल. एक स्कॉचमन एका जहाजाच्या कप्तानाला भेटायला गेला. कप्तान नव्हता. जातांना तेथल्या माणसांना तो म्हणाला, 'कप्तानाला सांगा कीं मालकांपैकीं एक जण भेटायला आला होता.' जहाज बनविण्याचा धंदा राष्ट्रीय मालकीचा असल्यानें तेथें प्रत्येक जण मालक आहे, असें त्याचें म्हणणें होतें. येथेंही जमीन सर्वांची आहे आणि प्रत्येक जण मालक आहे. खरें तर नांगरील त्याची जमीन राहील. किसान जर जमीन पडीत ठेवील तरच ती काढून घ्यावी."

कस्तुरबा देवाघरीं

गांधीजी आगाखान महालांत अस्वस्थ चित्तानें कालक्रमणा करीत होते. कस्तुरबांचीही प्रकृति नादुरुस्त होती. महादेवभाई गेल्यापासून त्यांना बरें नव्हतें. त्या नेहमीं म्हणत, "महादेव, तुझ्याच शेजारीं मी येऊन राहीन." आणि ज्याला महादेव देसाई भीत होते तो गांधीजींचा

लॉर्ड वॅव्हेल

उपवासही झाला. कस्तुरबांच्या प्रार्थनेनें, पुण्याईनें जणूं गांधीजी त्यांतून पार पडले. पण बांची तब्येत दिवसेंदिवस चिंताजनक होत होती. बापूजी आणि इतर मंडळी शुश्रूषा करीत होती. पण अखेरीस २२ फेब्रुवारी १९४४ ला त्यांनीं बापूंच्या मांडीवर आपला देह सोडला. महादेव-भाईच्या समाधीशेजारींच त्यांच्या देहाला अग्नि देण्यांत आला. सरकारचा ताठा कायमच होता. कस्तुरबांच्या दहनक्रियेला फक्त शंभर लोकांनाच सरकारनें येऊं दिलें. गांधीजींच्या डोळ्यांसमोर सारा जीवनपट उभा राहिला. त्यांच्या जवळच्यांपैकीं अत्यंत जवळच्या अशा दोन स्वकीयांचें स्वातंत्र्याच्या ह्या चळवळींत बलिदान झाले. गांधीजी नेहमीं म्हणत कीं जर पुन्हा मला पत्नी निवडायचा प्रसंग आला तर जन्मोजन्मीं मी कस्तुरबांचीच निवड करीन. गांधीजी दहनभूमीवर हजर होते. दुपारचीं उन्हें आलीं तरी बापू चितेजवळच होते. लोक म्हणाले, "बापू, तुम्ही जा, आम्ही राहातों इथें." बापू म्हणाले, "६२ वर्षें बरोबर राहिलों. आतां शेवटच्या दिवशीं मला कसली घाई आहे? आणि बा काय म्हणेल?" बापूंच्या ह्या उत्तरानें साऱ्यांच्या डोळयांत अश्रु उभे राहिले. तो प्रसंग करुण होता.

आणि इकडे लिनलिथगो जाऊन वॅव्हेल व्हाइसरॉय झाला. लिनलिथगो-इतका तो माणुसकीला पारखा झालेला मनुष्य नव्हता. वॅव्हेलनें सहानुभूतीचा संदेश बापूंना पाठविला. बापूजींनीं त्याला उत्तर दिलें. कस्तुरबांचें त्यांत हृदयस्पर्शी वर्णन आहे. इतकी भावपूर्ण श्रद्धांजलि कस्तुरबांना कोणीं वाहिली नसेल.

कस्तुरबांच्या निधनानंतर मालवीयजींनीं पुढाकार घेऊन कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारकनिधि ७५ लाख रुपयांचा, येणाऱ्या गांधीजयंतीला गांधीजींना अर्पण करावयाचा संकल्प सोडला आणि कोटीच्या वर हा निधि जमला.

पी. सी. जोशी

सुटका

गांधीजींना ह्यानंतर मलेरियाचा त्रास होऊं लागला. दिवसेंदिवस अशक्तता येऊं लागली. साऱ्या देशांतलीं मनें हळवीं झालीं होतीं. दोन बलिदानें आगाखान महालांतच झालीं होतीं. शेवटीं सरकारनें १४ मे, १९४४ ला गांधीजींना बिनशर्त सोडून दिलें. प्रकृतीच्या कारणावरून आपल्याला सोडल्यामुळें गांधीजींना जराही आनंद झाला नाहीं. ते म्हणाले, "अशा प्रकारें प्रकृतीच्या कारणासाठीं सुटावें लागलें ह्याची मला शरम वाटते. ज्यानें आध्यात्मिक प्रगति केली आहे तो कधीं आजारी पडत नाहीं. त्याची सर्व शक्ति आणि स्वास्थ्य अखेरपर्यंत कायम राहातें. ज्याचें मन पूर्ण स्वच्छ आणि स्वस्थ आहे त्याचें शरीरही तसेंच असलें पाहिजे." देशांत उदासीनता पसरत होती, लोक गांजून गेले होते. गांधीजींनीं पुन्हा लोकहिताच्या कार्याला आरंभ केला. सरकारनें सर्वत्र सभाबंदीचा कायदा जाहीर करून सबंध देश म्हणजेच एक तुरुंग बनवून टाकला होता. गांधीजींनीं ही कोंडी फोडली. त्यांनीं सामुदायिक प्रार्थनेला सुरुवात केली. तेथें प्रार्थनोत्तर ते प्रवचनेंही देऊं लागले.

गांधी–पी. सी. पत्रव्यवहार

गांधीजी जेलमधून सुटले त्या वेळीं हिंदी कम्युनिस्ट पक्षाचे पी. सी. जोशी सेक्रेटरी होते. १९४२ च्या 'चले जाव' लढ्याच्या वेळीं हिंदी

नगर वाचनालय सातार.
संगणकीकरण

कम्युनिस्टपक्ष ‘ लोकयुद्ध ’ ची गर्जना करीत होता. त्यानें सरकारशीं हातमिळवणी केली होती. गांधीजींनीं ‘ चले जाव ’ ठरावाचें स्पष्टीकरण करतांना वेळोवेळीं हें सांगितलें होतें कीं “ चीन आणि रशिया ह्या दोन देशांना जर परिणामकारक रीतीनें मदत करावयाची असेल तर हिंदुस्थानच्या मानेवरचें गुलामगिरीचें जूं निघालें पाहिजे. चीन आणि रशिया ह्यांच्या स्वातंत्र्याला कोणत्याही प्रकारें धोका पोचूं नये अशी माझी तीव्र इच्छा आहे. ” पण सरकारनें ऐकलें नाहीं. कम्युनिस्ट पार्टीनेंही गांधीजींची ही दृष्टि लक्षांत घेतली नाहीं आणि कॉंग्रेसला आणि गांधीजींना जपानचे हस्तक, हुकूमशाहीचे पुरस्कर्ते, देशद्रोही, वगैरे शेलकीं विशेषणें बहाल केलीं. परंतु तरीही सौजन्यमूर्ति गांधीजींनीं पी. सी. जोशींशीं अत्यंत खुल्या दिलानें पत्रव्यवहार केला. कम्युनिस्टांच्या अंतरंगावर ह्या पत्रव्यवहारामुळें चांगलाच प्रकाशझोत पडला.

निसर्गोपचार

गांधीजींची प्रकृति, ते सुटले तेव्हां अस्वस्थच होती. ते पुण्याला डॉ. दिनशा मेहतांच्या निसर्गोपचारगृहांत राहिले होते. तेथेंच त्यांच्या सायंकाळच्या प्रार्थना होत. गांधीजींची आफ्रिकेपासून निसर्गोपचारावर श्रद्धा बसली होती. ज्या पंचमहाभूतांचें शरीर बनलें आहे, त्याच पंचमहा-भूतांच्या उपयोगानें शरीराची दरेक विकृति दूर झाली पाहिजे. भारतांतली कोट्यवधि जनता महाग औषधें कोठून आणणार ? हिंदुस्थानच्या दृष्टीनें निसर्गोपचाराच्या प्रचाराची आवश्यकता गांधीजींना वाटत होती. त्यासाठीं त्यांनीं पुढें उरुळीकांचन येथें जागा घेतली. तेथें निसर्गोपचारभुवन काढलें. गरीब, श्रीमंत सर्वांना तें खुलें राहावें अशी त्यांची इच्छा होती.

गांधीजींच्या सहवासांत जे कोणी येत, त्यांच्या जीवनावर गांधीजींचा परिणाम झाल्यावांचून राहात नसे. त्यांनीं तर आपलें सर्वस्वच देशाच्या चरणीं वाहिलें होतें. स्वतः त्यांनीं फकिरी पत्करलीच होती, पण इतरांनाही

फकिरी पत्करायला लावण्यांत त्यांना आनंद वाटे. दिनशा मेहतांच्याकडे गांधीजी राहिले. दिनशांच्यावर परिणाम झाला. त्यांनीं आपल्या निसर्गोपचारगृहाचा ट्रस्ट करावयाचें ठरविलें. गांधीजींची इच्छा होती कीं उरुळीकांचनला निसर्गोपचाराचें एक अखिल भारतीय शिक्षणकेंद्र उभें व्हावें.

गांधी-जीना वाटाघाटी

गांधीजींची नेहमीं इच्छा असे कीं व्हाइसरॉयकडे याचना करायला जाण्यापेक्षां हिंदुस्थानच्या जनतेनें आपसांत सारें ठरवून घ्यावें व तो निर्णय सांगायला सरकारकडे जावें. क्रिप्स वाटाघाटीच्या वेळींदेखील गांधीजींनीं जीनांना अगोदर सांगितलें कीं आपण अगोदर आपसांत ठरवूं व एक निर्णय करून आपलें म्हणणें मांडूं. पण त्या वेळीं जमलें नाहीं. तरीही गांधीजी आशा राखून होते. गांधीजी जेलमध्यें असतांना लीगचें अधिवेशन भरलें. जीना अध्यक्ष होते. आपल्या भाषणांत ते म्हणाले, "गांधींनीं मला पत्र लिहावें. जगांतली कोणती सत्ता तें अडवून ठेवते, पाहूं दे." गांधीजींना जीं वृत्तपत्रें वाचावयास मिळत त्यांत 'डॉन' हें मुस्लिम लीगचें मुखपत्रही असे. गांधीजींनीं ही बातमी वाचली. त्यांना बरें वाटलें. ब्रिटिशांशिवाय जर वाटाघाटी झाल्या व एकोपा झाला तर उत्तमच. पण ते तर जेलमध्यें होते. जीनांना सद्बुद्धि सुचली असें त्यांना वाटलें. त्यांनीं जेलमध्यें एक पत्र जीनांना लिहिलें आणि तें पत्र सरकारनें जीनांना पाठवावें असें कळविलें; पण सरकारनें तें पत्र द्यायचें नाकारलें. पण गांधीजींनीं असें पत्र लिहिलें आहे, एवढेंच जाहीर केलें. सरकारला कोणाची किती ताकद आहे हें पाहावयाचेंच होतें. पण जीना मूग गिळून स्वस्थ बसले.

गांधीजी नम्रतेची मूर्ति. मानवाच्या मनांतील सद्वृत्तींबद्दल विश्वास बाळगणारे. सौजन्य तर त्यांच्या वागणुकींत सर्वत्र दरवळलेलें असे. सुटल्यानंतर देशांतली उदासीनता व सर्वत्र पसरलेली भूक आणि भीक

पाहून त्यांचा आत्मा तळमळे. ह्यांतून मार्ग काढला पाहिजे. त्यासाठीं ते प्रयत्न करीत होते. त्यांनीं १७ जुलैला जीनांना पत्र लिहिलें. हें पत्र त्यांनीं गुजराथींत लिहिलें. जीनांची मातृभाषा गुजराथी. त्याची जीनांना जणूं जाणीव द्यावयाची होती. त्यानंतर त्यांच्यांत पत्रव्यवहार झाला. पुढें मुंबईत बोलणीं झालीं. परंतु दोघांची वृत्ति भिन्न. गांधीजी. All human mind is necessarily one : सर्व मानवी मन हें एकच आहे असें मानणारे व साऱ्या विश्वाचें एक संघराज्य असावें असें मानणारे. त्यासाठीं आवश्यक इतका त्यांचा दृष्टिकोन उदार व मन मोठें. जीनांचें सारेंच उलट. स्वतःच्या भावावरसुद्धा विश्वास न ठेवण्याइतके ते संशयात्मे. गांधीजी सर्वसंगपरित्यागी तर जीनांना राज्यसत्तेचा लोभ. तेव्हां अशा दोन भिन्न वृत्तींच्या माणसांचें जमावें कसें? त्या वेळच्या त्यांच्या मुलाखती आणि पत्रव्यवहार ह्यांमधून दोघांचें स्वभावदर्शन फार चांगल्या प्रकारें होतें. गांधीजींचें सौजन्य भेटीला जाण्यापासूनच प्रतीत होत होतें.

विधायक कार्याला चालना

प्रत्यक्ष प्रतिकार एवढाच लढा अशी गांधीजींची कल्पना कधींच नव्हती. त्यांनीं १९४२ च्या लढ्यानंतर सांगितलें होतें, "Battle of freedom can never stop till it is achieved." स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्वातंत्र्ययुद्ध चालूच असतें. ह्या स्वातंत्र्यायुद्धाला आवश्यक असें वातावरण, जागृति व संघटना विधायक कार्यांतूनच होते. उद्यां स्वातंत्र्यांत जी समाजरचना उभी करावयाची त्यासाठीं पायाभूत असें हें काम आहे अशी गांधीजींची श्रद्धा होती. रचनात्मक काम म्हणजे मानवतेचें काम असें ते मानीत. ह्यामुळेंच सुटल्यावर त्यांनीं पुन्हा विधायक कार्याला चालना दिली. परंतु रचनात्मक कार्यांचा त्यांनीं विस्तार केला. समाजाच्या सर्वांगांना स्पर्श करील इतका तो विधायक कार्यक्रम त्यांनीं व्यापक केला. जातीय ऐक्य, अस्पृश्यतानिवारण, व्यसनमुक्ति,

चर्चिल

खादी, ग्रामोद्योग, ग्रामसफाई, नई तालीमचें शिक्षण, प्रौढ शिक्षण, स्त्री-संघटना, आदिवासी सेवा, आरोग्य व स्वच्छतेचें शिक्षण, राष्ट्रभाषा – प्रचार, मातृभाषाप्रेम वाढविणें, आर्थिक समतेसाठीं आंदोलन, किसान - कामगार - विद्यार्थी ह्यांच्या संघटना, असा सर्वविध कार्यक्रम त्यांनीं जनतेपुढें ठेवला आणि जनतेंतील कर्तृत्वशक्तीला आवाहन केलें. ही जणूं नवजीवनाची चळवळ होती.

युद्धाची समाप्ति

आणि तिकडे युरोपांत जर्मनीचा पराभव झाला. जपानचा पराभवही दृष्टीच्या टप्प्यांत दिसूं लागला. इंग्लंडमधलें संमिश्र मंत्रिमंडळ मोडून पुन्हा नव्या निवडणुका करण्याचें ठरलें. इंग्लंडमधलें लोकमत आपल्याला अनुकूल करून घ्यावयाचें, तर भारताचा प्रश्न डावलून व आतांप्रमाणें उद्दामपणा करून चालणार नाहीं हें चर्चिलना प्रतीत होत होतें. त्यांनीं भारताचा प्रश्न हाताळावयाचें ठरविलें. "मी इंग्लंडचें साम्राज्य बुडवायला मुख्य प्रधान झालों नाहीं" असें म्हणणारे चर्चिल व 'चले जाव'चा ठराव मागें घेतल्यावांचून कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना नाहींच सोडणार असें म्हणणारे व्हाइसरॉय ह्या दोघांनाही कॉंग्रेसचे पुढारी बंधमुक्त करावे लागले आणि वाटाघाटींचें नवें पर्व सुरु झालें.

व्हाइसरॉयनें सल्ला देण्यासाठीं गांधीजींना दिल्लीला बोलावून घेतलें. इंग्लंडमध्यें निवडणुका झाल्या. मजूरपक्ष अधिकारावर आला. त्रिमंत्री वाटाघाटीसाठीं आले. मध्य सरकारांत कॉंग्रेसनें प्रवेश केला. एकत्र जबाबदारीच्या पद्धतीनें त्यांनीं काम सुरु केलें.

लॉर्ड माउंटबॅटन

वॅव्हेल जणूं रबर स्टँप बनला; पण त्यानें लीगशीं वाटाघाटी केल्या. लीगनें मागून मंत्रिमंडळांत प्रवेश केला. उपप्रमुख म्हणून जवाहरलालजींना ते मानीनात. त्यांनीं एकत्र जबाबदारीचें तत्त्वही धाब्यावर बसविलें व स्वत: स्वतंत्रपणें व्हाइसरॉयला जबाबदार असल्याप्रमाणें ते वागूं लागले. व्हाइसरॉयला हेंच हवें होतें. पुढें वॅव्हेलला परत बोलाविण्यांत आलें. माउंटबॅटनना व्हाइसरॉय म्हणून पाठविलें.

हरिजन सुरू

तिकडे ॲटमबाँब टाकून जपानचाही पराभव झाला. दोस्त राष्ट्रें विजयी झालीं. परंतु ह्या युद्धामुळें सारी मानवजात हादरली. हा विजयही पराजया-इतकाच महाग पडला. साम्राज्यें परवडेनाशीं झालीं. स्वातंत्र्य मिळणार असें वाटूं लागलें. त्या दृष्टीनें वाटाघाटी सुरूच होत्या. एका हिंसक संहारांतून जग बाहेर पडलें होतें. जगाला शांततेची भूक होती. गांधीजींकडे साऱ्या जगांतून लोक डोळे लावून बसले होते. गांधींचें म्हणणें काय हें जाणून घेण्याची लोकांना उत्सुकता होती. जगाच्या कानाकोपऱ्यांतून पत्रें येत होतीं. गांधीजींचा हरिजन १९४२ मध्यें सरकारनें जप्त केला होता. गांधीजींनीं पुन्हा हरिजनचें प्रकाशन सुरू केलें. पहिल्याच अंकांत त्यांनीं लिहिलें, "ॲटम बॉबमुळें अहिंसेवरचा माझा विश्वास ढळला तर नाहींच, उलट वाढला आहे. ॲटमबॉबसारखें अति संहारक शस्त्र निघालें आहे. आतां मानवजात वांचायची असेल तर अहिंसेवांचून गत्यंतरच नाहीं."

पूर्वेचा दौरा

दुष्काळांतून बंगाल नुकताच बाहेर पडला होता. आसाम तर सैनिक-क्षेत्रच बनला होता. ओरिसा भारताचें एक दुर्लक्षिलेलें बालक आहे.

ह्या सर्वांकडे जावयाचें होतें. तिकडे दक्षिणेंत मद्रासला गांधीजींनीं ‘ दक्षिण भारत हिंदी प्रचार सभे ’ तर्फे राष्ट्रभाषाप्रचारकार्याची मुहूर्तमेढ रोवली त्याला पंचवीस वर्षे झालीं होतीं व सभेची रजतजयंती साजरी करावयाची होती. त्यासाठीं गांधीजींना जावयाचें होतें. आजारीपणामुळें, सुटल्यावर ते ह्या दौऱ्यासाठीं शक्तिसंचय करीत होते. दक्षिणेंत जावयाचें, तेथल्या जनतेला भाऊ म्हणावयाचें तर तें त्यांच्या भाषेंत म्हणतां यावें म्हणून ते तामीळची उजळणी करूं लागले. बंगालीचे धडे गिरवूं लागले आणि त्यांचा हा दौरा यशस्वीपणें पार पडला.

भंगीवाड्यांत वस्ती

स्वातंत्र्य जवळ येत असल्याचें दिसत होतें. परंतु राजकीय स्वातंत्र्य म्हणजे खरें स्वातंत्र्य नाहीं. आर्थिक, सामाजिक व नैतिक स्वातंत्र्यासाठीं लोकांचीं मनें कोठें तयार आहेत ? हरिजनांवरचे अन्याय कोठें दूर झाले आहेत ? त्यांना अस्पृश्य मानण्यांत आपण कांहीं चुकतों असेंही लोकांना वाटत नाहीं. गांधीजींना तर ह्या सामाजिक समतेची तळमळ होती पण त्यांच्या गुजराथेंतूनच हरिजनांना असमानतेनें वागविल्याच्या बातम्या आल्या तेव्हां गांधीजी फार अस्वस्थ झाले. त्यांनीं लगेच आपला निश्चय जाहीर केला, आतां भंगीवस्तींतच उतरावयाचें. ते दिल्लीला गेले आणि भंगीवस्तींत उतरले. भंगीवस्तीची साफसफाई झाली. सर्व प्रकारचे लोक तेथें येऊं लागले. तेथल्या हरिजनांत नवजीवन आलें.

नौखालींतले अत्याचार

तिकडे घटनासमितीच्या वाटाघाटी होत होत्या. लीगची सर्व वाटाघाटींत मानहानि झाली होती. लीगचे पदाधिकारी खवळले होते. आपली पाकिस्तानची मागणी गुंडगिरीनें पूर्ण करावयाचें त्यांनीं ठरविलें. बंगालमध्यें त्यांचें मंत्रिमंडळ अधिकारावर होतें. जीनांनीं पाकिस्तानसाठीं प्रत्यक्ष कृतिदिन म्हणून २६ ऑगस्ट हा दिवस जाहीर केला आणि जिकडे

तिकडे दंगली पेरल्या. नौखालींत हिंदूंवर अमानुष अत्याचार झाले. आठ दिवस तेथली बातमी लीग मंत्रिमंडळानें बाहेर फुटूं दिली नाहीं. पुढें बातमी कळली. तेथें लष्कर पाठवायचा विचार होऊं लागला. पण मध्यवर्ती सरकारांतले लीगमंत्री आडवे आले. बंगालमध्यें लीग मंत्रिमंडळ आणि प्रांतिक स्वायत्ततेच्या कायद्याप्रमाणें न्याय व शांततारक्षणाची जबाबदारी तर प्रांतावर. तेथल्या जनतेचा वाली कोण ? तिकडे जायला कोणाला धैर्य होईना.

अश्रु पुसायला धावले

परंतु मानवतेची ही विटंबना थांबवायला, तेथल्या दुःखी बंधुभगिनींचे अश्रु पुसायला महात्माजी धावून गेले. नौखालीचे निर्वासित कलकत्त्याला आले. तेथेंही दंगल पेटली. खुनाखुनी सुरू झाली. बंगालच्या मंत्रिमंडळाला ही लाट थोपविणें कठीण वाटलें. गांधीजी आले तों कलकत्त्यासच दंगल होती. गांधीजी कलकत्ता शांत करण्यासाठीं थांबले. सामुदायिक प्रार्थना सुरू झाली. धर्माच्या नांवानें ही अमानुषता कशी चालते ! ही तर गुंडगिरी ! खऱ्या धर्माचें लोकांना भान करून दिलें पाहिजे म्हणून ही त्यांची धर्मयात्रा जणूं सुरू होती. कलकत्त्याला ते म्हणाले, "दुसऱ्याला कोणत्याही तऱ्हेनें पीडा न देणें, कोणाशीं शत्रुत्व न करणें व ईश्वरशरणता मानणें ह्याला धर्म म्हणतात." स्वातंत्र्योन्मुख राष्ट्राचे लोक संरक्षणासाठीं गव्हर्नर, पोलीस व लष्कर ह्यांच्यावर अवलंबून राहातात ह्याचें त्यांना दुःख होई. "गव्हर्नर, पोलीस, लष्कर ह्यांच्यावर स्वातंत्र्योन्मुख लोकांनीं अवलंबून राहाणें लाजिरवाणें आहे. चिरशांति लोकच निर्माण करूं शकतात. आपलीं शूर निर्भय अंतःकरणेंच रक्षणाला अधिक उपयोगी पडतील." असें ते म्हणाले. "बदला घेणें हें दुष्टचक्र आहे. बदल्याची भावना निर्माण झाली कीं तिला अंत ना पार. बदल्याची भावना अंतःकरणांतून काढून टाकली पाहिजे. आपला आपणच वध करतों. शरीर तर जाणारच असतें, पण

आत्महिंसा सर्वांत भयंकर ! ह्या गांधीला गांधीशिवाय कोण मारूं शकेल ? दुष्टाचा द्वेष करूं नका मी म्हणतों. पण दुष्टाला त्याचा दुष्कृत्याबद्दल बजावणें मात्र कर्तव्य आहे, नाहींतर तो भित्रेपणा होईल."

गौतम बुद्ध

मुसलमानांच्या समोर जाऊन त्यांनीं बजावलें, "इस्लाम तर म्हणतो कीं एकाही निर्दोष माणसाला जर मारलें तर मानवतेच्या विरुद्ध तो गुन्हा आहे. ज्यांनीं अत्याचार केले त्यांना शासन करणें मी समजूं शकतों पण अन्याय करणारा निघून गेल्यावर त्याच्या निर्दोष जातवाल्यांना मारणें म्हणजे रानटीपणा आहे."

गांधीजी कलकत्याला शांत करीत होते तों बिहारमधल्या दंगलीची बातमी आली.

दुधाचा त्याग.

गांधीजींचा आहार मुख्यत: फळें आणि दूध. बिहारमधल्या दंगलीची बातमी आल्यावर गांधीजींना दु:ख झालें. सूडाच्या भावनेनें सारा बिहार जणूं पेटला होता. माणुसकी सारे विसरले होते. चंपारण्याच्या सत्याग्रहाच्या वेळेपासून गांधीजींचा आणि बिहारचा संबंध. गौतम-बुद्धाचा बिहार, व्रजकिशोर बाबूंचा, राजेंद्रांचा, जयप्रकाशांचा, शूर, राष्ट्रीय वृत्तीचा बिहार जातीयतेनें पागल कसा बनला ? आपली माणुसकी कशी विसरला ? इतका पिसाट कसा बनला ? गांधीजींनीं बिहारमध्यें शांतता होईपर्यंत दूध सोडलें. त्यांनीं कळविलें, "बिहारवर माझें प्रेम आहे. बिहार पिसाट झाल्यानें मला दु:ख झालें. असले अमानुष प्रकार मी उघड्या डोळ्यांनीं पाहूं शकत नाहीं. मी बिहारी लोकांना संधि देत

आहे. आजपासून मीं दूध सोडलें आहे. जर परिस्थिति अशीच राहिली तर मला उपवासही करावा लागेल."

गांधीजी ६ तारखेला नौखालीला निघाले. हिंदुमुसलमानांपैकीं जातीय दृष्टीचे लोक गांधीजींवर ह्यामुळें चिडले. त्यांना मुसलमानांनीं विचारलें, "बिहारमध्यें एवढा दंगा झाला तरी तुम्ही तिकडे कां जात नाहीं ?" हिंदूनीं विचारलें, "नौखालींत एवढी दंगल झाली तरी तुम्ही उपास कां करीत नाहीं ?" दोन्ही पक्षांच्या जातीय पुढाऱ्यांना वाटे कीं आपल्या अपराधांवर पांघरूण पडावें. गांधीजींनीं दोघांना सांगितलें, "बिहारमध्यें मीं सेवा केली आहे. ते माझे आहेत. त्यांना माझ्याबद्दल आत्मीयता आहे. मी उपास करतों म्हटलें तरी त्यांच्यावर परिणाम होईल. तेवढ्यानेंही बिहारमध्यें सारें ठीक होईल. मी तिथें जाण्याची गरज नाहीं. नौखालींत अत्याचार झाले. तेथील जनता घाबरली आहे. त्यांच्यांत निर्भयता आणायला मला स्वतःलाच तिकडे गेलें पाहिजे." दोघांचे प्रश्न म्हणजेच एकमेकांना उत्तरें होतीं. गांधीजी नौखालींत गेले.

नौखालींत काय दिसलें?

नौखालींत अमानुष अत्याचार झाले होते. गुंडांनीं धुमाकूळ घातला होता. स्त्रियांवर अत्याचार केले होते. त्यांचीं सक्तीनें लग्नं लावलीं होतीं. बळजबरीनें कलमा वाचायला लावून लोकांना मुसलमान केलें होतें. अनेकांना ठार करून जळत्या घरांत फेकण्यांत आलें होतें. शेतीवाडी, घरें उध्वस्त झालीं होतीं. स्त्रियांचें कुंकू पुसून, त्यांच्या बांगड्या फोडून, त्यांनाही मुसलमान बनविण्यांत आलें होतें. सक्तीचीं धर्मान्तरें होतीं, सक्तीनें देणग्या आणि दंड वसूल केले होते. मानवतेची जेवढी म्हणून विटंबना करणें शक्य होतें तेवढी सर्व तेथें झाली होती आणि ह्या दुःखी लोकांना दिलासा द्यायलाही कोणी जायला धजावत नव्हते. गांधीजी म्हणाले, "मी येथें कॉंग्रेसवाला म्हणून आलों नाहीं. ईश्वराचा सेवक

म्हणून आलों आहें. मानवांतील सद्वृत्तींवर माझी श्रद्धा आहे. गुंडांना शरण गेलेली सद्वृत्ति मला जागी करावयाची आहे. जर सतींचे अश्रु पुसतां आले तर मी स्वत:ला धन्य मानीन."

मी बंगाली होणार

बंगालचें दुखणें खोल होतें. वरवरच्या मलमपट्टीनें बरें होण्यासारखें तें नव्हतें. गांधीजींनीं बंगालमध्येंच राहावयाचें ठरविलें व म्हणाले, "करेंगे या मरेंगे ह्या ध्येयानें मी आतां येथें काम करणार. माझ्यांत प्रांतीयता नाहीं. मी भारतीय आहें आणि म्हणूनच इथल्या लोकांइतकाच बंगालीही आहें." आणि गांधीजींनीं बंगालीचे धडे घ्यावयाला सुरुवात केली.

अभय प्रवर्तनाचा उपाय

गांधीजींनीं पाहिलें तों तेथें हिंदु जनता अत्यंत भयग्रस्त झाली होती. एका ठिकाणीं चौकशी केली तर लोकांनीं सांगितलें, "एक मौलवी येऊन सर्वांना कलमा पढवून जातात. इच्छा नसतांना तो पढावा लागतो." "मग तुम्ही घरीं जाऊन रामनाम कां घेत नाहीं ?" त्यांना विचारलें. तर ते लोक घरांतही देवाचें नांव घ्यायला भीत होते. गांधीजींच्या दृष्टीनें रामनाम हा अभय प्रवर्तनाचा उपाय होता. ते रोजच्या प्रार्थनेंत राम-धुन गात. ते म्हणाले, "संकटाला तोंड न देतां पळ काढणें म्हणजे मानवावरचा आणि ईश्वरावरचा आपला विश्वास सोडून देण्यासारखेंच आहे. मानवतेवरचा विश्वास गमाविण्यापेक्षां मेलेलें परवडेल."

एकला चलो रे

परंतु अत्याचारांनीं त्रस्त असा नौखालींतला प्रदेश फार मोठा होता. एकटे गांधीजी किती ठिकाणीं पुरे पडणार ? गांधीजींच्याबरोबर बरेच लोक असत. गांधीजींनीं त्या सार्‍यांना कसोटीवर घासावयाचें

ठरविलें. त्यांनीं वीस नोव्हेंबरला सर्वांना निरोप दिला व म्हणाले, " आतां सर्वांनीं एक एक ठाणें घेऊन काम करावयाचें. मीही आतां एकटा जाणार. माझ्या अहिंसेची आतां खरी कसोटी आहे. अहिंसक हा निर्भय असलाच पाहिजे. मी आणि माझे सहकारी अभय प्रवर्तन करतां करतां आपलें जीवन समर्पण करूं. निर्भयतेनें जगावें कसें हें शिकवूं. निदान शूरपणें स्वतःच्या मानव्याची विटंबना करून न घेतां मरावें कसें हें तरी आम्ही शिकवूं. "

एक संवाद

पुष्कळांना वाटे गांधीजी भोळे आहेत, बावळट आहेत. गांधीजी तसे नव्हते. त्यांची मानवतेवरची श्रद्धा जबरदस्त होती. प्रत्येक माणसांत सदंश आहे हें ते जाणीत होते. परंतु कांहीं लोक ह्याचा फायदा घेऊं पाहात. गांधींना, स्तुति करून, खूप करुन त्यांची फसगत करावी म्हणून कांहीं बनवीत तर कांहीं त्यांना प्रश्नाच्या कचाट्यांत पकडूं पाहात. पण सत्यनिष्ठाचा पराभव कोण करणार ? नौखालींतले मुसलमान एकदा गांधीजींकडे आले आणि म्हणाले, " पोलिसांनींच मुसलमानांवर फार अत्याचार केले. फार मुसलमान मारले गेले. हिंदु फार थोडे मारले गेले."

"मग लष्कर कशासाठीं बोलावलें ?"

" लीगच्या राजवटीला बदनाम करण्यासाठीं हिंदु येथून पळून जात आहेत."

" आपलें घरदार, सर्वस्व सोडून उगीच कोण पळून जाईल ? इतकी लुटालूट झाली ती तर खोटी नाहीं ना ? "

" पण हिंदु लोक घरें सोडून पळाल्यावर लुटालूट झाली. "

" पण ते घरें सोडून सुखासुखी गेले ? "

" तसे गुंड फार नाहींत. शेकडा एक गुंड असेल. ९९ टक्के लोक चांगले आहेत. "

" जर ९९ टक्के लोक चांगले होते तर एव्हढे अत्याचार होतांना ते गप्प कसे बसले? चांगले जर खऱ्या अर्थानें चांगले असतील तर त्यांनीं वाइटांशीं लढलें पाहिजे. केवळ तोंड पाहात राहाणें म्हणजे चांगलेपणा नव्हे. तिकडे जीना पाकिस्तानांत न्यायानें वागवूं म्हणून म्हणतात, पण तो न्याय कुठें आहे ? "

मश्रुवाला

राम नामाची धास्ती

गांधीजींनीं रामरहीम जोडल्यामुळें पुन्हा लोक रागावत. मुसलमान म्हणत तुम्ही प्रार्थनेंत कुराणाच्या आयता कशाला म्हणतां ? रामनामाशीं रहीम कशाला जोडतां ? आणि शेवटीं मुसलमानांनीं रामनामावर बहिष्कार घातला. गांधीजींनीं मुलें जमविलीं. त्यांनीं गांवांतून राम-धूनची फेरी काढली. अभयप्रवर्तन हेंच मोठें कार्य त्यांच्यापुढें होतें. पुढें ज्या ठिकाणीं घरांतही रामनाम घ्यायला लोक भीत त्याच नौखालींत राम-धून निघूं लागली. " मी येथें मुसलमानांजवळ बोलायला आलों असें नाहीं. मला हिंदूंनाही विचारायचें आहे कीं तुम्ही एव्हढे भित्रे कसे झालांत ? "

इतर कामें बाजूला

नौखालींतली अवमानित मानवता पुन्हा सन्मानानें प्रस्थापित करण्याच्या कामाचा गांधीजींनीं ध्यास घेतला होता. 'हरिजन' पत्र त्यांना प्राणप्रिय वाटे. सर्व जगांतल्या विचारकांशीं त्यांचा हरिजनद्वारें संबंध असे. पण नौखालीपुढें त्यांना इतर कामें कमी महत्त्वाचीं वाटत. त्यांनीं जाहीर केलें, " ह्यापुढें माझा पत्रव्यवहार अत्यंत महत्त्वाचा तेवढाच चालू राहील. हरिजनचें कार्यही मी पाहूं शकणार नाहीं. काका कालेलकर, विनोबा, मश्रुवाला, नरहरिभाई आतां हरिजन सांभाळतील. "

बंकिमचंद्र चतर्जी

माझें हृदय रडत आहे

श्रीरामपूरनंतर लखमीपूर भागांत गांधीजींची पायीं यात्रा सुरू झाली. त्यांनीं पादत्राणें सोडलीं. लखमीपूर भागांत फिरतांना लहान मुलांचीं अर्धवट जळलेलीं प्रेतें गांधीजींना दिसलीं. त्यांना वाईट वाटलें. म्हणाले, "हिंदुमुसलमान हा प्रश्न नाहीं पण मानव इतका क्रूर कसा होऊं शकतो ?" पुढें म्हणाले, "हीं अशीं दृश्यें पाहूनही माझ्या डोळ्यांत मीं अश्रु येऊं दिले नाहींत ; कारण एक अश्रु ढाळणारा दुसऱ्या अश्रु ढाळणाऱ्याचे अश्रु काय पुसणार ? पण माझें हृदय रडत आहे." प्रार्थनेच्या वेळीं गांधीजींच्या रक्षणार्थ बंगाल सरकारनें पोलीस ठेवले होते. एक दिवस हूल उठली, पोलीस धरपकड करणार आहेत. त्यामुळें घाबरून मुसलमान प्रार्थनेला आले नाहींत. गांधीजी प्रार्थनेनंतर म्हणाले, "मीं स्वतःला ईश्वराच्या हातीं सोपविलें आहे. मला कधीं दुसरें संरक्षण लागत नाहीं. परंतु इथल्या अधिकाऱ्यांना मला संरक्षण दिल्यावांचून जाऊं द्यायला भीति वाटते. ही लाजिरवाणी गोष्ट आहे. पण माझ्यापेक्षां येथल्या मुसलमानांना ती अधिक लाजिरवाणी आहे."

विश्वाला कवटाळणाऱ्या रवींद्रांचा आणि वंदेमातरम् गाणाऱ्या बंकिम-बाबूंचा बंगाल, चित्तगांवच्या शूर क्रांतिकारकांचा बंगाल भित्रा बनल्याचें गांधीजींना आश्चर्य वाटे. "मुसलमान पागल बनले हें विशेष वाईट नाहीं, पण इतक्या हिंदूंनीं उघड्या डोळ्यांनीं हें सारें पाहिलें हें फार भयंकर आहे. जे लोक स्वातंत्र्यापेक्षां सुरक्षिततेला अधिक किंमत देतात त्यांना जगायचाही अधिकार नाहीं." गांधीजींनीं शक्यतों लीगच्या मुसलमानांच्या घरींच उतरावयाचें ठरविलें. त्यांच्या अंतःकरणाला हात घालावयाची त्यांची

दृष्टि होती. लीगवाल्यांना हें नको होतें. कोणी म्हणाले, "तुमची व्यवस्था तेथें कोण ठेवणार?" "मी माझें सारें पाहीन. मला कुणाच्या सेवेची जरुरी नाहीं. माझ्या गरजाही फार थोड्या आहेत. मला राहावयाची जागा आणि पाणी स्वच्छ हवें व माझ्या पद्धतीनें आणि श्रद्धेप्रमाणें प्रार्थना करावयाची परवानगी असली कीं पुरे."

अमतुल सलाम

ह्या अभयप्रवर्तन यात्रेंत गांधीजींना मदतीला कोणी नसे. त्यांनाच बरेंचसें काम करावें लागे. दिवसाचे १८–२० तास ते काम करीत. कधीं कधीं रात्रीं २–२॥ वाजतांच कामाला लागत.

अमतुल सलाम

गांधीजींच्या मानवतेमुळें त्यांच्याकडे कितीतरी लोक आकर्षित होऊन येत. अमतुल सलाम ह्याही एक मुस्लिम महिला अशाच प्रकारें गांधीजींकडे १९३० मध्यें आल्या. त्या पतियाळच्या राहाणाऱ्या. एका खानदान घराण्यांतल्या. हिंदु-मुसलमान ऐक्यासाठीं त्या तहानेलेल्या असत. त्यासाठीं त्यांनीं 'इतेहाद' नांवाचें वर्तमानपत्रही चालविलें होतें. प्रत्यक्ष सेवाकार्यांतही त्यांना गोडी वाटे. १९४२ सालीं बंगालमध्यें भयंकर दुष्काळ पडला, तेव्हां त्या तेथें काम करावयास गेल्या होत्या. त्यानंतर पुन्हा गांधीजींच्याजवळ राहूं लागल्या. नौखालींतल्या अत्याचारांच्या बातमीनें त्या अशान्त झाल्या. स्त्रियांवरच्या अत्याचारांनीं तर त्यांना धक्काच बसला. गांधीजी नौखालींत जाण्यापूर्वीं त्या तिकडे धावल्या. त्यांना गुंडांची कधीं भीति वाटली नाहीं, प्राणांची पर्वा वाटली नाहीं. अपहृत स्त्रियांच्या सुटकेचें कार्य त्यांनीं सुरू केलें. पण पुढें मुसलमानांचा विरोध होऊं लागला. प्रतिष्ठित लोकही तोंडदेखली सहानुभूति दाखवीत. शेवटीं निर्वाणीचा उपाय

म्हणून त्यांनीं उपवास सुरू केला. त्यांच्या उपवासानें मुसलमानांत खळबळ माजली. लोक गांधीजींना गळ घालूं लागले. म्हणाले, "त्यांना उपवास सोडायला सांगा." गांधीजी म्हणाले, "ती माझी मुलगी आहे. तिनें जावें असें मला कसें वाटेल, पण मुसलमानांच्या असहिष्णुतेनें दुःखी होऊन तिनें उपास सुरू केला आहे. मुसलमान स्त्रियांची इज्जत करीत नसले तर तिला जगावें असें वाटत नाहीं. स्थानिक मुसलमानांनीं पश्चात्ताप व्यक्त करावा आणि अपहृत स्त्रिया परत करण्यासाठीं तिला मदत करावी म्हणजे ती उपवास सोडील." आणि ती शूर स्त्री जराही कचरली नाहीं. अंगांत १०४° ताप असतांना तिचा उपवास सुरू झाला. दिवसें-दिवस अशक्तता वाढतच होती. म्हणत होत्या, "मी मृत्यूच्या समीप गेल्यावर गांधीजी आले म्हणजे पुरेत. त्यांच्या मांडीवर समाधानानें मृत्यु यावा ही माझी इच्छा आहे." उपवासाचा २५ वा दिवस होता. गांधीजींच्या यात्रेतला तो दिवस त्याच गांवासाठीं दिला होता. गांधीजी आले. अमतुल सलामच्या क्षीण मुखावर हास्यरेखा चमकली. गांवच्या मुसलमानांनीं आपल्या सह्यांनिशीं एक प्रतिज्ञापत्रक दिलें. अपहृत स्त्रियांच्या शोधांत सर्व प्रकारची मदत करण्याचें आश्वासन त्यांनीं दिलें होतें. गांधीजींच्या हस्तें मोसंबीचा रस घेऊन अमतुल सलामचा उपवास सुटला. गांधीजींच्या समवेत असे कार्यकर्ते होते.

एका ठिकाणीं मुसलमानांनीं गांधीजींना सांगितलें, "सरकार खटले भरतें म्हणून हा द्वेषाग्नि शांत होत नाहीं. मुसलमानांवरचे खटले सरकारला काढून घ्यायला सांगा."

गांधीजी म्हणाले, "गुन्हेगारांना न्यायासनासमोर खेचण्याचा शांततेवर काय परिणाम व्हायचा आहे ?"

आशियाला संदेश

दिल्लींत वाटाघाटी चालू होत्या. गांधीजींचा सल्ला मोलाचा आहे असें माउन्टबॅटननाही वाटत होतें. त्यांनीं गांधीजींना दिल्लीला बोलावून

घेतलें. गांधीजी आले. त्याच वेळीं आशियांतर्गत राष्ट्रांची परिषद जवाहरलालजींनीं बोलावली होती. आशियायी राष्ट्रांची मैत्री दृढ करण्याचा तो प्रयत्न होता. गांधीजी दोन दिवस हजर राहिले. गांधीजींनीं त्यांना सांगितलें, "जर हें जग एकतेच्या मार्गाकडे जाणार नसेल तर मला त्यांत राहायला आवडणार नाहीं. हें स्वप्न 'ह्याचि देहीं ह्याचि डोळां' दिसावें अशीही माझी इच्छा आहे. पश्चिमेला आशियानेंच थोर महात्मे दिले आहेत. बुद्ध, येशू, महमद आशियांतलेच. राम, कृष्ण येथलेच. आशियाची एकी करायची ती युरोपला किंवा कोणाला गुलाम करून सूड घेण्यासाठीं नाहीं. पाश्चिमात्यांना एकच संदेश द्यायचा आहे आणि तो म्हणजे सत्य प्रेमाचा."

फाळणीनें दुःख

गांधीजी पुन्हा बिहारमध्यें गेले. त्यांच्याच जोडीला सत्यप्रेमाचा संदेश घेऊन सरहद्द गांधी बादशाहाखानही गेले. ते बिहारमध्यें राहिले. गांधीजी पुन्हा बंगालमध्यें गेले. मानवतेच्या अधःपातानें दोघांनाही फार दुःख झालें होतें. सामान्य जनतेमधील निद्रिस्त मानवता जागवायला दोघे निघाले होते आणि माउंटबॅटननें फाळणीची योजना कॉंग्रेस आणि लीग ह्यांना पटविली. ३ जूनला घोषणा झाली. गांधीजींना वाईट वाटलें. त्यापेक्षां त्रिमंत्री योजना बरी होती असें ते म्हणाले. "मीं जिनांच्या द्विराष्ट्रवादाला कधींच मान्यता दिली नाहीं आणि देणारही नाहीं. धर्म बदलला कीं राष्ट्रीयत्व कसें बदलतें तें अजूनही माझ्या ध्यानांत येत नाहीं. भौगोलिक दृष्टीनें देशाचे तुकडे झाले तरी त्यांत एक आत्मा निर्माण करण्याचा मी प्रयत्न करीन."

फाळणीची योजना जाहीर झाली आणि स्थलान्तरें सुरू झालीं. गांधीजी ह्या स्थलान्तरितांच्या सेवेला लागले.

शेख अबदुल्ला

काश्मीर

हिंदुस्थानच्याच नव्हे तर जगाच्या दृष्टीनें काश्मीर हें एक अत्यंत महत्त्वाचें संस्थान. त्याचें काय होणार ? तें पाकिस्तानांत जाणार कीं हिंदुस्थानांत, कीं स्वतंत्र, कीं इतरांच्या राजकीय डावपेचांचें क्षेत्र बनणार ? काश्मीरचे सारे पुढारी तर जेलमध्यें पडले होते. काश्मीरचा दिवाण काक कपटी डाव खेळत होता. आणि गांधीजी काश्मीरमध्यें गेले. चार पांच दिवस ते काश्मीरमध्यें होते. जम्मूलाही गेले. पुढें वाहच्या निर्वासित छावणींतही ते गेले. महाराजांची त्यांची भेट झाली. शेख अबदुल्लांच्या पत्नीलाही ते भेटले. काश्मीरच्या कार्यकर्त्यांना स्वातंत्र्याच्या वाटाघाटींच्या काळांत आपल्याकडे दुर्लक्ष केलें असें वाटूं नये म्हणून गांधीजी पंडितजींऐवजीं गेले होते. पुढें काश्मीरवर आक्रमकांनीं हल्ला केला. श्रीनगरपर्यंत त्यांनीं मुसंडी मारली. भारताशीं काश्मीर संलग्न झालें. सैन्य धाडण्यांत आलें. पाकिस्तानांतून एक पत्र गांधीजींना आलें. हिंदी सैन्य काढून घेतलें पाहिजे, वगैरे त्यांत लिहिलें होतें. गांधीजींनीं प्रार्थनाप्रवचनांत सांगितलें, “ काश्मीरच्या महाराजांच्या आणि जनतेच्या विनंतीवरून आक्रमकांना हाकून लावण्यासाठीं हिंदी सैन्य तेथें गेलें आहे. सारे आक्रमक जेव्हां काश्मीरच्या भूमीवरून बाहेर पडतील, काश्मीरमध्यें सर्वत्र शांतता व सुव्यवस्था होईल, तेव्हां हिंदी सैन्य काढून घेण्यांत येईल आणि तेथल्या जनतेच्या मताप्रमाणें तेथला कारभार चालेल. ”

स्वातंत्र्य-दिन

१५ ऑगस्ट ही सत्तान्तराची तारीख ठरली. गांधीजी बिहार व बंगालच्या दौऱ्यावर होते. राजधानींत सुखसोहळा चालला होता. पण

राष्ट्रपिता शांतियात्रेसाठीं कलकत्त्यांत गेला होता. त्यांना ब्रिटिशांच्या साम्राज्यशाही मगरमिठींतून सुटल्यानें बरें वाटलें. पण ब्रिटिश जाणें म्हणजे का स्वातंत्र्य? भाऊ भावाचे गळे कापीत आहेत हें का स्वातंत्र्य ? ”

दिल्लींत दंगल

परंतु राष्ट्रपिता तिकडे बिहार बंगालमध्यें शांतता करीत होता, तर इकडे जातीयवादी दिल्ली काबीज करण्याचे मनसुबे रचीत होते. स्वातंत्र्यदिन साजरा झाला आणि दिल्लींत दंगलीला सुरुवात झाली. राजधानींत जर अराजक माजलें तर इतरत्रही माजेल अशी शक्यता होती. दिल्लींत दंगल झाल्यानें गांधीजींना अत्यंत दु:ख झालें. ते म्हणाले, “ माझ्या देशाच्या राजधानींत दंगल होत आहे. तेथें हिंदुमुसलमान सारे सुखासमाधानानें राहूं शकत नाहींत. मी कोणत्या तोंडानें पाकिस्तानला सांगूं कीं तुमच्याकडले दंगे थांबवा. मला दिल्ली शांत करूं दे. मग मी पाकिस्तानांत जाईन. ” गांधीजी दिल्लीला परतले. आपली सर्व शक्ति लावून दिल्लींत शांति निर्मूं लागले. परंतु गांधीजींच्या कामानें भागेना. शेवटीं त्यांनीं उपवास सुरू केला. दिवसेंदिवस गांधीजींची प्रकृति खालावूं लागली. सामान्य जनतेला चिंता वाटूं लागली, तेव्हां सर्वपक्षीय मंडळी एकत्र जमली. त्यांनीं एक सात कलमी प्रतिज्ञापत्रक तयार केलें. दिल्लींत सुखशांति नांदेल असें करूं, भारताचा नागरिक असलेल्या प्रत्येकाला सन्मानानें राहातां येईल असे वागूं. अशा प्रतिज्ञा-पत्रकावर त्यांनीं सह्या केल्या. १८ जानेवारीला गांधीजींनीं उपवास सोडला.

बॉंब फुटला

१९ जानेवारीला प्रार्थनासभेंत आवाज झाला. गांधीजींचें तिकडे लक्षही नव्हतें. मागून कळलें, गांधीजींवरच बॉंब फेकण्यांत आलेला होता, पण चुकला. गांधीजी दुसऱ्या दिवशीं प्रार्थनेनंतर प्रवचनांत म्हणाले, “ तो बॉंब माझ्यावरच फेकण्यांत आलेला आहे हें जर मला समजलें असतें तर मी कसा वागलों असतों देवाला माहिती ! पण अशा प्रकारें मृत्यु येत असतांही जर माझ्या तोंडावर प्रसन्नता राहिली आणि दुष्कृत्य करणाऱ्याच्याबद्दल

तपस्वी कोंडा वेंकटपय्या

यत्किंचितही राग मनांत नसला तर ती खरी गौरवाची गोष्ट. ज्या लोकांनीं त्या बाँब-स्फोटांतून मी वांचलों म्हणून अभिनंदन केलें त्यांना मला हें सांगावयाचें आहे. ''

त्यांनीं प्रार्थनेनंतर पोलीस अधिकाऱ्याला बोलावून घेतलें आणि बाँब फेकणाऱ्या त्या चुकलेल्या तरुणाला कोणत्याही प्रकारें त्रास देऊं नका म्हणून सांगितलें.

काळ येत होता

गांधीजींचें कार्य सुरू होतें. ते नेहमीं म्हणत कीं सव्वाशें वर्षें जगण्याची माझी इच्छा आहे. त्याला आधार म्हणून ते उपनिषदाचा एक मंत्र नेहमीं सांगत.

" इहलोकीं कर्में करीत करीत
शंभर वर्षें जगण्याची इच्छा धरावी.
तुला देहवन्ताला हाचि मार्ग आहे
याहून वेगळा मार्ग नाहीं ॥

गांधीजींचा हा मंत्र नित्य प्रार्थनेंतला होता, परंतु मानवतेवरचा जातीयतेचा कलंक पाहून त्यांना सर्वत्र काळोख काळोख वाटे. म्हणत, मी प्रकाश शोधीत आहें. एकदा लिहिलें, " आतां मीं १२५ वर्षें जगण्याची इच्छा सोडून दिली आहे."

काँग्रेस लोक-सेवक संघ बनवा

देशांत सर्वत्र काँग्रेसजनांच्या होत असलेल्या अधःपाताच्या व सत्तासंघर्षाच्या वातम्या गांधीजींच्या कानांवर नित्य येत. आंध्रचे तपस्वी आणि वयोवृद्ध देशभक्त कोंडा वेंकटपय्या ह्यांनींही गांधीजींना तसें लिहिलें होतें. स्वातंत्र्यपूर्व काळांतील राजकीय स्वातंत्र्यासाठीं लढणारी काँग्रेस आतां

निरुपयोगी होती. रचनात्मक काम, कमी बोलबाला असलेल्या आणि अधिक निष्ठेची व त्यागाची जरुरी असलेल्या, रचनात्मक काम करणाऱ्या निष्ठावान् सेवकांची संघटना हें स्वरूप काँग्रेसचें असावें असें त्यांना वाटे. त्यासाठीं त्यांनीं काँग्रेसची नवी घटना बनविली. दिल्लींत शांतता झाली कीं पाकिस्तानमध्यें जावयाचें त्यांच्या फार मनांत होतें.

१९३३ सालची गोष्ट

१९३३ सालीं गांधीजींनीं, सरकार 'हरिजन' सुरू करावयाला परवानगी देईना म्हणून उपवास सुरू केला. गांधीजींना सरकारनें सोडून दिलें. प्रकृतिस्वास्थ्यासाठीं थोडे दिवस पर्णकुटीवर राहायचें त्यांनीं ठरविलें होतें. एक दिवस ते म्हणाले, "मला सरकार सोडणार नाहीं, तसेंच मरूं देईल असें वाटत होतें. मी त्यासाठीं तयारही झालों होतों. माझ्याजवळ माझ्या म्हणण्यासारख्या ज्या दोन चार वस्तु होत्या त्या तेथल्या नर्सना बक्षीस म्हणून देऊनही टाकल्या." गांधीजी जरासे थांबले. मग त्यांच्याजवळ असलेल्या आनंद हिंगोराणींना ते म्हणाले, "मी जर उपासांत मेलों असतों तर लोकांना काय वाटलें असतें ?"

"तें तर दिव्य मरण होतें बापू."

"पागल. तें तूं दिव्य मरण समजतोस? उपवासानें मरण म्हणजे वीरमरण असें मला नाहीं वाटत. त्यांत कोठें आहे वीरता? माझ्या कुंडलींत काय आहे, आहे ठाऊक?"

"पण बापू, कण कण झिजून मरण्यांत शौर्य नाहीं वाटत तुम्हांला? कणकण झिजून मरण्याला फार मोठें धैर्य लागतें."

"मला नाहीं तसें वाटत. माझें मरण एक तर फाशीच्या तक्त्यावर होणार, नाहीं तर बंदुकीच्या गोळ्यांनीं मी मरणार. हें खरें वीरमरण. उपवासानें मरण्यांत मला कांहीं विशेष वाटत नाहीं."

गांधीजींची सही आपल्यापाशीं असणें हा अनेकांना गौरव वाटे. गांधीजींची सही हवी असेल त्याला हरिजनफंडाला पांच रुपये द्यावे लागत. लोक खुशीनें पांच रुपये देऊन .गांधीजींची सही घेत. जानेवारीच्या २९ तारखेला एक तरुण असाच गांधीजींकडे आला. म्हणाला, " दोन तारखेला तुम्ही वर्ध्याला जाणार. आज सही द्या. "

" कोण म्हणतें मी वर्ध्याला जाणार ? "

" वर्तमानपत्रांत आलें आहे. "

गांधीजी हसले. म्हणाले, " मींही त्या गांधीविषयीं असें वाचलें आहे खरें. पण वर्ध्याला जाणारा हा गांधी कोण आहे मला ठाऊक नाहीं ! "

तो भयंकर दिवस

गांधीजी नित्याप्रमाणें तीस तारखेला सकाळीं ३॥ वाजतां उठले. त्यांचा दिनक्रम प्रार्थनेनें सुरू होई. त्यांनीं प्रार्थना केली. प्रार्थनेनंतर ते लगेच कामाला लागले. काम करून ते थोडा वेळ झोपले. असे नेहमींच ते झोपत. नंतर उठले. शौचमुखमार्जन आटोपून पुन्हा कामाला बसले. आठ वाजतां त्यांची मालिशची वेळ असे. मालिशला जातांना त्यांनीं प्यारेलालना काँग्रेसच्या घटनेचा खर्डा सुधारून लिहून ठेवायला सांगितलें. मालिशनंतर स्नानाला जाण्यापूर्वीं परत आले. मद्रासकडे दुष्काळाच्या भीषण छाया पडूं लागल्या होत्या. त्या वार्तांमुळें गांधीजी गंभीर झाले होते. " निसर्गानें अन्नाव्यतिरिक्त जे पदार्थ खाण्यासारखे ठेवले आहेत त्यांचा उपयोग करावयाला शिकलें पाहिजे, सवयी बदलल्या पाहिजेत. जर एवढें करूं शकलों तर ह्या दुष्काळांतून सहीसलामत पार पडतां येईल. " म्हणाले, प्यारेलालना आपल्या बंगालच्या अनुभवांच्या आधारावर एक लेख तयार करावयाला त्यांनीं सांगितलें.

आदल्या रात्रीं बराच वेळ जागल्यानें त्यांना थकवा आलेला होता. परंतु स्नानानंतर हा थकवा जाऊन चेहेऱ्यावर जरा तजेला दिसूं लागला.

श्यामाप्रसाद मुकर्जी

पुन्हा त्यांचें तें प्रसन्न हास्य चेहेऱ्यावर विलसूं लागलें. एक कार्यकर्ता गांवाला जाणार होता. पण त्याला तेथेंच पाहून गांधीजींनीं विचारलें, "जाणार ना होतास ? मग अजून इथेंच कसा ?"

"बापू, टांगा मिळाला नाहीं, त्यामुळें जातां आलें नाहीं."

"मग चालत कां नाहीं गेलास ? आंध्रमध्यें १९४५ च्या दौऱ्यांत आमच्या गाडीचें पेट्रोल अचानक मध्येंच संपलें. मी प्यारेलालला कागदपत्र व जरूरी सामान घ्यायला सांगितलें. तेरा मैलांवरच्या स्टेशनवर आम्ही पायीं गेलों."

९।-९॥ वाजतां नेहमीं ते न्याहारी घेत. त्याप्रमाणें त्यांनीं न्याहारी घेतली. रोज ह्या वेळीं ते बंगालीचे धडे घेत. त्याप्रमाणें त्यांनीं बंगालीचा धडा गिरवला. नौखालीच्या यात्रेपासून त्यांनीं नित्य बंगाली शिकायला सुरुवात केली होती; रोज थोडें फार बंगाली वाचीत, लिहीत. रवींद्रांचीं पदें ते गुणगुणत, कारण बंगाली बोलतां यायचें तर ती भाषा तोंडांत हवी. पूर्वीं महादेवभाई त्यांच्याजवळ असत. महादेवभाईंना बंगाली, मराठी चांगलें येत असे. रवींद्रांच्या कितीतरी कवितांचे अनुवाद त्यांनीं गुजरातींत करून ठेवले आहेत.

बंगाली शिकणें झाल्यावर कॉंग्रेसच्या घटनेचा खर्डा घेऊन ते पुन्हा बसले. राजेंद्रांची प्रकृति बरी नव्हती. गांधीजींनीं त्यांना भेटायला प्यारेलालना पाठविलें होतें, त्यांच्याकडे त्यांनीं चौकशी केली. श्यामाप्रसादांकडून आलेलें बंगालचें वृत्त त्यांनीं ऐकलें. त्यांतून बंगाल व नौखालीची चर्चा सुरू झाली. गांधीजी म्हणाले, "धार्मिक स्वातंत्र्या-साठीं 'करेंगे या मरेंगे' ह्या धर्तीवर एक मोठा लढा केला पाहिजे."

अकरा साडे-अकराला मधल्या वेळचें जेवण त्यांनीं घेतलें. नंतर वामकुक्षी केली व पुन्हा कामाला सुरवात केली. सुधीर घोषना भेटले. कांहीं निर्वासित व इतर लोक भेटीला यायचे होते त्यांच्या भेटी घेतल्या. ४॥ वाजतां नेहमींप्रमाणें सायंकाळचें जेवण त्यांनीं घेतलें.

जेवण होतें न होतें तोंच सरदार पटेल आले. त्यांच्याशीं गांधीजींची चर्चा सुरू झाली. सरदार पटेल आणि पंडितजी ह्यांच्यामध्यें वेबनाव झाल्याबद्दल वृत्तपत्रांतून गवगवा होत होता. गांधीजी त्याच प्रश्नाबाबत सरदारांशीं बोलत होते. प्रार्थनेची वेळ होत आली होती. गांधीजींना सर्व कामें वेळच्या वेळीं व्हावींत असें वाटत असे. पण सरदारांशीं बोलण्यांत ते तन्मय झालेले. त्यांना कसें उठवायचें हा प्रश्न होता. पण त्यांच्या प्रार्थनेच्या वेळीं त्यांच्याबरोबर असणाऱ्या आभानें सूचक हालचाली करावयास सुरुवात केली व शेवटीं हातांत घड्याळ उचललें. त्यांच्या समोर धरलं. गांधीजी ताडकन् उठले. त्यांनीं हातपाय धुतले व ते प्रार्थनास्थानाकडे जायला निघाले.

“ दहा मिनिटें मला उशीर झाला आहे. उशीर होणें मला बिलकूल खपत नाहीं. अगदीं पांचाच्या ठोक्याला प्रार्थनेच्या जागीं पोचायला मला आवडतें.” ते असें पुटपुटत झपझप पावलें टाकीत जात होते.

३० जानेवारीला देवाघरचें बोलावणें आलें. एक मनुष्य आला. प्रार्थनेला महापुरुष जात होता. शुक्रवारचा दिवस. आणि गोळ्या झाडण्यांत आल्या. महापुरुषानें गोळ्या झाडणाऱ्याला प्रणाम केला. केवढा मोठा पुरुष ! केवढें महान् जीवन ! सर्वांना जवळ घ्या सांगणारे, सर्वांना सांभाळा सांगणारे ! त्यांना नव्हता भेदाभेद. मानवतेचे ते पूजक होते. सत्याचे उपासक होते. भीति त्यांना माहीत नव्हती. तुम्ही मोठे व्हाल तेव्हां त्यांचें आत्मचरित्र वाचा. त्यांची शिकवण आचरणांत आणा. भारतांतील सारे आमचे भाऊ हें जगांत सिद्ध करा. ह्या देशाचे नागरिक असूनही जगाचे नागरिक व्हा. स्वतःच्या देशाचें कल्याण जगाच्या

कल्याणाशीं जोडा. महात्माजी महापुरुष होते. ते मानवजातीचें हृदय बनले होते. त्यांनीं दिलेला प्रकाश कधीं नाहींसा होणार नाहीं. तो प्रकाश चुकणारीं पावलें नीट रस्त्यावरच आणील, द्वेषमत्सराचा अंधार दवडून प्रेमस्नेहाचीं जगांत फुलें फुलवील. खरें ना? करा त्यांच्या स्मृतीला प्रणाम – बापूजींना – राष्ट्रपित्याला प्रणाम !